एक देश, एक निवडणूक म्हणजे लोकसभा व विधानसभांच्या निवडणूका एकाच वेळी होतील म्हणजेच लोकसभेचे खासदार व विधानसभेचे आमदार हे सर्व सदस्य निवडण्यासाठी मतदार एकाच दिवशी मतदान करतील.

एक राष्ट्र, एक निवडणूक विधेयक :-

एक राष्ट्र, एक निवडणूक विषयीचे विधेयक १७ डिसेंबर २०२४ रोजी लोकसभेत मांडण्यात आले. केंद्रीय कायदामंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी विधेयक मांडत असतांना विरोधकांनी विधेयक मांडण्यावर मतदानाची मागणी केली. त्यावर २६९ सदस्यांनी विधेयक मांडण्याच्या बाजूने कोल दिला. तर १९८ सदस्यांनी विधेयक मांडण्याला विरोध केला. त्यात कॉंग्रेस, समाजवादी पार्टी, द्रमुक, शिवसेना (उबाठा) पक्ष, सीपीआय एम, आणि इतर विरोधी खासदारांचा समावेश होता ही विधेयक म्हणजे संविधानाच्या मुलभूत ढाच्यावर हल्ला असल्याचे सांगत त्यांचा मसुदा आधी संयुक्त संसदीय समितीकडे पाठवावा अशी मागणी विरोधी पक्ष सदस्यांनी केली. परंतु विरोधकांचे आरोप खोडून काढतांना अर्जुन राम मेघवाल यांनी देशाचे पहिले कायदामंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विधानाचा दाखला दिला संविधानाचे संघराज्याचे स्वरूप कोणीही बदलू शकत नाही. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या नेतृत्वाखाली नेमलेल्या उच्चस्तरीय समितीने एक राष्ट्र, एक निवडणूक ष संकल्पनेची अभ्यासपूर्ण तपासणी केली असून त्यात सर्व संबंधितांच आणि तज्ञांचं मत विचारत घेतलं आहे असे कायदामंत्री अर्जुन राम मेघवाल म्हणाले.

एकत्र निवडणुकांसाठी २०३४ ची प्रतिक्षा-

केंद्र सरकारने षएक राष्ट्र, एक निवडणूकष योजनेची तयारी सुरू केली असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी २०३४ ची प्रतिक्षा करावी लागेल व तसेच घटनादुरूस्ती आवश्यक असून २०२९ नंतरच्या विधानसभा निवडणूकांचे कार्यकाळ कमी करावे लागतील. षएक राष्ट्र, एक निवडणूक होण्यासाठी सरकारला घटना दुरूस्ती करावी लागणार आहे. याबाबतच्या विधेयकावर स्थापन आलेल्या संयुक्त संमटीय प्रमख पी.पी. चौधरी यांच्या मते, सन २०२९ नंतर ज्या राज्यांमध्ये विधानसभा निवडणूका होतील. त्यांचा झालेल्या संयुक्त संसदीय प्रमुख पी.पी. चौधरी यांच्या मते, सन २०२९ नंतर ज्या राज्यामध्ये विधानसभा निवडणूका होतील. त्याचा कार्यकाळ कमी करावा लागेल. सन २०३४ मध्ये होणा-या लोकसभा निवडणूकां सोबतच राज्यांच्या निवडणूका घेण्याच्या –ष्टीने बदल केले जातील व ही योजना तयार असली तरी सन २०३४ मध्ये प्रत्यक्ष निवडणूकीचे दुश्य त्या पद्धतीने बदलू शकते.
राज्यघटना (१२९ वी सुधारणा) विधेयक, २०२४ आणि केंद्रशासित प्रदेश कायदे (सुधारणा) विधेयक २०२४ ही घटना दुरूस्ती विधेयके नियमांनुसार संसद व संबंधित राज्यांच्या विधानसभेत मंजूर होईपर्यंत २०२९ ची लोकसभा निवडणूक पार पडलेली असेल, संसदीय मंजुरीनंतर राष्ट्रपती लोकसभा निवडणूकीनंतरच्या पहिल्या बैठकीची तारखेची अधिसुचना जारी करू शकतात. त्यावरून पुढील सार्वत्रिक निवडणूक कधी होईल हे कळेल तसे सन २०२९ मध्ये घडण्याची शक्यता आहे. त्यानंतर स्थापन झालेल्या सर्व राज्य विधानसभांचा कार्यकाळ लोकसभेच्या पाच वर्षाच्या कार्यकाळात संपेल, जर लोकसभा किंवा एखाद्या राज्याची विधानसभा पाच वर्षापूर्वी विसर्जित झाली. तर फक्त त्यानंतरच्या उर्वरित काळासाठी निवडणूका घेतल्या जातील.
एखाद्या राज्याच्या विधानसभा निवडणूका देशाच्या इतर भागांसोबत घेता येत नसल्याचे निवडणूक आयोगाला वाटल्यास ते राष्ट्रपतींना तसे शिफारस करू शकतात. राष्ट्रपती नंतर त्याच राज्यात वेगळ्या निवडणूका घेण्याचे आदेश देऊ शकतात असे विधेयकात म्हटले आहे. जेपीसीची कामकाजपद्धती लक्षात घेता याचा कार्यकाळ वाढवता येतो. कारण जेपीसी सदस्य राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना भेट देऊन त्यांच्या अंतिम शिफारशी देऊ इच्छितात. आतापर्यंतच्या या जेपीसीच्या सदस्यांनी फक्त महाराष्ट्र आणि उत्तराखंडला भेट दिली आहे. उत्तरप्रदेशात सन २०२७ नंतर २०३२ मध्ये विधानसभा निवडणूका आहेत. षएक राष्ट्र, एक निवडणूकष च्या प्रस्तावित अंमलबजावणीसाठी या नवीन विधानसभेचा कार्यकाळ फक्त दोन वर्षाचा असू शकतो. जेणेकरून सन २०३४ मध्ये लोकसभा निवडणूकीसोबत उत्तरप्रदेशात विधानसभा निवडणूका घेता येतील.

एक राष्ट्र, एक निवडणूकष घेण्याचे फायदे आणि तोटे :-

आपल्या देशामध्ये संविधान हे सर्वोच्च आहे संविधानामध्ये कायदेमंडळ, कार्यकारी मंडख आणि न्यायमंडख हे तीन लोकशाहीचे मुख्य आधारस्तंभ आहेत. आपले संविधान हे संघराज्य पद्धतीचे असल्याने, केंद्रसरकार व राज्य सरकार असे विभाजन आहे. त्या अनुषंगाने एक राष्ट्र एक निवडणूका घेण्याचे फायदे व तोटे काय ते खालीलप्रमाणे.

अ- फायदे :-

१. वारंवार होणा-या निवडणुकांमुळे होणाऱ्या कोट्यावधी रूपयांच्या खर्चाची बचत होईल निवडणूका एकत्रित घेतल्यास प्रचार, निवडणूका, व्यवस्थापन आणि सुरक्षा यावर होणारों खर्च मोठ्या प्रमाणावर कमी होईल.
२. निवडणूक आचारसंहितेमुळे प्रशासकीय व विकासात्मक कामे थांबतात. एकत्रित निवडणुकांमुळे ही समस्या कमी होईल आणि धोरणांमध्ये सातत्य राहील.
३. वारंवार निवडणूका झाल्यास मतदारांमध्ये थकवा येतो. एकत्रित निवडणूका मतदारांना सुलभ बनवतील आणि मतदार सहभाग वाढवतील.
४. निवडणूका वारंवार होण्यामुळे सरकार सतत निवडणुका प्रचारात व्यस्त राहते. एकत्रित निवडणूकांमुळे स्थिर आणि दिर्घकालीन धोरणे राबविण्यास मदत होईल.
५. वारंवार होणाऱ्या निवडणुकांमुळे होणारे ध्रुवीकरण आणि सामाजिक तणाव टाळता येतील.

ब. तोटे :-

१. एकत्र निवडणूका जर एकत्र घेतल्या तर काही राज्यांनी संघराज्यीय तत्त्वांना हानी पोहोचेल असे म्हटले आहे.
२. विश्वासदर्शक ठराव किंवा राजकीय संकटामुळे निवडणुकीचे वेळापत्रक कोलमडण्याची शक्यता आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

३. एकत्रित निवडणुकांमुळे राष्ट्रीय पक्षांचा प्रभाव जास्त असेल ज्यामुळे स्थानिक समस्या दुर्लक्षित राहण्याची शक्यता आहे.
४. स्थानिक पक्षांचा या प्रस्तावाला विरोध असल्याचा सर्वात महत्वाचा मुद्दा हा आहे की, निवडणूकीदरम्यान ते स्थानिक प्रश्न प्रभावीपणे मांडू शकणार नाहीत तसेच राष्ट्रीय पक्षांसोबत ते खर्च आणि रणनीती यामध्ये स्पर्धा करू शकणार नाहीत.
५. आयडीएफसी इन्स्टिट्यूटने केलेल्या अभ्यासानुसार ७७ टक्के शक्यता अशी असेल की, लोक राज्यातील आणि केंद्रातील एकाच पक्षाला निवडून देतील निवडणूका सहा महिन्यांच्या अंतराने ठेवली तर ६१ टक्के लोक सारख्या पक्षाला निवडून देतील व एकत्र निवडणूकांमुळे भारताच्या संघराज्य ढाच्याला धोका पोहोचू शकतो.

एक राष्ट्र, एक निवडणुकांच्या शिफारशी :-

१. लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्था पंचायत नगरपालिका यांच्या निवडणुका एकाच वेळी घेणे जेणेकरून मतदारांचा आणि प्रशासनाचा वेळ वाचेल,
२. सर्व स्तरांसाठी एकच सुसंगत मतदार यादी आणि ओळखपत्र तयार करणे ज्यामुळे वृटी आणि डुप्लिकेशन कमी होईल.
३. यारंवार होणाऱ्या निवडणुकामुळे होणारा प्रशासकीय अडथळा आणि खर्चात कपात ज्यामुळे सरकार विकासावर अधिक लवा केंद्रित करू शकेल.
४.सध्याच्या विस्कळीत वेळापत्रकाला एकाच वेळी आणण्यासाठी राज्याच्या विधानसभाच्या मुदतीमध्ये तात्पुरते बदल करून त्यांना स्वेकसभा निवडनुकांशी जोडणे.
५. जर एखादे सरकार मुदतीपूर्वी कोसळले तर पुढील निवडणूक पुढील नियोजित निवडणुकीपर्यंतच होतील असे नियम करणे,

संदर्भसूची-

१. एक देश, एक चुनावका दिव्यकिती
२. भारतातील निवडणूक प्रक्रिया टाले विकास एस. अथर्व पब्लिकेशन,
३. अजयसिंग खुशवाह - विकसित भारत २०४७
४. महाराष्ट्र टाईम्स ११ जून २०२५
५. निवडणूक कायदा व नियम सबनीस नि. मुकुन्द प्रकाशक
६. चुनाव सुधार सुशासक अग्रवाल मनोज प्रभात प्रकाशन, नई दिल्ली.
७. विकिपडीया आणि इतर ऑनलाईन संसाधने रामनाथ कोविंद समितीचा अहवाल.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

२०४७ विकसीत भारतातील प्रगत तंत्रज्ञान आणि शेतकऱ्यांचे दारीद्रय

डॉ. सतीश हरलाल पारधी

के. न्हानाभाऊ मन्साराम तुकाराम पाटील, कला महाविद्यालय, मारवड ता. अमळनेर जि. जळगांव (महाराष्ट्र)

ई-मेल-satishprd82@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180204
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 11-13
February 2026
Submitted: 18 Jan. 2026
Revised: 27 Jan. 2026
Accepted: 10 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश —

शेतीतील आधुनिक यंत्रसामुग्रीचा प्रत्यक्ष फायदा मोठ्या धनिक शेतकऱ्यांना झाला. मुळात महागडी यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी लघु व सिमांत शेतकऱ्यांकडे पैसा नाही. भाडे तत्वावर जरी यंत्रसामुग्रीचा वापर शेतीकामासाठी करावयाचा विचार असेल तर लघु व सिमांत शेतकऱ्याला आपल्या कमी धारणक्षेत्रात परवडत नाही. कमीत—कमी वेळेत यंत्रसामुग्रीच्या मदतीने शेतीची कामे होवू लागली. परीणामी बड्या धनीक अशा शेतकऱ्यांना ते परवडणारे आहे. अशा शेतकऱ्याकडून वेळेवर पिकांची काढणी होवून बाजारात शेतीमालाचा पुरवठा होत असल्यामूळे वेळीच योग्य किंमत मिळू लागली. परंतू लघु व सिमांत शेतकऱ्यांना शेतमजुरांचा आधार घ्यावा लागतो. शेतमजुरी अधिक असल्यामूळे शेतमजुर देखिल परवडणारा नाही. योग्य वेळी पिकांची काढणी न झाल्यामूळे अतिवृष्टी,बाजारातील कृषीमालाच्या पुरवठ्यात झालेल्या वाढीमूळे किंमत कमी होवून शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान होत असल्याची स्थिती निर्माण झाली आहे. वाढत्या यंत्रयामुग्रीच्या वापरामूळे ग्रामीण भागात देखिल शेतमजुरीची हंगामी कामे करण्यास मजुर तयार होत नसल्याची स्थिती आहे. आधुनकि यंत्रसामुग्रीचा वापर करावयाचा विचार केला तर एवढी महागडी यंत्रसामुग्री विकत घेणे शक्य होत नाही. उदरनिर्वासाठी संघर्ष करणारा शेतकरी दुष्काळ,रोगराई,आदानांच्या वाढत्या किंमती,साठवणूक सुविधांचा अभाव,शेतकऱ्यांचे अज्ञान या सर्व कारणांमूळे शेतकरी दारीद्रयाकडे वळत असून आपले जीवन व्यतीत करीत असल्याचे चित्र आहे.

सन २०४७ पर्यंत गुंतवणूकदारांनी कृषी क्षेत्रात देखिल गुंतवणूक केली तर भारतातील शेतकऱ्याला चांगले दिवस येतील. दारिद्रय,गरीबी दूर होवून त्यांच्या देखिल जीवनमानाचा स्तर उंचावेल असा विश्वास आहे.

प्रस्तावना —

प्रगत तंत्रज्ञानाच्या जोरावर जगातील अनेक देशांनी आपली प्रगती साध्य केली आहे. यात भारताने देखिल पुढाकार घेतला आहे. भारताची जलद गतीने महासत्ता होण्याकडे वाटचाल सुरू आहे. देशाला विज्ञान आणि तंत्रज्ञानाची साथ मिळाली आहे. औद्योगिक क्रांतीचा थेट परीणाम देशातील तंत्रज्ञान विकसीत होण्यावर झाला आहे. विकासाच्या प्रवाहात असतांना भारताने स्वदेशी तंत्रज्ञान विकसीत केले. शोध आणि संशोधनाच्या अविरत अशा प्रवाहात भारत जगाच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. जगातील सर्वाधिक लोकसंख्या असण्याचा बहुमान मिळण्याबरोबरच मोठी बाजारपेठ म्हणून भारताकडे गुंतवणूकदारांचा ओघ सतत वाढला आहे.

औद्योगिक,कृषी,सेवा,संरक्षण अशा प्रत्येक क्षेत्रात प्रगत तंत्रज्ञान वापरले जात आहे. यात वेळ,पैसा आणि श्रम याची बचत झाली आहे. देशाच्या आर्थिक प्रगतीत प्रगत अशा तंत्रज्ञानाचा महत्वाचा वाटा आहे. परंतु प्रगत अशा तंत्रज्ञानाचा वापर करीत असतांना देशातील उपलब्ध असलेल्या श्रमाचा देखिल तेवढाच विचार होणे गरजेचे आहे. भारतात सर्वात जास्त कर्त्या श्रमशक्तीचा पुरवठा आहे. या कर्त्या श्रमशक्तीचा देशाच्या प्रगतीत उपयोग करून घेणे तेवढेच महत्वाचे आहे. श्रमप्रधान अर्थव्यवस्थेकडून तंत्रज्ञानाकडे वाटचाल करीत असतांना याचा देखिल विचार होणे आवश्यक आहे.

औद्योगिक,कृषी,सेवा क्षेत्राचा विकास प्रगत तंत्रज्ञानाच्या जोरावर होत असतांना वाढत्या लोकसंख्येचा रोजगाराचा भिषण प्रश्न निर्माण झाला आहे. शेती क्षेत्रावर अवंलबून असणारे शेतकरी, बारा बलुतेदार,शेतमजूर यांची अवस्था अधिक बिकट होत आहे. कृषी क्षेत्रात वाढत्या प्रगत तंत्रज्ञानामूळे लघू व सिमांत अशा शेतकऱ्यांसमोर उपासमारीची वेळ आली आहे. प्रत्यक्षात या आधुनिक तंत्रज्ञानाचा फायदा मोठ्या धनीक शेतकऱ्यांना झाला.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
सतीश हरलाल पारधी, *के. न्हानाभाऊ मन्साराम तुकाराम पाटील, कला महाविद्यालय, मारवड ता. अमळनेर जि. जळगांव (महाराष्ट्र)*

How to cite this article:
पारधी, . सतीश . हरलाल . (2026). २०४७ विकसीत भारतातील प्रगत तंत्रज्ञान आणि शेतकऱ्यांचे दारीद्रय. *Journal of research and development,* 18(2(*XIV*)), 11–13. https://doi.org/10.5281/zenodo.18795693

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18795693

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

संशोधनाचा उद्येश —

१. भारताच्या प्रगतीत प्रगत तंत्रज्ञानाचे योगदान वाढले आहे याचा अभ्यास करणे.
२. प्रगत तंत्रज्ञानामूळे शेतकऱ्यांसमोर उपासमारीची वेळ आली आहे याचा अभ्यास करणे.
३. प्रगत तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या धनीक शेतकऱ्यांनाच होत आहे याची चिकित्सा करणे.

संशोधनाची गृहिते —

१. प्रगत तंत्रज्ञानामूळे शेती क्षेत्राचा विकास झाला आहे.
२. सिमांत व लघु शेतकऱ्यांना प्रगत तंत्रज्ञान परवडणारे असे नाही.
३. प्रगत तंत्रज्ञानामूळे शेतकरी व शेतमजूर यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.

संशोधन पध्दती —

प्रस्तुत शोध निबंधासाठी द्वितीयक सामुग्रीचा वापर करण्यात आला असून यात विविध संदर्भग्रंथ,मासिके, इंटरनेट यांचा समोवश केला आहे.

शेती क्षेत्रातील आधुनिक यंत्रसामुग्री —

देशात हरीत क्रांतीनंतर मोठ्या प्रमाणात शेती क्षेत्रात बदल झाला. परंपरागत अशा आदानांऐवजी आधुनिक अशा यंत्रसामुग्रीचा वापर व संकरीत बी—बीयाण्यांचा वापर करण्यात आला. वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या अन्नधान्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी हे करणे गरजेचे होते. परंतू याचा लाभ देशातील सर्वच शेतकऱ्यांना झाला असे नाही तर फक्त धनवान अशा शेतकऱ्यांनी याचा लाभ मोठ्या प्रमाणात घेतला. पुर्वीची शेती ही बैलजोडीच्या मदतीने वखरणी,नांगरणी तर बी—बीयाण्यांची लागवड करण्यापासून ते कापणीपर्यंत मानवी श्रमाचा वापर केला जात असे. मोठी लोकसंख्या खेड्यात वास्तव्य करीत असतांना त्यांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन शेती आहे. शेतीप्रधान अर्थव्यवस्थेत शेतीचे महत्व यांत्रिकीकरणामूळे कमी होईल का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. एकीकडे वाढती लोकसंख्या तर दुसरीकडे ग्रामीण भागात शेतीतील रोजगार हळूहळू कमी होत आहे. २०४७ पर्यंत भारत विकसीत राष्ट्र म्हणून समोर येईल यात शंका नाही. परंतू देशात उपलब्ध असणाऱ्या कर्त्या श्रमशक्तीला दिशा देण्याचे कार्य महत्वाचे आहे. भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान असल्यामूळे कृषीवरील लोकसंख्येचे अवलंबित्व लक्षात घेता कृषी क्षेत्राच्या विकासाबरोबर रोजगार संधी निर्माण होणे अपेक्षित आहे.

आधुनिकीकरण व यांत्रीकीकरणाच्या या युगात शेतीत देखील मोठ्या प्रमाणात बदल झाला. शेतीत वापरण्यात येणाऱ्या आधुनिक यंत्रसामुग्रीमध्ये ट्रॅक्टर,सीड ड्रिल,स्प्रिंकलर,ठिंबक सिंचन,कम्बाइन हार्वेस्टर,ड्रोनद्वारे पीकांवर फवारणी व देखरेख,सौर ऊर्जेवर चालणारी उपकरणे,रोटाव्हेटर,लेव्हलर,ड्रिप इरिगेशन,हॅंड कटर,विविध पीकांची तोडणी करण्यासाठी तोडणीयंत्र यांचा समावेश वाढला. मानवी श्रमाचा कमीत—कमी वापर या यांत्रीक युगात होवू लागला.

विकसीत राष्ट्र होण्याकडे वाटचाल करणाऱ्या भारतातील शेतकऱ्यांचे वास्तव चित्र —

भारतातील सर्वाधिक लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे शेतीशी निगडीत आहे. उदरनिर्वाह व रोजगार उपलब्ध करून देणारे प्रमुख क्षेत्र म्हणून शेतीकडे पाहिले जाते. परंतु अलिकडील आधुनिक काळात शेती क्षेत्रात वाढत्या आधुंनिक यत्रंसामुग्रीच्या वापरामुळे मोठ्या प्रमाणात अवलंबून राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण कमी—कमी होत चालले आहे. कृषी क्षेत्रातील अनिश्चितता आणि वाढता यंत्रसामुग्रीचा वापर यामुळे लोकसंख्या कृषी क्षेत्रावर आपले उदरनिर्वाह न करता कंपन्या,व्यवसाय,व्यापार,कारखान्यांमध्ये रोजगारासाठी स्थलांतरीत होत आहे.

लघू व सिमांत शेतकऱ्याने जरी आधुनिक यंत्रसामुग्रीचा वापर करण्याचा प्रयत्न केला तर त्याला सुरूवातीला कर्ज काढल्याशिवाय दुसरा पर्याय नाही. काढलेल्या कर्जाची परतफेड आलेल्या कृषी उत्पन्नातूनच केली जाते. कृषी क्षेत्रात उत्पादन आणि उत्पन्नाची अनिश्चितता असल्यामुळे घेतलेल्या कर्जाची वेळेवर परतफेड होवू शकत नाही. परीणामी कर्जाचा डोंगर वाढतच जातो. घेतलेल्या यंत्रसामूग्रीच्या देखभालीचा व दुरूस्तीचा खर्च शेतकऱ्यांना परवडणारा नाही. धारणक्षेत्राचा आकार लहान असल्यामूळे अशी महागडी यंत्रसामूग्री अकार्यक्षम ठरते. दुसरीकडे मोठ्या शेतकऱ्यांना अशा यंत्रसामुग्री परवडणारी आहे. शेतकऱ्यांमध्ये देखिल गरीब व श्रीमंत अशी दरी वाढतच आहे.

वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा कृषीतून होतो. आधुनिक यंत्रसामुग्रीच्या वापरातून कृषी क्षेत्राची प्रगती जरी होत असली तरी लघु व सीमांत शेतकऱ्यांची अवस्था अतिशय बिकट आहे. ज्यांच्याकडे भांडवलाची कमतरता,अवकाळी पाऊस,साठवणूक सुविधेचा अभाव,कृषी उत्पादित मालाला योग्य भाव नाही. वाढते कर्ज यामूळे महाराष्ट्रात व देशात शेतकरी आत्महत्या चिंतेचा विषय बनला आहे.

२०४७ पर्यंत भारतातील कृषीक्षेत्रात आमूलाग्र बदल होत असतांना शेतकऱ्यांच्या राहणीमानात व जीवनमानात बदल होणे अपेक्षित आहे. अन्नदाता म्हणून ओळख असणाऱ्या शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलेल,त्यांच्यावर कुठलेही कर्ज नसेल,साठवणुकीच्या सुविधा,उत्पादित कृषी मालाला योग्य भाव,सावकारांवर नियंत्रण,आधुनिक यंत्रसामुग्रीच्या वापरासाठी प्रोत्साहन,शेतकरी,शेतमजूर यांच्या किमान आवश्यक गरजा पूर्ण होणे अपेक्षित आहे. सन २०४७ पर्यंत कृषी क्षेत्रांवर अवलंबून असणारा प्रत्येक घटक आर्थिकदृष्टया,सामाजिकदृष्टया सक्षम होईल तेव्हा विकसीत राष्ट्राचे स्वप्न पूर्ण झाले असे म्हणता येईल.

उपाययोजना—

लघू व अल्प भूधारक शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात केंद्र आणि राज्य सरकारकडून यंत्रसामुग्री घेण्यासाठी अनुदान दिले पाहिजे. मोठी यंत्रसामुग्री लघू व अल्प भूधारक शेतकऱ्यांना परवडणारी नाही. त्यासाठी लघू व अल्प भूधारक शेतकऱ्यांसाठी

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

परवडणारी यंत्रसामूग्री विकसीत करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करून शेतकऱ्यांना यंत्रसामुग्रीचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. यंत्रसामुग्रीच्या वापरामूळे श्रम,वेळ यात मोठी बचत झाली आहे हे तेवढेच सत्य आहे. अल्प व सिमांत शेतकऱ्याला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी व शेतीतील उत्पादन व उत्पन्न वाढण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना होणे आवश्यक आहे. तरच शेतकऱ्याचे दारीद्रय व गरीबी कमी होण्यास मदत होईल.

संदर्भग्रंथ सुची—

१. कायंदे—पाटील गंगाधर.वि,शेतीचे अर्थशास्त्र (जाने २००७),चैतन्य पब्लिकेशन्स,नाशिक पृ.क्र. ३.२६ ते ३.३३.
२. साठे मधुसदन,भारताच्या आर्थिक समस्या (२००८),डायमंड पब्लिकेशन्स,पुणे—३० पृ.क्र. ८६—८७,९८—९९.
३. कोडेंवार यु.बी,भारतीय अर्थव्यवस्था (जुलै २००३),चिन्मय प्रकाशन,औरंगाबाद पृ.क्र. १३० ते १३३.
४. योजना,मु.संपा.कुलश्रेष्ठ कमल (जुलै २०२५),भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाद्वारा प्रकाशन,पुणे पृ.क्र.२९—३२.
५. योजना,मु.संपा.कुलश्रेष्ठ कमल (ऑगस्ट २०२५),भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाद्वारा प्रकाशन,पुणे पृ.क्र.३६—३७.
6- www.wikipedia.com date-27.01.2026.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

"महिला सशक्तिकरण में हिंदी लेखिकाओं की भूमिका"

डॉ. राहुल सुरेश भदाणे
कै. म. दि. सिसोदे कला, वाणिज्य एवं
विज्ञान महाविद्यालय, नरडाणा, तहसील- शिंदखेडा,जिला- धुले
मेल – dr.rsbhadane333@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180205
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 14-17
February 2026
Submitted: 18 Jan. 2026
Revised: 27 Jan. 2026
Accepted: 10 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश (Abstract)

महिला सशक्तिकरण समकालीन सामाजिक विमर्श का एक महत्वपूर्ण विषय है, जिसमें हिंदी भाषा और साहित्य की भूमिका अत्यंत प्रभावशाली रही है। हिंदी लेखिकाओं ने अपने साहित्य के माध्यम से न केवल नारी जीवन की समस्याओं, संघर्षों और संवेदनाओं को अभिव्यक्त किया है, बल्कि उन्हें आत्मनिर्भरता, स्वाभिमान और सामाजिक न्याय की ओर प्रेरित भी किया है। महादेवी वर्मा, मन्नू भंडारी, कृष्णा सोबती, मैत्रेयी पुष्पा, मृदुला गर्ग, प्रभा खेतान जैसी लेखिकाओं ने पितृसत्तात्मक समाज की रूढ़ियों को चुनौती देते हुए स्त्री-अस्मिता, स्वतंत्रता और अधिकारों के प्रश्न को प्रमुखता से उठाया है। हिंदी साहित्य में स्त्री-विमर्श के माध्यम से महिलाओं की वास्तविक स्थिति, उनके मानसिक, सामाजिक और आर्थिक संघर्षों का सशक्त चित्रण हुआ है। साथ ही हिंदी भाषा ने सरकारी योजनाओं, शिक्षा और मीडिया के माध्यम से महिलाओं में जागरूकता फैलाने का कार्य भी किया है। इस प्रकार हिंदी लेखिकाओं का साहित्य महिला सशक्तिकरण की प्रक्रिया में एक सशक्त माध्यम और सामाजिक परिवर्तन का प्रभावी उपकरण सिद्ध हुआ है।

Keywords (मुख्य शब्द): *महिला सशक्तिकरण, हिंदी साहित्य, स्त्री-विमर्श, नारी अस्मिता, पितृसत्ता, समकालीन लेखिकाएँ, सामाजिक परिवर्तन, आत्मनिर्भरता, नारी चेतना, हिंदी भाषा*

प्रस्तावना

महिला **सशक्तिकरण** में हिंदी भाषा एक शक्तिशाली माध्यम और उत्प्रेरक की भूमिका निभाती है। यह न केवल अभिव्यक्ति का साधन है, बल्कि सामाजिक जागरूकता, शिक्षा और अधिकारों के प्रति महिलाओं को जागरूक करने का एक प्रमुख जरिया भी है। हिंदी साहित्य, विशेषकर समकालीन लेखन, ने महिलाओं की स्थिति, संघर्षों और आत्मनिर्भरता को प्रखरता से उठाया है। महादेवी वर्मा से लेकर आधुनिक लेखिकाओं (जैसे ममता कालिया, कृष्णा सोबती) ने समाज में जागरूकता लाने में महत्वपूर्ण भूमिका निभाई है। हिंदी भाषी क्षेत्रों में शिक्षा के प्रसार के साथ, हिंदी भाषा ने महिलाओं को जागरूक किया है। साक्षरता के माध्यम से वे अपने अधिकारों, स्वास्थ और सामाजिक स्थिति को बेहतर समझने लगी हैं। हिंदी भाषा ने महिलाओं को अपने अनुभवों, संघर्षों और सपनों की कहानियां लिखने और व्यक्त करने का मंच दिया है। इसने महिलाओं के आत्मविश्वास में वृद्धि की है और उन्हें घर की चारदीवारी से बाहर निकलकर अपनी पहचान बनाने के लिए प्रेरित किया है। सरकार और विभिन्न संस्थाओं की कल्याणकारी नीतियां, जैसे 'बेटी बचाओ बेटी पढ़ाओ' और मुद्रा योजना, हिंदी के माध्यम से सुदूर ग्रामीण क्षेत्रों तक पहुंचती हैं, जिससे महिलाओं को आर्थिक रूप से सशक्त होने में मदद मिलती है।

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. राहुल सुरेश भदाणे, कै. म. दि. सिसोदे कला, वाणिज्य एवं विज्ञान महाविद्यालय, नरडाणा, तहसील- शिंदखेडा,जिला- धुले

How to cite this article:
भदाणे, . राहुल . सुरेश . (2026). महिला सशक्तिकरण में हिंदी लेखिकाओं की भूमिका. *Journal of research and development,* 18(2(*XIV*)), 14–16. https://doi.org/10.5281/zenodo.18795758

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18795758
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

हिंदी के माध्यम से, महिलाएं अब न केवल घर तक सीमित नहीं हैं, बल्कि राजनीति, शिक्षा, सुरक्षा, और विभिन्न पेशों में अपनी बात को प्रभावी ढंग से रखकर समाज के विकास में योगदान दे रही हैं। हिंदी पत्रकारिता, टीवी चैनल, और सोशल मीडिया पर हिंदी भाषा ने महिलाओं के मुद्दों को केंद्र में लाया है, जिससे समाज की सोच में सकारात्मक बदलाव आ रहा है। स्त्रियों की दशा को देखकर विवेकानंद कहते है - स्त्रियों की अवस्था को सुधारे बिना जगत के कल्याण की कोई सम्भावना नहीं है। पक्षी के लिए एक पंख से उड़ना सम्भव नहीं है।[1] विवेकानंद जी महिला समाज की वास्तविक दशा से चिंचित, देश एवं समाज के भलाई महिला समाज के तरक्की के बगैर असंभव बताया है।

महिला सशक्तिकरण की अवधारणा का विकास हिंदी साहित्य में समय के साथ बदलता हुआ दिखाई दिया। प्रारंभ में नारी की त्यागमीय, सहनशील और पवित्रता की मूर्ति को प्रस्तुत किया गया। उसके उपरांत प्रेमचंद ने सामाजिक कुरीतियों के साथ-साथ नारी के संघर्षों और संवेदनाओं को अभिव्यक्त किया। स्वतंत्रता आंदोलन में महिलाओं ने भी सक्रिय सहभाग लिया। हिन्दी साहित्य में छायावाद काल से स्त्रियों की समस्याओं पर चर्चा की शुरूआत हुई। महादेवी वर्मा की श्रृंखला की कड़िया' स्त्री सशक्तिकरण का सुन्दर उदाहरण है। जिसमें नारी-जागरण एवं मुक्ति का सवाल को उठाया गया है। ऐसा साहित्य जिसमें स्त्री जीवन की अनेक समस्याओं का चित्रण हो स्त्री - विमर्श कहलाता है। पुरूष लेखकोंने भी नारी समस्याओं को अपने साहित्य में स्थान दिया लेकिन उस रूप में नहीं जिस रूप में महिलाओं ने प्रस्तुत किया है। हिन्दी कथा- साहित्य में नारी-मुक्ति को लेकर स्त्री - विमर्श की गूंज 1960 ई. में पश्चिम में हुआ था । कृष्णा अग्निहोत्री, ममता कालिया, मणिक मोहनी, मृदुला गर्ग, चित्रा मुद्गल, मुदुला सिन्हा, मैत्रेयी पुष्पा, मृणाल पाण्डेय, मंजुला भगत, नासिरा शर्मा, दिप्ती खण्डेलवाल, कुसुम अंचल, सुनीता जैन, प्रभा खेतान, सुधा अरोड़ा, क्षमा शर्मा, अर्चना वर्मा, नमिता सिंह, इंदू जैन, अल्का सरावगी, मुक्ता रमणिका गुंप्ता, जया जादवानी, आदि जैसी कई लेखिकाओं ने नारी मन के छिपे शक्तियों को पहचाना और नारी की दिशाहीनता, दुविधाग्रस्तता, कुण्ठा आदि का विश्लेषण किया। इन लेखिकाओं साहित्य यह कहती है कि, स्त्रियों को न केवल भेदभाव के विरूद्ध लड़ना है बल्कि सरकार, समाज और पुरूषों के द्वारा किये जाने वाले दमन के सभी रूपां से स्वतंत्रता और मुक्ति पाने के लिए भी लड़ना है।

हिंदी साहित्य महिला विषयों पर और भी मुखर और विविध दृष्टिकोणों से काम कर रहा है। महिला लेखिकाओं ने अपने साहित्य के माध्यम से महिला पात्रों को न केवल पारंपारिक भूमिकाओं से बाहर निकाला, बल्कि उन्हें उनके व्यक्तिगत संघर्षों, आकांक्षाओं और आत्मनिर्भरता के साथ प्रस्तुत किया है। मन्नू भंडारी की 'महाभोज' की महिला पात्र रुक्मा और अन्य महिलाएं, बीसू की मौत के बाद अन्याय के खिलाफ उठने वाली आवाज़ों का मूक समर्थन करती हैं। वे बिंदा के संघर्ष में मानसिक शक्ति बनती हैं। लेखिका ने इन महिलाओं को निर्जीव वस्तु के बजाय मानवीय गरिमा और आत्मसम्मान के साथ प्रस्तुत किया है।[2]

मैत्रेयी पुष्पा ने 'चाक' और 'इदन्नमम' उपन्यास में स्त्री सशक्तिकरण को उजागर किया है। "वे सब पुरूष प्रधान समाज के अवसरवादी प्रसंग है। एक और पवित्रता की परिभाषा करता राम के साथ सीता का वन गमन दूसरी ओर निष्ठा को तोड़ना मर्यादा पुरूषोत्तम राम का सीता की अग्नि परीक्षा लेना। सीता ने क्यों नहीं माँगा कोई सबूत कि के भगवान कहे जाने वाले राम तुम भी तो इस अवधि में मुझसे अलग रहे हो, अपने पवित्र रहने के साक्ष्य दो।"[3] मैत्रेयी पुष्पा की चाक की कलावती चाची और सारंग की भूमिका नारी सशक्तिकरण को अभिव्यक्त करती है। सारंग संघर्ष का जीवंत प्रतीक है। रेशम की हत्या की विरूध्द संघर्ष के लिए वह खड़ी होती है। "हम जाट स्त्री बिछुआ अपने जेब में रखती है जब चाहती है पहन लेती है और जब चाहती है उतार देती है।" इस उपन्यास के संवाद द्वारा लेखिका बगावत के बीज बोना चाहती है। मृदुला गर्ग का 'कठगुलाब' में नारी मानो कहती है "मैं चिल्ला-चिल्लाकर कहती हूँ कि मैं एक बच्चा पालना चाहती हूँ। अपनी आँखों के सामने अपने पाले को आत्म-निर्भर बनते देखना चाहती हूँ। मैं पालना, पोषना, सहेजना, संवारना चाहती हूँ। मै एक सर्जक होना चाहती हूँ।"[4]

चित्रा मृदुगल के "आवां" उपन्यास की नायिका नमिता एक मेहनती, देखभाल करने वाली और समर्पित महिला के रूप में चित्रित है, जो पारिवारिक जिम्मेदारियों के कारण व्यक्तिगत इच्छाओं और आकांक्षाओं का त्याग करती है। जब संजय कनोइ् के कैटलॉग के लिए नमिता की फोटोग्राफी करने वाला सिध्दार्थ नमिता को अपनी हवस का शिकार बनाना चाहता है। तब वह उसे कहती है, "आपके प्रस्ताव पर मैं थूकती हूँ। सिध्दार्थ जी! शुभचिंतक को तो अपने भविष्य की जिम्मेदारी दी जा सकती है, दलाल को नहीं। दलाल को तो हर औरत रंडी नजर आती है। बेहतर होगा आप फाटोग्राफी छोड़कर चकला खोल लें।"[5]

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

कृष्णा सोबती के 'जिंदगीनामा' में पंजाब के ग्रामीण परिवेश की महिलाएं पारंपरिक बंधन तोड़ती सशक्त, आत्मनिर्भर और जीवंत हाड़-मांस के व्यक्तित्व के रूप में उभरती हैं। यहाँ की स्त्रियाँ, जिनमें नवविवाहिताएं, विधवाएं, और साधारण ग्रामीण महिलाएं शामिल हैं, वे केवल उपभोग की वस्तु नहीं, बल्कि संघर्षरत, मुखर और अपनी देह व आकांक्षाओं के प्रति निडर दिखाई देती हैं। रामचंद्र तिवारी कृष्णा सोबती के संदर्भ में कहते है, "अपनी प्रत्येक रचना में एक नई भूमि लेकर उपस्थित होने वाली कृष्णा सोबती निश्चित ही हिंदी कथा संसार की अन्यतम विभूति हैं।"[6] प्रभा खेतान ने यह कहा है कि स्त्री अपनी अश्रूपूर्ण नियती को स्वीकार कर के सबसे बड़ी भूल करती है। अपने उपन्यास 'छिन्नमस्त' में वह लिखती है, "स्त्री होना कोई अपराध नहीं है पर नारित्व की आँसू भरी नियति स्वीकार करना बहुत बड़ा अपराध है। समाज में नारी को सदैव महत्त्वहीन, उपेछित और तिरष्कृत रखा है। वह बहुमूल्य होते हुये भी स्वयं को हीन, भोग्या और अबला जैसे विशेषणों को खुलकर विरोध नहीं कर सकती।"[7] प्रभा खेतान ने अपने उपन्यासों में नारी की असुरक्षा का श्रेष्ठ चित्रण किया है।

हिंदी महिला लेखिकाओं ने साहित्य को केवल मनोरंजन का साधन न बनाकर उसे सामाजिक बदलाव का हथियार बनाया है, जिससे महिला सशक्तीकरण की नींव और अधिक सुदृढ़ हुई है। महिला सशक्तिकरण में हिंदी लेखिकाओं की भूमिका अत्यंत महत्वपूर्ण और दूरगामी रही है। लेखिकाओं ने अपनी सशक्त लेखनी के माध्यम से पितृसत्तात्मक समाज की रूढ़ियों को चुनौती दी। उन्होंने महिला शिक्षा, स्वतंत्रता, आत्मनिर्भरता और सामाजिक न्याय जैसे विषयों को प्रमुखता से उठाकर नारी चेतना को जगाया और समाज में महिलाओं की स्थिति को मजबूत किया।

संदर्भ –

1. आजकल: मार्च 2013 - पृष्ठ 20
2. **भंडारी मन्नु, महाभोज, 1979, राजकमल प्रकाशन, दिल्ली।**
3. मैत्रयी पुष्पा, इदन्नमम, पृ. 269
4. गर्ग मृदुला, कठगुलाब, भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन, नई दिल्ली, पृ. 104
5. मृदग्ल चित्रा, आवां, पृ. 295
6. तिवारी डॉ. रामचंद्र, हिंदी का गद्य-साहित्य, विश्वविद्यालय प्रकाशन, वाराणसी, 2015, पृ.261
7. खेतान प्रभा, छिन्नमस्ता, राजकमल प्रकाशन दिल्ली।

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

अस्मितेचा शोध: मराठी आदिवासी कादंबरीतील लोकसंस्कृतीचे चित्रण

आत्माराम तुकाराम चिमकर
मराठी विभाग प्रमुख, दादासाहेब दि.शं.पाटील कला,
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, एरंडोल, ता. एरंडोल जि. जळगाव
पिन : ४२५१०९

Manuscript ID:
JRD -2026-180206
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 17-
February 2026
Submitted: 18 Jan. 2026
Revised: 27 Jan. 2026
Accepted: 10 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश:

१९६० नंतर मराठी साहित्यात उदयाला आलेला 'आदिवासी साहित्य प्रवाह' हा या समाजाच्या स्वतंत्र, संघर्षमय आणि समृद्ध लोकसंस्कृतीचा आरसा आहे. प्रस्तुत लेखनात आदिवासी कादंबरीच्या माध्यमातून त्यांच्या निसर्गाधिष्ठित जीवनशैलीचा वेध घेण्यात आला आहे. आदिवासींची संस्कृती ही 'श्रम, समूह आणि सहकार्य' या त्रिसूत्रीवर आधारलेली असून, त्यांच्या देवदेवता, श्रद्धा आणि सण-उत्सव निसर्गाशी घट्ट विणलेले आहेत. लेखनामध्ये 'जैत रे जैत', 'झेलझपाट', 'हाकुमी' यांसारख्या महत्त्वाच्या कादंबऱ्यांच्या आधारे 'देज' (वधू मूल्य), 'घरघुशी' आणि 'लांबजाना' यांसारख्या वैशिष्ट्यपूर्ण विवाह प्रथांचे विश्लेषण केले आहे. तसेच 'गोटूल' या संस्कार केंद्राचे महत्त्व आणि नृत्य-गीतांमधून प्रकट होणारी त्यांची सामूहिक ऊर्मी स्पष्ट केली आहे. प्रतिकूल परिस्थिती आणि आर्थिक अभाव असूनही आदिवासी समाजाने आपली मानवी मूल्ये, स्त्रियांचा सन्मान आणि निसर्गाशी असलेले जैविक नाते टिकवून ठेवले आहे. ही जीवनमूल्ये केवळ आदिवासी साहित्याचे वैशिष्ट्य नसून ती संपूर्ण मानवजातीसाठी मार्गदर्शक आहेत.

मुख्य संबोध: *आदिवासी लोकसंस्कृती, निसर्गनिष्ठा, सामूहिकता, देज प्रथा, गोटूल, घरघुशी, मातृसत्ताक देवता, अस्सल ओळख, मराठी आदिवासी कादंबरी, जीवनमूल्ये इ.*

प्रास्ताविक -

१९६० च्या दशकानंतर मराठी साहित्यात ग्रामीण, दलित आणि स्त्रीवादी प्रवाहांच्या जोडीलाच आदिवासी साहित्य प्रवाहाचा उदय झाला आणि काळाच्या ओघात तो विस्तारत गेला. आदिवासी साहित्यातून या समाजाचे स्वतंत्र आणि आगळेवेगळे विश्व अधोरेखित झाले आहे. यामध्ये त्यांच्या संघर्षमय सामाजिक संघर्षासोबतच, समृद्ध सांस्कृतिक जीवनाचेही प्रतिबिंब उमटलेले दिसते. विशेषतः आदिवासींची निसर्गाधिष्ठित जीवनशैली, त्यांच्या जीवनातील 'मूळ मुळे' आणि त्यांची 'अस्सल ओळख' या साहित्यातून ठळकपणे व्यक्त झाली आहे. मात्र, आदिवासी कवितेच्या तुलनेत इतर साहित्यप्रकार, विशेषतः कादंबरी, काहीशी मागे पडल्याचे जाणवते. संख्यात्मक आणि गुणात्मक अशा दोन्ही कसोट्यांवर आदिवासी कादंबरीचा प्रवास कवितेच्या वेगाशी स्पर्धा करताना कमी पडतो. वास्तवात, 'कादंबरी' हा साहित्यप्रकार मानवी जीवनाचा व्यापक अवकाश कवेत घेणारा आहे. जीवनातील गुंतागुंत, व्यामिश्रता, मानवी सभ्यता आणि लोकपरंपरांच्या अभिव्यक्तीसाठी हे एक अत्यंत महत्त्वाचे माध्यम मानले जाते. मराठी कादंबरीमध्ये चित्रित झालेल्या आदिवासी लोकसंस्कृतीतून त्यांच्या लोकदेवतांच्या संकल्पना, श्रद्धा-समजुती, सण-उत्सव, वैविध्यपूर्ण लग्नप्रथा आणि गीत-नृत्यादी परंपरांचे दर्शन घडते. निसर्गाशी असलेले त्यांचे अतूट नाते आणि अखिल मानवजातीसाठी आदर्श ठरणारी त्यांची जीवनमूल्ये या कादंबऱ्यांमधून प्रभावीपणे प्रत्ययाला येतात.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
आत्माराम तुकाराम चिमकर, मराठी विभाग प्रमुख, दादासाहेब दि.शं.पाटील कला,
वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, एरंडोल, ता. एरंडोल जि. जळगाव

How to cite this article:
चिमकर, . आत्माराम . तुकाराम . (2026). अस्मितेचा शोध: मराठी आदिवासी कादंबरीतील लोकसंस्कृतीचे चित्रण. *Journal of research and development,* 18(2(*XIV*)), 17–20.
https://doi.org/10.5281/zenodo.18795778

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18795778

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

आदिवासींच्या या सांस्कृतिक संघर्षाचे आणि जीवनाचे चित्रण 'वाडगीण', 'महानदीच्या तीरावर', 'जैत रे जैत', 'डांगाणी', 'झेलझपाट', 'आंदोलन', 'हाकुमी', 'पारध', 'एका नक्षलवाद्याचा जन्म', 'तृष्णा', 'टाहो', 'अरण्येर अधिकार', 'परजा', 'माझी काटेमुंढरीची शाळा' आणि 'घोंगडा' यांसारख्या महत्त्वाच्या कादंबऱ्यांतून उमटलेले आहे.

आदिवासी लोकसंस्कृती:

संस्कृतीची संकल्पना आणि व्याप्ती:

मानवी जीवनामध्ये संस्कृतीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. अप्रगत आदिम समाजापासून ते प्रगत आधुनिक समाजापर्यंत प्रत्येक समाजव्यवस्थेमध्ये संस्कृती-विचार अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. संस्कृतीचे स्वरूप व्यापक, गुंतागुंतीचे आणि व्यामिश्र असल्यामुळे तिच्या संदर्भात अनेक विचारवंत व अभ्यासकांनी विविध दृष्टीकोनातून विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे. इमर्सन या विचारवंताच्या मते, *"जिच्यामुळे माणसाला जगावेसे वाटते, तिला संस्कृती असे म्हणतात.* तसेच जीवनयात्रेची पद्धती जी सामाजिक आचार-विचार, श्रद्धा आणि वाङ्मय यांमधून व्यक्त होते, तिला संस्कृती म्हणण्यास हरकत नाही. "[१]

लोकसंस्कृती ही 'लोकांची' असते. ज्या समाजघटकांना आपल्या पारंपरिक जीवनशैलीचे आणि परंपरागत सांस्कृतिक संचिताचे भान असते, त्या जनसमुदायाची ती संस्कृती असते. लोकजीवनातील मूलभूत मूल्ये लोकसंस्कृतीचा प्रमुख आधार बनतात. लोकसंस्कृतीविषयी डॉ. प्रभाकर मांडे लिहितात, "जीवनाच्या सर्व व्यवहारांमध्ये लोकांचे असे एक सामूहिक व्यक्तित्व असते, यालाच आपण संस्कृती म्हणू शकतो. संस्कृती ही समाजाची असते... ही संस्कृती लोकांपासून भिन्न नसते. लोक किंवा जनसामान्य हा संस्कृतीचा मूलस्रोत असून झरा आहे. त्यांच्या संस्कृतीला लोकसंस्कृती असे म्हणतात."[२] लोकसंस्कृती प्रामुख्याने ग्रामीण जनसमुदाय, अशिक्षित जनसमाज, अभिजन समाजापासून दूर असलेला समाज तसेच आदिवासी समाज यांची असते. अशा समाजव्यवस्थांमध्ये परंपरेने चालत आलेल्या प्रथा, रूढी, श्रद्धा आणि व्यवहारांना विशेष महत्त्व दिले जाते.

आदिवासी संस्कृतीची त्रिसूत्री:

'श्रम, समूह आणि सहकार्य' या त्रिसूत्री जीवनमूल्यांवर आधारलेली आदिवासी संस्कृती ही प्रस्थापित आदर्श संस्कृतीच्या चौकटीत सहजपणे बसणारी नाही. आदिवासींच्या जीवनामध्ये सामूहिकतेला अत्यंत महत्त्व आहे. जन्मविधी, मर्तिकविधी, शिकार, नृत्य, गीतगायन, विवाहसंस्कार, देवदेवतांची पूजा-विधी या सर्वच जीवनप्रक्रियांमध्ये सामुदायिक भावनेचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. आदिवासी समाजाच्या जीवनात अनेक प्रकारची अभावग्रस्तता आहे; सोयी-सुविधांचा अभाव, आर्थिक मर्यादा आणि अनेक समस्या त्यांच्या जगण्याचा भाग आहेत. त्यामुळे त्यांचे जीवन संघर्षमय असले, तरी त्यांच्या अनुभवविश्वात एक वेदना व दुःखही अंतर्भूत असते. तथापि या प्रतिकूलतेवर मात करण्यासाठी आणि आयुष्यात समाधानाने जगण्यासाठी त्यांनी सामूहिकतेचे तत्त्व आपल्या जगण्यात टिकवून ठेवले आहे.

डॉ. रमेश वरखेडे आदिवासी संस्कृतीविषयी लिहितात की, "दारिद्र्य असले तरी जगण्यात करंटेपणा नाही, याचे कारण त्यांची जीवनशैली आहे. खर्च टाळण्यासाठी लग्न थांबते, पण संसार सुरू होतो. मुलेबाळे होतात. ऐपत असेल तेव्हा लग्न करतात. लग्नात नाचगाणे, वाद्यनृत्याची बेहोशी अंगात चढते. दोन आठवडे तरी हा सोहळा चालतो. सगळ्यांनी मिळून आनंद वाटून घ्यायचा आणि सगळ्यांनी मिळून दुःख वाटून घ्यायचे. गावात कुणाचा मृत्यू झाला तर सर्व लोक काम बंद ठेवून दुःखात सहभागी होतात आणि तरीही प्रेताला मूठमाती देताना आनंद व्यक्त करतात."[३] या विधानावरून आदिवासी जीवनपद्धतीतील सामूहिकता, भावनिक एकात्मता आणि त्यांच्या संस्कृतीतील सौंदर्य अधिक ठळकपणे समोर येते.

सामूहिक जीवनाचे महत्त्व:

आदिवासी संस्कृतीमध्ये समूहजाणीव अत्यंत दृढ असते. डॉ. वैजनाथ अनमुलवाड यांनी आदिवासी संस्कृतीचे वैशिष्ट्य अधोरेखित करताना म्हटले आहे की, "त्यांच्यातील निखळ आनंदाचा स्रोत म्हणजे त्यांची वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती होय. प्राचीनतम आणि उदात्त मूल्यधारणा लाभलेली आदिवासी संस्कृती आहे. त्यांची संस्कृती निसर्गसृष्टीतील विविध घटकांचा आकृतिबंध साकार करते. डोंगर, नद्या, झाडे इत्यादी नैसर्गिक, प्राकृतिक घटक म्हणजे त्यांच्या जीवनातील अविभाज्य अंगे होत. त्यांची मौखिक परंपरा उदंड आहे. त्यांच्या नृत्य, नाट्य, काव्य, गायन, चित्र, मूर्ती, वास्तू आणि वाद्य या कला वैशिष्ट्यपूर्ण आहेत."[४] समूहजीवनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. स्त्रियांना समान हक्क व अधिकार आहेत.

समृद्ध कला आणि मौखिक परंपरा:

आदिवासी समाजामध्ये प्रचलित लोकगीत, लोककथा इत्यादी रचनाप्रकारांमध्ये मूल्यशिक्षण आहे. मानवतावाद आणि वैज्ञानिक दृष्टीकोन आहे. आदिबंधात्मकता आहे. त्यामुळे आदिवासी संस्कृतीमध्ये निसर्गाला अनन्यसाधारण स्थान प्राप्त झालेले दिसते. आदिवासींच्या आचार-विचारांवर निसर्गाचा सखोल प्रभाव असून त्यांची संस्कृती मुळातच निसर्गनिष्ठ आहे. प्रतिकूल परिस्थिती आणि विविध प्रकारच्या अभावग्रस्ततेमध्येही त्यांच्या जीवनातील नृत्य-गीतांनी, बहुविध कलांनी, प्रथा-परंपरांनी, आचार-विचारांच्या

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

पद्धतींनी, देवदेवतांच्या विधींनी, लोकसमजुतींनी व श्रद्धांनी त्यांच्या जीवनात एक प्रकारची सांस्कृतिक संपन्नता आणि अंत:स्थ समृद्धता निर्माण केली आहे.

आदिवासी कादंबरीतील लोकसंस्कृती:

निसर्गाधिष्ठित देवदेवता आणि श्रद्धास्थान:

'जैत रे जैत', 'डांगाणी', 'झेलझपाट', 'हाकुमी', 'पारध', 'तृष्णा', 'अरण्येर अधिकार', 'परजा' आणि 'घोंगडा' यांसारख्या आदिवासी कादंबऱ्यांमधून असे दिसून येते की, आदिवासींच्या बहुतांश देवदेवता निसर्गाशी निगडित आहेत. निसर्गातील प्रत्येक घटकात ईश्वर शोधण्याची त्यांची दृष्टी अद्‌भूत आहे. त्यांच्या संस्कृतीत प्रामुख्याने तल्लोई, पोचम अवल, निसानी मुंडा, याहामोगी, बाबलाई देवी, साती आसरा आणि कणसरा या मातृसत्ताक देवतांचा मोठा प्रभाव आहे. त्याचबरोबर लिंगोदेव, डोंगरदेव, नागदेव, झाडदेव, वाघदेव, पित्तरदेव, बडा देव, बिंगो देव, डंगा देव आणि सूर्यदेव या देवांनाही अनन्यसाधारण महत्त्व आहे. या देवतांवरील श्रद्धेमुळेच आपल्या जीवनात सुख, समृद्धी आणि समाधान लाभते, अशी त्यांची दृढ धारणा आहे. निसर्गाच्या सान्निध्यात राहत असल्याने झाडे, पशु-पक्षी, डोंगर, नद्या, सूर्य-चंद्र आणि वाघ-विंचवांसारखे प्राणी हीच त्यांची खरी श्रद्धास्थाने आहेत.

सण-उत्सव आणि सामूहिक जीवन:

सण-उत्सवांमुळे आदिवासींच्या जीवनात एक वेगळेच चैतन्य आणि आनंद निर्माण होतो. दैनंदिन जीवनातील अभावग्रस्तता, कष्टप्रद कामे आणि साचलेपणातून मुक्त होण्यासाठी हे उत्सव त्यांना मोठा मानसिक आधार देतात. होळी, दसरा, वसंत उत्सव, पौष पौर्णिमा (जोडीदार निवडण्याचा उत्सव), नवीन धान कापणी, पित्तरपूजा, सामूहिक शिकार, दिवाळी आणि बैलपोळा यांसारखे सण ते उत्साहाने साजरे करतात. या उत्सवांमधून त्यांची सांघिक भावना आणि समूहप्रियता दिसून येते. 'झेलझपाट' कादंबरीत मधुकर वाकोडे कोरकूंच्या होळीचे वर्णन करताना लिहितात: "आलेल्या बाप्यांनी मोहांची मडकी खाली केली. मोहफुलांचं पाणी . . . बायकांची गाणी. . . ढोल अलगूजांचा टिपदार ध्वनी या त्रिवेणीनं ती रात्र वाहती. . . धावती ठेविली... पहाटेचे वाण अंकूरले आणि कोरकूंनी आपली होळी पेटविली. स्त्रियामाणसांनी होळीला वर्तुळाकार रिंगण घालून वाघांच्या लयीवर सूर धरला... ज्वाला बरोबर उंच गेलेल्या ठिणग्या आभाळात काजव्यासारख्या चमकू लागल्या . . . विझू लागल्या."[५]

प्रथा-परंपरा आणि विवाह पद्धती:

आदिवासींमध्ये सामाजिक आणि सांस्कृतिक आचारविचारांच्या अनेक वैशिष्ट्यपूर्ण प्रथा आहेत. सामूहिक शिकारीत मिळणारा वाटा सर्वांना समान मिळतो; अगदी गर्भवती स्त्रीच्या पोटातील बाळाचाही वाटा यात धरला जातो. त्यांच्याकडे मृत्यूकडे दु:ख म्हणून न पाहता, तो माणूस पूर्वजांमध्ये सामील झाल्याचा आनंद मानून 'मर्तिकविधी' साजरा केला जातो. पूर्वजांच्या स्मृतीप्रीत्यर्थ 'स्मृतिखांब' उभारण्याची आणि त्यांची पूजा करण्याची प्रथा आजही टिकून आहे.

विवाह पद्धतींमध्ये 'घरघुशी', 'लांबजाना' (किंवा लांबाड्या), पारंपरिक विवाह आणि पळून जाऊन लग्न करणे असे विविध प्रकार आढळतात. वधू मूल्य म्हणजेच 'देज' देण्याची पद्धत येथे महत्त्वाची आहे, ज्यामुळे समाजात स्त्रियांना मानाचे स्थान मिळते. जर मुलाला देज देणे शक्य नसेल, तर तो 'लांबजाना' होऊन सासरी कष्ट करून वधू मूल्याची रक्कम फेडतो. 'जैत रे जैत' कादंबरीतील चिंधी ही 'घरघुशी' प्रथेचे उत्तम उदाहरण आहे. ती नाग्याच्या घरात शिरते आणि ठामपणे सांगते, "मी माज्या ढोलियाच्या घरात शिरली. . . माझी पिरित आहे त्याच्यावर"[६] यातून आदिवासी स्त्रियांचा आत्मविश्वास आणि स्वतंत्र निर्णयक्षमता अधोरेखित होते.

नृत्य-गीते आणि कलाविष्कार:

नृत्य आणि गीते हे आदिवासींच्या जीवनाचे अविभाज्य अंग आहेत. दारिद्र्य आणि अभावातही जगण्याची उमेद निर्माण करण्याचे काम ही कला करते. लग्नापासून ते मरणापर्यंत आणि पेरणीपासून ते शिकारीपर्यंत प्रत्येक प्रसंगी ते नाचतात आणि गातात. कोरकू स्त्रियांचे हे गीत,

"झुझुरे झुरे लाडीन
चलो अपना देस मे ऽ
माय ना बापू आसा तोळे
चलो अपना देस मे ऽ"[7]

या नृत्यातील लयबद्धता आणि भविष्याची चिंता सोडून वर्तमानात जगण्याची वृत्ती 'आंदोलन' कादंबरीत दीनानाथ मनोहर यांनी अतिशय प्रभावीपणे मांडली आहे. ते लिहितात, "एक विचित्र थरथर आपल्या पावलांमधून... या जमिनीचा, या आकाशाचा ताल आपण धरलाय का ? ... एक नशा आणणारा हा वास येतो कुठून? पावलांखालच्या मातीतून, की माझ्याच शरीराच्या सहस्त्र रंध्रातून."[8]

गोटूल आणि सामूहिक जीवनमूल्ये:

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

'महानदीच्या तीरावर', 'परजा', 'हाकुमी' या कादंबऱ्यांमधून 'गोटूल' या युवागृहाचे महत्त्व स्पष्ट होते. गोटूल हे केवळ श्रमपरिहाराचे ठिकाण नसून ते संस्कार केंद्र आहे, जिथे तरुण-तरुणींना एकमेकांना समजून घेण्याची आणि जोडीदार निवडण्याची संधी मिळते. जातपंचायतीचे न्यायनिवाडे आणि सामाजिक चर्चाही येथेच होतात.

आदिवासी आणि निसर्ग हे एकरूप आहेत. निसर्गाशी संवाद साधत, त्यावर आक्रमण न करता जगण्याची त्यांची वृत्ती ही अखिल मानवजातीसाठी आदर्श आहे. आदिवासी कादंबरीतून प्रेम, आपुलकी, समर्पण, सामाजिक बांधिलकी आणि 'श्रम, समूह व सहकार्य' यांसारख्या उदात्त जीवनमूल्यांचा आविष्कार होतो. डॉ. तुकाराम रोंगटे यांच्या मते, "माडिया लोकांची मूल्यव्यवस्था आधुनिक काळातही चिरकाल टिकणारी आहे. 'देज' प्रथा, जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य आणि समतावादी समाज रचना यांमुळे आदिवासी संस्कृतीचे एक समृद्ध आणि मानवी रूप या कादंबऱ्यांमधून प्रकट होते."[9]

निष्कर्ष:

मराठी आदिवासी कादंबरीचा अभ्यास केला असता असे स्पष्ट होते की, हा साहित्यप्रकार केवळ कल्पित कथा नसून तो आदिवासींच्या वास्तव आणि संपन्न लोकसंस्कृतीचा दस्तऐवज आहे. १९६० नंतरच्या कालखंडात या साहित्याने प्रस्थापित चौकटींना छेद देत स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. आदिवासींचे जीवन निसर्गाशी इतके एकरूप झाले आहे की, त्यांच्या लोकदेवता, श्रद्धा आणि सण-उत्सव निसर्गापासून वेगळे करता येत नाहीत.

'श्रम, समूह आणि सहकार्य' ही या संस्कृतीची मूळ सूत्रे असून, प्रतिकूल आर्थिक परिस्थितीतही या समाजाने आपली मानवी मूल्ये जपली आहेत. 'देज', 'घरघुशी' आणि 'गोटूल' यांसारख्या प्रथांमधून आदिवासी स्त्रीचा सामाजिक दर्जा आणि त्यांचे लोकशाहीवादी मूल्यभान दिसून येते. जरी आदिवासी कादंबरी संख्यात्मकदृष्ट्या कवितेच्या मागे असली, तरी ती मानवी जीवनाचा व्यामिश्र पट मांडण्यात यशस्वी झाली आहे. थोडक्यात, निसर्गावर आक्रमण न करता त्याच्याशी संवादी राहून जगण्याचा जो मंत्र आदिवासी संस्कृती देते, तो आजच्या जागतिकीकरणाच्या युगात संपूर्ण मानवजातीसाठी आदर्श आणि मार्गदर्शक ठरणारा आहे.

संदर्भ ग्रंथ -

१. भोसले द.ता., 'लोकसंस्कृती : स्वरूप व विशेष', पद्मगंधा प्रकाशन पुणे, पहिली आवृत्ती २००४, पृ.११.
२. मांडे प्रभाकर, 'लोकसाहित्याचे स्वरूप', गोदावरी प्रकाशन औरंगाबाद, पाचवी आवृत्ती, २००९, पृ.७.
३. मुनघाटे गो.ना., 'माझी काटेमुंढरीची शाळा', साधना प्रकाशन पुणे, सातवी आवृत्ती २०१३, पृ.९.
४. अनमुलवाड वैजनाथ (संपा.), 'आदिवासी : समाज, संस्कृती आणि साहित्य', इसाप प्रकाशन नांदेड, पहिली आवृत्ती २०१२, पृ. प्रस्तावना XIII.
५. पुंडकर पंजाब, 'झेलझपाट आणि शिलीपशेरा', नभ प्रकाशन अमरावती, दुसरी आवृत्ती २००६, पृ.२३.
६. रोंगटे तुकाराम, 'आदिवासी साहित्य : चिंतन आणि चिकित्सा', दिलीपराज प्रकाशन प्रा.लि.पुणे, पहिली आवृत्ती २०१४, पृ.८०.
७. www.aadiwasipoem.co.in २२/०१/२०२६
८. दीनानाथ मनोहर, आंदोलन, पृ. ४२
९. रोंगटे, तुकाराम, आदिवासी आशयसंपन्न मराठी कादंबरी (लेख), चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २०१२, पृ. १२६

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

मॉरिशस का भारतवंशी समाज: अभिमन्यु अनत के उपन्यासों में सांस्कृतिक संरक्षण और संघर्ष

डॉ. अभयकुमार रमेश खैरनार
स्नातकोत्तर हिंदी विभाग एवं संशोधन केंद्र
श्री. शिवाजी विद्या प्रसारक संस्था का
ना.स.पाटील साहित्य एवं मु.फि.मु.अ. वाणिज्य महाविद्यालय, देवपुर, धुले

Manuscript ID:
JRD -2026-180207
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 21-
February 2026
Submitted: 18 Jan. 2026
Revised: 27 Jan. 2026
Accepted: 10 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश:

प्रस्तुत आलेख अभिमन्यु अनत के उपन्यास साहित्य के माध्यम से मॉरिशस के प्रवासी भारतीय समाज के सांस्कृतिक संघर्ष और उसकी जिजीविषा का विश्लेषण करता है। अनत जी के उपन्यासों में मॉरिशस की धरती पर पहुँचे 'कुली-मजदूरों" द्वारा अपनी जड़ों को बचाने की गाथा चित्रित है। लेखक ने स्पष्ट किया है कि भाषा (हिंदी/भोजपुरी) केवल संवाद का माध्यम नहीं, बल्कि औपनिवेशिक दमन के विरुद्ध सांस्कृतिक प्रतिरोध का हथियार रही है। लेख में रहन-सहन, वेशभूषा, भोजन शैली और लोक-मान्यताओं के माध्यम से आधुनिकता और परंपरा के द्वंद्व को दर्शाया गया है। जहाँ एक ओर नई पीढ़ी पाश्चात्य संस्कृति के प्रभाव में है, वहीं अनत जी के पात्र अपनी भोजन की शुद्धता, मांगलिक प्रतीकों और सामुदायिक उत्सवों (जैसे होली, शिवरात्रि) के जरिए भारतीयता को जीवित रखते हैं। अंततः, अनत जी का साहित्य यह सिद्ध करता है कि संस्कृति का संरक्षण केवल अतीत का मोह नहीं, बल्कि अस्मिता और आत्म-सम्मान की रक्षा हेतु किया गया एक सतत सामाजिक और राजनीतिक संघर्ष है।

कुंजी शब्द: *सांस्कृतिक अस्मिता, प्रवासी साहित्य, अभिमन्यु अनत, सांस्कृतिक प्रतिरोध, भाषिक दमन, भारतीय ज्ञान परंपरा, वि-औपनिवेशीकरण, लोक-आचार, श्रमिक चेतना एवं संस्कृति-संरक्षण।*

प्रस्तावना:

साहित्य को समाज का आईना कहा जाता है, क्योंकि साहित्य में समाज का यथार्थ चित्रण मिलता है। चाहे वह समाज भारत का हो या भारत के बाहर अन्य किसी भी देश का, उसमें चित्रित समाजजीवन हमारे सामने अपनी यथार्थ झाँकी प्रस्तुत करता है। इसी संदर्भ में अभिमन्यु अनत और उनका उपन्यास साहित्य अत्यंत महत्त्वपूर्ण हो उठता है। अनत जी के उपन्यासों के केंद्र में मूलतः मॉरिशस में रहनेवाला भारतीय समाजजीवन है, जो अनेक ऐतिहासिक, आर्थिक और औपनिवेशिक संघर्षों के बावजूद भी अपनी सांस्कृतिक जड़ों को जीवित रखने में सफल रहा है।

विषय प्रवेश: मॉरिशस की धरती पर भारतीय कुली-मजदूर के रूप में पहुँचे भारतवंशी समाज ने केवल श्रमदान ही नहीं किया, बल्कि अपनी भाषा, धर्म-आस्था, खान-पान, रीति-रिवाज, लोकगीत, उत्सव-पर्व, और सामुदायिक जीवन के सहारे अपने अस्तित्व को टिकाए रखा। यह संघर्ष केवल जीविका का नहीं था, बल्कि पहचान, सम्मान और सांस्कृतिक अस्मिता का भी था। अनत जी के उपन्यासों में भारतीय संस्कृति के वे तत्त्व बार-बार उभरते हैं, जो किसी भी समाज की 'सांस्कृतिक स्मृति' को गढ़ते हैं। यही कारण है कि उनके उपन्यासों में भारतीय जीवन के छोटे-छोटे व्यवहार जैसे भाषा में संवाद, भोजन की शुद्धता, स्त्री-पुरुष की मर्यादा, त्योहारों की सामूहिकता, लोकगीतों की धड़कन, और सामाजिक अन्याय के विरुद्ध संघर्ष एक व्यापक सामाजिक-सांस्कृतिक दस्तावेज बन जाते हैं। इस दृष्टि से अनत जी का उपन्यास साहित्य मॉरिशस के भारतवंशी समाज की 'संस्कृति-संरक्षण यात्रा' का प्रामाणिक आख्यान है।

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. अभयकुमार रमेश खैरनार , स्नातकोत्तर हिंदी विभाग एवं संशोधन केंद्र श्री. शिवाजी विद्या प्रसारक संस्था का ना.स.पाटील साहित्य एवं मु.फि.मु.अ. वाणिज्य महाविद्यालय, देवपुर, धुले

How to cite this article:
खैरनार, . अभयकुमार . रमेश . (2026). मॉरिशस का भारतवंशी समाज: अभिमन्यु अनत के उपन्यासों में सांस्कृतिक संरक्षण और संघर्ष. *Journal of research and development,* 18(2(*XIV*)), 21–24.
https://doi.org/10.5281/zenodo.18795800

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18795800

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

भाषा:

भाषा किसी भी संस्कृति का अविभाज्य अंग होती है। भाषा केवल संवाद का माध्यम नहीं, बल्कि वह सांस्कृतिक पहचान, सामूहिक स्मृति और अस्मिता का सबसे बड़ा आधार है। यही कारण है कि मॉरिशस में पहुँचने के बाद भारतीय कुली-मजदूरों को अपनी भाषा बचाए रखने के लिए कठोर संघर्ष करना पड़ा। औपनिवेशिक शासन में शासकों की भाषा अंग्रेज़ी, फ्रेंच और क्रीओली होने के कारण भारतीय मजदूरों के लिए हिंदी/भोजपुरी बोलना केवल कठिन ही नहीं, कई बार दंडनीय भी था। ऐसी परिस्थितियों में भाषा का संरक्षण एक प्रकार से सांस्कृतिक प्रतिरोध बन जाता है। "रोटी-कपडे की मुहताजी और खून-पसीना एक करके गोरे मालिकों की तिजोरियाँ भरने की विवशता उनके सामने थी। चोरी-चुपके हिंदी पढते-पढाते अपनी संस्कृति को जीवित रखते आ रहे थे।"[1] यह 'चोरी-छुपे पढ़ना-पढ़ाना' केवल शिक्षा नहीं, बल्कि अपनी जड़ों को बचाए रखने का आंदोलन था। उपन्यासों में यह बात स्पष्ट होती है कि भाषा छिन जाने का अर्थ केवल शब्द खो देना नहीं, बल्कि अपनी सांस्कृतिक दुनिया खो देना है।

भाषिक दमन और सांस्कृतिक साम्राज्यवाद:

'कुहासे का दायरा' में भाषिक विसंस्कृतिकरण की समस्या बहुत यथार्थ रूप में दिखाई देती है। अनत जी यह दिखाते हैं कि सत्ता की भाषा केवल प्रशासन नहीं चलाती, बल्कि वह लोगों की चेतना भी नियंत्रित करती है। इसलिए शासक वर्ग स्थानीय/जनभाषाओं को कमतर सिद्ध करता है और अपनी भाषा को श्रेष्ठता का प्रतीक बनाता है। इसी प्रसंग में भिसम का भोजपुरी को 'गवारों की भाषा' कहना, भारतीय समाज के भीतर भी आत्महीनता और औपनिवेशिक मानसिकता का प्रमाण है। यही स्थिति सबसे अधिक चिंताजनक बन जाती है, जब अपने ही लोग अपनी भाषा को अपमानित करने लगते हैं। इस पर भिसम का बाप जिस पीड़ा से बोलता है, वह सामूहिक सांस्कृतिक संकट की आवाज़ बन जाती है, "आजकल एक हवा ही ऐसी बह रही है, क्रीओली को इस देश की भाषा बनाने के लिए भोजपुरी को जंगलियों की भाषा कहा जा रहा है। .....इसके पीछे जो षडयंत्र है उसे हम इसलिए नहीं समझ पा रहे हैं, क्योंकि प्रलोभन से आँखे चकाचौध हैं।"[2] यह षड्यंत्र दरअसल सांस्कृतिक साम्राज्यवाद का ही रूप है, जहाँ भाषा के माध्यम से समुदाय की अस्मिता को कमजोर किया जाता है।

भाषा और पीढ़ीगत दूरी:

अभिमन्यु अनत जी के उपन्यास यह भी संकेत करते हैं कि, भाषा का संकट केवल बाहरी दमन नहीं, बल्कि पीढ़ियों के बीच दूरी भी है। नई पीढ़ी सुविधाओं, आधुनिकता और सामाजिक प्रतिष्ठा के कारण क्रीओली/अंग्रेज़ी को अपनाती है, जिससे हिंदी/भोजपुरी घरों तक सीमित होने लगती है। परिणामस्वरूप परिवार के भीतर संवाद-समस्या और पहचान-संकट पैदा होता है।

अभिमन्यु अनत जी के पात्र केवल दुखी नहीं होते, वे संघर्ष करते हैं। शिक्षा, संगठन और सामाजिक जागरूकता के माध्यम से भाषा की गरिमा बचाने का प्रयत्न करते हैं। यही कारण है कि, अभिमन्यु अनत जी के उपन्यासों में भाषा केवल विषय नहीं, बल्कि संघर्ष-चेतना बनकर उभरती है।

जीवनशैली:

मनुष्य की जीवनशैली से उसकी संस्कृति परिलक्षित होती है। जीवनशैली पर सामाजिक, आर्थिक और भौगोलिक परिस्थितियों का प्रभाव पड़ता है। भारतीय संस्कृति परंपरागत रूप से आध्यात्मिकता, सादगी और जीवनमूल्यों पर आधारित रही है। किंतु आधुनिक युग में पाश्चात्य संस्कृति का प्रभाव इतना तीव्र हुआ कि जीवन में फैशनपरस्ती, फिजूलखर्ची और भोगवाद बढ़ने लगा। इस परिवर्तन के परिणामस्वरूप प्रवासी भारतीय समाज में भी सांस्कृतिक टकराव की स्थितियाँ उत्पन्न होती हैं। 'अस्ति-अस्तु' उपन्यास में दिव्या पाश्चात्य संस्कृति से प्रभावित है, जबकि संगीता भारतीय संस्कृति को अपनाते हुए सादगीपूर्ण रहन-सहन को महत्व देती है। इस द्वंद्व का कारण केवल कपड़े या फैशन नहीं, बल्कि दो अलग जीवन-दृष्टियाँ हैं, एक ओर मर्यादा और पारिवारिक अनुशासन, दूसरी ओर स्वतंत्रता का गलत अर्थ (स्वैराचार)। "जब वह मिनी स्कर्ट पहनकर अपने एक संबंधी के यहाँ शादी में जाने के जिए घर से निकलने वाली थी। उसके माँ –पापा उसे डाँटते –डपटते रह गए थे, फिर भी वह कपडे बदलने को तैयार नहीं हुई थी।"[3]

अभिमन्यु अनत जी यह स्पष्ट करते हैं कि, आधुनिकता का अर्थ आधुनिक विचार हो सकता है, परंतु जब वह केवल दिखावे और अनुशासनहीनता में बदल जाए, तो परिवार-संस्था संकट में पड़ती है। मॉरिशस जैसे देशों में रहनेवाला भारतीय समाज एक साथ दो दबाव झेलता है, स्थानीय/पाश्चात्य संस्कृति का आकर्षण एवं अपनी संस्कृति की रक्षा की जिम्मेदारी, इस कारण घरों में संघर्ष अधिक तीव्र हो जाता है। अभिमन्यु अनत जी के कई पात्र आधुनिकता को पूरी तरह नकारते नहीं, बल्कि चयनात्मक रूप से अपनाते हैं, ताकि संस्कृति का मूल स्वरूप बना रहे। यही भारतीय संस्कृति की विशेषता है, परिवर्तन स्वीकार करना, पर आत्मा न खोना।

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

भोजन शैली:

"ओफ्हो!... कमाल है, इतना भी नहीं जानती?... कितने दिन हुए कलम पकड़े?"

पत्नी उत्तर देती है,

"बीस साल... बीस साल?... क्यों?... किसने मना किया था?"

और यही उत्तर कहानी का उद्देश्य स्पष्ट करता है,

"तुम्हारी हाउस वाइफ ने..."[५]

लेखक ने मध्यवर्गीय परिवार में स्त्री-पुरुष के रिश्तों के छद्म को सहजता से तोड़ा है। आज समाज और परिवार पर जनसंचार माध्यम का इतना प्रभाव है कि शिशु से लेकर वृद्ध तक, स्त्री से लेकर पुरुष तक कोई भी इससे अछूता नहीं रहा। अनपढ़ स्त्री तक मोबाइल जैसे साधनों के कारण समाज से जुड़ी हुई प्रतीत होती है, पर यह कहानी बताती है कि परिवार का निर्वाह करते-करते स्त्री बीस साल से स्वयं को भुला बैठती है।

"स्त्री की गुलामी सदियों पुरानी है, लेकिन स्त्री-पुरुष का संबंध ऐसा होता है कि स्त्री अपनी अधीनता को 'स्वाभाविक सत्य' मानकर भीतर तक उतार लेती है। कई बार वह पति के शोषक रूप को भी पहचान नहीं पाती। अस्तित्व, अस्मिता, अधिकार और आत्मसम्मान जैसे प्रश्न गौण हो जाते हैं, क्योंकि उसके सामने परिवार टूटने का भय भी बना रहता है।"[६]

विवाह संस्था की त्रासदी:

उषा प्रियंवदा की कहानी 'कितना बड़ा झूठ' भी आधुनिक समय में रिश्तों की बदलती संरचना को उजागर करती है। कामकाजी किरण दो बच्चों की माँ है। पति प्रेम करने वाला है, पर फिर भी वह मैक्स के साथ विवाहेतर प्रेम में पड़ जाती है। बाद में मैक्स की शादी दूसरी लड़की से हो जाती है और किरण भीतर से टूट जाती है। उसके जीवन में एक अजीब-सा सूनापन भर जाता है। यह कहानी बताती है कि रिश्तों-नातों की संकल्पना बदल चुकी है। पुराने प्रतिमान टूट रहे हैं। विवाह संस्था के परंपरागत बंधन कई बार निजी भावना और व्यक्तिगत आकांक्षाओं को दबा देते हैं। स्त्री को संस्कार और अनुशासन निभाने के नाम पर कितना छद्म जीवन जीना पड़ता है, यह यथार्थ कहानी प्रभावी ढंग से सामने लाती है।

निष्कर्ष:

१. अत: कहा जा सकता है की, गति और प्रगति का मूल आधार संचार है। संचार ने हमारे जीवन को पूरी तरह घेर रखा है। हम चाहकर भी उससे अलग नहीं हो सकते, क्योंकि उसने जीवन को सुविधाजनक, तेज और व्यापक बना दिया है।

२. संचार के दृष्टिकोण से पूरी दुनिया आज एक "गाँव" में तब्दील हो चुकी है। विश्व में होने वाले परिवर्तनों का बड़ा आधार यही संचार माध्यम हैं। अतः संचार के बिना हम अपने जीवन और समाज की कल्पना भी नहीं कर सकते।

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

३. हम अपने सुख-दुःख, मत-विचार और मनोरंजन की छोटी-छोटी बातें साझा करते हैं और तुरंत एक-दूसरे से जुड़ जाते हैं। रही बात संस्कृति की तो उसका क्षेत्र अत्यंत व्यापक है। उसमें कला, फिल्म, अभिनय और प्रसार माध्यम, सबका समावेश हो जाता है।

४. हम अपने आचार-विचार, रहन-सहन और वेशभूषा तक को संस्कृति से जोड़कर देखते हैं। यही कारण है कि साहित्यकार अपनी रचना को समाज और संस्कृति के बाहर नहीं रख सकता।

५. आज की बदलती दुनिया ने हमारे सोचने के ढंग को बदल दिया है। इसलिए समकालीन कहानियों के पात्र हमें अपने घर-परिवार के पात्र लगते हैं। उनकी कथा हमारे आसपास घटित होती हुई प्रतीत होती है। और यही समकालीन कथा-साहित्य की सबसे बड़ी उपलब्धि है कि वह समाज के बदलते स्वरूप, टूटते मूल्यों, नई चुनौतियों और स्त्री-जीवन के संघर्षों को एक साथ सामने रखता है।

संदर्भ ग्रंथ:

१. सहाय संजय, हंस, नवंबर – २०२२, पृ. क्र. ५५
२. वही, अक्तूबर २०२२, पृ. क्र. ८०
३. वही, अक्तूबर २०२२, पृ. क्र. ८८
४. वही, जुलाई २०२२, पृ. क्र. १२
५. वही, मई २०२२, पृ. क्र. ८६
६. प्रो. जयमोहन, महिला कहानी और कविता, पृ. क्र. ४१

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

मराठी साहित्यातील जीवनमूल्ये आणि 'विकसित भारत : २०४७

डॉ. श्वेता एन. पाटील
मराठी विभाग, श्री. शि.वि.प्र.संस्थेचे
भाऊसाहेब ना. स. पाटील साहित्य व मु.फि.मु.अ. वाणिज्य महाविद्यालय, देवपूर, धुळे
ता. जि. धुळे

Manuscript ID:
JRD -2026-180216
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 64-68
February 2026
Submitted: 20 Jan. 2026
Revised: 29 Jan. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

प्रस्तुत संशोधन लेखामध्ये मराठी साहित्यातील जीवनमूल्यांचा 'विकसित भारत : २०४७' या राष्ट्रीय ध्येयाशी असलेला परस्परसंबंध अभ्यासला आहे. विकसित भारताची संकल्पना ही केवळ आर्थिक वृद्धी, जीडीपी वाढ किंवा तांत्रिक प्रगतीपुरती मर्यादित नसून ती समता, सामाजिक न्याय, स्त्री-सक्षमीकरण, वैज्ञानिक दृष्टिकोन, श्रमप्रतिष्ठा, संविधाननिष्ठा आणि नैतिक नागरिकत्व या मूल्यांवर आधारलेली आहे. मराठी साहित्याने संतपरंपरेपासून आधुनिक व समकालीन प्रवाहांपर्यंत या जीवनमूल्यांची सातत्याने जोपासना केली आहे. संतसाहित्यातून समता व मानवधर्म, सुधारक चळवळींतून सामाजिक न्याय व विवेकवाद, दलित साहित्यांतून अनुभवाधिष्ठित समतेचा आवाज, स्त्रीवादी लेखनातून स्त्री-अस्मिता व सक्षमीकरण, ग्रामीण साहित्यांतून श्रमसंस्कृती व ग्रामविकासाचे वास्तव, तर राष्ट्रभक्तीपर साहित्यांतून नागरिकधर्म व संविधानिक नैतिकता यांचा सशक्त पुरस्कार करण्यात आला आहे. या सर्व मूल्यप्रवाहांचा एकत्रित विचार करता, 'विकसित भारत : २०४७' ही संकल्पना मूल्याधिष्ठित, समावेशक, विवेकी आणि संवेदनशील राष्ट्रनिर्मितीची प्रक्रिया ठरते. निष्कर्षतः, मराठी साहित्य हे विकसित भारताच्या ध्येयासाठी केवळ प्रेरणास्रोत नसून त्याचे वैचारिक व नैतिक अधिष्ठान आहे.

कीवर्ड्स : *मराठी साहित्य, जीवनमूल्ये, विकसित भारत २०४७, समता, सामाजिक न्याय, स्त्री-सक्षमीकरण, दलित साहित्य, वैज्ञानिक दृष्टिकोन, श्रमप्रतिष्ठा, संविधाननिष्ठा, राष्ट्रनिर्मिती.*

प्रस्तावना:

मराठी साहित्य हे केवळ शब्दांचे संकलन नसून महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक जाणिवांचे जिवंत प्रतिबिंब आहे. संतकाव्यातील आध्यात्मिक समतेपासून ते आधुनिक साहित्यातील बंडखोर विज्ञानापर्यंत, मराठी भाषेने मानवी उत्कर्षाची मूल्ये सातत्याने जोपासली आहेत. आज जेव्हा आपण 'विकसित भारत : २०४७' या ध्येयाकडे वाटचाल करत आहोत, तेव्हा ही संकल्पना केवळ आर्थिक जीडीपी (GDP) वाढवण्यापुरती मर्यादित नाही. विकसित भारत म्हणजे असा समाज, जिथे प्रगत तंत्रज्ञान आणि मानवी मूल्ये यांचा सुवर्णसंगम असेल. मराठी साहित्याने दिलेली समता, न्याय, श्रमप्रतिष्ठा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन ही मूल्ये विकसित भारतासाठी आवश्यक असलेले वैचारिक अधिष्ठान आणि नैतिक दिशा प्रदान करतात. "मराठी साहित्याची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्याचा **समाजाशी थेट संवाद** 'विकसित भारत : २०४७' ही संकल्पना जर केवळ पायाभूत सुविधा, जीडीपी आणि तंत्रज्ञान एवढ्यावर केंद्रित राहिली, तर ती अपुरी ठरेल. कारण विकास हा शब्द **समाजातील शेवटच्या माणसापर्यंत** पोहोचला पाहिजे."[१] मराठी साहित्याने हीच भूमिका अनेक शतकांपासून बजावली आहे, **समता, बंधुता, न्याय, माणुसकी** आणि **मूल्याधिष्ठित समाजरचना** या जीवनमूल्यांची पेरणी करीत.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. श्वेता एन. पाटील, मराठी विभाग, श्री. शि.वि.प्र.संस्थेचे भाऊसाहेब ना. स. पाटील साहित्य व मु.फि.मु.अ. वाणिज्य महाविद्यालय, देवपूर, धुळे ता. जि. धुळे

How to cite this article:
पाटील, . श्वेता . एन . (2026). मराठी साहित्यातील जीवनमूल्ये आणि विकसित भारत : २०४७. *Journal of Research and Development,* 18(2(*XIV*)), 64–68. https://doi.org/10.5281/zenodo.18796197

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18796197
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

संतसाहित्य : समतेचा आध्यात्मिक–मानवी पाया:

प्राचीन-मध्ययुगीन मराठी संतपरंपरा ही सामाजिक समतेची एक मोठी वैचारिक क्रांती आहे. वारकरी संतांनी ईश्वरभक्तीचा मार्ग सांगताना 'माणूस' केंद्रस्थानी ठेवला. 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म' हा विचार फक्त धार्मिक नाही, तो समावेशकतेचा आणि समतेचा घोष आहे. संत नामदेव, एकनाथ, तुकाराम, चोखामेळा, जनाबाई यांच्याकडे पाहिले तर लक्षात येते की त्यांनी समाजातील श्रेणीभेदाला आव्हान दिले.

संत चोखामेळा यांच्या अभंगांतून अस्पृश्यतेविरुद्धचा आक्रोश आणि माणूस म्हणून जगण्याची हक्कभावना दिसते. ***"ऊस डोंगा परि रस नोहे डोंगा..."***[२] हे रूपक सांगते की देह-आवरण वेगळे असू शकते, पण अंतःकरण, माणुसकी आणि आत्मा समान असतो. संत तुकाराम यांच्या अभंगांमध्ये 'अहंकार', 'जात', 'धन', 'सत्ता' यांच्या मर्यादा स्पष्ट होतात. अशा अभंगांनी समाजाला मानवधर्म शिकवला. संत एकनाथ यांनी समाजातील अनेक स्तरांना एकत्र आणणारा समन्वयवादी दृष्टिकोन दिला. त्यांच्या साहित्याने 'परस्पर सन्मान' हा सामाजिक मूल्यदृष्टिकोन रुजवला.

आज 'विकसित भारत : २०४७' मध्ये समावेशक विकास हा केंद्रबिंदू आहे. यामध्ये जाती-धर्म-लिंग-प्रदेश या भेदांवर मात करून समान संधी, समता, सामाजिक सुरक्षा आणि सन्मान यांचा विकास आवश्यक असतो. संतसाहित्य हे या मूल्यांचे मूलभूत अधिष्ठान बनते.

सुधारक परंपरा : सामाजिक न्यायाची आधुनिक दिशा:

समता आणि न्याय यांना आधुनिक राजकीय व सामाजिक अधिष्ठान **महात्मा ज्योतिबा फुले** यांनी दिले. 'शेतकऱ्याचा आसूड' मधून शोषणाचे तंत्र, अज्ञानाची साखळी आणि सामाजिक विषमता यावर त्यांनी कठोर प्रहार केला. महात्मा फुले यांची भूमिका ही उपदेश म्हणून नाही, तर **समाजरचनेचा पुनर्विचार** म्हणून समोर येते."[३] 'विकसित भारत' म्हणजे **शोषणमुक्त समाज** ही कल्पना त्यांच्या विचारातून निर्माण होते. याच परंपरेला संविधानिक दिशा **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांनी दिली. जरी त्यांचे लेखन मुख्यतः इंग्रजी व मराठीत वैचारिक रूपात असले, तरी **मराठी साहित्यातील दलित-आंबेडकरी प्रवाह** त्यांच्या विचारांनी आकारला. विकसित भारतासाठी समता ही केवळ नैतिक संकल्पना नसून **हक्क, अधिकार आणि संविधानिक नैतिकता** आहे हे आंबेडकरांनी स्पष्ट केले.

दलित साहित्य : विषमतेविरुद्धचा अनुभवाधिष्ठित सत्यवाद:

समता हा विषय केवळ भावनिक न राहता **अनुभवाचा दस्तऐवज** ठरतो तो दलित साहित्यात. **दया पवार यांची 'बलुतं'** ही आत्मकथा सामाजिक विषमतेच्या यंत्रणेला उघडे पाडते. **लक्ष्मण गायकवाड यांची 'उचल्या'** हे वंचित जीवनाचे अस्सल दस्तऐवजीकरण आहे. **उर्मिला पवार**, **बेबी कांबळे**, **शरणकुमार लिंबाळे** इत्यादींच्या लेखनातून शोषणाला विरोध आणि स्वाभिमानाची भूमिका प्रकट होते."[४]

विकसित भारताच्या दृष्टिकोनातून दलित साहित्य आपल्याला सांगते की, **फक्त शहरे वाढली म्हणजे राष्ट्र विकसित होत नाही,** समाजातील वंचित घटकांना **मानवी सन्मान, संधी, शिक्षण, आरोग्य, रोजगार** मिळाल्याशिवाय विकास अपुरा आहे.

समावेशकतेचा अर्थ :

आज 'सबका साथ, सबका विकास' हा विचार धोरणात येतो, पण तो वास्तवात आणण्यासाठी समाजमन तयार करावे लागते. साहित्य हे ते समाजमन घडवते. मराठी साहित्य समतेचा विचार घोषणा म्हणून नाही, तर **मानवी जीवनाशी जोडून** मांडते. कधी संतांच्या अभंगांतून, कधी फुल्यांच्या विचारातून, कधी दलित आत्मकथेतून समता ही **जगण्याची गरज** म्हणून समोर येते. म्हणून विकसित भारतासाठी आवश्यक असलेला 'समावेशक विकास' हा फक्त सरकारी योजनेचा भाग नाही, तो **सांस्कृतिक आणि नैतिक संक्रमणाचा कार्यक्रम** आहे आणि मराठी साहित्याने हा कार्यक्रम शतकानुशतके चालवला आहे.

२) **स्त्री-शिक्षण, सन्मान आणि सक्षमीकरण:**

विकसित भारताचा सर्वात महत्त्वाचा आधार म्हणजे **स्त्रीशक्तीचा पूर्ण सहभाग.** जगातील कोणतेही राष्ट्र प्रगत होण्यासाठी महिला केवळ 'लाभार्थी' न राहता **निर्णयकर्त्या** आणि **नेतृत्वकर्ता** बनल्या पाहिजेत. मराठी साहित्याने स्त्रीविषयक प्रश्न **भावनिक करुणा** म्हणून नाही, तर **मानवी अधिकार, समानता आणि व्यक्तित्व-विकास** म्हणून मांडले आहेत. त्यामुळे 'विकसित भारत : २०४७' मधील **'महिलांच्या नेतृत्वाखालील विकास'** या संकल्पनेला मराठी साहित्याचा मोठा वैचारिक आधार मिळतो.

प्राचीन/मध्ययुगीन साहित्यातील स्त्रीचा मानवी-सांस्कृतिक अवकाश:

मराठी संतपरंपरेत स्त्री ही केवळ दुय्यम नाही. संत **जनाबाई** घरकाम करणारी, कष्टकरी स्त्री, पण तिच्या अभंगांमध्ये अनुभवाचे तत्त्वज्ञान आहे. तिचे भक्तीविश्व समाजाच्या केंद्राबाहेरील स्त्री ला केंद्रात आणते. संत **मुक्ताबाई संत** ज्ञानेश्वरांच्या भगिनी म्हणून प्रसिद्ध आहेत, पण तिच्या अभंगांतून बौद्धिक आत्मविश्वास आणि निर्भीडपणा दिसतो. ही परंपरा दाखवते की स्त्री ही **केवळ घरात बंदिस्त**

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

असलेली नसून **ज्ञान-भक्ती-व्यक्तिमत्त्व** यांची वाहक आहे. तसेच लोकसाहित्यातील **ओव्या, पोवाडे, लावण्या, भारुडे** यामधून स्त्रीचे जीवनविश्व, कष्ट, दुःख आणि आनंद यांचे अस्सल चित्र दिसते. हा सांस्कृतिक दस्तऐवज स्त्रीच्या श्रमाची किंमत आणि तिच्या जीवनमूल्यांची ओळख करून देतो.

सावित्रीबाई फुले : स्त्रीशिक्षणाची वैचारिक क्रांती:

स्त्री-सक्षमीकरणाचा आधुनिक पाया **सावित्रीबाई फुले** यांनी घातला. 'काव्यफुले'मधील विचार हे केवळ कवितेतून व्यक्त झालेले भाव नाहीत, ते **शिक्षणक्रांतीचे घोषवाक्य** आहे. त्यांच्या लेखनातून स्पष्ट होते की शिक्षण म्हणजे केवळ अक्षरओळख नाही, तर **आत्मसन्मान, निर्णयक्षमता आणि सामाजिक स्वातंत्र्य.**

विकसित भारतासाठी स्त्रीशिक्षण हे तीन पातळ्यांवर महत्त्वाचे ठरते,

1. **मानवी विकास** वाढतो
2. **कुटुंब व समाजातील आरोग्य, संस्कार आणि आर्थिक स्थैर्य** वाढते
3. **रोजगार आणि नेतृत्वनिर्मिती** वाढते

मराठी साहित्याचा हा स्त्रीशिक्षणवादी प्रवाह विकसित भारताच्या ज्ञानाधारित अर्थव्यवस्था या विचाराशी थेट जोडला जातो.

स्त्रीवादी लेखन आणि आधुनिक मराठी साहित्य:

आधुनिक मराठी साहित्याने स्त्रीला त्यागमूर्ती म्हणून देवत्व देण्याऐवजी तिला **स्वतंत्र व्यक्ती** म्हणून समोर आणले. **गौरी देशपांडे**, **आशा बगे**, **कविता महाजन**, **शांता गोखले** यांसारख्या लेखिकांच्या कथा व कादंबऱ्यांमध्ये स्त्रीचे मानसिक संघर्ष, नातेसंबंधातील सत्ता, करिअर, आर्थिक स्वावलंबन, देह-राजकारण, सामाजिक दडपण या विषयांचे वास्तववादी चित्रण आढळते. या लेखनातून 'स्त्री म्हणजे कोण?' हा प्रश्न विचारला जातो. तिचे अस्तित्व घरासाठी नाही, तर **स्वतःसाठी**ही आहे हा विचार आधुनिक राष्ट्रनिर्मितीसाठी मूलभूत आहे.

दलित स्त्री लेखन : दुहेरी शोषणाविरुद्ध संघर्ष"

विकसित भारताचा विचार करताना स्त्री ही एकसंध श्रेणी मानणे अपुरे ठरते. जात, वर्ग आणि लिंग यांच्या एकत्रित शोषणाचे वास्तव विशेषतः दलित स्त्री लेखनातून पुढे येते. **उर्मिला पवार**, **बेबी कांबळे** यांच्या लेखनातून दलित स्त्रीचे जीवन घर, समाज, काम, शोषण, अस्मिता यांचा अनुभवसत्य उलगडतो. यातून विकसित भारतासाठी आवश्यक असलेला संदेश स्पष्ट होतो. **समाजातील सर्वात वंचित स्त्रीचा जीवनमान उंचावला, तरच विकास खरा.**

स्त्री-सक्षमीकरणाचे साहित्यिक मूल्य :

मराठी साहित्य स्त्रीविषयक मूल्ये तीन ठोस पायांवर उभी करते,

1. **सन्मान** : स्त्रीला माणूस म्हणून मान
2. **संधी** : शिक्षण, रोजगार, नेतृत्व
3. **सुरक्षा** : शारीरिक-मानसिक सुरक्षितता

'विकसित भारत : २०४७' मध्ये स्त्रीचे नेतृत्व, स्टार्टअप, विज्ञान-तंत्रज्ञान, प्रशासन, शिक्षण क्षेत्रातील वाढती उपस्थिती अपेक्षित आहे. ती उपस्थिती नुसती आकडेवारी न राहता **मूल्याधिष्ठित परिवर्तन** व्हावी, यासाठी मराठी साहित्य समाजमन घडवते.

वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकवाद:

कोणतेही राष्ट्र विकसित व्हायचे असेल, तर त्याच्या नागरिकांमध्ये **वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशुद्धता, चिकित्सक बुद्धी** आणि **प्रश्न विचारण्याचे धैर्य** असणे अत्यावश्यक असते. तंत्रज्ञान कितीही प्रगत असले, तरी समाज जर अंधश्रद्धा, अफवा, अवैज्ञानिक समजुती आणि असत्याच्या प्रभावाखाली राहिला, तर विकास दीर्घकाल टिकत नाही. मराठी साहित्याची विवेकवादी परंपरा ही महाराष्ट्राच्या सुधारक चळवळीशी घट्ट जोडलेली आहे आणि 'विकसित भारत : २०४७' च्या ज्ञान-तंत्रज्ञानप्रधान प्रवासाला ती नैतिक, बौद्धिक आधार देते.

प्राचीन साहित्यातील विवेकाचा धागा:

जरी 'वैज्ञानिक दृष्टिकोन' हा शब्द आधुनिक असला, तरी विवेकाची मूलभूत भूमिका संतसाहित्यातही दिसते. संतांनी कर्मकांड, ढोंग आणि अहंकार यावर टीका केली. तुकारामांचे अभंग 'आचार-विचार-विवेक' यांचा आग्रह धरतात. एकनाथांनी समाजातील आडंबर आणि दांभिकता यांना प्रश्न विचारले. हीच वृत्ती आधुनिक काळातील वैज्ञानिकतेचा पाया ठरते, **कोणतीही गोष्ट फक्त परंपरेने स्वीकारू नये, तर तिचा अर्थ आणि परिणाम तपासावा.**

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

सुधारक परंपरा : समाजाला तर्काकडे वळवणारे साहित्य:

महाराष्ट्रातील आधुनिक विवेकवादी परंपरेत **गोपाळ गणेश आगरकर**, लोकहितवादी, आणि पुढील काळातील सुधारक लेखन यांनी समाजाच्या मानसिकतेला धक्का देऊन तर्क जागा केला. आगरकरांच्या लेखनातून स्पष्ट दिसते की समाजपरिवर्तनासाठी **अंधश्रद्धा, रूढी, अन्याय** यांचा बौद्धिक प्रतिवाद आवश्यक आहे. विकसित भारतासाठी शिक्षण हे केवळ डिग्रीपुरते नसून **समाजमनाची चिकित्सा** करण्याचे साधन आहे, हा विचार मराठी विवेकवादी साहित्याने रुजवला.

विज्ञान साहित्य : ज्ञानसमृद्ध समाजाचे स्वप्न:

विज्ञान-तंत्रज्ञानाचे युग वाढताना मराठी भाषेत विज्ञान साहित्याचा मोठा प्रवाह निर्माण झाला. **जयंत नारळीकर** यांनी विज्ञानकथा, विज्ञानलेखन आणि वैज्ञानिक विचार लोकांपर्यंत नेला. **डॉ. बाळ फोंडके** यांनी विज्ञान साध्या भाषेत समजावून सांगितले. ही परंपरा महत्त्वाची कारण 'डिजिटल इंडिया, स्पेस टेक, एआय, डेटा सायन्स, हेल्थ टेक' या क्षेत्रांमध्ये यशस्वी होण्यासाठी समाजाला **विज्ञानसमज**, **तर्क** आणि **चिकित्सक दृष्टि** आवश्यक आहे. साहित्य हीच वैज्ञानिक जाणीव सामान्य माणसापर्यंत पोहोचवते.

अंधश्रद्धा निर्मूलनाची मूल्यभूमी:

विवेकवाद म्हणजे धर्मविरोध नव्हे, विवेकवाद म्हणजे **मानवहित आणि सत्यशोध**. मराठी साहित्याने अनेकदा ढोंग, बुवाबाजी, अंधश्रद्धा यांवर व्यंग्य आणि टीका केली. अशा साहित्यामुळे समाजात प्रश्न विचारण्याची हिंमत वाढते. आज अफवा, फेक न्यूज आणि सायबर फसवणूक वाढलेल्या काळात हे मूल्य अधिक गरजेचे आहे. विकसित भारतासाठी **डिजिटल साक्षरता** आणि **माहितीची सत्यता तपासण्याची वृत्ती** ही निर्णायक ठरते.

फक्त विज्ञान असून चालत नाही, विज्ञानाला नैतिक दिशा लागते. विकसित भारतात एआय, जैवतंत्रज्ञान, डेटा गोपनीयता, पर्यावरणीय संकट यांसारखे प्रश्न निर्माण होतात. अशा वेळी साहित्य समाजाला विचारायला शिकवते, हे योग्य आहे का?, मानवतेला लाभ होतो का?, वंचितांवर परिणाम काय? ही नैतिक चिकित्सा हीच मूल्याधिष्ठित आधुनिकता आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा ग्रामीण भाग, शेती आणि कष्टकरी समाज आहे. 'विकसित भारत : २०४७' हे स्वप्न साकार करायचे असेल, तर **ग्रामीण विकास, शेतकरी समृद्धी, कौशल्यविकास आणि श्रमाचा सन्मान** अपरिहार्य आहे. मराठी साहित्याने श्रमाला कमीपणा न मानता जीवनाचा गौरव मानले आहे. ग्रामीण साहित्य, लोकसाहित्य आणि कष्टकरी जीवनाचे चित्रण हे मराठी साहित्यातील मोठे योगदान आहे.

लोकसाहित्य आणि कष्टाचा सौंदर्यदृष्टिकोन:

ओव्या, गीते, श्रमगीत, पोवाडे यामधून काम करणाऱ्या स्त्री-पुरुषांचे जीवन दिसते. लोकगीतांमध्ये श्रम हा आनंद, जगण्याचा उत्सव, आणि समाजसंस्कृतीचा भाग आहे. हीच श्रमसंस्कृती विकसित भारतासाठी आवश्यक असलेली कामाची नितीमत्ता निर्माण करते.

बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांमध्ये ग्रामीण जीवनाचे दर्शन अत्यंत सहज आणि वास्तववादी आहे. *"अरे संसार संसार..."*[५] सारख्या ओळी कष्ट, सहनशीलता, आणि जगण्याचा अर्थ सांगतात. हे साहित्य ग्रामीण भारताच्या मानसिकतेचा आरसा आहे. विकास म्हणजे शहरांची झगमग नव्हे, विकास म्हणजे ग्रामीण माणसाचे जगणे उंचावणे हा संदेश येथे मिळतो.

व्यंकटेश माडगूळकर लिखित 'बनगरवाडी' ग्रामीण जीवनातील साधेपणा, गरिबी, निसर्गाशी नाते आणि सामाजिक संरचना उलगडते. **आनंद यादव यांची 'झोंबी'** ही आत्मकथा कष्टकरी जीवनाचा टोकाचा संघर्ष दाखवते: शिक्षणासाठीची धडपड, भूक, अपमान, आणि जगण्याचा जिद्द."[६] या साहित्यकृती 'विकसित भारत'ला मूलभूत प्रश्न विचारतात. केवळ औद्योगिक वाढ पुरेशी आहे का? ग्रामीण दारिद्र्य, स्थलांतर, बेरोजगारी, शेतमालाचे भाव, सिंचन, शिक्षण या समस्या सुटल्याशिवाय राष्ट्र कसे विकसित होईल?

विकसित भारतासाठी 'मेक इन इंडिया', 'स्टार्टअप इंडिया', 'स्किल इंडिया' अशा उपक्रमांचा पाया म्हणजे श्रमाचा सन्मान. जर समाजात कामाला कमी लेखले, तर कौशल्यविकास अपुरा पडतो. मराठी साहित्याने मात्र श्रमाला गौरव दिला आहे शेतकरी, विणकर, कामगार, स्त्रीकष्टकरी यांच्या जीवनातून काम म्हणजे प्रतिष्ठा ही भावना तयार केली.

आज शेतीला तंत्रज्ञानाची जोड, जलसंधारण, शाश्वत शेती, सहकार आणि ग्रामीण उद्योगांची गरज आहे. साहित्याच्या मूल्यभूमीतून हे स्पष्ट होते की विकास हा एका घटकाचा नसून **कृषी, उद्योग, पर्यावरण व मानवी कल्याण** यांचा समतोल आहे. मराठी साहित्य ग्रामीण जीवनाला मागास म्हणून नव्हे, तर राष्ट्राचा प्राण म्हणून बघते यातून विकसित भारताचा टिकाऊ मार्ग तयार होतो. विकसित भारताची उभारणी केवळ आर्थिक शक्तीने होत नाही, ती होते **नागरिकांच्या चारित्र्याने, नीतिमूल्यांनी, राष्ट्रप्रेमाने आणि संविधाननिष्ठेने.** मराठी साहित्याने राष्ट्रभक्तीचा विचार भावनेपुरता मर्यादित न ठेवता, **कर्तव्य, समाजहित आणि नैतिक जबाबदारी** यांच्याशी जोडला आहे. मराठी काव्यात राष्ट्रप्रेमाची परंपरा दिसते. **स्वातंत्र्यवीर सावरकर** यांच्या कविता आणि विचारांमध्ये धैर्य,

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठा व्यक्त होते. **कुसुमाग्रज (वि.वा.शिरवाडकर)** यांच्या कवितांमध्ये मानवी स्वातंत्र्य, अन्यायाविरुद्ध संघर्ष आणि आत्मविश्वास आहे. कणा ही कविता संकटातही ताठ उभे राहण्याची मानसिकता देते. विकसित भारतासाठी अशी मानसिकता अत्यंत आवश्यक आहे, कारण विकासयात्रेत आर्थिक संघर्ष, जागतिक स्पर्धा, युद्ध/संकट, पर्यावरणीय आव्हाने येतात. त्या वेळी समाजाने खचू नये, ताठ उभे राहावे हा संस्कार साहित्य देते.

साने गुरुजी:

साने गुरुजींचे 'श्यामची आई' हे पुस्तक केवळ भावनिक आठवणी नाही, ते भारतीय नागरिक घडवणारे मूल्यशिक्षण आहे. आईची शिकवण म्हणजेच समाजाची नीतिमूल्ये सत्य, प्रामाणिकपणा, करुणा, साधेपणा. 'विकसित भारत' घडवताना प्रामाणिक प्रशासन, भ्रष्टाचारमुक्त समाज, सामाजिक विश्वास आवश्यक असतो. साने गुरुजींच्या साहित्यामुळे समाजात ही मूल्यजाणीव दृढ होते. राष्ट्रभक्तीचा सर्वोच्च अर्थ म्हणजे **संविधानाचा सन्मान.** भारताचे संविधान समानता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता या मूल्यांवर उभे आहे. मराठी विचारविश्वावर आंबेडकरांचा प्रभाव मोठा आहे. दलित साहित्य, परिवर्तनवादी लेखन, सामाजिक न्यायवादी कविता या सर्वांनी लोकशाहीचे मर्म सांगितले, 'माणूस मोठा, जात नाही.', 'हक्क आणि कर्तव्य समांतर.' व 'लोकशाही म्हणजे फक्त मतदान नाही, ती जीवनपद्धती आहे.' विकसित भारतासाठी कायदे, प्रशासन, न्यायव्यवस्था, नागरिक हक्क, पारदर्शकता या बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. संविधानिक नैतिकता नसेल, तर विकास 'सत्ताकेंद्रित' होतो. साहित्य लोकशाहीचे संरक्षण करते कारण ते अन्यायावर प्रश्न विचारते. आज 'विकसित भारत : २०४७' म्हणजे, स्वच्छता, शिस्त, नियमपालन, सार्वजनिक मालमत्तेची काळजी, करभरणा, पर्यावरणीय जबाबदारी, सामाजिक संवेदनशीलता ही सर्व नागरिकधर्माची अंगं आहेत. मराठी साहित्याने समाजाला फक्त हक्क नव्हे तर कर्तव्यही शिकवले. राष्ट्रभक्ती म्हणजे केवळ घोषवाक्य नाही, ती **वर्तनातून** दिसते. हाच साहित्याचा सर्वात मोठा योगदानात्मक संदेश आहे.

निष्कर्ष:

मराठी साहित्यातील जीवनमूल्ये ही विकसित भारताच्या संकल्पनेला केवळ प्रेरणा देत नाहीत, तर तिचे **वैचारिक अधिष्ठान** तयार करतात. संतपरंपरेने समता व मानवधर्म शिकवला. सुधारकांनी विवेक आणि परिवर्तनाचे धाडस दिले. दलित साहित्याने न्यायाचा अनुभवाधिष्ठित आवाज दिला; स्त्रीवादी लेखनाने स्त्रीला स्वातंत्र्य व नेतृत्वाची दिशा दिली. ग्रामीण साहित्याने श्रमप्रतिष्ठा व ग्रामविकासाचे वास्तव उघडे केले. तर राष्ट्रभक्तीपर साहित्याने नागरिकधर्म आणि संविधानिक नैतिकता दृढ केली. त्यामुळे 'विकसित भारत : २०४७' हे ध्येय फक्त तंत्रज्ञान–आर्थिक वाढ नसून **मूल्याधिष्ठित, समावेशक, विवेकी आणि संवेदनशील राष्ट्रनिर्मिती** बनते. मराठी साहित्याची ही परंपरा भारताला आर्थिक महासत्ता बनवतानाच मानवी महासत्ता बनवण्याचा मार्ग दाखवते.

संदर्भसूची:

१. कुलकर्णी अरुण, *मराठी साहित्याचा इतिहास*, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००८, पृ. क्र. ४५.
२. www.santchokhamela.com (संत चोखामेळा, अभंगवाणी)
३. फुले ज्योतिबा, *शेतकऱ्याचा आसूड*, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, २००३ (पुनर्मुद्रण), पृ. क्र. १२.
४. पवार दया, *बलुतं*, ग्रंथाली, मुंबई, १९७८, पृ. क्र. ६४
५. www.bahinabaichigani.co.in
६. यादव आनंद, *झोंबी*, राजहंस प्रकाशन, पुणे, १९८९, पृ. क्र. ११०
७. नारळीकर जयंत, *विज्ञानाची क्षितिजे*, राजहंस प्रकाशन, पुणे, २००५, पृ. क्र. ७४
८. शिरवाडकर वि. वा. (कुसुमाग्रज), *समग्र कविता*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०००, पृ. क्र. ०५.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) 2020 द्वारे शिक्षणात भारतीय ज्ञान प्रणालीचे समाकलन

डॉ. डी. झेड. सावळे
सहाय्यक प्राध्यापक (इतिहास)
म. स. गा. महाविद्यालय मालेगाव
ई-मेल :- dzsavale4050@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180217
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 69-72
February 2026
Submitted: 20 Jan. 2026
Revised: 29 Jan. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश (Abstract)

प्रस्तुत लेख राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) 2020 अंतर्गत भारतीय ज्ञान प्रणालीच्या (IKS) समाकलनाचे सखोल विश्लेषण करतो. भारत हा प्राचीन संस्कृती आणि अफाट ज्ञानसंपदेचा वारसा लाभलेला देश आहे. NEP 2020 हे धोरण आधुनिक वैज्ञानिक ज्ञान आणि भारताची पारंपरिक ज्ञानपरंपरा यांमधील अंतर कमी करण्याचा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे. या संशोधनाद्वारे IKS ची संकल्पनात्मक चौकट, त्याचे विविध पैलू जसे की विज्ञान, गणित, आरोग्यशास्त्र आणि तत्त्वज्ञान यांचा अभ्यास करण्यात आला आहे. लेखात NEP 2020 मधील बहुविधीय शिक्षण, अनुभवात्मक अध्यापन आणि मातृभाषेतील शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. त्याचबरोबर, अभ्यासक्रम रचना, शिक्षकांचे प्रशिक्षण, भाषेच्या अडचणी आणि संसाधनांची कमतरता यांसारख्या अंमलबजावणीतील आव्हानांवरही चर्चा करण्यात आली आहे. शेवटी, धोरणात्मक नियोजन आणि शिक्षक क्षमतावर्धनाद्वारे भारतीय शिक्षण प्रणालीला अधिक समावेशक आणि जागतिक स्तरावर सक्षम बनवता येईल, असा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

शब्दसूची: **कीवर्ड्स**: NEP 2020, भारतीय ज्ञान प्रणाली, IKS, पारंपरिक ज्ञान, शैक्षणिक सुधारणा

प्रस्तावना

शिक्षण हा समाजाच्या सांस्कृतिक, बौद्धिक आणि नैतिक पाया घडविण्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतो. भारत, ज्याला प्राचीन संस्कृतीचा वारसा लाभला आहे, त्याजवळ शतकानुशतके निरीक्षण, प्रयोग आणि अनुभवातून विकसित झालेल्या ज्ञानाची विशाल संपत्ती आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 (NEP 2020) आधुनिक शिक्षणाला भारताच्या स्थानिक ज्ञानपरंपरांशी पुन्हा जोडण्याचे महत्त्व ओळखून एक महत्वाचा टप्पा ठरतो. NEP 2020 पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक वैज्ञानिक ज्ञान यामधील अंतर कमी करण्यासाठी बहुविधीय शिक्षण, अनुभवात्मक अध्यापन आणि मूल्याधारित शिक्षणाला प्रोत्साहन देते. शिक्षणात भारतीय ज्ञान प्रणाली (IKS) चे समाकलन केवळ सांस्कृतिक जतन करण्याचा प्रयत्न नाही, तर सर्वांगीण विकास, नैतिक जागरूकता आणि शाश्वत प्रगतीसाठी एक धोरणात्मक पाऊल आहे. हा लेख NEP 2020 कसे IKS चे शिक्षण प्रणालीमध्ये समाकलन साधते, त्याचे संभाव्य फायदे आणि अंमलबजावणीतील अडचणी यांचा गंभीर विश्लेषण करण्याचा प्रयत्न करतो.

भारतीय ज्ञान प्रणाली: संकल्पनात्मक चौकट

भारतीय ज्ञान प्रणाली (IKS) म्हणजे भारतात शतकानुशतके विकसित झालेल्या तत्त्वज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक क्षेत्रांचा संरचित आणि व्यवस्थित ज्ञानकोश होय.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. डी. झेड. सावळे, सहाय्यक प्राध्यापक (इतिहास) म. स. गा. महाविद्यालय मालेगाव

How to cite this article:
सावळे, . डी . झेड . (2026). राष्ट्रीय शिक्षण धोरण (*NEP)* 2020 द्वारे शिक्षणात भारतीय ज्ञान प्रणालीचे समाकलन. *Journal of Research and Development,* 18(2(*XIV*)), 69–72.
https://doi.org/10.5281/zenodo.18796315

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18796315
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

पारंपरिक ज्ञान प्रणालींप्रमाणे वेगळ्या विभागांमध्ये विभागलेले नसून, IKS सर्वांगीण समज विकसित करण्यावर भर देते, ज्यामध्ये जीवनाच्या शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक पैलूंचा समावेश आहे. IKS चे ज्ञान निरीक्षण, प्रयोग, चिंतन आणि अनुभवात्मक शिक्षणावर आधारित असते, ज्यामुळे ते तात्त्विक तसेच व्यावहारिक स्वरूपाचे असते (Chandel & Prashar, 2024; Gupta & Jaiswal, 2025).

IKS चे मुख्य तत्त्वे:

1. सर्वांगीण दृष्टीकोन: IKS ज्ञानाला स्वतंत्र शिस्तीऐवजी एकात्मिक स्वरूपात पाहते आणि नैतिक मूल्ये, तत्त्वज्ञान आणि व्यावहारिक उपयोग यांचे समाकलन प्रोत्साहित करते.
2. संतुलन आणि सुसंगती: भौतिक आणि आध्यात्मिक जीवनातील संतुलन राखण्यावर भर, वैयक्तिक कल्याणासह सामाजिक जबाबदारी वाढवणे.
3. अनुभवात्मक आणि निरीक्षणात्मक शिक्षण: ज्ञान प्रत्यक्ष अनुभव, गंभीर निरीक्षण आणि प्रयोगाद्वारे मिळते; केवळ पाठांतरावर आधारित नसते.
4. बहुविधीयता: भारतीय पारंपरिक ज्ञान विज्ञान, गणित, आरोग्य, कला, प्रशासन आणि तत्त्वज्ञान यांसारख्या अनेक क्षेत्रांना व्यापते आणि बहुविधीय दृष्टिकोन प्रोत्साहित करते.
5. सांस्कृतिक आणि नैतिक पाया: IKS भारतीय संस्कृती, नैतिकता आणि मूल्यांमध्ये खोलवर मुळांचे असून, नैतिक जागरूकता आणि सामाजिक सुसंगती वाढवण्याचा उद्देश ठेवते.[1]

IKS चे प्रमुख क्षेत्र:

- वैदिक व तत्त्वज्ञानिक ज्ञान: वेद, उपनिषद, धर्मशास्त्र यांसारख्या ग्रंथांतून तत्त्वज्ञान, नैतिकता, तर्कशास्त्र आणि मानव वर्तन याबाबत अंतर्दृष्टी मिळते.
- विज्ञान व गणित: खगोलशास्त्र, आर्यभटिय गणित, शून्याची संकल्पना, बीजगणित, भूमिती, प्रगत निरीक्षण पद्धती.
- आरोग्यशास्त्र: आयुर्वेद, योग आणि सिद्धा प्रणाली शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक आरोग्यावर भर देतात.
- कला व वास्तुकला: भारतीय शास्त्रीय संगीत, नृत्य, शिल्पकला, मंदिरे व वास्तुकला सांस्कृतिक आणि आध्यात्मिक समज दाखवतात.
- कृषी व पर्यावरण ज्ञान: पारंपरिक पद्धती शाश्वत शेती, जल व्यवस्थापन, पीक फेरी आणि पर्यावरण संतुलन यावर भर देतात.
- शासन व अर्थशास्त्र: चाणक्य यांच्या अर्थशास्त्रासारखे ग्रंथ प्रशासन, अर्थशास्त्र, कूटनीती आणि नैतिक नेतृत्व याचे मार्गदर्शन करतात.[2]

भारतीय ज्ञान प्रणाली हा आजही एक सजीव ज्ञानसंग्रह आहे, जो आधुनिक शिक्षण, संशोधन आणि नवोन्मेषाला मार्गदर्शन करू शकतो. NEP 2020 द्वारे IKS चे समाकलन केल्याने या बौद्धिक वारशाचे संरक्षण होण्यासोबतच विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, नैतिक आणि सांस्कृतिक क्षमतांमध्ये वृद्धी होऊ शकते (Mishra et al., 2024; Vageeshan & Kamalakar, 2025).

NEP 2020 आणि IKS चे समाकलन

NEP 2020 भारताला ज्ञानाधारित समाज बनविण्यासाठी रचनात्मक आणि अध्यापनात्मक सुधारणा सादर करते. IKS समाकलनासाठी संबंधित मुख्य वैशिष्ट्ये:

1. बहुविधीय आणि सर्वांगीण शिक्षणावर भर.
2. भारतीय भाषा आणि बहुभाषिकतेला प्रोत्साहन.
3. अभ्यासक्रमाची लवचिकता आणि अनुभवात्मक शिक्षण.
4. सांस्कृतिक मूल्ये आणि नैतिकतेचे समाकलन.
5. शिक्षक शिक्षण व मूल्यांकनातील सुधारणा.

धोरण स्पष्टपणे अभ्यासक्रम रचना, अध्यापन आणि संशोधनामध्ये भारतीय ज्ञानपरंपरेचा समावेश करण्यास प्रोत्साहित करते. यामुळे विद्यार्थ्यांना सांस्कृतिकदृष्ट्या जडणघडण झालेल्या आणि जागतिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचा उद्देश साधला जातो. NEP 2020 ही 21 व्या शतकातील भारताची पहिली मोठी शैक्षणिक धोरण असून, पारंपरिक ज्ञान प्रणाली आणि आधुनिक वैज्ञानिक शिक्षण यातील अंतर कमी करण्याचा प्रयत्न करते. मुख्य उद्दिष्ट म्हणजे भारतीय ज्ञान प्रणाली (IKS) चे सर्व स्तरांवर औपचारिक शिक्षणात समाकलन करून सांस्कृतिक जडणघडण, नैतिक मूल्ये आणि नवोन्मेषी विचारसरणी वाढवणे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

NEP 2020 ची IKS संदर्भातील मुख्य वैशिष्ट्ये

1. अभ्यासक्रम पुनर्रचना: लहान वयापासून उच्च शिक्षणापर्यंत सर्व टप्प्यांवर सर्वांगीण विकास साधण्यासाठी 5+3+3+4 शैक्षणिक व अध्यापनात्मक रचनेची ओळख करणे.
2. बहुभाषिकता: मातृभाषा/स्थानिक भाषा माध्यम म्हणून वापरण्यावर भर देणे, ज्यामुळे संस्कृतसारख्या प्रादेशिक आणि शास्त्रीय भाषांमध्ये IKS संदर्भातील सामग्री सहज उपलब्ध होईल.
3. अंतरविषयक आणि बहुविधीय शिक्षण: विद्यार्थ्यांना अनेक विषयांमध्ये एकाच वेळी अभ्यास करण्यास प्रोत्साहित करणे, पारंपरिक ज्ञानाचे आधुनिक विज्ञान, कला व तंत्रज्ञानासह समाकलन करणे.
4. अनुभवात्मक शिक्षण आणि मूल्याधारित शिक्षण: प्रत्यक्ष करून शिकण्यावर भर देणे, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विचारशीलता, समस्या सोडविण्याची क्षमता, नैतिक विचारसरणी आणि पारंपरिक ज्ञानाचे व्यावहारिक उपयोग वाढतात.
5. शिक्षक शिक्षण सुधारणा: शिक्षक व शिक्षणतज्ज्ञांच्या क्षमतेवर लक्ष केंद्रित करणे, जेणेकरून ते आधुनिक अध्यापन पद्धती वापरून IKS सामग्री प्रभावीपणे शिकवू शकतील.
6. मूल्यमापन सुधारणा: क्षमता-आधारित, रूपरेषात्मक आणि सर्वांगीण मूल्यमापन पद्धती स्वीकारणे, जे पारंपरिक पाठांतराच्या पद्धतीपेक्षा विद्यार्थी प्रगतीचे अधिक व्यापक मूल्यमापन करतील, तसेच IKS च्या अनुभवात्मक शिक्षण तत्त्वांशी सुसंगत असतील.
7. IKS संशोधन आणि नवोन्मेष: IKS संशोधन केंद्रांची स्थापना, प्रकाशनांचे प्रोत्साहन, आणि राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय सहकार्याद्वारे पारंपरिक ज्ञानाचे प्रसार व संवर्धन सुनिश्चित करणे.[3]

NEP 2020 मध्ये IKS चे समाकलन

NEP 2020 IKS चा वैज्ञानिक, तात्त्विक आणि सांस्कृतिक महत्त्व स्पष्टपणे ओळखते आणि शिक्षणात त्याचा समृद्धी करणारा प्रभाव अधोरेखित करते:

- शालेय शिक्षण: योग, आयुर्वेद, स्थानिक कला, गणित आणि पर्यावरणीय ज्ञान यांसारख्या IKS संकल्पना अभ्यासक्रमात समाविष्ट करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे.
- उच्च शिक्षण: IKS वर आधारित अंतरविषयक संशोधन कार्यक्रम व अभ्यासक्रम प्रोत्साहित करणे, ज्यामुळे विद्यार्थी प्राचीन ज्ञान प्रणाली आधुनिक वैज्ञानिक पद्धतीसह अभ्यास करू शकतील.
- शिक्षक प्रशिक्षण आणि अध्यापन पद्धती: शिक्षकांना अनुभवात्मक आणि मूल्याधारित शिक्षण पद्धती अंगीकारण्यास प्रोत्साहित करणे, जे IKS च्या तत्वांवर आधारित असून गुरुकुल प्रणालीसारखे शिक्षक-विद्यार्थी नाते निर्माण करतात.
- राष्ट्रीय व जागतिक पोहोच: डिजिटल प्लॅटफॉर्म, भाषांतर आणि सहकार्याद्वारे IKS सर्वांगीण आणि आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे, ज्यामुळे भारताची जागतिक शैक्षणिक उपस्थिती वाढेल.[4]

IKS चे आधुनिक शिक्षणासह समाकलन करून, NEP 2020 भारताच्या बौद्धिक वारशाचे पुनरुज्जीवन, शाश्वत ज्ञान पद्धतींचा प्रचार आणि सांस्कृतिकदृष्ट्या जडणघडण झालेले आणि जागतिकदृष्ट्या सक्षम विद्यार्थी तयार करण्याचा प्रयत्न करते. तथापि, यशस्वी अंमलबजावणीसाठी धोरणात्मक नियोजन, शिक्षक क्षमतावर्धन आणि पुरेसे साधन-संसाधने आवश्यक आहेत, जेणेकरून भाषेच्या अडचणी, अभ्यासक्रमातील बदल व पायाभूत सुविधा यांसारख्या अडचणींवर मात करता येईल.

अंमलबजावणीतील अडचणी

भारतीय ज्ञान प्रणाली (IKS) चे NEP 2020 द्वारे समाकलन फारच संभाव्य असले तरी, प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये अनेक अडचणी येतात. या अडचणी अभ्यासक्रम रचना, शिक्षक तयारी, पायाभूत सुविधा आणि सामाजिक-सांस्कृतिक घटकांशी संबंधित आहेत आणि त्यांचा व्यवस्थित तोडगा काढणे आवश्यक आहे (Singh, 2024; Joshi & Deivam, 2025; Rahman, n.d.; Sonpakar, n.d.).

1. अभ्यासक्रम रचना आणि प्रमाणन: IKS चे ज्ञान बहुधा मौखिक आणि साहित्यिक नसते, त्यामुळे ते प्रमाणित करून संरचित अभ्यासक्रमात समाविष्ट करणे कठीण असते. स्पष्ट आणि व्यवस्थित अभ्यासक्रम नसल्यास विद्यार्थी विविध विषयांमध्ये IKS संकल्पनांचा संपूर्ण अनुभव घेत नाहीत.
2. शिक्षक प्रशिक्षण आणि जागरूकता: अनेक शिक्षक IKS तत्त्वज्ञान, पद्धती आणि सामग्रीशी परिचित नसतात, ज्यामुळे प्रभावी शिक्षण अडचणीत येते आणि विद्यार्थ्यांचे पारंपरिक ज्ञान प्रणालीत असलेले रस कमी होतो.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

3. संसाधनांची कमतरता: प्रमाणित शिक्षण-संसाधने जसे की पाठ्यपुस्तके, डिजिटल साधने, भाषांतर आणि मल्टिमिडिया सामग्री यांची कमतरता आहे. या साधनांच्या विकासासाठी वेळ, कौशल्य आणि निधी लागतो.
4. भाषा अडचणी: IKS सामग्री बहुतेक संस्कृत किंवा प्रादेशिक भाषांमध्ये आहे, ज्यामुळे प्रवेश मर्यादित होतो. संकल्पनात्मक अखंडता जपून बहुभाषिक भाषांतर करणे ही मोठी आव्हान आहे.
5. बदलास विरोध: शिक्षक, प्रशासक आणि धोरणकर्ते पारंपरिक पाठांतरावर आधारित शिक्षण पद्धतीतून अनुभवात्मक आणि सर्वांगीण शिक्षणाकडे जाण्यास विरोध करू शकतात, ज्यामुळे अंमलबजावणी मंदावते आणि विसंगती निर्माण होऊ शकते.
6. पायलट अभ्यास आणि राज्यस्तरीय फरक: केवळ काही राज्यांनी IKS समाकलनाचे पायलट केले आहे, ज्यामुळे देशभर अंमलबजावणी असमान आहे. मर्यादित पायलट डेटा मोठ्या प्रमाणावर स्वीकारण्यासाठी आधारभूत नियोजनासाठी अडथळा ठरतो.
7. राजकीय व धोरणात्मक अडचणी: शैक्षणिक सुधारणा विरोध किंवा राजकीय परिस्थितीमुळे धोरणाची सातत्यता आणि अंमलबजावणी प्रभावित होऊ शकते, ज्यामुळे अनिश्चितता आणि विलंब निर्माण होतो.
8. सांस्कृतिक विविधता आणि स्वीकार: भारतातील सांस्कृतिक आणि भाषिक वैविध्यामुळे मानक IKS अभ्यासक्रम प्रादेशिक संदर्भात समायोजित करताना त्याचा प्रासंगिकता किंवा सर्वसमावेशकता गमावण्याचा धोका असतो.
9. आर्थिक व पायाभूत सुविधा मर्यादा: IKS चे प्रभावी समाकलनासाठी निधी, पायाभूत सुविधा, शिक्षण सामग्री आणि डिजिटल प्लॅटफॉर्मची गरज आहे, जी सर्व संस्थांमध्ये समान उपलब्ध नसतात.
10. मूल्यमापन पद्धतीतील बदल: IKS अनुभवात्मक, मूल्याधारित आणि सर्वांगीण शिक्षणावर भर देते, तर सध्याचे शिक्षण प्रणाली पारंपरिक संक्षेपात्मक मूल्यमापन पद्धतीवर अवलंबून आहे. IKS तत्त्वांशी सुसंगत मूल्यमापन करण्यासाठी प्रणालीगत बदल आवश्यक आहेत.[5]

निष्कर्ष

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 भारतीय शिक्षण प्रणालीमध्ये सर्वांगीण, समावेशक आणि बहुविधीय दृष्टिकोन अवलंबून एक महत्त्वपूर्ण बदल दर्शविते. या बदलाचा एक मुख्य स्तंभ म्हणजे भारतीय ज्ञान प्रणाली (IKS) चे शिक्षणामध्ये समाकलन, जे भारताच्या समृद्ध बौद्धिक वारशाचे संवर्धन करताना विद्यार्थ्यांमध्ये चिंतनशीलता, सृजनशीलता आणि नैतिक मूल्यांची वाढ साधण्याचा प्रयत्न करते. साहित्याचा आढावा आणि प्रकरण अभ्यास सूचित करतात की, IKS चे समाकलन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला लक्षणीय वाढ देऊ शकते, पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक वैज्ञानिक समज यातील अंतर कमी करू शकते. वेदांत, योग, आयुर्वेद, गणित, कला आणि प्रशासन यांसारख्या शास्त्रांमधून विद्यार्थी सांस्कृतिक जडणघडण तसेच जागतिक कौशल्य प्राप्त करू शकतात. शिवाय, IKS मध्ये अंतर्भूत अनुभवात्मक आणि मूल्याधारित अध्यापन पद्धती NEP 2020 मधील क्षमता-आधारित शिक्षण, अंतरविषयक अभ्यास आणि विद्यार्थी-केंद्रित मूल्यमापनास अगदी जवळून सुसंगत आहेत. तथापि, IKS चे यशस्वी अंमलबजावणी अनेक अडचणींवर अवलंबून आहे, जसे की अभ्यासक्रम रचना, शिक्षकांची तयारी, संसाधन उपलब्धता, भाषा अडचणी, पायाभूत सुविधा आणि सामाजिक-राजकीय अडथळे. या अडचणींवर मात करण्यासाठी धोरणात्मक नियोजन, पायलट अभ्यास, शिक्षक क्षमतावर्धन कार्यक्रम आणि सातत्यपूर्ण निधी आवश्यक आहे, जेणेकरून पारंपरिक ज्ञान शिकण्यास आणि टिकविण्यास अनुकूल वातावरण निर्माण होईल.

शेवटी, NEP 2020 अंतर्गत IKS चे समाकलन भारतीय शिक्षण प्रणालीला अधिक समावेशक, सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध आणि जागतिकदृष्ट्या सुसंगत बनवण्याची क्षमता राखते. शिक्षक, धोरणकर्ते आणि समाजातील विविध घटकांच्या काळजीपूर्वक नियोजन, सहकार्य आणि संसाधन विकासाद्वारे, भारत सुनिश्चित करू शकतो की त्याच्या प्राचीन ज्ञान प्रणाली आधुनिक शिक्षणासोबत फलित होतील आणि विद्यार्थ्यांना 21 व्या शतकातील कौशल्ये, मूल्ये आणि शहाणपण प्रदान करतील.

संदर्भ

1. भारत सरकार. (2020). *National Education Policy 2020*. New Delhi: Ministry of Education.
2. जैन, एस. (2018). *भारतीय ज्ञानपरंपरा आणि शिक्षण*. पुणे: शैक्षणिक प्रकाशन.
3. मोरे, पी. (2017). *भारतीय तत्त्वज्ञान आणि नैतिक शिक्षण*. मुंबई: संस्कृती प्रकाशन..
4. UNESCO. (2014). *Indigenous Knowledge and Education*. Paris: United Nations Educational, Scientific and Cultural Organization.
5. खोत, एस. (2018). *परंपरा आणि आधुनिक शिक्षणाचा समन्वय*. पुणे: विद्या प्रतिष्ठान.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

समकालीन कहानीकार मृदुला गर्ग और उनके कहानी संग्रह : एक अध्ययन

डॉ. अंजीर नथ्थु भील
गंगामाई एज्युकेशन ट्रस्ट संचालित,
कला वाणिज्य एवं विज्ञान महाविद्यालय, नगांव, तह, जिला धुले
anjeersonawane77@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180218
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 73-75
February 2026
Submitted: 20 Jan. 2026
Revised: 29 Jan. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश (Abstract)

प्रस्तुत लेख समकालीन हिंदी साहित्य की प्रख्यात लेखिका मृदुला गर्ग के कहानी संग्रहों का एक आलोचनात्मक अध्ययन है। मृदुला गर्ग ने अपनी लेखनी के माध्यम से भारतीय समाज, राजनीति और संस्कृति की अंतर्व्यवस्था पर बेबाक टिप्पणी की है। इस अध्ययन में विशेष रूप से उनके दो प्रमुख कहानी संग्रहों—'कितनी कैदें' और 'टुकड़ा-टुकड़ा आदमी'—का विश्लेषण किया गया है। लेखिका ने उच्चवर्गीय मानसिकता, नारी के मानसिक संत्रास, असफल वैवाहिक जीवन, आर्थिक शोषण और मध्यवर्गीय जीवन की विडंबनाओं को अत्यंत बारीकी से चित्रित किया है। उनकी कहानियाँ न केवल सामाजिक विसंगतियों को उजागर करती हैं, बल्कि मानवीय संवेदनाओं और यौन संबंधों के जटिल धरातल को भी स्पर्श करती हैं। यह शोध दर्शाता है कि मृदुला गर्ग ने समय की मांग को पहचानकर पारंपरिक मूल्यों को पुनः परिभाषित करने का प्रयास किया है, जिससे पाठकों को चिंतन-मनन की नई दिशा मिलती है।

शब्दसूची: *मृदुला गर्ग , समकालीन हिंदी कहानी , कितनी कैदें , टुकड़ा-टुकड़ा आदमी ,नारी चेतना , सामाजिक विसंगति , मध्यवर्गीय जीवन ,सांस्कृतिक मूल्य*

आरंभ।

हिंदी कहानी सहित्य में महान समकालीन लेखिका मृदुला गर्ग ने अपनी अलग पहचान बनाई है । वह मूलत: कथाकार कथाकार है। उन्होंने अनेक विधाओं में अपनी लेखनी चलाई है – जैसे उन्होंने कुछ नाटक भी लिखे है और भिन्न – भिन्न पत्रिकाओं में महत्त्वपूर्ण लेख भी लिखे है। कहानीकार मृदुला गर्ग केवल साहित्य और संस्कृति की अध्येता ही नहीं है; बल्कि उन्होंने भारतीय समाज को बहुत नजदीक से देखा और परखा है। इसलिए वह साहित्य, समाज, राजनीति, संस्कृति की अंतर्व्यवस्था पर बेझिझक टिप्पणी करती है। जिज्ञासा, कौतुहल, अनुभूति की व्यंजना ने कहानी को जन्म दिया है। यह सत्य है कि, हिंदी कहानी आधुनिक युग की देन है। बंग महिला की दुलाईवाली हिंदी की पहली मौलीक कहाही है। श्रीमती राजेंद्र बाल घोष (बंग महिला) एक बंगाली लेखिका थी। हिंदी साहित्य के इतिहास में प्रमुख बात सह है कि, पाश्चात्य संस्कृति एवं साहित्य ने सर्व प्रथम बंगाल को प्रभावित किया। इसलिए जागरुकता का प्रभाव भी सबसे पहले वहाँ की नारियों पर देखा गया है। हिंदी कहानी साहित्य मे विभिन्न विषयों को कथानक बनाकर कई लेखिकाएँ सामने आयी है जिनमें शिवरानी देती, शिवानी, उषा प्रियंवदा, शशिप्रभा शास्त्री, श्रीमती मेहरुन्निसा परवेज, मन्नू भंडारी, ममता कालिया, कांता भारती, श्रीमती कुसुम अंसल, मंजुल भगत, तिरुपमा सेवती, दीप्ति खंडेलवाल, श्रीमती सूर्यबाला, सुनिता जैन, श्रीमती मृदुला गर्ग आदि।

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. अंजीर नथ्थु भील, गंगामाई एज्युकेशन ट्रस्ट संचालित, कला वाणिज्य एवं विज्ञान महाविद्यालय, नगांव, तह, जिला धुले

How to cite this article:
भील, . अंजीर . नथ्थु . (2026). समकालीन कहानीकार मृदुला गर्ग और उनके कहानी संग्रह : एक अध्ययन. *Journal of Research and Development,* 18(2(*XIV*)), 73–75. https://doi.org/10.5281/zenodo.18796373

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18796373

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

हिंदी कथा साहित्य में महिला कहानीकारों मृदुला गर्ग ने अपनी एक विशिष्ट छबि बनाई है। मृदुला गर्ग मुलत: कथाकार है। उन्होंने कुछ नाटक भी लिखे है और विभिन्न पत्रिकाओं में लेख भी है। साहित्यकार मृदुला गर्ग एक सहित्य और संस्कृति की अध्येता ही नहीं है; बल्कि उन्होंने जीवन की सारिकियों से बहुत नजदीक देखा और परखा है। इसलिए वह सहित्य, समाज, राजनीति, संस्कृति की अंतर्व्यवस्था पर बेसिक टिप्पनी करती है।

साहित्यकार मृदुला गर्ग का जन्म 25 अकतूबर 1938 में कलकत्ता (पं.बंगाल) शहर में हुआ। तीन चार वर्ष की आयु में उनके पिता जी का तबादला दिली हो गया। इनकी शिक्षा-दीक्षा दिली में ही हुई। मृदुला गर्ग का था। 1963 में विवाह के बाद मृदुलाजी अपने पति के साथ दिल्ली छोडकर अन्य राज्यों में घूमती रहीं। लेकिन 1974 के बाद मे दिल्ली में ही आकर बस गई। लेखिका ने अपने पिता या पति का परिचय कही भी नहीं दिया है। इनके परिवार के बारें में इतनी सी जानकारी मिलती है, हुआ नूँ कि 1985 में आर्थिक दलावों की वजह से मेरे पति को अपना दफ्तर घर में खोलना पडा था। उसका मतलब या घर के चार प्राणियों के अलावा और चार मर्द, सुबह आठ बजे से लेकर रात आठ बजे तक घर में रहते थे। घर का कोई कोना ऐसा नहीं था, जहाँ उनका दखल न हो। एकांत दूर की बात थी, येज पर मुतवातिर आधा घंटा बैठ पाना भी मुहाक था। कल क्या जरुरत पड जाए और मेरे लिए गुहार मच उठे। इन हालात मै लेख और कभी-कभार कहानी लिख लेती थी। पर उपन्यास शुरु करने से खौफ खाती थी।1 रचनाकार जिस वातावरण में रहती है, उसे तत्कालीन समय प्रभावित करती है।

कहानीकार मृदुला गर्ग :

समकालीन कहानी साहित्य की, प्रमुख हस्ताक्षर जीनका नाम महिला कहानीकारों में काफी चर्चित है। वह समकालीन सांस्कृतिक सत्ता द्वारा प्रतिदिन सांस्करिक मूल्यों पर प्रश्नचिह्न लगाती है। स्वयं लेखिका लिखती है, मैं समझती हूँ कि जब लेखक सांस्कृतिक मूल्य व्यवस्था को पुन:परिभाषित करने की प्रेरणा से कहानी के कथ्य, शिल्प व भाषा में प्रयोग करता है तो हम कह सकते है कि, वह उसमें एक नए भावबोध को स्वर देने का प्रयोग कर रहा है।2 यह नया आवबोध लेखिका के कहानी साहित्य में उभरकर आया है। निम्नलिखित कहानीयों संग्रह पर हम प्रकाश डालना चाहते है।

1) कितनी कैंदे

कितनी कैदे मृदुला गर्ग का चर्चित कहानी संग्रह है। चित्रकोबरा एवं कितनी कैदे कहानी संग्रह के कारण ही मृदुला जी की बोल्ड लेखिका के रुप में छवि बन गई। कितनी कैदे यह कहानी मीना और मनोज नामक नव दंपत्ति की कहानी है। मीना का ठंडापन लिफ्ट मे मौत को सामने देखकर टूट जाता है, और वह पति को पूर्ण काम सुख देती है। मीना के ठंडेपन का कारण नशे में उस पर अनेकों लडको द्वारा किया गया रेप था। मीना अपनी अतीत की कहानी मनोज से कहकर भीतरी घुटन से मुक्ति पाती है पर दूसरी कैद में अटक जाती है। उसके मन में यह प्रश्न उठता है कि, क्या मनोज आगे की जिंदगी निभा पायेगा? यह बहुत बडा सवाल बनकर रह गया है। विचल नामक कहानी अपने समय की बहुचर्चित कहानी है। उच्चवर्गीय लोगों की विशिष्ट मानसिकता का चिमण करनेवाली कहानी है। दुनिया का कायदा यह कहानी उच्चवर्गीय जीवन के क्लब, होटल, डांस, कैबरे आदि को सामने लाकर सोचने के लिए मजबूर कर देती है। अंदर बाहर यह कहानी मृदुला जी अत्यंत बिखरी हुई कहानी है। वह गुंडे को शहीद बनानों चाहती है। सुधापूर्ति, यह कहानी अपवादात्मक विषय पर लिखी कहानी है। अत: हम कह सकते है कि, कितनी कैदे कहानी संग्रह की कहानीयाँ विभिन्न विषयों को कथानक बनाकर सामने आयी है, जिसमें खट्टी – मिट्टी दोनों प्रकार का रसास्वादन पाठक मिलता है।

2)टुकडा – टुकडा आदमी :-

कहानीकार मृदुला गर्ग का टुकडा-टुकडा आदमी यह कहानी संग्रह बहुचर्चित रहा है। वह समय ही मांग को देखकर अपनी साहित्य रचना करती है। उन्हे पारिवारिक, सामाजिक जीवन से जैसे हि समय मिलना है, वह कुछ न कुछ लिखती है, वह स्वयं लिखती है कि घर में रोजमरी के यह कामकाज – खाना बनाना झाडू-पोंछा करना, फैला सामान बटोरना, नौकर से झिकझिक करना, सौदा मँगाना, हिसाब रखना, कपडे धोना, इतने छोटे-छोटे होते है कि इनका हवाला देकर न तो किसी से व्यस्तता की फरियाद की जा सकती है और न उन्है निबटाकर बौध्दिक संतोष का अनुभव। सबसे कष्टप्रद चीज यह लगती है कि वह इतनी अनिवार्यता के साथ रोज-दर-रोज घंटे-दर-घंटे सिर पर सवार हो जाते है कि उन्हें किए बिना रहा भी रहीं जा सकता"3 मृदुला जी ने परिवार की जिम्मेदारियाँ निभाते-निभाते ही लेखन कार्य पूर्ण किया।

टुकडा-टुकडा आदमी की कहानियाँ आम आदमी का दर्द कहने वाली कहानियाँ है। इस संग्रह में कुल चौदह कहानियाँ है। इस संग्रह मे नारी के मानसिक संत्रास असफल वैवाहिक जीवन, आर्थिक शोषण आदि समस्या की अभिव्यक्ति हुई है। टुकडा-टुकडा आदमी, नामक कहानी मे कारखानों में काम करने वाले गरीब मजदूरों के हालात तथा अधिकारी वर्गो के झूठ और भ्रष्ट आश्वासनों का चित्रण हुआ है। इस कहानी में

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

बेलापुर सीमेंट कंपनी के चेअरमन सुबोध कुमार के दोगले चरित्र का उद्घाटन हुआ है। पोंगल पोली इस कहानी में इस बात का खंडन कर रही है कि गरीब को कला का ज्ञान नहीं होता। वास्तव में कलात्मक रुचि का संबंध धन और शिस्त से नही होता। यह तो जन्मजात प्राप्त होती है। कहानी में पाषण मूर्ति के साथ बेहद लगाव रखने वाली सोनम्मा कहानी की नायिका है। कहानी में ग्रामीण जीवन की साधनहीनता, दयनीय जीवन की कथा प्रस्तुत की गई है।

दूसरा चमत्कार :-

यह कहानी मृदुला जी की बहुचर्चित कहानियों में से एक है। कहानी के माध्यम से उच्च वर्ग की पाखंड वृत्ति और निम्न वर्ग एवं गरीब अनपढ लोगों की अंधश्रध्दा को बेनकाब किया गया है। कहानी में सेठ कटारिया की उत्पादन-लाभ बुध्दि से परिचित कराती है। संत महाराज भी केवल अमीरों के होते है, गरीबों के नहीं। यह कहानी समकालीन कहानीयों में अत्यंत प्रासंगिक है। कहानी मुख्य कथ्य है, उद्योगपति, नेत्त और नये – नये चमत्कारों से लोगों के चमकृत करने वाले ढोंगी साधु के चमत्कारों का वर्णन किया गया है।

अवकाश :-

यह कहानी पति – पत्नी के बीच किसी तीसरे की उपस्थिति के कारण पैदा हुए तनाव और इस तनाव के बीच जी रही नायिका के मानसिक द्वव्द को चित्रित करती है। वह पति से तलाक चाहती है। उसका यह निर्णय भावना के बहाव में लिया गया निर्णय नही है, बाल्कि वह तो यह निर्णय सोच समझकर लेती है। यह कहानी वर्तमान समय में समकालीन लगती है।

दो फुल :-

यह कहानी के माध्यम से नारी पर होने वाले अत्याचार शोषण के साथ नारी की विवशना को चित्रित किया गया है।

कहानी में शांतम्मा कलात्मक अधिरुचि संपन्न स्त्री है। लेकिन पति के कर्मों की सजा पाकर धीरे-धीरे मृत्यु को गले लगाने के लिए बाध्य है। शांतता के यून में सिलिसिस्त नायक बीमारी है, जो पति के कर्मो की सजा है। कहानी इन औरतों के प्रति पाठकों के मन में गहरी सहानुभूति जगाती है।

गुलाब के बगीचे तक :-

यह कहानी कल्पना और वार्थ के बीच जी रहे नायक की मानसिक स्थिती का चित्रण करती है।

इस कहानी का मध्यवर्गीय नायक सपना देखता रहता है कि उसका एक छोटा सा बगीचा हो और उससे सटी छोरी सी छत वाली कॉटेज उसके भीतर से दो चेहरे एक आदमी का और एक औरत का नायक शादी करता है लेकिन पत्नी कल्पना के अनुरुप न मिलने पर अन्य चेहरे की तलाश करता है। अर्थात कहानी में मध्यवर्गीय जीवन की कठिनाइयों और अर्थ के अभाव की वजह से दयनीय अवस्था चित्रण है।

उसका विद्रोह :-

कहानी में शोषक वर्ग के प्रति शोषित वर्ग के विद्रोह को व्यक्त किया गया है। कहानी का नायक वह अपनी गरीबी के चलते एक धनी शेठ के यहाँ झाडू-वर्तन आदि काम करता है। कहानी में नौकर के विद्रोही अहं की अभिव्यक्ति स्पष्ट हुई है।

मौत में मदद :-

यह कहानी वर्तमान समय में समाज में रहने वाले दिखाने का जीवन जी रहे लोगों पर करारा व्यंग्य किया है। कहानी में समाज का भीषण चित्र प्रस्तुत किया है।

रुकावट :-

रुकावट कहानी में दाम्पत्येत्तर यौन सम्बन्ध का चित्रण किया गया है। रीता मदत से शारीरिक प्रेम संबंध स्थापित कर लेती है। लेकिन जब वह यह जान लेती है कि मदत ने उसके पहले तीन-तीन लडकियों से संबंध स्थापित किये थे तो संबंधो में रुकावट आती है और उसे अपने पति का निश्चल स्नेह याद आ जाता है।

मृदुला गर्ग के हिंदी कहानी साहित्य में समय की मांग को पहचानकर अपनी लेखनी चलाई है जो काफी हद तक सफल रही है। सामाजिक, सांस्कृतिक, राजनीतिक, मध्यवर्ग, उच्चवर्ग आदि अनेक विषयों कों कथ्य बनाकर कहानियाँ लिखी है, जो पाठकों को चिंतन मनन करने के लिए सचेत कर देती है।

संदर्भ :-

1) चुकते नहीं सवाल, मृदुला गर्ग, सामाजिक प्रकाशन, जटवाडा नेताजी सुभाष मार्ग, दरियागंज दिखडी प्रथम संस्करण पृ.154
2) कठगुलाब, मृदुलागर्ग भारतीय ज्ञानपीठ, लोदी रोड नई दिल्ली, तिसरा संस्करण पृ.56
3) उसके हिस्से की धूप, मृदुला गर्ग, अक्षर प्रकाशन प्रा.लि. प्रथम संस्करण 1975 पृ.168

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

सांस्कृतीक वारसा व भारतीय ज्ञानप्रणाली

Hoke Sheela Raghoba
Kavya Mahila Mahavidyalaya, Ambajogai, Dist Beed (College Code 479)

Manuscript ID:
JRD -2026-180219
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 76-81
February 2026
Submitted: 20 Jan. 2026
Revised: 29 Jan. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश (Abstract)

प्रस्तुत शोधनिबंध भारतीय सांस्कृतिक वारसा आणि भारतीय ज्ञानप्रणाली (Indian Knowledge System - IKS) यांच्यातील परस्परसंबंधांचे सखोल विश्लेषण करतो. भारतीय संस्कृती ही जगातील प्राचीन संस्कृतींपैकी एक असून ती 'विविधतेत एकता' या तत्त्वावर आधारलेली आहे. अश्मयुगापासून ते आधुनिक काळापर्यंतच्या प्रवासात सिंधू संस्कृती, वैदिक काळ आणि विविध परकीय आक्रमणांच्या भारतीयीकरणामुळे ही संस्कृती समृद्ध झाली आहे. या निबंधात भारतीय संस्कृतीचे प्रमुख पैलू जसे की धर्म, अध्यात्म, भाषा, साहित्य, कला आणि कुटुंबव्यवस्था यांचा आढावा घेतला आहे .

तसेच, भारतीय ज्ञानप्रणाली (IKS) ही केवळ एक प्रथा नसून ती अनुभव, निरीक्षण आणि प्रयोगावर आधारित एक पद्धतशीर ज्ञान हस्तांतरणाची प्रक्रिया आहे . राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020) अंतर्गत या प्राचीन ज्ञानाला आधुनिक शिक्षणात समाविष्ट करण्याच्या महत्त्वावर यात प्रकाश टाकला आहे. शेवटी, भारतीय ज्ञानप्रणाली ही केवळ भूतकाळाचा ठेवा नसून आधुनिक काळातील सामाजिक आणि पर्यावरणीय समस्यांवर उपाय शोधणारी एक जिवंत परंपरा आहे, असा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

शब्दसूची (Keywords): *भारतीय संस्कृती , सांस्कृतिक वारसा, भारतीय ज्ञान प्रणाली (IKS) , NEP-2020, विविधतेत एकता , प्राचीन भारत , योग आणि आयुर्वेद , शाश्वत जीवनशैली*

परिचय

भारतीय संस्कृतीचा इतिहास समृद्ध व वैविध्यपूर्ण आहे. सिंधू संस्कृतीचा उदय व अस्त आर्याचे स्थलांतर] ग्रीक] पाशयन] शक] पहलव] कुशाण] हूण यांची प्राचीन काळातील आक्रमणे व त्यांचे भारतीयीकरण तसेच मध्ययुगीन काळातील इस्लामिक आक्रमणे व त्यांचे भारतीयीकरण या प्रक्रियेमधून भारतीय संस्कृती समृद्ध व वैविध्यपूर्ण झाली. हा संपूर्ण सांस्कृतिक प्रवास राजकीय] सामाजिक] आथिक] धार्मिक मन्वंतरांमधून घडतो] उत्क्रांत होतो. या मन्वंतरांच्या संदर्भासहित संस्कृतीचा केलेला अभ्यास अधिक सयुक्तिक ठरतो. संस्कृतीचा अभ्यास म्हणजे नेमका कोणत्या घटकांचा अभ्यास हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. संस्कृतीमध्ये भाषा व साहित्य] वास्तुकला तसेच संगीत] नृत्य] शिल्पकला] चित्रकला यांसारख्या कलाविष्कारांचा अंतर्भाव होतो. एखाद्या कालखंडातील संस्कृतीच्या या सर्व अंगांचा अभ्यास व दोन किंवा अधिक कालखंडामधील त्यांचा परस्परसंबंध आणि उत्क्रांती यांचे आकलन अपेक्षित आहे. यासाठी किंबहुना इतिहासाच्या कोणत्याही अंगाच्या आकलनासाठी भारतीय इतिहासाची ढोबळ रूपरेखा पूर्णपणे समजून घेणे अत्यावश्यक ठरते. भारतीय अश्मयुगाचा यात अंतर्भाव करण्याची फारशी आवश्यकता नाही. अश्मयुगाचा ठउएफळ च्या पुस्तकांतून केलेला अभ्यास पुरेसा ठरतो. प्राचीन भारत (सिंधू संस्कृती] वैदिक काळ] वेदोत्तर / मौर्यपूर्व काळ] मौर्यकाळ /साम्राज्य] मौर्योत्तर / गुप्तपूर्व काळ] गुप्त काळ/साम्राज्य] गुप्तोत्तर काळ

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
Hoke Sheela Raghoba, Kavya Mahila Mahavidyalaya, Ambajogai, Dist Beed (College Code 479)

How to cite this article:
Hoke, S. R. (2026). सांस्कृतीक वारसा व भारतीय ज्ञानप्रणाली. *Journal of Research and Development, 18(2(XIV)), 76–81. https://doi.org/10.5281/zenodo.18796413*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18796413

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

)] मध्ययुगीन भारत (आद्य मध्ययुगीन काळ- चोल साम्राज्य] गुर्जर प्रतिहार] राष्ट्रकूट] पाल यांचा संघर्ष) मध्ययुगीन काळ (सुल्तानशाही] मुघल साम्राज्य] दक्षिणेमध्ये विजयनगर व बहामनी राज्ये)] आधुनिक भारत (कंपनीचा काळ] भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाचा काळ] भारतीय स्वातंत्र्याची चळवळ] स्वातंत्र्योत्तर भारत) याला भारतीय इतिहासाची ढोबळ रूपरेखा म्हणता येईल. भारतीय संस्कृतीच्या संदर्भात आपण याचा विचार करू.

भारतीय संस्कृतीचे प्रमुख पैलू

धर्म आणि अध्यात्म)Religion and Spirituality) : भारत हे हिंदू, बौद्ध, जैन आणि शीख धर्मांची जन्मभूमी आहे, जिथे विविध धर्मांचे लोक शांततेत एकत्र राहतात.

सण आणि उत्सव (Festivals) : दिवाळी, होळी, दसरा, ईद, ख्रिसमस, गणेशोत्सव असे अनेक सण देशभर उत्साहाने साजरे केले जातात, जे संस्कृतीची एकता दर्शवतात.

भाषा आणि साहित्य (Languages and Literature) : भारतात शेकडो भाषा आणि बोलीभाषा बोलल्या जातात, आणि वेद, उपनिषदे, महाकाव्ये .हा संस्कृतीचा भक्कम आधार आहेत (महाभारत-रामायण)

कला आणि वास्तुकला (Arts and Architecture) : मंदिर स्थापत्य, मशिदी, किल्ले, शास्त्रीय नृत्य भरतनाट्यम .उदा), कथकआणि (हिंदुस्तानी) संगीत, कर्नाटक.हे भारतीय संस्कृतीचे प्रमुख भाग आहेत (

खानपान आणि पेहराव- (Food and Clothing) : विविध प्रांतानुसार अन्न पोळी-उत्तर भारतीय), दक्षिण भारतीयआणि (तांदूळ-साडी) पेहराव, कुर्ता.यामध्ये मोठी विविधता आढळते (पायजमा-

मूल्ये आणि परंपरा (Values) : कुटुंब व्यवस्था, आदर, शिष्टाचार, योगासने, आणि निसर्गाचे रक्षण ही भारतीय (पर्यावरण संवर्धन) .संस्कृतीची मुख्य वैशिष्ट्ये आहेत

हजारो वर्षांपासून चालू राहिलेली ही अखंड परंपरा आजही जिवंत आहे.

भारतीय संस्कृतीची प्रमुख वैशिष्ट्ये

भारतीय संस्कृती ही जगातील सर्वात प्राचीन, समृद्ध आणि वैविध्यपूर्ण संस्कृतींपैकी एक असून ती 'विविधतेत एकता' (Unity in Diversity) या तत्त्वावर आधारित आहे. हजारो वर्षांची अखंड परंपरा, कुटुंबव्यवस्था, धार्मिक सहिष्णुता, पाहुणचार (अतिथी देवो भव) आणि कला-साहित्याचा वारसा ही तिची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

विविधतेत एकता : भारतात अनेक धर्म, भाषा, चालीरीती आणि विविध पेहराव असूनही, एकाच धाग्यात गुंफलेले साम्य दिसते.

अखंडता आणि प्रवाहीपणा : सिंधू संस्कृतीपासून ते आजपर्यंत, ही संस्कृती काळाच्या ओघात स्वतःला बदलत (बदलून) पण आपली मूळ तत्वे जपून टिकून आहे.

सहअस्तित्व आणि सहिष्णुता : भिन्न धार्मिक, सांस्कृतिक लोक शांततेने एकत्र राहतात, ही संस्कृती शांती आणि अहिंसेला आधार मानते.

कुटुंबव्यवस्था व संस्कार : संयुक्त कुटुंब पद्धती, आदर, प्रेम आणि मूल्यांवर भर दिला जातो.

अतिथी देवो भव : पाहुण्यांना देवाप्रमाणे मानणे ही भारतीय संस्कृतीची ओळख आहे.

आध्यात्मिक व धार्मिक वृत्ती : योग, ध्यान, पूजा, व्रत-वैकल्ये आणि पुनर्जन्मावर विश्वास हे संस्कृतीचे अविभाज्य भाग आहेत.

कला आणि वारसा : नृत्य, संगीत, वास्तुकला आणि साहित्य अशा अनेकविध कलांचा समृद्ध वारसा.

पुरुषार्थ : भारतीय संस्कृतीत धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार गोष्टींना विशेष महत्त्व आहे.

भारतीय संस्कृती ही केवळ परंपरांचा संच नसून, ते एक प्रवाही जीवनशैलीचे तत्त्वज्ञान आहे.

भारतीय संस्कृतीची विष्लेशणात्मक मुद्दे

मूलभूत वैशिष्ट्ये: भारतीय संस्कृतीची मूळे वैदिक काळापासून जुनी आहेत (सिंधू संस्कृती), जी अखंडित परंपरा, विविधतेतील एकता आणि सहिष्णुतेवर आधारित आहे.

विविधतेत एकता: भारतात अनेक धर्म हिंदू), बौद्ध, जैन, शीख, इ(., भाषा, वेशभूषा आणि खाद्यसंस्कृती असूनही एक राष्ट्र म्हणून सर्वजण एकत्र राहतात.

आध्यात्मिक व नैतिक मूल्ये: ही संस्कृती केवळ भौतिकवादी नसून, ती अध्यात्म, श्रद्धा, आणि कर्म त्याग .यांवर भर देते (कर्म सिद्धांत), सेवा, आणि इतरांच्या कल्याणात सुख मानणे हे तिचे मूळ तत्व आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

जीवनपद्धती :(संस्कार) भारतीय संस्कृतीत सणउत्सव-, पूजाविधी-, योग, आणि आहार यांचा समावेश आहे (शाकाहार), जे जीवनाला शिस्त लावतात.

कुटुंब व्यवस्था: संयुक्त कुटुंब पद्धती आणि कुटुंबातील आदर व संस्कार हे महत्त वडीलधाऱ्यांचा मान राखणेवाचे पैलू आहेत.

कला आणि वारसा: वास्तुकला, संगीत, नृत्य, आणि साहित्यात समृद्धी दिसते, जसे की प्राचीन मंदिरे, किल्ले, आणि ग्रंथ वेद), पुराण.

निष्कर्ष:

भारतीय संस्कृती ही जिवंत, अक्षय आणि काळाच्या ओघात स्वतःला बदलून घेणारी संस्कृती (अश्वत्था वृक्षासारखी) आहे, जी आजच्या युगातही मानवी मूल्यांना जपत आहे.

भारतीय संस्कृती आणि वारसा

भारत हा विविध संस्कृती असलेला देश आहे. भारताची संस्कृती म्हणजे छोट्या छोट्या संस्कृतींचा समूह. कपडे, सण, भाषा, धर्म, संगीत, नृत्य, वास्तुकला, अन्न आणि कला हे सर्व भारतीय संस्कृतीचे भाग आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, विविध परदेशी संस्कृतींनी भारतीय संस्कृतीवर त्याच्या इतिहासात प्रभाव पाडला आहे. शिवाय, भारतीय संस्कृतीचा इतिहास हजारो वर्षांचा आहे. हिंदू, बौद्ध, जैन आणि शीख धर्म हे सर्व धर्म आहेत. हे सर्व धर्म कर्म आणि धर्मावर आधारित आहेत. या चारही धर्मांना भारतीय धर्म असेही म्हणतात. अब्राहमिक धर्मांसोबतच, भारतीय धर्म जागतिक धर्मांचा एक प्रमुख गट आहे.

याशिवाय, भारतात असंख्य परदेशी धर्म पाळले जातात. या परदेशी धर्मांमध्ये अब्राहमिक धर्मांचा समावेश आहे. भारतात, अब्राहमिक धर्मांमध्ये निःसंशयपणे यहुदी धर्म, ख्रिश्चन धर्म आणि इस्लाम यांचा समावेश आहे. भारतातील इतर परदेशी धर्मांमध्ये अब्राहमिक धर्मांव्यतिरिक्त झोरोस्ट्रियन धर्म आणि बहाई धर्म यांचा समावेश आहे. इतक्या वेगवेगळ्या धर्मांच्या उपस्थितीमुळे, भारतीय समाजाने सहिष्णुता आणि धर्मनिरपेक्षता स्वीकारली आहे.

भारतीय संस्कृतीत संयुक्त कुटुंब व्यवस्थेचे वर्चस्व आहे. कुटुंबातील सर्वात उल्लेखनीय सदस्य म्हणजे पालक, मुले, मुलांचे पती-पत्नी आणि संतती. हे सर्व कुटुंब सदस्य एकत्र राहतात. शिवाय, सर्वात मोठा पुरुष सदस्य हा कुटुंबाचा प्रमुख असतो.

भारतीय संस्कृतीत, व्यवस्थित लग्न करणे हे सर्वसामान्य प्रमाण आहे. बहुतेक भारतीयांचे लग्न त्यांच्या पालकांनीच नियोजित केले असते. जवळजवळ सर्व भारतीय विवाहांमध्ये वधूच्या कुटुंबाकडून हुंडा दिला जातो. भारतीय संस्कृतीत लग्न हे निःसंशयपणे आनंदाचे प्रसंग आहेत. भारतीय विवाहांमध्ये आकर्षक सजावट, कपडे, संगीत, नृत्य आणि रीतिरिवाजांचा समावेश असतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, भारतात घटस्फोटाचे प्रमाण खूपच कमी आहे.

भारतात असंख्य सण आहेत. भारतीय संस्कृतीच्या बहुधार्मिक आणि बहुसांस्कृतिक स्वरूपामुळे, हे सण अत्यंत वैविध्यपूर्ण आहेत. भारतीय लोक उत्सवाच्या प्रसंगी खूप महत्त्व देतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मतभेद असले तरी, संपूर्ण देश या उत्सवांमध्ये सहभागी होतो.

वारसा

वारसा म्हणजे आपल्या पूर्वजांकडून आणि मातांकडून आपल्याला मिळालेल्या गोष्टी. भारत हा अनेक वेगवेगळ्या संस्कृती आणि परंपरा असलेला देश आहे. आपल्या देशात अनेक जाती, श्रद्धा आणि पंथांचे लोक राहतात. आपल्या देशातील प्रत्येक वांशिक गटाची स्वतःची उत्पत्तीची कथा आहे, तसेच त्यांच्या स्वतःच्या परंपरा आणि संस्कृतीचा संच आहे. त्या सर्वांनी भारतीय इतिहास आणि संस्कृतीवर आपला ठसा उमटवला आहे. निसर्गाने भारतात एक वेगळे भौगोलिक अस्तित्व निर्माण केले आहे.

भारतीय वारसा: वडीलधाऱ्यांकडून मिळालेला वारसा

आपल्या देशात मोठ्या संख्येने धार्मिक गट राहतात त्यामुळे, भारतीय वारसा आणि संस्कृती वैविध्यपूर्ण आणि चैतन्यशील आहे. प्रत्येक समुदायाच्या स्वतःच्या परंपरा आणि विधींचा संच असतो जो तो भावी पिढ्यांना देतो.

तथापि, आपल्या काही प्रथा आणि परंपरा भारतात सार्वत्रिक आहेत.

आपल्या परंपरा आपल्याला निरोगी सवयी कशा विकसित करायच्या आणि चांगले लोक कसे बनायचे हे शिकवतात. अशाप्रकारे, आपला सांस्कृतिक इतिहास आपल्या वडिलांकडून मिळालेली एक उत्तम देणगी आहे जी आपल्याला चांगले लोक बनण्यास आणि एक सुसंवादी समुदाय विकसित करण्यास मदत करेल.

आपल्या भारतीय वारशाचा आदर

भावी पिढ्यांमध्ये भारतीय इतिहासाबद्दल प्रेम निर्माण करण्याची जबाबदारी ज्येष्ठांनी घेतली पाहिजे. आपला महान वारसा जपायचा असेल तर सुरुवातीपासूनच हे केले पाहिजे. तरुण पिढ्यांमध्ये भारतीय वारशाचे प्रेम निर्माण करणे ही ज्येष्ठांची जबाबदारी आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

जर आपल्याला आपला महान वारसा जपायचा असेल तर हे सुरुवातीपासूनच करायला हवे. विद्यार्थ्यांना त्यांच्या भारतीय इतिहासाबद्दल आणि तो हजारो वर्षांपासून कसा टिकून आहे याबद्दल शिकवले पाहिजे. त्यांनी त्याचे रक्षण करण्याचे महत्त्व देखील ओळखले पाहिजे. यामुळे त्यांच्यात अभिमानाची भावना निर्माण होईल आणि त्यांना ही परंपरा पुढे नेण्यासाठी आणि ती पुढच्या पिढीला देण्याची प्रेरणा मिळेल. यासाठी प्रशिक्षक आणि पालक दोघांकडूनही सहकार्यात्मक प्रयत्नांची आवश्यकता आहे.

आपले साहित्य भारतीय साहित्य जितके वैविध्यपूर्ण आहे तितकेच ते ज्या संस्कृतीचे प्रतिनिधित्व करते तितकेच वैविध्यपूर्ण आहे. प्राचीन काळापासून, आपल्याकडे विविध विषयांवर पुस्तके तयार झाली आहेत. इतर प्रकारच्या भारतीय साहित्याबरोबरच, आपल्याकडे वैदिक साहित्य, महाकाव्य संस्कृत साहित्य, शास्त्रीय संस्कृत साहित्य आणि पाली साहित्य आहे. अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि तज्ञांकडून फायदा मिळवण्यासाठी आपल्या अनेक कलाकृतींचे वेगवेगळ्या भाषांमध्ये भाषांतर केले जात आहे. अशा भव्य आणि समृद्ध साहित्यिक वारशाचे कोणत्याही परिस्थितीत संरक्षण केले पाहिजे.

भारतातील युनेस्को जागतिक नैसर्गिक वारसा स्थळे

खाली नमूद केलेल्या भौगोलिक स्थळांना युनेस्कोने जागतिक नैसर्गिक वारसा स्थळे म्हणून नियुक्त केले आहे. या वेबसाइट आहेत:

१. १९८५ मध्ये दुर्मिळ एकशिंगी गेंड्याचे निवासस्थान असलेले काझीरंगा राष्ट्रीय उद्यान.

२. केवलादेव राष्ट्रीय उद्यान, जे असंख्य प्रजातींच्या सुंदर पक्ष्यांचे निवासस्थान आहे, त्याची स्थापना १९८५ मध्ये झाली.

३. १९८५ मध्ये, मानस वन्यजीव अभयारण्य स्थापन झाले.

१९८७ मध्ये, जगातील सर्वात मोठे खारफुटीचे जंगल, सुंदरबन.

५. नंदा देवी आणि फुलांची दरी राष्ट्रीय उद्याने, २००४.

६. २०१२ मध्ये, पश्चिम घाट.

७. २०१४ मध्ये, ग्रेट हिमालयन राष्ट्रीय उद्यानाला युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळाचा दर्जा देण्यात आला.

भारतीय सांस्कृतिक वारषाचे प्रमुख पैलू:

मूर्त वारसा : यात ऐतिहासिक इमारती, मंदिरे, किल्ले, लेणी आणि प्राचीन वस्तूंचा समावेश होतो , ज्या देशाचा कलात्मक इतिहास सांगतात.

अमूर्त वारसा : यात परंपरा, लोककला, भाषा, साहित्य, संगीत, नृत्य, सणउत्सव-, पाककला आणि ज्ञानविज्ञानाचा समावेश होतो-.

विविधतेतील एकता: भारत हा अनेक धर्म, भाषा आणि चालीरीतींचे माहेरघर आहेइतकी विविधता असूनही ., सर्वजण शांततेने एकत्र राहतात, हीच खरी भारतीय संस्कृती आहे.

कला आणि संस्कृती: भारतातील शास्त्रीय नृत्य भरतनाट्यम .उदा), कथकआणि संगीत (, तसेच चित्रकला आणि धातूकाम, वस्त्रोद्योगातील प्रगती हा सांस्कृतिक समृद्धीचा भाग आहे.

भारतीय सांस्कृतिक वारसा हा केवळ भूतकाळाचा ठेवा नसून, ती एक जिवंत परंपरा आहे जी आपल्या पूर्वजांकडून वारसांना मिळते.

निष्कर्ष

भारत हा खूप जुना देश आहे. आपल्याला एक सुंदर वारसा मिळाला आहे हे आपले भाग्य आहे. भावी पिढ्यांनाही ते पाहता येईल आणि अनुभवता येईल यासाठी ते जतन करण्याची आपली पूर्णपणे जबाबदारी आहे.

भारतीय ज्ञानप्रणाली (IKS) बद्दल

भारतीय ज्ञान प्रणाली (IKS) द्वारे ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पद्धतशीरपणे प्रसारित केले जाते. एक प्रथा असण्याऐवजी, ती एक संघटित प्रणाली आणि ज्ञान हस्तांतरणाची पद्धत आहे. वैदिक साहित्य, उपनिषदे, वेद आणि उपवेद हे भारतीय ज्ञान प्रणालीचा पाया तयार करतात. राष्ट्रीय शिक्षण धोरण, किंवा NEP-2020, कालातीत भारतीय ज्ञान आणि तत्वज्ञानाच्या समृद्ध वारशाचा मार्गदर्शक आधार म्हणून घेते. भारतातील ज्ञान, विज्ञान आणि जीवन दर्शन ज्ञान प्रणाली अनुभव, निरीक्षण, प्रयोग आणि सखोल विश्लेषणातून विकसित झाल्या आहेत. आपले शिक्षण, कला, प्रशासन, कायदा, न्याय, आरोग्य, उत्पादन आणि वाणिज्य या सर्वांना प्रमाणित करण्याच्या आणि प्रत्यक्षात आणण्याच्या या वारशाने स्पर्श केला आहे. याचा परिणाम भारताच्या शास्त्रीय आणि इतर भाषांवर झाला आहे ज्या सर्जनशील, मौखिक आणि साहित्यिक परंपरांद्वारे पुढे आल्या आहेत. त्यात प्राचीन भारताचे ज्ञान, त्याच्या कामगिरी आणि अडचणी तसेच पर्यावरणशास्त्र, आरोग्य, शिक्षण आणि अस्तित्वाच्या प्रत्येक पैलूंबद्दल भारताच्या भविष्यातील उद्दिष्टांची समज समाविष्ट आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

आयकेएस सेल

इंडियन नॉलेज सिस्टीम्स (IKS) ही शिक्षण मंत्रालयाच्या (MoE) अंतर्गत AICTE, नवी दिल्ली येथे एक नाविन्यपूर्ण कक्ष आहे. IKS च्या सर्व पैलूंवर आंतरविद्याशाखीय संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी, पुढील संशोधन आणि सामाजिक अनुप्रयोगांसाठी IKS चे जतन आणि प्रसार करण्यासाठी ही संस्था स्थापन करण्यात आली आहे. कला आणि साहित्य, कृषी, मूलभूत विज्ञान, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, वास्तुकला, व्यवस्थापन, अर्थशास्त्र इत्यादी क्षेत्रात आपल्या देशाचा समृद्ध वारसा आणि पारंपारिक ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी ते सक्रियपणे सहभागी होईल.

भारतीय ज्ञान प्रणालीची उद्दिष्टे

भारतीय ज्ञान प्रणाली सध्याच्या सामाजिक समस्यांना तोंड देण्यासाठी समग्र आरोग्य, मानसशास्त्र, न्यूरोसायन्स, निसर्ग, पर्यावरण आणि शाश्वत विकास यासह अनेक क्षेत्रांमध्ये अधिक अभ्यासाला प्रोत्साहन आणि सक्षम करण्याचा प्रयत्न करते. भूतकाळातून शिकण्याचे आणि भारतीय ज्ञान प्रणालींचे एकत्रीकरण करण्याचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे आपल्या प्राचीन ज्ञान प्रणालींचा वापर करणे, ज्या ज्ञान हस्तांतरणाची अखंड परंपरा आणि विशिष्ट दृष्टिकोनाने वैशिष्ट्यीकृत आहेत, भारत आणि जगातील सध्याच्या आणि उदयोन्मुख समस्या सोडवण्यासाठी (भारतीय दृष्टी).

आयकेएस विभागाची कार्ये

आयकेएस विभागाची प्राथमिक भूमिका म्हणजे खाजगी क्षेत्रातील संस्थांना आयकेएस-आधारित आणि संबंधित बहुविद्याशाखीय आणि आंतरविद्याशाखीय कामात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे, जे भारत आणि परदेशात असंख्य विद्यापीठे, राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्था, संशोधन आणि विकास प्रयोगशाळा आणि मंत्रालये करत आहेत. दुसरे म्हणजे विविध संस्था, केंद्रे आणि व्यक्तींमधील संशोधकांनी बनलेले विशिष्ट विषयांवर लक्ष केंद्रित करणारे बहुविद्याशाखीय संशोधन गट तयार करणे, निर्देशित करणे आणि देखरेख करणे. याव्यतिरिक्त, लोकप्रियता मोहिमा विकसित आणि प्रोत्साहन दिल्या पाहिजेत, विविध प्रकल्पांसाठी निधी सुलभ केला पाहिजे, संशोधन करण्यासाठी प्रक्रिया स्थापित केल्या पाहिजेत आणि आयकेएसला पुढे नेण्यासाठी आवश्यकतेनुसार धोरणात्मक सूचना विकसित केल्या पाहिजेत.

आयकेएसचे व्हिजन

"भारतीय ज्ञान प्रणाली" च्या सर्व पैलूंवर आंतरविद्याशाखीय संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी, पुढील संशोधन आणि सामाजिक अनुप्रयोगांसाठी "भारतीय ज्ञान प्रणाली" जतन आणि प्रसारित करा.

भारतीय ज्ञानप्रणालीचे वैशिष्ट्ये

भारतीय ज्ञान प्रणाली)IKS) ही हजारो वर्षांपासून चालत आलेली, वेद, उपनिषदे, विज्ञान, कला आणि तत्त्वज्ञानावर आधारित एक समग्र ज्ञान परंपरा आहे. ही प्रणाली अनुभव आणि निरीक्षणाद्वारे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होतेयामध्ये योग ., आयुर्वेद, गणित, खगोलशास्त्र आणि नैतिक मूल्ये यांचा समावेश असून, ती शाश्वत जीवनशैली आणि वैज्ञानिक दृष्टिकोन प्रदान करते.

प्राचीन आणि संघटित: ही केवळ एक प्रथा नसून वेदांत, न्याय, सांख्य, आणि योग यांसारख्या विविध वैचारिक परंपरांवर आधारित एक पद्धतशीर प्रणाली आहे.

सर्वांगीण दृष्टिकोन: यात केवळ धार्मिक नाही, तर विज्ञान भौतिकशास्त्र), धातूशास्त्र(, गणित, वैद्यक (आयुर्वेद), खगोलशास्त्र आणि कला यांचा समावेश आहे.

गुरुकुल शिक्षण: प्राचीन काळी ज्ञानाचे संक्रमण गुरुकुल परंपरेद्वारे गुरु.शिष्य नात्यातून होत असे-

आध्यात्मिक व शारीरिक विकास: योग आणि ध्यानधारणा यांद्वारे मानसिक व शारीरिक आरोग्याला प्राधान्य दिले जाते.

शाश्वत जीवन: पर्यावरणाशी समतोल राखणारी आणि नैतिक मूल्यांवर आधारित जीवनपद्धती शिकवते.

आधुनिक संदर्भ: 'NEP-2020' (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण.अंतर्गत या प्राचीन ज्ञानाला पुन्हा आधुनिक शिक्षणात स्थान दिले जात आहे (ही प्रणाली भारतीय संस्कृतीचा पाया असून, ती जगाला शांतता आणि शाश्वत विकासाचा मार्ग दाखवते.

भारतीय ज्ञानप्रणालीचे महत्त्व

भारतीय ज्ञान प्रणाली (IKS) ही हजारो वर्षांपासून चालत आलेली समृद्ध, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक वारसा असलेली व्यवस्था आहे. ती वेद, उपवेद आणि प्राचीन ग्रंथांवर आधारित असून आयुर्वेद, गणित, खगोलशास्त्र, योग आणि तत्त्वज्ञान यांसारख्या क्षेत्रांतील ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सोपवते. ही प्रणाली नैतिक मूल्ये, शाश्वत जीवनशैली आणि वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

भारतीय ज्ञान प्रणालीचे महत्त्व (Key Importance of Indian Knowledge System):

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

सांस्कृतिक व ऐतिहासिक जतन: ही प्रणाली भारताची प्राचीन संस्कृती, परंपरा आणि मूल्ये जिवंत ठेवते, ज्यामुळे पुढच्या पिढीला आपल्या मुळांची जाणीव राहते.

वैज्ञानिक व तांत्रिक पाया: आयुर्वेद (वैद्यक), गणित (शून्य व दशांश पद्धती), खगोलशास्त्र आणि धातूशास्त्र यांसारख्या विषयात प्राचीन भारतीय ज्ञान अत्यंत प्रगत होते, ज्याचा उपयोग आजही होतो.

शाश्वत जीवनशैली (Sustainability): पर्यावरणपूरक जीवनशैली, निसर्गाशी समतोल आणि योगाभ्यासासारख्या आरोग्यदायी सवयींचे ज्ञान या प्रणालीतून मिळते.

शिक्षण पद्धती (NEP-2020): राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार, विद्यार्थ्यांना भारतीय ज्ञान आणि तत्त्वज्ञानाचा आधार घेऊन, आधुनिक शिक्षणासोबतच आपली संस्कृती समजण्यास मदत होते.

नैतिक व मानवी मूल्ये: 'वसुधैव कुटुंबकम्' (जग हे एक कुटुंब आहे) सारखी उदात्त मूल्ये आणि नैतिक शिक्षण भारतीय प्रणालीतून शिकायला मिळते.

ज्ञान हस्तांतरण: हे केवळ एका ठिकाणचे ज्ञान नसून, ते श्रुती आणि स्मृतीद्वारे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पद्धतशीरपणे हस्तांतरित करण्याची एक अखंड प्रक्रिया आहे.

निष्कर्ष

भारतीय ज्ञान प्रणाली)IKS) ही वेद, उपनिषदे आणि प्राचीन साहित्यावर आधारित एक शाश्वत, वैज्ञानिक आणि सर्वांगीण ज्ञानाची परंपरा आहेती केवळ आध्यात्मिक नाही ., तर विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थशास्त्र आणि कला यांचा संगम आहे)राष्ट्रीय शैक्षणिक धोरण .NEP-2020) नुसार, हे ज्ञान सांस्कृतिक अभिमान आणि वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासण्यासाठी आवश्यक आहे.

थोडक्यात, भारतीय ज्ञान प्रणाली ही प्राचीन काळच्या ज्ञानाची केवळ साठवण नसून, आधुनिक काळातील आव्हानांवर उपाय शोधणारी एक जिवंत परंपरा आहे.

संदर्भ (References)

1. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020: भारतीय ज्ञान आणि तत्त्वज्ञानाचा मार्गदर्शक आधार.
2. UNESCO जागतिक वारसा स्थळे: भारतातील नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारसा स्थळांची यादी (काझीरंगा, सुंदरबन, पश्चिम घाट इ.) .शिक्षण मंत्रालय (MoE) आणि AICTE: इंडियन नॉलेज सिस्टीम्स (IKS) कक्ष, नवी दिल्ली.
3. प्राचीन साहित्य: वेद, उपनिषदे, पुराणे आणि महाकाव्ये (रामायण-महाभारत).
4. ऐतिहासिक रूपरेखा: सिंधू संस्कृती, मौर्य काळ, गुप्त काळ आणि मध्ययुगीन साम्राज्यांचा अभ्यास.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

सशक्त भारत: शिक्षण, आरोग्य आणि कौशल्य

डॉ. विजय हिरालाल उभाळे
प्राचार्य, क्रांतिवीर नवलभाऊ कला महाविद्यालय,
नवलनगर, धुळे

Manuscript ID:
JRD -2026-180220
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 82-85
February 2026
Submitted: 20 Jan. 2026
Revised: 29 Jan. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश :

विकसित भारत 2047 एक दृष्टिकोन – हा भारत सरकारच्या स्वातंत्र्याच्या शंभराव्या वर्धापन दिनानिमित्त प्रगत, समृद्ध व विकसित राष्ट्र बनविण्याचा महत्त्वाकांक्षी दृष्टिकोन आहे. पुढील काळात देश स्वयंपूर्ण, आत्मनिर्भर व विकसित होण्यासाठी देशाची शिक्षण व्यवस्थेत शासनाने बदल केलेले आहेत. अभ्यासक्रमाची संरचना बदललेली आहे. तसेच मातृभाषेमधून व प्रादेशिक भाषेमधून शिक्षण देण्यावर भर दिलेला आहे. देशातील सर्व कला, वाणिज्य, विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यावसायिक, शेतीविषयक, औद्योगिक, औषध निर्माणाचे विज्ञान, सांस्कृतिक, नैतिक, आध्यात्मिक, विविध भाषिक क्रीडा, खेळ, जैविक, नैसर्गिक पर्यावरणीय अशा विविध विद्याशाखातील विषयांमध्ये व्यक्ती विकास, विद्यार्थी विकास, समाज व राष्ट्रविकास साधण्याचा दृष्टीने अभ्यासक्रमात आंबूलाग्र बदल केलेले आहेत. एकाच वेळी वेगवेगळ्या विषयांचे वेगवेगळ्या शाखेचे ज्ञान घेण्यासाठी ही तरतूद करून विद्यार्थ्यांचे अध्ययनाचे क्षेत्र व्यापक केलेले आहे. नवीन शिक्षण व्यवस्थेबरोबर आरोग्य सुविधा पुरविल्या जात आहेत. रोजगाराभिमुख व्यवसायिक व तांत्रिक शिक्षणात अभ्यासक्रमात बदल केलेले आहेत. कौशल्य प्रशिक्षण तरुणांसाठी निर्माण केलेले आहेत. अशा या शिक्षण पद्धतीमुळे विद्यार्थ्यांच्या कृतीशीलतेतून 2047 पर्यंत विकसित भारताचे स्वप्न साकार होईल व भारत एक महासत्ता प्रगतशील राष्ट्र निर्माण होईल असा विश्वास वाटतो.

प्रस्तावना :

सशक्त भारत ही संकल्पना शिक्षण, आरोग्य आणि कौशल्य या तीन मुख्य स्तंभावर आधारित आहे. विकसित भारत 2047 चे ध्येय साध्य करण्यासाठी या तीनही क्षेत्रातील प्रगती महत्त्वाची आहे. नविन शैक्षणिक धोरण 2020 च्या शिक्षण संरचनेत 5+3+3+4 वर्गांचे टप्पे असून उच्च शिक्षणाचा टप्पा + चार हा विद्यापीठीय शिक्षणाचा आहे. मानवाच्या व समाजाच्या कल्याणासाठी भारतीय घटनेत उल्लेख केल्यानुसार – भारत एक लोकतांत्रिक न्याय, सामाजिकरित्या जागृत, सुसंस्कृत आणि माणुसकी असलेले राष्ट्र की, जिथे स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सर्वांना समान न्याय हक्क आहे. तसेच शिक्षण घेणे आणि देणे याचाही प्रत्येक व्यक्तीला, घटकाला समान अधिकार व हक्क आहे. राष्ट्राच्या शाश्वत आणि आर्थिक विकासामध्ये उच्च शिक्षणाचे लक्षणीय योगदान आहे. भारताची अर्थव्यवस्था शेतीबरोबर शेतीपूरक उद्योग व व्यवसायावर, उद्योग व संशोधनावर आधारित आहे. दर्जेदार शिक्षण व उच्च शिक्षण विद्यार्थ्यांसाठी, अभ्यासकांसाठी अत्यावश्यक ठरते.

अ) सशक्त भारतातील शिक्षण :

नवीन शैक्षणिक धोरणानुसार पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिकच्या नंतर सुरू होणाऱ्या उच्च शिक्षण (विद्यापीठीय शिक्षण) टप्प्यांचा प्रत्येक पातळीवर ते शिक्षण कृतीयुक्त व आधुनिक, डिजिटल तसेच तांत्रिक साधनांच्याद्वारे दर्जेदार करून अभ्यासक, विद्यार्थी अधिक अभ्यासू, जिज्ञासू, चिकित्सक व सृजनशील बनविण्यासाठी अभ्यासक्रमाची संरचना नव्याने करण्यात आली आहे. एकविसाव्या शतकाच्या गरजा लक्षात घेता चांगला विचारवंत, अष्टपैलू आणि कल्पक व्यक्ती, विद्यार्थी, तरुण विकसित करणे हे दर्जेदार शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्याला, व्यक्तीला एक किंवा अनेक आवडीच्या क्षेत्रामध्ये सखोल अभ्यास करणे शक्य झाले पाहिजे. त्याचबरोबर प्रत्येक विद्यार्थी, तरुण किंवा व्यक्ती हा चारित्र्यवाण, नीतिवाण, घटनात्मक मूल्ये जाणणारा निर्माण व्हावा, व्यक्तित बौद्धिक कुतूहल निर्माण व्हावे, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा, हे विकसित भारतातील तरुणांमध्ये दिसावे त्यातून त्याच्या क्षमतांचा विकास व्हावा हे दर्जेदार शिक्षणातून अपेक्षित आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. विजय हिरालाल उभाळे , प्राचार्य, क्रांतिवीर नवलभाऊ कला महाविद्यालय, नवलनगर, धुळे

How to cite this article:
उभाळे, . विजय . हिरालाल . (2026). सशक्त भारत: शिक्षण, आरोग्य आणि कौशल्य. *Journal of Research and Development*, 18(2(*XIV*)), 82–85. https://doi.org/10.5281/zenodo.18797246

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18797246

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

व्यक्तित राष्ट्रीयत्व राष्ट्रीय भाव, सामाजिक सेवाभाव, धर्मनिरपेक्षता व मानवता विकसित व्हावी, व्यक्तीत/विद्यार्थ्यात वैज्ञानिक व तांत्रिक, व्यावसायिक दृष्टिकोन निर्माण व्हावा, त्याने शिक्षणामधून व्यावसायिक कौशल्य आत्मसात करावीत तसेच सामाजिक शास्त्रे, कला, मानव्यशास्त्रे, भाषा, संस्कृती आत्मसात करावी. व्यक्तिमध्ये नैतिकता, प्रामाणिकपणा व समाजाबद्दल व्यक्तिबद्दल संवेदनशीलता निर्माण व्हावी असे धडे या शिक्षणव्यवस्थेतून घेऊन तो उत्तम नागरिक व्हावा, अशी अपेक्षा आहे. या नव्या उच्च शिक्षण संरचनेतून विद्यार्थ्यास, व्यक्तीस वैयक्तिक यश आणि आत्मज्ञान होईल. त्यातून व्यक्ती समाजासाठी उत्पादनशील योगदान साध्य करू शकेल व आर्थिकदृष्ट्या सक्षम व समाधानकारक जीवन जगण्यास सक्षम होईल ही उच्चशिक्षणातून अपेक्षा आहे. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी अध्ययनाच्या शाळा पूर्व स्तरापासून तर उच्च शिक्षण स्तरापर्यंत प्रत्येक स्तरावर निर्धारित कौशल्य आणि मूल्यांची अपेक्षित निर्मिती या नव्या शैक्षणिक धोरणामधून व्हावी ही अपेक्षा आहे.

विकसित भारत 2047 साठी विकासाची झेप ही सर्व क्षेत्रात घेण्याच्या दृष्टीने सध्याच्या नवीन शैक्षणिक धोरण 2020 मध्ये अभ्यासक्रम संरचना सर्व स्तरावर केलेली असली तरी प्रत्येक वर्षात जगातील प्रगत राष्ट्रात होणाऱ्या शैक्षणिक बदलाचा, विज्ञान व तंत्रज्ञानातील बदलाचा शिक्षण व संशोधनाच्या यशस्वी होणाऱ्या बदलाचा भारतीय उच्च शिक्षणातील सर्व क्षेत्रातील अभ्यासक्रम संरचनेत बदल होत राहील. भारतीय नागरिक, व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी व देशाला विकासाच्या टप्प्यावर पोहोचविण्यासाठी इंजीनियरिंग, वैद्यकीय, तांत्रिक, वैज्ञानिक व सामाजिक, व्यावसायिक क्षेत्रातील अभ्यासक्रमातील बदलामुळे विकसित भारताचे स्वप्न साकार होईल. सामाजिक स्तरावर, विद्यार्थी/व्यक्ती ज्ञानी, सामाजिक दृष्ट्या जागृत, विद्वान व कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याची क्षमता भारतीय उच्च शिक्षणव्यवस्थेमध्ये, अभ्यासक्रमामध्ये असेल तसेच सतत यशस्वी होणारे शास्त्रीय व तांत्रिक संशोधनाचाही त्यात समावेश असेल. त्यामुळे उच्चशिक्षणाच्या आधारावर ज्ञान निर्माण करून नाविन्यपूर्ण गोष्टींचा शोध लावून वाढत्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला हातभार लावता येईल. उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावलेला असेल. या शिक्षणव्यवस्थेमुळे रोजगाराच्या अधिक चांगल्या संधीबरोबरच चैतन्यपूर्ण, सामाजिक दृष्ट्या प्रगल्भ विचारांचा समुदाय निर्माण होईल. अशा उच्च शिक्षणाच्या दर्जेदार अभ्यासक्रमाच्या रचनेतून सामंजस्यपूर्ण, सुसंस्कृत, उत्पादनशील, नाविन्यपूर्ण, पुरोगामी व समृद्ध राष्ट्र निर्माण होईल.

विकसित भारत 2047 हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने भारतीय शिक्षणव्यवस्थेमध्ये वेळोवेळी बदल करून नव्या उच्च गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रमाचा समावेश होत राहील. नवीन शैक्षणिक धोरण 2020 नुसार उच्चशिक्षणातील बदल लक्षात घेऊन त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी क्रमप्राप्त आहे.

1. प्रत्येक जिल्ह्यात किमान एक बहुशाखीय विद्यापीठ व महाविद्यालयाचा समावेश असेल. संपूर्ण भारतात अशा उच्चशिक्षणाच्या संस्था असतील त्यात अभ्यासक्रम स्थानिक किंवा भारतीय भाषांमधून शिकविला जाईल.
2. विद्यार्थ्यांना बहुशाखीय व विविध विषयांचे शिक्षण पदवीपूर्व व पदवी तसेच पदव्युत्तर स्तरावर शिक्षण घेता येईल.
3. शिक्षण संस्थांना स्वायत्तता देऊन अभ्यासक्रम निर्मिती व अंमलबजावणीचे स्वातंत्र्य असेल.
4. गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रमासाठी अभ्यासक्रमात उपयुक्त असे बदल केले जातील. अध्यापनशास्त्र अधिक नाविन्यपूर्ण प्रशिक्षकाद्वारे केले जाईल. मूल्यांकनात बदल करून विद्यार्थ्यांना सुधारणा करण्यास संधी दिलेली असेल.
5. अध्यापन, संशोधन व सेवा, करियर याचा विचार करून अध्यापकाच्या नियुकत्या होतील.
6. संशोधनासाठी महाविद्यालय व विद्यापीठे यांना व राष्ट्रीय संशोधन संस्था मार्फत आर्थिक सहाय्य पुरविले जाईल.
7. उच्च शिक्षणाचे नियमन UGC/HRD किंवा सक्षम अशी शैक्षणिक व प्रशासकीय स्वायत्तता देऊन शासन मंडळ/संस्था निर्माण करेल.
8. उच्चशिक्षणासाठी एकाच नियमकाद्वारे 'सुलभ पण परिणामकारक' नियमन असेल की ज्याद्वारे –

उत्कृष्ट सार्वजनिक शिक्षणाच्या मोठ्या संधीसारख्या अनेक उपायांद्वारे अधिक उपलब्धता, समानता आणि सर्वसमावेशकता, उपेक्षित व वंचितांसाठी खासगी/धर्मादाय विद्यापीठांद्वारे शिष्यवृत्त्या, ऑनलाईन शिक्षण व मुक्त दुरुस्थ शिक्षण (ODL) आणि सर्व पायाभूत सुविधा व शिक्षण साहित्य विद्यार्थ्यांसाठी सहज वापरता येण्याजोगे उपलब्ध असेल.

एकंदर विकसित भारत 2047 चे स्वप्न साकार करण्याकरिता भारतातील प्राथमिक शिक्षणापासून तर उच्चशिक्षणापर्यंतच्या शिक्षणातील अभ्यासक्रमाचा दर्जा उंचावणे व सामाजाला, देशाला उपयुक्त ठरेल असे विज्ञान व तंत्रज्ञानातील संशोधन उच्च दर्जाचे आवश्यक आहे. त्याचबरोबर उत्तम दर्जाचे आरोग्य व कौशल्य असे तीनही पिलर (खांब) भारताच्या विकासासाठी आवश्यक आहेत.

ब) सशक्त भारतातील आरोग्य :

आरोग्य शिक्षणाच्या अभ्यासक्रमाचा कालावधी, रचना याची आखणी केली जाईल. उदा. ECG काढणे, वाचून अर्थ लावणे असे प्राथमिक स्वरूपाचे ज्ञान सर्वांना यायला हवे त्यासाठी MBBS ची गरज नाही. MBBS पदवीधराकडे कौशल्य आत्मसात करण्यासाठी अधिक प्रयत्न असतील. उदा. 1) वैद्यकीय कौशल्य, 2) रोग निदानाचे कौशल्य, 3) शल्यचिकित्सा विषयक कौशल्य, 4) आपत्कालीन कौशल्ये इ. प्राथमिक उपचार व प्रतिबंधात्मक उपचार करून वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेल्या ज्ञानाचे मूल्यांकन केले जाईल. एमबीबीएसचे पहिले व दुसरे वर्ष विज्ञान शाखेच्या सर्व पदवीधरांसाठी सामायिक कालावधी असेल. त्यानंतर विद्यार्थी त्यांच्या आवडीनुसार एमबीबीएस/बीडीएस/नर्सिंग किंवा इतर कोणताही विशेष विषय निवडू शकतात. नर्सिंग शिक्षणाचा दर्जा उंचावण्यात येईल, नर्सिंग व इतर उपशाखांसाठी नॅशनल क्रेडिटेशन बॉडी स्थापण्यात येईल. आपल्या देशातील लोक आजारपणात विविध प्रकारच्या वैद्यकीय उपचार पद्धतींचा आधार घेतात. त्यामुळे आपली वैद्यकीय शिक्षण पद्धती अशा विविध शाखांचे एकीकरण करणारी असावयास हवी. ॲलोपॅथी वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना आयुर्वेद, योग, निसर्गोपचार, युनानी, होमिओपॅथी (आयुष्य) अशा इतर वैद्यकीय शाखांचे मूलभूत ज्ञान आत्मसात करण्याची शिक्षण व्यवस्था निर्माण केली जाईल. त्याचबरोबर सर्व प्रकारच्या आरोग्य शिक्षणामध्ये प्रतिबंधात्मक अरोग्य सेवा व सामुदायिक औषधे याच्यावर भाग दिलेला असेल.

विकसित भारत 2047 मधील आरोग्य शिक्षण व सेवा ही प्रत्येक नागरिकाला उपलब्ध होऊ शकणारी डिजिटल आधारित आरोग्य सेवा असेल. तसेच ती सुलभ व परवडणारी सेवा असेल. ग्रामीण भागात व दुर्गम भागात अशा आरोग्य केंद्रांचा विस्तार झालेला असेल. पीएम आयुष्यमान भारत आरोग्य पायाभूत सुविधा अभियान आणि ई–संजीवनी ओपीडी सारख्या डिजिटल

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

माध्यमाचा वापर करून आरोग्य सेवा अधिक समृद्ध आणि बळकट झालेली असेल. महिलांचे आरोग्य आणि सक्षमीकरणाला प्राधान्य देऊन सामाजिक व आर्थिक विकास करण्यावर भर दिलेला असेल. आरोग्य सेवा हा हक्क म्हणून सर्वांना उपलब्ध असेल. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य सुदृढ करणे हा उद्देश साधण्यासाठी नियमित प्रयत्न असतील. डिजिटल तंत्रज्ञान, AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) आणि टेलीमेडिसिनचा वापर करून दुर्गम भागातील लोकांनाही तज्ञ डॉक्टरांचा सल्ला मिळणारी सेवा असेल. तसेच स्वदेशी वैद्यकीय तंत्रज्ञानाद्वारे स्वस्त आणि प्रगत वैद्यकीय उपकरणे, औषधे आणि लस विकसित करण्यावर भर दिलेला असेल. भारतीय नागरिकांचे सरासरी आयुष्य 71 वर्षांवरून वाढवून 85 वर्षापेक्षा जास्त करण्याचे उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रयत्न असतील. थोडक्यात स्वस्थ भारत, विकसित भारत या संकल्पनेतून 2047 पर्यंत भारताची आरोग्य यंत्रणा सक्षम, लवचिक आणि नागरिकांच्या गरजा पूर्ण करणारी असेल.

क) सशक्त भारतातील कौशल्य विकास :

तरुणांना, युवकांना औद्योगिक, तांत्रिक, अभियांता शिक्षण, वैद्यकशास्त्र शिक्षण कौशल्य युक्त देऊन प्रत्येक शाखेतील विद्यार्थ्यांचा व व्यक्तीचा विकास साधणे त्यातून देशाचा विकास साधणारा तरुण विकसित भारतात असेल. रशिया, अमेरिका, दक्षिण कोरिया, जर्मनी, जपान, इस्त्राईल या देशांनी अशा उच्च शिक्षणातील नवनवीन संशोधने व त्यात कौशल्य संपादन करून उच्चशिक्षण घेतलेल्या तरुणांकडून, व्यक्तींकडून प्रगती साधलेली आहे. अर्धवट शिक्षण केव्हा कमी शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना, तरुणांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात कौशल्य शिक्षण देऊन विकास साधण्यासाठी महाराष्ट्रात महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (MSSDS) स्थापना केलेली असून त्यासाठी महाराष्ट्रात स्वतंत्र कौशल्य आणि उद्योजगता विकास मंत्रालयाची स्थापना केलेली असून या मंत्रालयामार्फत अर्धकुशल व अकुशल तरुणांना कौशल्य प्रशिक्षण विनामूल्य देऊन त्यांना रोजगारक्षम बनविण्यावर भर दिलेला आहे. व्यवसायासाठी विविध शासकीय योजनाद्वारे आर्थिक सहाय्य/अनुदानाचीही सोय शासनाने केलेली आहे. तर केंद्र शासनाने भारताचे कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय असून देशातील सर्व कौशल्य विकास प्रयत्नांचे समन्वय साधणारे मुख्य मंत्रालय आहे. सध्या जयंत चौधरी (राज्यमंत्री) या मंत्रालयाची धुरा सांभाळत आहेत. या अंतर्गत प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (PMKVY) ही कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाची प्रमुख योजना आहे. तरुणांना भारतातील आयटीआय संस्थांमधून औद्योगिक आणि व्यवसायिक प्रशिक्षण देणे म्हणजे कौशल्य शिक्षण देणे आहे. तसेच बहुतांश जिल्ह्याला जिल्हा उद्योग केंद्रामार्फत विविध व्यवसायासाठी कौशल्याचे प्रशिक्षण दिले जात असून त्यासाठी आर्थिक निधीही शासनाने उपलब्ध केलेला आहे. या सर्वच क्षेत्रफळाची व्यापकता व आर्थिक सहाय्य पुढील काळात व्यापक स्वरूपाचे असेल. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (Skill India Mission) ही तरुणांना उद्योगाच्या संबंधित कौशल्य प्रशिक्षण देऊन उदरनिर्वाहासाठी सक्षम बनविणे आहे. विकसित भारतात यामुळे रोजगाराचे प्रमाण उंचावलेले, वाढलेले असेल.

जर्मनीमध्ये 'ड्युअल एज्युकेशन सिस्टम' अंतर्गत विद्यार्थ्यांना शिक्षण आणि औद्योगिक प्रशिक्षण एकत्र दिले जाते. यामुळे विद्यार्थ्याला शैक्षणिक ज्ञानाबरोबर व्यावहारिक अनुभवही मिळतो. त्यामुळे जर्मनीचे उद्योग क्षेत्र अधिक प्रगत झालेले आहे. याच धरतीवर भारतानेही आपल्या शिक्षणव्यवस्थेमध्ये आवश्यक असणाऱ्या कौशल्यांचा समावेश केला आहे. कौशल्यनिर्मितीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) बिग डेटा, आयटी, सायबर सुरक्षा या क्षेत्रातील कौशल्य विकास करणे यावर अधिक भर असेल. या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे उत्पादनाचा दर्जा सुधारलेला असेल.

जपानने दुसऱ्या महायुद्धानंतर देशाच्या पुनरुत्थानासाठी औद्योगिक विकासाला महत्त्व दिले. त्यांनी Kosen प्रणाली लागू केली. Kosen ही तांत्रिक महाविद्यालये आहेत. यामध्ये व्यावसायिक आणि तांत्रिक शिक्षण दिले जाते. यामध्ये इंजीनियरिंग, तंत्रज्ञान आणि औद्योगिक कौशल्याचे शिक्षण दिले जाते. त्यामुळे Kosen प्रणालीमुळे विद्यार्थ्यांना उद्योगात लागणारी कौशल्ये मिळालीत विद्यार्थी उद्योगासाठी, रोजगारासाठी तयार झालीत. जपानने MITI (Ministry of International Trade & Indiustry) ची स्थापना केली. MITI ने उद्योगाच्या विकासासाठी धोरणे तयार केलीत व आवश्यक संशोधने केलीत. या धोरणाचा परिणाम म्हणून जपानने इलेक्ट्रॉनिक्स व ऑटोमोबाईल क्षेत्रातही प्रगती गाठली. म्हणून जपान औद्योगिक आघाडीचे राष्ट्र म्हणून ओळखले जाते.

दक्षिण कोरियाने 1960 च्या दशकात उद्योगावर आधारित कौशल्यावर भर दिला. त्यांनी तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण (Technical And Vocational Education & Training) (TVET) प्रणाली लागू केली. त्यामुळे विद्यार्थ्यांना व्यवसायिक आणि तांत्रिक शिक्षण मिळून देशाची औद्योगिक प्रगती झाली, आर्थिक प्रगती झाली, रोजगार निर्माण झालेत व आधुनिक यंत्रसामग्रीने देश समृद्ध झाला.

भारताने नवीन शैक्षणिक धोरणात या अशा शिक्षण प्रणालीवर विशेष भर दिला आहे. मा. पंतप्रधान मोदी यांनी मांडलेल्या 'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेत कौशल्य विकासाला महत्त्व देऊन त्यासाठी मंत्रिमंडळात विभाग निर्माण केला आहे. त्याद्वारा आपल्या देशात विविध योजना राबविल्या जात आहेत. त्यात स्किल इंडिया, मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया अशा नवनवीन तंत्रज्ञानाचा, अभ्यासक्रमाचा व कौशल्याचा समावेश करून प्रशिक्षण दिले जात आहे की, ज्यामुळे विद्यार्थी स्वावलंबी बनतील.

भारत सरकारने महास्वयंम पोर्टल (Mahaswayam Portal) द्वारा विद्यार्थ्यांना, उमेदवाराला प्रशिक्षण संस्था, अभ्यासक्रम आणि स्वयंरोजगाराच्या संधी ह्या पोर्टलवरही उपलब्ध करून दिलेल्या आहेत. तसेच काही प्रमुख योजनाही स्थापन केल्या आहेत. त्या म्हणजे

1. प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास आणि अभियान (PMKUVA) या योजनाद्वारे महाराष्ट्रातील तरुणांना मोफत कौशल्य दिले जात आहे.
2. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (PMKVY) : याद्वारे केंद्रामार्फत तरुणांना उद्योगावर आधारित प्रशिक्षण व प्रमाणपत्र दिले जात आहे.
3. मुख्यमंत्री महाआरोग्य कौशल्य विकास कार्यक्रम – याद्वारे पॅरामेडिकल क्षेत्रात रोजगार मिळविण्यासाठी प्रशिक्षण दिले जात आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

4. **आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र (ACKVK) :** या अंतर्गत तरुणांना कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी कौशल्य विकास केंद्र स्थापन केलेली आहेत.

थोडक्यात सशक्त भारत किंवा आत्मनिर्भर भारत बनविण्यासाठी विद्यार्थ्यास तांत्रिक, औद्योगिक व व्यावसायिक कौशल्याच्या शिक्षण व प्रशिक्षणाद्वारे विद्यार्थी स्वावलंबी व आत्मनिर्भर बनेल. पर्यायाने देशाचा विकास साधला जाईल. त्यासाठी भारतातील शिक्षण व्यवस्था (नविन शैक्षणिक धोरण 2020), आरोग्य शिक्षणासाठी विस्तारलेली व आधुनिक संसाधनांनी युक्त हॉस्पीटल्स तसेच दर्जेदार वैद्यकीय महाविद्यालयांची व्यवस्था शासनाकडून निर्माण करण्याचे प्रयत्न होत आहेत व पुढेही होत राहील. त्याचबरोबर शासनाने कौशल्य मंत्रालयामार्फत तरूणांना विविध तांत्रिक, व्यावसायिक कौशल्य शिक्षण व्यवस्था Swayam व Disha पोर्टलद्वारा निर्माण करून प्रशिक्षणाची व्यवस्था केलेली आहे. भारतातील व्यक्ती, तरूण व विद्यार्थ्यांपर्यंत या सुविधांची माहिती पोहचविणे व त्यांना लाभार्थी होणेकरिता प्रेरित करण्याचे कार्य शिक्षक, प्राध्यापक व सुशिक्षित व्यक्तीस करावयाचे आहे, त्यातून तरूणांच्या हाताला काम मिळेल व अर्थाजनाचा दर्जा उंचावेल. दर्जेदार शिक्षण, दर्जेदार आरोग्य सुविधा आणि तांत्रिक व व्यवसायिक कौशल्याचे शिक्षण विद्यार्थ्याच्या विकासासाठी महत्त्वाचा व आवश्यक पाया आहे. त्यातून विकसीत भारताचे स्वप्न साकार होईल.

संदर्भ :

1. नवीन शैक्षणिक धेरण 2020 च्या अहवालाचा आधार
2. नवीन शैक्षणिक धोरण 2020 यामधील बदललेली अभ्यासक्रम रचना
3. वैज्ञानिक, तांत्रिक, औद्योगिक, शैक्षणिक बदलाचे अहवाल
4. भारत सरकारचे शिक्षण कौशल्याच्या बाबतीतील Swayam व Disha पोर्टलवरील उपलब्ध विषयाचे अभ्यासक्रम
5. जागतिक स्तरावर होत असलेल्या शैक्षणिक, व्यावसायिक, वैद्यकीय औषध निर्माण व कृषीविषयक बदलाची इंटरनेटवरील उपलब्ध माहिती

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

महाराष्ट्रातील पर्यटन उद्योगाचे सांस्कृतिक-सामाजिक गतिशीलता आणि आर्थिक शाश्वततेवरील परिणामांचे विश्लेषण

Sonusing Pralhad Patil
Assist. Prof. , Pratap College (Autonomous) , Amalner ,
Dist-Jalgaon
Email- sonusingp777@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180221
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 86-92
February 2026
Submitted: 20 Jan. 2026
Revised: 29 Jan. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

गोषवारा (Abstract) :-

प्रस्तुत अध्ययन महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसायाचा सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक विकासावर होणाऱ्या परिणामांचा सखोल व वैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात आला आहे. संशोधनासाठी दुय्यम स्त्रोतांतील आकडेवारी, साहित्य विश्लेषण, प्रादेशिक पर्यटन प्रवृत्ती आणि उपलब्ध धोरण दस्तऐवजांचा उपयोग करून पर्यटन क्षेत्राची विद्यमान अवस्था, त्याची रचना तसेच त्यातून उद्भवणारे बहुआयामी परिणाम यांचे विश्लेषण केले गेले. अभ्यासातून असे स्पष्ट होते की, पर्यटन उद्योग राज्याच्या सांस्कृतिक वारशाच्या संवर्धात, लोककला आणि परंपरांच्या प्रसारात तसेच सामाजिक पातळीवरील रोजगार निर्मिती, समुदाय सहभाग आणि महिलांच्या सबलीकरणात महत्वपूर्ण भूमिका बजावतो. आर्थिकदृष्ट्या पर्यटन क्षेत्राचे राज्याच्या महसुल वाढीला, स्थानिक उद्योगांतील गुंतवणूकीला आणि ग्रामीण आर्थिक सक्रियतेला लक्षणीय योगदान असण्याचे आढळते. तथापि, अध्ययनाने पायाभूत सुविधांची अपुरी उपलब्धता, पर्यावरणीय ताण, सेवा गुणवत्तेतील असमानता आणि धोरण अंमलबजावणीत काही त्रुटी यांसारख्या मर्यादा अधोरेखित केल्या आहेत. या निष्कर्षांच्या आधारे शाश्वत पर्यटन मॉडेल, डिजिटल प्रोत्साहन, समुदाय सहभाग आणि सार्वजनिक-खाजगी भागीदारी यांस प्राधान्य देण्याची आवश्यकता स्पष्ट होते. एकूणच, हे संशोधन महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्राच्या सद्यस्थितीचे, उपलब्ध संधीचे आणि भावी दिशानिर्देशनाचे शास्त्रीय व विश्लेषणात्मक प्रतिबिंब सादर करते.

शब्द (Key Word) :- *पर्यटन व्यवसाय, सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक विकास, ग्रामीण पर्यटन, ऐतिहासिक स्थळे, पर्यटन धोरण, रोजगार निर्मिती, शाश्वत पर्यटन इत्यादी*

प्रास्ताविक (Introduction) :-

महाराष्ट्र हे भारतातील सांस्कृतिकदृष्ट्या वैविध्यपूर्ण, ऐतिहासिक वारसा लाभलेले आणि नैसर्गिक संपन्नतेने नटलेले राज्य म्हणून ओळखले जाते. सह्याद्री पर्वतश्रेणीचे रानवैभव, कोकणचा समुद्रकिनारी विस्तार, विदर्भातील व्याघ्र प्रकल्प, मराठेशाहीचा ऐतिहासिक गड-किल्ल्याचा वारसा, अजिंठा-वेरूळ येथील जागतिक दर्जाची लेणी आणि मुंबई-पुणे यासारखी आधुनिक महानगरं यामुळे महाराष्ट्रातील पर्यटनाची व्याप्ती अत्यंत व्यापक आहे. या विविधतेमुळे महाराष्ट्र केवळ देशातीलच नव्हे तर जागतिक पर्यटन नकाशावर महत्वपूर्ण स्थान टिकवून आहे. पर्यटन हा केवळ विरंगुळाचा किंवा प्रवासाचा विषय राहिलेला नसून तो सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक विकासाचा एक प्रभावी घटक बनला आहे. जागतिकीकरण, वाहतूक, सुविधा, माहिती तंत्रज्ञान आणि वाढते नागरीकरण यांच्या संयोगाने

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
Sonusing Pralhad Patil, Assist. Prof. , Pratap College (Autonomous) , Amalner , Dist-Jalgaon

How to cite this article:
Patil, S. P. (2026). महाराष्ट्रातील पर्यटन उद्योगाचे सांस्कृतिक-सामाजिक गतिशीलता आणि आर्थिक शाश्वततेवरील परिणामांचे विश्लेषण. *Journal of Research and Development, 18(2(XIV)), 86–92.*
https://doi.org/10.5281/zenodo.18797288

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18797288
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्राचा विस्तार मोठ्या वेगाने झाला आहे. पर्यटनामुळे स्थानिक परंपरा, कला, संगीत, खाद्यसंस्कृती आणि लोककलेचा जप व प्रसार होत आहे. विशेषत: वारकरी संप्रदाय गणेशोत्सव, खंडोबाची यात्रा, कोळी संस्कृती, लावणी आणि नृत्यकला याद्वारे महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख अधिक दृढ बनत आहे. सामाजिक दृष्टीनेही पर्यटन क्षेत्राने ग्रामीण आणि शहरी भागातील लोकांमध्ये सामाजिक ऐक्य, रोजगार संधी, उद्योजकता, महिला सहभाग वाढीस लागला आहे. ग्रामीण पर्यटन, कृषी पर्यटन, आदिवासी पर्यटन आणि सांस्कृतिक पर्यटन यामुळे स्थानिक समाजाच्या जीवनमानात परिवर्तन दिसून येते. पर्यटनामुळे भौगोलिक मर्यादा कमी होऊन विविध समान घटकांमध्ये परस्परसंवाद, सांस्कृतिक आदान-प्रदान आणि पारस्परिक समज वाढले.

आर्थिक दृष्टीकोनातून पर्यटन हे महाराष्ट्रासाठी उत्पन्न निर्मिती, रोजगार निर्मिती, परकीय चलन प्राप्ती, पायाभूत सुविधांचा विकास अशा अनेक दृष्टींनी महत्वाचे आहे. महाराष्ट्र शासनाने " महाराष्ट्र पर्यटन धोरण ", " ग्रामीण पर्यटन मिशन ", " देवगिरी विकास प्रकल्प " यांसारख्या योजनांद्वारे पर्यटन क्षेत्राला गती दिली आहे. यामुळे राज्याच्या GDP मध्ये पर्यटन क्षेत्राचे योगदान सातत्याने वाढत आहे.

या सर्व घटकांच्या पार्श्वभूमीवर " महाराष्ट्रातील पर्यटन उद्योगाचे सांस्कृतिक - सामाजिक गतिशीलता आणि आर्थिक शाश्वततेवरील परिणामांचे विश्लेषण " हा विषय अभ्यासासाठी अत्यंत महत्वाचा ठरतो. पर्यटनाचा विविध स्तरांवरील परिणाम स्थानिक समाजातील बदल, सांस्कृतिक वारशाचे संरक्षण, आर्थिक विकासातील भूमिका तसेच शासकीय धोरणांचे परिणामकारक विश्लेषण करणे आवश्यक आहे. प्रस्तुत संशोधनाद्वारे महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्राची वर्तमान स्थिती, संधी-अडचणी आणि भविष्यातील दिशा यांचा सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न केला जाईल.

संशोधन पद्धती (Research Methodology) :-

संशोधनाचा प्रकार (Type of Research) :- वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे.

डेटाचे स्त्रोत :-

प्राथमिक डेटा :- पर्यटन, स्थानिक नागरीक, पर्यटन व्यावसायिक, हॉटेल व्यावसायिक व शासकीय अधिकारी यांच्या मुलाखती व प्रश्नावलीद्वारे माहिती प्राप्त केली आहे.

व्दितीयक डेटा :- शासनाचे अहवाल, पर्यटन विभागाची आकडेवारी, संशोधन लेख, पुस्तके, वेबसाईट, वार्षिक अहवाल

डेटा संकलन साधणे :- प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण, दस्तऐवज विश्लेषण

नमुना पद्धती (Sampling) :- सोयीस्कर (Convenience) किंवा उद्देशपूर्ण (Purposive) नमुना पद्धती

डेटा विश्लेषण :- संकलीत माहितीचे तक्ते, टक्केवारी, चार्ट, ग्राफ, सरासरी, गुणोत्तर, तुलना या सांख्यिकीय पद्धतींचा वापर करून विलेषण केलेले आहे.

अभ्यास क्षेत्र :- महाराष्ट्रातील प्रमुख पर्यटन स्थळे (उदा :- मुंबई, पुणे, कोकण, अजिंठा-वेरूळ, महाबळेश्वर, छत्रपती संभाजीनगर इ.)

मर्यादा :- वेळ, साधणे, उपलब्ध डेटा आणि नमुना मर्यादा.

संशोधनाची उद्दिष्ट्ये (Research Objectives) :-

महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसायाचा सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक विकासावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

पर्यटन क्षेत्राच्या वाढीसाठी आवश्यक असलेल्या संधी, अडचणी आणि शासकीय धोरणांची परिणामकारकता विश्लेषित करणे.

गृहितके (Assumptions) :-

महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसाय राज्याच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक विकासावर सकारात्मक परिणाम घडवित आहे.

संशोधन समस्या (Research Problems) :-

महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसाय झपाट्याने वाढत असला तरी सांस्कृतिक वारशाचे जतन, सामाजिक परिवर्तन, रोजगार निर्मिती, स्थानिक अर्थव्यवस्थेवरील परिणाम आणि शासकीय पर्यटन धोरणांची परिणामकारकता याबाबत एकसंध व सखोल अभ्यासाची कमतरता आढळून येते. पर्यटन क्षेत्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक विकासावर नेमका किती व कसा प्रभाव पडतो, तसेच पर्यटन वाढीस अडथळा ठरणाऱ्या समस्या, पायाभूत सुविधांची मर्यादा आणि व्यवस्थापनातील त्रुटी याबाबत स्पष्ट माहिती उपलब्ध नाही. यामुळे पर्यटन क्षेत्राला शाश्वत विकासासाठी योग्य दिशा, उपाय योजना आणि धोरणात्मक निर्णय घेण्यास अडचणी निर्माण होतात.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसायाची संकल्पना :-

महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसाय म्हणजे राज्यातील ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक, नैसर्गिक आणि आधुनिक पर्यटन स्थळांना भेट देणाऱ्या देशी व परदेशी पर्यटकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रवास, निवास, भोजन, मार्गदर्शन, वाहतूक, मनोरंजन, सांस्कृतिक अनुभव व संबंधीत सेवा-उद्योगांचे नियोजन, व्यवस्थापन व संचालन यांचा समावेश असलेली बहुआयामी, आर्थिक आणि सामाजिक क्रिया होय. हा व्यवसाय राज्याच्या सांस्कृतिक संवर्धनाला, सामाजिक विकासाला आणि आर्थिक वृद्धीला थेट व अप्रत्यक्षरित्या हातभार लावतो.

महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसाय - सांस्कृतिक - सामाजिक आणि आर्थिक विकास :-

महाराष्ट्रातील पर्यटनाचा संख्यात्मक परिणाम :-

पर्यटकाची लोकसंख्या - 2024 मध्ये भारतात 2.10 कोटी परदेशी पर्यटक प्रवासासाठी आले. त्यापैकी सुमारे 37.05 लाख परदेशी पर्यटन महाराष्ट्रात भेट दिली. म्हणजे भारतातील परदेशी पर्यटकांच्या सुमारे 18% महाराष्ट्रात आले - (reddit)

2022 मध्ये महाराष्ट्र 111.3 दशलक्ष घरगुती पर्यटन भेटी आणि 1.51 दशलक्ष परदेशी पर्यटन भेटी नोंदल्या गेल्या. (mumbai365tour.com)

आर्थिक परिणाम (Economy Impact) :-

राज्याच्या अर्थव्यवस्थेत पर्यटनाचे योगदान (Contribution to State Economy) :-

महाराष्ट्रातील पर्यटन उद्योग राज्याच्या Gross Value Added (GVA) मध्ये सुमारे $26 billion (अंदाजे रू.2,10,000 कोटी) योगदान देतो. जे राज्याच्या एकूण GVA चा अंदाजे 6.5% भाग आहे. *(maharashtra.org)*

यातून सरळ (Direct) पर्यटन खर्चाचे योगदान ~ $11 billion (~Rs.88,800 कोटी)

अप्रत्यक्ष (Indirect) ~$11 billion

आणि उत्पन्नपणे (Induced) ~$4 billion आहे. *(mahermitra.org)*

रोजगार निर्मिती (Employment Generation) :-

महाराष्ट्रातील पर्यटन उद्योग सुमारे 59 दशलक्ष लोकांना रोजगार देतो. हे राज्याच्या एकूण कामकाजी लोकसंख्येच्या 11% पेक्षा जास्त आहे. (mumbai365tour.com)

पुढील काही वर्षात 15.2 दशलक्ष नवे रोजगार निर्माण होण्याची क्षमता या क्षेत्रात दिसते. (mumbai365tour.com)

सांस्कृतिक परिणाम (Cultural Impact) :-

पर्यटनामुळे सांस्कृतिक वारसा जपणूक :-

महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख - गड, किल्ले, लेणी, धार्मिक आणि उत्सव - आधारित पर्यटन स्थळे - हे पर्यटनाला आकर्षित करतात. त्यातून स्थानिक परंपरा, कला, संगीत आणि नृत्य टिकविण्यास मदत होते. (Ex-Tuljabhavani Navaratri)

' श्री तुळजाभवानी नवरात्री महोत्सव ' प्रमाणे मोठ्या सांस्कृतिक उत्सवाला राज्य पर्यटन कॅलेंडरमध्ये स्थान देऊन समारे 5 मिलियन (50 लाख) ध्यानार्थी आणि पर्यटक आकर्षित केले जातात, ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्था आणि सामाजिक सहभागाला चालना मिळते. (The Times of India)

सामाजिक परिणाम (Social Impact) :-

रोजगार आणि जीवनमान सुधारणा :-

पर्यटनामुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष नौकऱ्यांमध्ये वाढ होते. ज्यामुळे स्थानिक समाजाची आर्थिक स्थिती सुधारते आणि बेरोजगारी कमी होते.

ग्रामीण, आदिवासी आणि महिला समुदायामध्ये उद्योजकता व सहभागी सहभाग वाढण्याचे अभ्यास संदर्भातून दिसते.

सामाजिक समावेशन (Inclusion) :-

पर्यटन गतिविधींमध्ये स्थानिक समाजाच्या सहभागामुळे त्यांच्या परंपरा, हस्तकला, सांस्कृतिक कार्यक्रम आणि भाषा जपण्यास मदत होते व सामाजिक आत्म-आधार वाढतो.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

संक्षेप - आकडेवारीने सिद्ध परिणाम -

परिणामाचे क्षेत्र	प्रमुख आकडेवारी	स्त्रोत
परदेशी पर्यटक	~ 37.05 लाख (2024)	readdit
घरगुती पर्यटन भेट	~ 111.3 दशलक्ष (2022)	mumbai365tour.org
GVA योगदान	~ $26 B ≈ 6.5% GVA	mahermitra.org
रोजगार	5.9 M + रोजगार	mumbai365tour.com
सांस्कृतिक उत्सव पर्यटक	~ 5 M	The Times of India

या आकडेवारीच्या आधारे आपण स्पष्टपणे सांगू शकतो की, पर्यटन व्यवसायाचा महाराष्ट्रातील सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक विकासावर महत्वपूर्ण आणि सकारात्मक प्रभाव आहे. जो लोकसंख्या, रोजगार, आर्थिक GVA, सांस्कृतिक जपणूक आणि सामाजिक सहभाग यांची पुष्टी होत आहे.

पर्यटन क्षेत्राच्या वाढीसाठी संधी, अडचणी आणि शासकीय धोरणांची परिणामकारकता :

पर्यटन क्षेत्रातील संधी (Opportunities) :-

नैसर्गिक व सांस्कृतिक विविधता :- महाराष्ट्रात सह्याद्री पर्वतरांग, कोकण किनारपट्टी, वन्यजीव अभयारण्ये, गड-किल्ले, लेणी, धार्मिक स्थळे आणि आधुनिक शहरांचे मिश्रण आहे. या विविधतेमुळे ग्रामीण पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन, सह्याद्री पर्यटन, समुद्र पर्यटन, धार्मिक पर्यटन, विकसित करण्यासाठी मोठी क्षमता आहे.

ग्रामीण व कृषी पर्यटनाची वाढ :- पाचगणी, महाबळेश्वर, माळवण, कोकण आणि विदर्भातील गावात कृषी पर्यटनाद्वारे स्थानिक उत्पन्नात वाढ होण्याची संधी आहे.

रोजगार व उद्योजकतेच्या संधी :- पर्यटनामुळे हॉटेल, ट्रॅव्हल एजन्सी, टूर ऑपरेटर, गाईड, हस्तकला, वाहतूक, फोटोग्राफी, खाद्यसेवा यांसारख्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होण्याच्या संधी आहेत.

डिजिटल पर्यटन (E-Tourism) :- ऑनलाईन बुकींग, व्हर्च्युअल टूर, सोशल मिडिया प्रमोशनमुळे पर्यटन स्थळांना जागतिक ओळख निर्माण होते.

जागतिक वारसा स्थळांचा प्रचार :- अजिंठा-वेरूळ, एलिफंटा - लेणी, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, गाझेट हिल ऑब्झर्वेटरी यामुळे आंतरराष्ट्रीय पर्यटकांचे आकर्षन वाढते.

पर्यटन क्षेत्रातील अडचणी (Challenges) :-

पायाभूत सुविधांची अपुरी उपलब्धता :-

अनेक पर्यटन स्थळांवर रस्ते, स्वच्छता, पार्किंग, सुरक्षितता, शौचालये, माहिती केंद्रे यांची कमतरता दिसून येते.

ग्रामीण पर्यटन भागात गुणवत्तापूर्ण निवासाची कमतरता दिसून येते.

प्रचार व मार्केटिंगची कमतरता :-

महाराष्ट्रातील अनेक पर्यटन स्थळांची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पुरेशी जाहिरात होत नाही.

पर्यावरण समस्या :-

भीमाशंकर, महाबळेश्वर, माथेरान यांसारख्या ठिकाणी कचरा व्यवस्थापन, वाहतूक आणि गर्दी या समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येतात.

कौशल्य विकासाचा अभाव :-

स्थानिक गाईड, पर्यटन कर्मचारी, उद्योजकांसाठी तांत्रिक आणि भाषिक प्रशिक्षणाची कमतरता दिसून येते.

हंगामी पर्यटन :-

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

काही ठिकाणी पर्यटन हंगामी असल्याने वर्षभर रोजगार उपलब्ध होत नाही.

सुरक्षा व नियमांचे पालन :-

पर्यटक सुरक्षा, नियमांचे पालन, टूर ऑपरेटर नोंदणी याबाबत अनेक समस्या निर्माण होतांना दिसून आलेल्या आहेत.

शासकीय धोरणाची परिणामकारकता (Effectiveness of Government Policies) :-

महाराष्ट्र पर्यटन धोरण (Maharashtra Tourism Policy) :-

राज्य सरकारने विविध पर्यटन प्रकल्पनांना कर सवलत, आर्थिक प्रोत्साहन, गुंतवणूक सहाय्य दिले आहे.

यामुळे पर्यटन व्यवसायात खाजगी गुंतवणूक वाढ होत असल्याचे निष्पन्न झालेले आहे.

ग्रामीण पर्यटन मिशन :-

ग्रामीण पर्यटन स्थळांच्या विकासासाठी - ग्रामीण होमस्टे, कृषी पर्यटन केंद्रे, स्थानिक परंपरा जतन करणारे कार्यक्रम प्रभावी ठरत आहेत.

वारसा संवर्धन प्रकल्प :-

महाराष्ट्रातील गड-किल्ले, लेणी, मंदिर आणि ऐतिहासिक स्थळांच्या संवर्धनासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

यामुळे सांस्कृतिक पर्यटनाला गती मिळाली.

प्रचार आणि डिजिटल पोर्टल्स :-

" Visit Maharashtra ", " MTDC " पोर्टल्सद्वारे ऑनलाईन बुकींग, प्रचार, टूर पॅकेजेस उपलब्ध - पर्यटनाचे आधुनिकीकरण होत आहे.

खाजगी - सार्वजनिक भागीदारी (PPP) :-

अनेक पर्यटन प्रकल्पांमध्ये PPP मॉडेलद्वारे - हॉटेल, रिसॉर्ट, वाटर स्पोर्टस, थीम पार्क विकसित होत आहेत.

धोरणाची मर्यादा :-

सर्व प्रकारची अंमलबजावणीची गती कमी आहे.

निधीचे असमान वितरण.

स्थानिक समाजाचा सहभाग कमी.

काही ठिकाणी परिणामकारकता कमी दिसून येते.

महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्रामध्ये वाढीसाठी प्रचंड संधी आहेत :-

सांस्कृतिक वारसा, निसर्ग, समुद्रकिनारे, धार्मिक स्थळे आणि ग्रामीण जीवनाची आकर्षकता हे त्याचे मुख्य स्त्रोत आहेत. परंतु, पायाभूत सुविधा, प्रशिक्षण, सुरक्षा आणि पर्यावरणीय व्यवस्थापन या क्षेत्रातील अडचणी कमी केल्या तर पर्यटनाचा सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक विकासावर अधिक प्रभावी आणि शाश्वत परिणाम घडू शकतो. शासकीय धोरणे उपयुक्त आहेत, परंतु त्यांची कठोर अंमलबजावणी आणि स्थानिक सहभाग वाढविणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसाय हा सांस्कृतिक जतन, सामाजिक विकास आणि आर्थिक समृद्धी याचा महत्वाचा आधारस्तंभ बनला आहे. योग्य नियोजन, पायाभूत सुविधा, डिजिटल प्रमोशन आणि शाश्वत पर्यटन पद्धती लागू केल्यास महाराष्ट्र पर्यटन क्षेत्रात देशात अग्रगण्य स्थान अधिक बळकट करू शकतो.

संशोधन विषयाचे महत्व (Importance of Study) :-

1) **सांस्कृतिक जतन :-** महाराष्ट्राच्या ऐतिहासिक, धार्मिक व कलात्मक वारशाचे संवर्धन आणि प्रसार समजून घेण्यासाठी हे संशोधन उपयुक्त आहे.
2) **सामाजिक विकास :-** पर्यटनामुळे स्थानिक रोजगार, महिलांचे सबलीकरण, उद्योजकता आणि जीवनमान सुधारणा यांचा अभ्यास करता येतो.
3) **आर्थिक वाढ :-** राज्याच्या GDP, महसुल, रोजगार आणि गुंतवणूक वाढीत पर्यटनाचे योगदान मोजण्यासाठी हे अध्ययन महत्वाचे आहे.
4) **धोरणांचे मुल्यांकन :-** शासकीय पर्यटन धोरणे किती परिणामकारक आहेत ? आणि कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत ? याचे विश्लेषण करता येते.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

5) **भविष्यातील संधीचा शोध :-** नवीन पर्यटन स्थळे, ग्रामीण पर्यटन, सेवा गुणवत्ता इत्यादी विकासक्षेत्राची दिशा ठरविण्यासाठी हे संशोधन उपयोगी ठरते.

संशोधनाच्या मर्यादा (Research Limitations) :-

1) **डेटा उपलब्धतेची मर्यादा :-** पर्यटनक्षेत्राशी संबंधित सरकारी व खाजगी संस्थांकडून प्राप्त होणारी आकडेवारी सर्व वेळा अद्ययावत, समग्र किंवा क्षेत्रनिहाय तपशीलवार उपलब्ध नसल्यामुळे विश्लेषणाच्या अचूकतेवर काही प्रमाणात बंधणे येतात.
2) **नमुना आकार आणि प्रतिनिधीत्वाची मर्यादा :-** पर्यटक व स्थानिक समुदायांकडून मिळालेल्या प्रतिसादांचा नमुना आकार मर्यादीत असल्याने प्राप्त निष्कर्ष संपूर्ण राज्याचे प्रतिनिधीत्व पूर्णपणे करू शकत नाही.
3) **भौगोलिक कव्हरेजची मर्यादा :-** महाराष्ट्रातील सर्व पर्यटन स्थळांचा प्रत्यक्ष अभ्यास करणे शक्य नसल्यामुळे काही स्थळांबाबतची माहिती दुय्यम स्त्रोतांवर आधारित राहते. ज्यामुळे विश्लेषणात काही प्रमाणात तफावत राहू शकते.
4) **कालमर्यादा :-** अध्ययन विशिष्ट कालावधीतील पर्यटन प्रवृत्तीवर आधारित असल्यामुळे दीर्घकालीन किंवा ऋतुनिहाय बदलांचा पूर्ण आढावा घेणे मर्यादीत ठरते.
5) **बाह्य परिस्थितीचा प्रभाव :-** हवामानातील बदल, आर्थिक चढ-उतार, राजकीय परिस्थिती, जागतिक घटना किंवा महामारीसारख्या अनपेक्षित घटकांचा पर्यटन उद्योगावर होणारा परिणाम विश्लेषणात पूर्णपणे नियंत्रित करणे शक्य नसते.

निष्कर्ष (Conclusion) :-

या संशोधन अध्ययनातून स्पष्ट होते की, महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसाय राज्याच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक विकासात बहुआयामी व महत्वपूर्ण भूमिका बजावतो. पर्यटनामुळे राज्यातील सांस्कृतिक वारशाचे जतन, संवर्धन आणि प्रसार प्रभावीपणे घडून येतो. ऐतिहासिक, धार्मिक, नैसर्गिक व कलात्मक स्थळाच्या वाढत्या प्रसिद्धीमुळे स्थानिक लोकसंस्कृती, कला आणि परंपरांना नवी बाजारपेठ प्राप्त होते.

सामाजिक स्तरावर पर्यटन उद्योगाने स्थानिकांना विविध रोजगार संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. विशेषत: ग्रामीण व आदिवासी प्रदेशांमध्ये पर्यटनामुळे महिलांचे सबलीकरण, उद्योजकता वाढ, समुदाय सहभाग तसेच जीवनमान सुधारणा यासारखे सकारात्मक सामाजिक परिवर्तन आढळून येतात. त्यामुळे पर्यटन हे सामाजिक ऐक्य आणि समुदाय विकासासाठी प्रभावी साधन ठरते.

आर्थिकदृष्ट्या पर्यटन व्यवसाय हा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेसाठी महत्वाचा वृद्धी-इंजन असल्याचे निष्पन्न होते. राज्याच्या सकल राज्य उत्पादनामध्ये पर्यटन क्षेत्राचे लक्षणीय योगदान असून स्थानिक उत्पन्नात वाढ, लघु उद्योगांना चालना, परकीय चलन प्राप्ती आणि पायाभूत सुविधांचा विस्तार याद्वारे पर्यटन आर्थिक वृद्धी घडविते.

याशिवाय, शासकीय पर्यटन धोरणे, डिजिटल प्रमोशन उपक्रम आणि पायाभूत विकास प्रकल्प यांचा पर्यटन उद्योगाच्या विस्तारावर सकारात्मक परिणाम झाल्याचे अभ्यासात दिसून आले. तथापि, शाश्वत पर्यटन, पर्यावरण संरक्षण, सेवा गुणवत्ता सुधारणा आणि स्थानिक समुदायांचा वाढता सहभाग या क्षेत्रांत अधिक प्रयत्नांची आवश्यकता आहे.

एकंदरीत, महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसायात अत्यंत व्यापक विकासक्षमता असून वैज्ञानिक नियोजन, पर्यावरण पूरक धोरणे, नवोन्मेषी पर्यटन संकल्पना आणि शासकीय खाजगी भागीदारी यांच्या माध्यमातून पर्यटन क्षेत्र राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणखी बळकट आधार स्तंभ होऊ शकते, असा हा संशोधनाचा सर्वसमावेशक निष्कर्ष आहे.

संदर्भ सूची (References) :-

1) गोरे, एम.एस. (2018). भारतीय पर्यटनाचा अभ्यास. पुणे, पुणे : विद्यापीठ प्रकाशन.
2) कुळकर्णी, आर.ए. (2017). पर्यटन व्यवस्थापन आणि विकास. मुंबई : हिमालय पब्लिशिंग.
3) भोसले, पी.के. (2019). महाराष्ट्राचे सांस्कृतिक वारसास्थळे. नागपूर : विदर्भ पब्लिशिंग.
4) गायकवाड, एन.बी. (2016). अर्थव्यवस्था व पर्यटन उद्योग. पुणे : ज्ञानदीप प्रकाशन.
5) Singh, S. (2015). Tourism Development : Principles and Practices : New Delhi : Pearson.
6) Desai, R. (2020). "Tourism Growth and Regional Development in Maharashtra." Journal of Tourism Studies, 12(3), 45-56.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

7) Patil, S. and Pawar, R. (2019). "Social-economic Impact of Tourism in Maharashtra. " International Journal of Hospitality and Tourism Research, 8(2), 20-30.
8) Government of Maharashtra. (2022). Maharashtra Tourism Policy 2021 - 22. Mumbai. Directorate of Tourism.
9) MTDC (Maharashtra Tourism Development Corporation). (2020). Annual Tourism Statistics Report.
10) Ministry of Tourism, Government of India. (2021). India Tourism Statistics.
11) Government of India. (2019). Economic Survey of India. New Delhi : Ministry of Finance.
12) Directorate of Economics and Statistics, Maharashtra. (2021). Socio-economic Review of Maharashtra.
13) The Hindu. (2022). "Tourism Revival in Post-Pandemic Maharashtra."
14) Times of India. (2021). "Maharashtra Sees Rise in Domestic Tourism."
15) Lokmat Tourism Spcial Issue. (2020).
16) UNESCO World Heritage Sites - https://whc.unesco.org
17) MTDC official portal - https://www.mtdc.co
18) Incredible India-https://www.incredibleindia.org

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

क्रिकेट खेळातील गोलंदाजी कौशल्य मापनासाठी पदनिश्चय श्रेणी कसोटी ची निर्मिती, वैधता व विश्वसनीयतेचा अभ्यास

डॉ. भालचंद्र रामकृष्ण मोरे[1] श्री. मनोज विष्णू पोरजे[2]

[1,2] कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, दहिवेल ता. साक्री, जि. धुळे

Manuscript ID:
JRD -2026-180222
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 93-98
February 2026
Submitted: 25 Jan. 2026
Revised: 31 Jan. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

*क्रिकेट खेळामध्ये गोलंदाजी ही सामन्याचा निकाल ठरविणारी एक महत्त्वाची कौशल्यात्मक बाब आहे. गोलंदाजी कौशल्याचे अचूक, वस्तुनिष्ठ व शास्त्रीय मापन करण्यासाठी विश्वासार्ह कसोटीची आवश्यकता असते. प्रस्तुत संशोधनामध्ये क्रिकेट खेळातील गोलंदाजी कौशल्य मोजण्यासाठी "पदनिश्चय श्रेणी कसोटी"ची निर्मिती करून तिची वैधता व विश्वसनीयता तपासण्यात आली आहे. या अभ्यासासाठी 14 ते 19 वयोगटातील पुरुष व महिला क्रिकेट खेळाडूंचा नमुना निवडण्यात आला. निरीक्षक आधारित श्रेणी पद्धतीने गोलंदाजी कौशल्याचे मापन करण्यात आले. कसोटीची विषयवैधता तज्ज्ञांच्या मताने निश्चित करण्यात आली असून **Test- Retest** पद्धतीने विश्वसनीयता तपासण्यात आली. ही कसोटी प्रशिक्षक, क्रीडा शिक्षक व संशोधकांसाठी उपयुक्त ठरेल.*

संशोधनसूचक शब्द : *क्रिकेट खेळ, गोलंदाजी कौशल्यमापन, पदनिश्चय श्रेणी कसोटी* ***(Rating Scale Test)****, प्रायोगिक संशोधन* ***(Experimental Research)****,* ***Tool Construction in Sports****, वैधता* ***(Validity)****, विश्वसनीयता* ***(Reliability)***

प्रस्तावना (Introduction):

क्रिकेट हा जागतिक पातळीवर लोकप्रिय व अत्यंत कौशल्यप्रधान खेळ आहे, ज्यामध्ये फलंदाजी, गोलंदाजी व क्षेत्ररक्षण यांच्या समन्वयामुळेच संघाचा विजय किंवा पराभव ठरतो. विशेषतः आधुनिक क्रिकेटमध्ये गोलंदाजीची भूमिका केवळ बचावात्मक राहिली नाही तर ती सामन्याच्या निकालावर निर्णायक प्रभाव टाकणारी ठरली आहे. गोलंदाजीची प्रभावीता मुख्यतः चेंडूची अचूक लाईन-लेंथ, वेग, चेंडू प्रकार, नियंत्रण व आक्रमकतेसारख्या तांत्रिक घटकांवर अवलंबून असते. तथापि, अभ्यास क्षेत्रात आढळते की गोलंदाजी कौशल्याचे मूल्यमापन प्रामुख्याने पारंपारिक निरीक्षणावर किंवा अनुभवावर आधारित असते, ज्यामुळे व्यक्तिनिष्ठता (Subjectivity) व मूल्यमापनातील विसंगती निर्माण होतात. अशा परिस्थितीत खेळाडूंची खरी क्षमता व कार्यक्षमता अचूकपणे प्रतिबिंबित होणे कठीण होते.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. भालचंद्र रामकृष्ण मोरे, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, दहिवेल ता. साक्री, जि. धुळे

How to cite this article:
मोरे, . भालचंद्र . रामकृष्ण ., & पोरजे, . मनोज . विष्णू . (2026). क्रिकेट खेळातील गोलंदाजी कौशल्य मापनासाठी पदनिश्चय श्रेणी कसोटी ची निर्मिती, वैधता व विश्वसनीयतेचा अभ्यास. *Journal of Research and Development,* 18(2(*XIV*)), 93–98. https://doi.org/10.5281/zenodo.18797351

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18797351
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

क्रीडा विज्ञान व क्रीडा प्रशिक्षण साहित्यामध्ये कौशल्य मापनाचे महत्त्व परदेशी देशांतर्गत अभ्यासांत अधोरेखित केले गेले आहे. **Bucher** (1964) यांच्या मते, क्रीडा कौशल्यांचे मूल्यमापन हे वैज्ञानिक, वस्तुनिष्ठ व विश्वसनीय चाचणी पद्धतींवर आधारित असावे, असे नमूद केले आहे. तसेच **Singh** (2008) यांनी त्यांच्या अभ्यासात कौशल्य मूल्यमापनाच्या चाचण्यांचा खेळाडू प्रशिक्षणातील सुधारणा व परफॉर्मन्स वाढविण्यात महत्त्वाचे योगदान असल्याचे सिद्ध केले आहे.

CCI Coaching Manual (2015) मध्ये गोलंदाजी कौशल्य मापनासाठी लाईन-लेंथ, चेंडू प्रकार व अचूकता या घटकांचा समावेश आवश्यक असल्याचे सांगितले आहे. तसेच **Verma** व **Sharma** (2017) यांनी निरीक्षक अधारित श्रेणी कसोटीचा वापर क्रीडा कौशल्य मापनासाठी प्रभावी असल्याचे नमूद केले आहे. **Kothari** (2014) यांनी कसोटी निर्मिती प्रक्रियेत शास्त्रीय पद्धती, तज्ज्ञ मत व सांख्यिकीय विश्लेषणाची गरज असल्याचे अधोरेखित केले आहे.या सर्व अभ्यासांचा आढावा घेतल्यास स्पष्ट होते की, गोलंदाजी कौशल्याचे शास्त्रीय व वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्यासाठी एक मान्यताप्राप्त व सुव्यवस्थित कसोटी विकसित करण्याची गरज आहे. इंटरनेटवर उपलब्ध असलेले सामान्य कौशल्य चाचणी स्वरूप गोलंदाजीच्या सर्व तांत्रिक घटकांना कव्हर करत नसल्याचे आढळते आणि तसे स्केल पूर्णपणे वैज्ञानिक पद्धतीने तयार केलेले नाहीत, यामुळे प्रशिक्षक व संशोधकांना योग्य निर्देश मिळत नाहीत. त्यामुळे क्रिकेट गोलंदाजी कौशल्यमापनासाठी स्वतंत्र, शास्त्रीय, विश्वसनीय व वैध असणारी पदनिश्चय श्रेणी कसोटी विकसित करणे अत्यावश्यक बनते.

उपरोक्त पार्श्वभूमीवर हा अभ्यास "क्रिकेट खेळातील गोलंदाजी कौशल्यमापनासाठी पदनिश्चय श्रेणी कसोटीची निर्मिती, तिची वैधता व विश्वसनीयता" या विषयावर केंद्रित केला आहे, ज्यामध्ये विकसित कसोटी रचना, त्याची **Validity** व **Reliability** तपासणे हाच प्रमुख उद्देश आहे. हा अभ्यास 14 ते 19 वयोगटातील मिश्र **(Mixed)** खेळाडूंचा नमुना घेऊन करण्यात आला असून, या कसोटीचा वापर प्रशिक्षक, क्रीडा शिक्षक व संशोधकांसाठी उपयुक्त ठरण्याच्या दृष्टीने केला जाणार आहे.

संदर्भ साहित्याचा आढावा (Review of Related Literature)

क्रीडा विज्ञान व शारीरिक शिक्षण क्षेत्रात कौशल्य मापन, कसोटी निर्मिती, वैधता व विश्वसनीयता या बाबींवर विविध संशोधकांनी महत्त्वपूर्ण अभ्यास केले आहेत. प्रस्तुत संशोधनाच्या पार्श्वभूमीवर खालील संदर्भ साहित्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे.

Bucher व Eagle (1964)

यांनी त्यांच्या प्रसिद्ध ग्रंथ **Foundations of Physical Education** मध्ये क्रीडा कौशल्य मूल्यमापनाची सैद्धांतिक व व्यावहारिक मांडणी केली आहे. त्यांच्या मते, कोणत्याही क्रीडा कौशल्याचे मूल्यमापन करताना कसोटी ही वस्तुनिष्ठ, पुनरावृत्तीयोग्य आणि विश्वसनीय असणे अत्यावश्यक आहे. त्यांनी असे स्पष्ट केले की कौशल्य मापन कसोटीने खेळाडूच्या प्रत्यक्ष कार्यक्षमतेचे अचूक प्रतिबिंब उमटवले पाहिजे. निरीक्षकांमधील फरक कमी करण्यासाठी स्पष्ट निकष, श्रेणीबद्ध गुणांकन व समान अटी आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. त्यांच्या अभ्यासामुळे क्रीडा कौशल्य मापनासाठी शास्त्रीय कसोटी विकासाचा पाया घातला गेला.

Johnson व Nelson (1982)

यांनी **Practical Measurement for Evaluation in Physical Education** या ग्रंथात कौशल्यमापनासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध मापन पद्धतींचे विश्लेषण केले आहे. त्यांनी विशेषतः **Rating Scale** आधारित कसोटीचे महत्त्व अधोरेखित केले आहे. त्यांच्या अभ्यासानुसार, Rating Scale पद्धतीमुळे निरीक्षकांच्या वैयक्तिक मतांचा प्रभाव कमी होतो आणि गुणांकन अधिक सुसंगत व तुलनात्मक ठरते. त्यांनी असेही नमूद केले की कौशल्य मापनासाठी **Rating Scale** ही पद्धत शारीरिक शिक्षण व क्रीडा संशोधनात अधिक विश्वासार्ह मानली जाते. त्यामुळे प्रस्तुत संशोधनातील पदनिश्चय श्रेणी कसोटीचा पाया या अभ्यासावर आधारित आहे.

Singh व Sharma (2008)

यांनी क्रिकेट कौशल्यमापनासंदर्भात केलेल्या अभ्यासात पारंपरिक निरीक्षण पद्धतींच्या मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. त्यांच्या मते, फक्त अनुभवाधारित निरीक्षणामुळे सूक्ष्म कौशल्यात्मक फरक लक्षात येत नाहीत. त्यांनी क्रिकेटमधील गोलंदाजी, फलंदाजी व क्षेत्ररक्षण यांसाठी स्वतंत्र कौशल्यमापन कसोटी विकसित करण्याची गरज अधोरेखित केली आहे. त्यांच्या अभ्यासात असे आढळले की शास्त्रीय कसोटीमुळे प्रशिक्षण नियोजन अधिक प्रभावी होते आणि खेळाडूंच्या कामगिरीत सातत्यपूर्ण सुधारणा दिसून येते.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Board of Control for Cricket in India (BCCI) Coaching Manual (2015)

मध्ये गोलंदाजी कौशल्याच्या विविध घटकांचा सविस्तर उल्लेख करण्यात आला आहे. या मॅन्युअलनुसार, लाईन-लेंथ, अचूकता, नियंत्रण, चेंडू प्रकार व आक्रमकता हे गोलंदाजी कौशल्याचे मुख्य आधारस्तंभ आहेत. **BCCI** ने प्रशिक्षकांना गोलंदाजी कौशल्यमापन करताना या घटकांचा शास्त्रीय पद्धतीने विचार करण्याचे मार्गदर्शन केले आहे. हा मॅन्युअल भारतीय क्रिकेट प्रशिक्षण व्यवस्थेचा अधिकृत दस्तऐवज असल्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी तो महत्त्वाचा आधार ठरतो.

Verma व Sharma (2017)

यांनी **Rating Scale** आधारित कौशल्यमापन कसोटीच्या विश्वसनीयतेवर संशोधन केले आहे. त्यांच्या अभ्यासात वेगवेगळ्या खेळांमध्ये **Rating Scale** वापरून कौशल्य मापन करण्यात आले. त्यांनी **Test-Retest** पद्धतीद्वारे कसोटीची स्थिरता तपासली आणि प्राप्त सहसंबंध गुणांक स्वीकारार्ह पातळीवर असल्याचे सिद्ध केले. त्यांच्या निष्कर्षांनुसार, **Rating Scale** आधारित कसोटी ही विविध परिस्थितींमध्येही सुसंगत परिणाम देते, त्यामुळे ती क्रीडा संशोधनासाठी उपयुक्त ठरते.

Kothari (2014)

यांनी **Research Methodology: Methods and Techniques** या ग्रंथात संशोधन पद्धतींचे सखोल विवेचन केले आहे. त्यांनी **Tool Construction** संशोधनामध्ये कसोटीची वैधता, विश्वसनीयता, तज्ज्ञ मत, पायलट अभ्यास आणि सांख्यिकीय विश्लेषण यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. त्यांच्या मते, कोणतीही कसोटी संशोधनात वापरण्यापूर्वी तिची शास्त्रीय चाचणी करणे अनिवार्य आहे. प्रस्तुत संशोधनातील कसोटी निर्मिती, वैधता व विश्वसनीयता तपासणी ही **Kothari** यांच्या मार्गदर्शनानुसार करण्यात आली आहे.

वरील सर्व अभ्यासांचा आढावा घेतल्यास असे स्पष्ट होते की, क्रिकेट गोलंदाजी कौशल्यमापनासाठी स्वतंत्र, शास्त्रीय, वस्तुनिष्ठ व विश्वसनीय पदनिश्चय श्रेणी कसोटी विकसित करण्याची आवश्यकता आहे. प्रस्तुत संशोधन हा त्या दिशेने केलेला एक प्रयत्न असून, तो विद्यमान संशोधन साहित्यावर आधारित आहे.

संशोधन समस्येचे विधान :

क्रिकेट खेळातील गोलंदाजी कौशल्य मापनासाठी विकसित करण्यात आलेली पदनिश्चय श्रेणी कसोटी वैध व विश्वसनीय आहे का?

संशोधनाची उद्दिष्टे :

1) गोलंदाजी कौशल्यमापनासाठी पदनिश्चय श्रेणी कसोटी विकसित करणे.

2) विकसित कसोटीची विषयवैधता निश्चित करणे.

3) कसोटीची विश्वसनीयता **(Reliability)** तपासणे.

4) प्रशिक्षकांसाठी उपयुक्त अशी गुणांकन पद्धती विकसित करणे.

संशोधन परिकल्पना :

विकसित पदनिश्चय श्रेणी कसोटी ही क्रिकेट खेळातील गोलंदाजी कौशल्यमापनासाठी वैध व विश्वसनीय ठरेल.

शून्य परिकल्पना :

विकसित पदनिश्चय श्रेणी कसोटी ही क्रिकेट खेळातील गोलंदाजी कौशल्यमापनासाठी वैध व विश्वसनीय ठरणार नाही.

संशोधन पद्धती :

सदर अभ्यासासाठी **Tool Construction** संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

नमुना

सदर संशोधनासाठी नमुना म्हणून स्वामी मुक्तानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, येवला तसेच स्वामी मुक्तानंद इंग्लिश मीडियम स्कूल, येवला येथील एकूण 40 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड करण्यात आलेले विद्यार्थी 14 ते 19 या वयोगटातील होते. सदर नमुना हा हेतुपूर्वक नमुना **(Purposive Sampling)** पद्धतीने निवडण्यात आला असून निवडलेले सर्व विद्यार्थी नियमितपणे क्रिकेट सरावात सहभागी असलेले होते

कसोटीची निर्मिती :

पदनिश्चय श्रेणी कसोटीमध्ये गोलंदाजी कौशल्याचे घटक :

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

1) लाईन व लेंथ 2) अचूकता 3) चेंडू प्रकार नियंत्रण 4) आक्रमकता एकूण गुण: 30 (प्रत्येक Over साठी)

कसोटीची अंमलबजावणी :

विकसित पदनिश्चय श्रेणी कसोटीची अंमलबजावणी मानक क्रिकेट खेळपट्टीवर करण्यात आली. कसोटी घेण्यापूर्वी प्रत्येक गोलंदाजाला सहा बॉल टाकण्याआधी त्याने कोणते गोलंदाजी कौशल्य वापरणार आहे, हे स्पष्टपणे निरीक्षकाला सांगण्यास सांगितले गेले. गोलंदाजांकडून यॉर्कर बॉल, गुड लेन्थ बॉल, ऑफ-कटर, लेग- कटर तसेच स्पिन गोलंदाजांच्या बाबतीत ऑफ स्पिन, लेग स्पिन किंवा चायनामन (Left Arm Unorthodox) अशा कौशल्यांची पूर्वघोषणा करून घेतली गेली. घोषित केलेल्या प्रत्येक गोलंदाजी कौशल्यासाठी खेळपट्टीवर स्वतंत्र व पूर्वनिश्चित टप्पे (Target Zones) निश्चित करण्यात आले होते. हे टप्पे फक्त निरीक्षकांच्या संदर्भासाठी रेखांकित करण्यात आले असून ते गोलंदाजांना प्रत्यक्षात दर्शविण्यात आले नाहीत, जेणेकरून गुणांकन प्रक्रियेत कोणताही पूर्वग्रह निर्माण होऊ नये. प्रत्येक गोलंदाजास एक ओव्हर (6 चेंडू) टाकण्याची संधी देण्यात आली. प्रत्येक चेंडू पडलेला टप्पा घोषित कौशल्याच्या अपेक्षित क्षेत्राशी किती सुसंगत आहे, याच्या आधारे निरीक्षकांनी ५ अंकी पदनिश्चय श्रेणीनुसार गुण प्रदान केले. घोषित कौशल्य आणि प्रत्यक्ष चेंडू पडलेला टप्पा यामधील अचूकतेच्या प्रमाणावरून गुणांकन करण्यात आले. अत्यंत अचूक अंमलबजावणीसाठी 5 गुण तर अपेक्षित टप्प्यापासून लक्षणीय फरक असल्यास कमी गुण देण्यात आले. कसोटीचे गुणांकन तीन अनुभवी क्रिकेट प्रशिक्षक निरीक्षकांनी स्वतंत्रपणे केले. तिन्ही निरीक्षकांच्या गुणांची सरासरी अंतिम गुण म्हणून विचारात घेण्यात आली

कसोटीची वैधता (Validity of the Test) :

प्रस्तुत संशोधनामध्ये विकसित करण्यात आलेल्या 'क्रिकेट गोलंदाजी कौशल्यमापनासाठी पदनिश्चय श्रेणी कसोटी'ची वैधता निश्चित करण्यासाठी विषयवैधता (Content Validity) या पद्धतीचा अवलंब करण्यात आला. कसोटीच्या निर्मिती प्रक्रियेमध्ये गोलंदाजी कौशल्याशी संबंधित सर्व महत्त्वाचे घटक जसे की लाईन व लेंथ, अचूकता, चेंडू प्रकार नियंत्रण व आक्रमकता यांचा समावेश करण्यात आला आहे. हे घटक क्रिकेट प्रशिक्षण साहित्य, BCCI Coaching Manual तसेच संबंधित संशोधन अभ्यासांच्या आधारे निश्चित करण्यात आले. विकसित कसोटीतील घटक, गुणांकन श्रेणी, कौशल्य घोषणा पद्धती तसेच अपेक्षित टप्प्यांची रचना ही अनुभवी क्रिकेट प्रशिक्षक, क्रीडा शिक्षणतज्ज्ञ व संशोधन मार्गदर्शक यांच्या अभिप्रायासाठी सादर करण्यात आली. तज्ज्ञांनी कसोटीतीलघटकांची उपयुक्तता, संपूर्णता व प्रत्यक्ष खेळाशी सुसंगतता तपासून आवश्यक सूचना दिल्या. तज्ज्ञांच्या एकमताने असे नमूद करण्यात आले की, ही कसोटी क्रिकेट खेळातील गोलंदाजी कौशल्याचे अचूक, वस्तुनिष्ठ व शास्त्रीय मापन करण्यास सक्षम आहे. त्यामुळे प्रस्तुत पदनिश्चय श्रेणी कसोटीला आवश्यक विषयवैधता प्राप्त झाल्याचे स्पष्ट होते.

सदर संशोधन हे कसोटी निर्मिती (Tool Construction) स्वरूपाचे असल्याने क्रिकेट खेळातील गोलंदाजी कौशल्यासाठी कोणतीही प्रमाणित संदर्भ कसोटी (Standardized Criterion Test) उपलब्ध नाही. त्यामुळे विषयवैधता (Content Validity) ही तज्ज्ञांच्या मतांच्या आधारे निश्चित करण्यात आली आहे. ही पद्धत संशोधन पद्धतशास्त्रानुसार शास्त्रीय व मान्यताप्राप्त असून, Kothari (2014) यांनीही या दृष्टिकोनास मान्यता दिली आहे.

विश्वसनीयता : (Reliability of the Test)

प्रस्तुत संशोधनासाठी तयार करण्यात आलेल्या 'क्रिकेट गोलंदाजीतील आक्रमक कौशल्य क्षमता कसोटी'ची विश्वसनीयता तपासण्यासाठी पद-निश्चय श्रेणी कसोटी (Test-Retest Method) या पद्धतीचा वापर करण्यात आला. या पद्धतीत एकाच गटातील विद्यार्थ्यांना समान अटींमध्ये ठराविक कालावधीच्या अंतराने दोन वेळा कसोटी देण्यात आली.

या उद्देशासाठी 14 ते 19 वयोगटातील एकूण 40 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. प्रथम वेळेस (First Time / पूर्व-कसोटी) प्रत्येक विद्यार्थ्याला एक ओव्हर (6 चेंडू) गोलंदाजी करण्यास सांगण्यात आली. सर्व चेंडूंमधील अचूकता, नियंत्रण व आक्रमक कौशल्य यांचा एकत्रित विचार करून कमाल 30 गुणांपैकी गुण देण्यात आले. त्यानंतर योग्य विश्रांती व रिकव्हरी कालावधी दिल्यानंतर त्याच विद्यार्थ्यांना पुन्हा समान परिस्थितीत दुसऱ्यांदा (Second Time / उत्तर-कसोटी) एक ओव्हर गोलंदाजी करण्यास सांगण्यात आली व त्याच निकषांवर पुन्हा गुणांकन करण्यात आले.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

प्रथम वेळ व दुसऱ्या वेळेस मिळालेल्या गुणांमध्ये सांख्यिकीय सहसंबंध (**Correlation**) काढण्यासाठी पिअर्सन सहसंबंध गुणांक पद्धत वापरण्यात आली. या दोन्ही वेळेच्या गुणांमधील सहसंबंध गुणांक (**r**) *0.67* इतका प्राप्त झाला.

निकाल व चर्चा :

सदर अभ्यासामध्ये विकसित करण्यात आलेल्या पद-निश्चय श्रेणी कसोटीची विश्वसनीयता तपासण्यासाठी 40 विद्यार्थ्यांवर दोन वेळा (प्रथम वेळ व पुनःकसोटी) गुण नोंदविण्यात आले. प्रथम कसोटीमध्ये विद्यार्थ्यांचा मध्यमान गुण 15.40 असून प्रमाणित विचलन 1.37 आढळून आले. पुनःकसोटीमध्ये मध्यमान गुण 15.75 असून प्रमाणित विचलन 1.03 नोंदविण्यात आले. दोन्ही कसोटींतील गुणांमध्ये लक्षणीय साम्य आढळून आले. प्रथम व द्वितीय वेळच्या गुणांमधील सहसंबंध गुणांक (Karl Pearson's r) **0.67** इतका आढळून आला. हा सहसंबंध गुणांक मध्यम ते चांगल्या दर्जाची विश्वसनीयता दर्शवितो.

मर्यादा :

1) सदर पदनिश्चय श्रेणी कसोटीमध्ये प्रत्येक गोलंदाजास केवळ एक ओव्हर (6 चेंडू) टाकण्याची संधी देण्यात आली. त्यामुळे दीर्घकाळ सातत्याने कौशल्य टिकविण्याची क्षमता पूर्णपणे मोजता येऊ शकली नाही. 2) नमुना मर्यादित असून तो विशिष्ट शाळांतील व विशिष्ट वयोगटातील (14 ते 19 वर्षे) विद्यार्थ्यांपुरताच मर्यादित होता. 3) कसोटी निरीक्षकाधारित असल्यामुळे निरीक्षकांच्या अनुभव व निर्णयक्षमतेचा काही प्रमाणात परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पुढील संशोधनासाठी दिशा :

1) विकसित पदनिश्चय श्रेणी कसोटी भविष्यात प्रत्येक गोलंदाजास चार ओव्हर टाकण्याची संधी देऊन वापरता येऊ शकते, ज्यामुळे सातत्य, दमणूक व कौशल्य टिकविण्याची क्षमता अधिक प्रभावीपणे मोजता येईल.

2) विविध वयोगटांतील (**Under**-14, **Under**-17, **Under**-19, **Senior**) खेळाडूंवर या कसोटीचा वापर करून तुलनात्मक अभ्यास करता येईल.

3) विविध स्तरांवरील (शालेय, महाविद्यालयीन, जिल्हा, राज्य) क्रिकेट खेळाडूंवर कसोटीची उपयुक्तता तपासता येईल.

4) भविष्यात या कसोटीच्या आधारे प्रशिक्षण हस्तक्षेप (**Training Intervention**) करून गोलंदाजी कौशल्यातील सुधारणा अभ्यासता येईल.

निष्कर्ष :

प्रस्तुत संशोधनामध्ये क्रिकेट खेळातील गोलंदाजी कौशल्य मापनासाठी पदनिश्चय श्रेणी **(Rating Scale)** आधारित एक नवीन कसोटी विकसित करण्यात आली. या कसोटीमध्ये गोलंदाजी कौशल्याचे प्रमुख घटक – लाईन व लेंथ, अचूकता,चेंडू प्रकार नियंत्रण व आक्रमकता – यांचा समावेश करण्यात आला. कसोटीची विषयवैधता तज्ज्ञांच्या मतांच्या आधारे निश्चित करण्यात आली, ज्यामध्ये सर्व तज्ज्ञांनी कसोटीतील घटक योग्य, उपयुक्त व गोलंदाजी कौशल्य मापनासाठी सुसंगत असल्याचे मान्य केले.

Test–Retest पद्धतीने कसोटीची विश्वसनीयता तपासली असता प्राप्त सहसंबंध गुणांक **r = 0.67** मिळाला. कौशल्य आधारित कसोटीसाठी **0.60** पेक्षा जास्त विश्वसनीयता स्वीकारार्ह मानली जाते, त्यामुळे ही कसोटी विश्वसनीय **(Reliable)** असल्याचे सिद्ध होते. या निष्कर्षांवरून असे स्पष्ट होते की, विकसित पदनिश्चय श्रेणी कसोटी ही क्रिकेट गोलंदाजी कौशल्याचे शास्त्रीय, वस्तुनिष्ठ व सातत्यपूर्ण मापन करण्यास सक्षम आहे. ही कसोटी प्रशिक्षण, निवड प्रक्रिया व पुढील संशोधनासाठी उपयुक्त ठरू शकते.

संदर्भ साहित्याचा प्रकार :

प्रस्तुत संशोधनामध्ये वापरण्यात आलेले संदर्भ साहित्य हे दुय्यम स्रोत **(Secondary Sources)** या प्रकारात मोडतात. यामध्ये पुढील प्रकारांचा समावेश होतो :

1) संशोधन पद्धती विषयक ग्रंथ **(Research Methodology Books)**

2) क्रीडा विज्ञान व शारीरिक शिक्षणावरील प्रमाणित ग्रंथ

3) आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय संशोधन लेख **(Research Journals)**

4) अधिकृत **Coaching Manuals** (उदा. **BCCI Coaching Manual)**

हे सर्व संदर्भ साहित्य वैज्ञानिकदृष्ट्या मान्यताप्राप्त, प्रकाशित व संशोधनासाठी विश्वासार्ह स्रोत आहेत.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

संदर्भसूची (References)

A) पुस्तके (Books – Measurement, Evaluation & Research Methodology)

1) कोठारी, सी. आर. (2014).

Research Methodology: Methods and Techniques.

New Delhi : New Age International Publishers.

(संशोधन पद्धती, कसोटी वैधता व विश्वसनीयता यासाठी मान्यताप्राप्त पुस्तक)

2) Singh, Hardayal (2012).

Research Methods in Physical Education.New Delhi : Friends Publications.(क्रीडा व शारीरिक शिक्षणातील प्रायोगिक व कसोटी विकास संशोधनासाठी वापरले जाणारे पुस्तक)

3) Clarke, H. H. & Clarke, D. H. (1970).Application of Measurement to Health and Physical Education.

New Jersey : Prentice Hall.(कसोटी मापन, गुणांकन पद्धती व विश्वसनीयता यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्य पुस्तक)

4) Verma, J. P. (2013).Sports Statistics: Methods and Applications.

New Delhi : Springer India.(Mean, SD, Correlation, Reliability यासाठी वापरले जाणारे पुस्तक)

5) Bucher, C. A. & Prentice, W. E. (2007).Fitness for College and Life.New York : McGraw-Hill.(क्रीडा कौशल्य, फिटनेस व मूल्यमापन संकल्पना स्पष्ट करणारे पुस्तक)

B) ऑनलाईन स्त्रोत (Online Sources – Open & Verifiable)

6) Kothari, C. R. (2014).Research Methodology – Tool Construction, Validity and Reliability.Available at:https://www.researchgate.net

(संशोधन पद्धती व कसोटी विकास संदर्भासाठी वापरलेला ऑनलाईन स्त्रोत)

7) Singh, Hardayal.Measurement and Evaluation in Physical Education – Notes and Research Articles.

Available at:https://shodhganga.inflibnet.ac.in(भारतीय PhD प्रबंधांचा अधिकृत UGC पोर्टल)

8) Cricket Bowling Skill Analysis – Coaching & Skill Assessment Articles.

Available at:

https://www.bcci.tv

https://www.ecb.co.uk

(क्रिकेट गोलंदाजी कौशल्य, लाईन-लेन्थ व तांत्रिक घटकांसाठी वापरलेले स्त्रोत)

9) Sports Skill Testing and Evaluation.Available at:https://www.sciencedirect.com

(क्रीडा कौशल्य कसोटी, स्कोअरिंग व विश्वसनीयता विषयक संशोधन लेख)10) Test–Retest Reliability in Sports Skill Tests.Available at:https://www.researchgate.net(कसोटी विश्वसनीयता सिद्ध करण्यासाठी वापरलेले संशोधन लेख)

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी बहुविषय (इंग्रजी, विज्ञान, गणित व समाजशास्त्र) शैक्षणिक संपादणूक चाचणीची निर्मिती

शशिकांत त्र्यंबक निकम [1] डॉ. अर्वित शिवाजी पाटील[2]
[1]संशोधक, कवयत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव, महाराष्ट्र
[2]मार्गदर्शक, छत्रपती राजे संभाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगांव ता. जि. जळगांव, महाराष्ट्र

Manuscript ID:
JRD -2026-180223
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 99-104
February 2026
Submitted: 25 Jan. 2026
Revised: 31 Jan. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश:

संशोधकाने नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील एस. एस. सी. बोर्ड अंतर्गत माध्यमिक स्तरातील इयत्ता नववी इयत्तेसाठी इंग्रजी, विज्ञान, गणित व समाजशास्त्र या विषयासाठी बहुविषय शैक्षणिक संपादणूक चाचणी तयार करून प्रमाणित केली. शैक्षणिक संपादणूक चाचणी तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये नियोजन, तयारी, प्रश्नांची निवड, चाचणी, गुणांकन व विश्लेषण यांचा समावेश होता. तज्ञांशी चर्चा व विद्यार्थ्यांवर चाचणीचे प्रशासन करून मूळ ३० प्रश्न कमी करून २० प्रश्न ठेवले गेले. नंतर अडचणीचे प्रश्न वगळले गेल्यावर १८ प्रश्नांची मसुदा चाचणी तयार करण्यात आली. प्रत्येक घटकाचे विश्लेषण केल्यानंतर अंतिम स्वरुपात १६ प्रश्न ठेवले गेले. यांत वस्तुनिष्ठ, लघुत्तरी व दीर्घोत्तरी प्रश्नांचा समावेश होता. प्रत्येक विषयास २० गुण देण्यात आले होते. चाचणीची विश्वसनीयता तपासण्यासाठी क्रॉन्बॅक अल्फा गुणांक (Cronbach's Alpha) हे साधन वापरण्यात आले. हा एक सांख्यिकीय गुणांक आहे. तो विशेषतः आंतरिक सुसंगतता तपासण्यासाठी वापरला जातो. प्रस्तुत चाचणीची विश्वसनीयता स्थापित करण्यासाठी अंतर्गत सुसंगती पद्धत वापरण्यात आली. अंतर्गत सुसंगतीचे प्रमाण 'क्रॉन्बॅक अल्फा' (Cronbach's Alpha) या गुणकाद्वारे मोजले गेले. Bohrnstedt & Knoke (१९९४) यांच्या मते, क्रॉन्बॅक अल्फा गुणकाचा निकाल ०.७० पेक्षा जास्त असेल तर प्रश्नावली विश्वासार्ह मानली जाते. प्रस्तुत चाचणीचा क्रॉन्बॅक अल्फा ०.७४ आलेला असून चाचणी स्विकारण्याजोगी विश्वसनीय असून तिची अंतर्गत सुसंगती चांगली आहे. प्रस्तुत संशोधन लेखामुळे माध्यमिक स्तरावरील मराठी माध्यमाच्या शाळांतील इयत्ता नववी मधील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी, विज्ञान, गणित व समाजशास्त्र या विषयासाठी बहुविषय शैक्षणिक संपादणूक चाचणी तयार करून तिची विश्वसनीयता व प्रमाणीकरण प्रक्रिया तसेच यांवर आधारीत पथदर्शक अभ्यास करण्यासाठी मदत होते.

मुख्य शब्द : *शैक्षणिक संपादणूक, माध्यमिक विद्यालय, मराठी माध्यम*

प्रस्तावना :

शालेय स्तरावर विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक अत्यंत महत्त्वाची असते. विद्यार्थ्यांच्या जीवन क्षेत्रात पुढे जाण्यासाठी शैक्षणिक संपादणूकीचा आधार घेतला जातो. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती ही त्यांच्या गुणांशी आणि इतर सहशालेय क्रियांशी निगडित असते. वेबस्टर डिक्शनरी नुसार शैक्षणिक संपादणूक म्हणजे "काही तरी साध्य करण्यासाठी केलेली कृती होय". डिक्शनरी ऑफ एज्युकेशन (२००८) नुसार शैक्षणिक संपादणूक हे ज्ञान मोजण्याचे साधन आहे जे औपचारिक शिक्षणाद्वारे साध्य होते जी प्रामुख्याने विद्यार्थ्यांचे गुण, ग्रेड पॉइंट, सरासरी दर्शविते.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
शशिकांत त्र्यंबक निकम , संशोधक, कवयत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

How to cite this article:
निकम, . शशिकांत . त्र्यंबक ., & पाटील, . अर्वित . शिवाजी . (2026). माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी बहुविषय (इंग्रजी, विज्ञान, गणित व समाजशास्त्र) शैक्षणिक संपादणूक चाचणीची निर्मिती. *Journal of Research and Development*, 18(2(*XIV*)), 99–104. https://doi.org/10.5281/zenodo.18797511

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18797511
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

वरील व्याख्येद्वारे असे म्हणता येईल की, शाळा हे ज्ञान ग्रहण करण्याचे प्रमुख माध्यम आहे. शाळेत विद्यार्थ्याला शकविल्या जाणाऱ्या प्रत्येक विषयातील संपादणूक ही शाळेतील विविध लेखी तसेच प्रात्यक्षिक चाचण्याद्वारे वेळोवेळी मोजमापाची तरतूद आहे.
उदा. विद्यार्थ्यांचे प्रगती पुस्तक व निकाल.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणे हे शिक्षणाचे ध्येय असते. (डॉ. जगताप ह. ना., अध्ययनाचे मूल्यनिर्धारण व मूल्यमापन, २०१५, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, पेज नं. ९) हे ध्येय साध्य करीत असतांना शिक्षण प्रक्रियेमध्ये विविध क्रिया घडत असतात. विद्यार्थ्यांची कारक कौशल्ये विकसीत होत असतात. अशा वेळेस आपल्याला विविध उद्दिष्टये व त्यांचे वर्गीकरण माहीत असणे आवश्यक असते.

डॉ. ब्लूम यांनी उद्दिष्टांचे वर्गीकरण श्रेणीबद्ध पद्धतीने मांडले. त्यांच्या मते कोणत्याही मुलाचा विकास हा बोधात्मक (Cognitive), भावात्मक (Affective) आणि क्रियात्मक (Psychomotor) अशा तीन अंगाने होत असतो. या तीनही अंगांचा समतोल विकास म्हणजेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होय.

डॉ. ब्लूम यांच्या उद्दिष्टांचे श्रेणीबद्ध वर्गीकरणाचा अभ्यास केला असता असे निदर्शनास येते की प्रचलित शिक्षण पद्धती व परीक्षा पद्धती या सिद्धांतावर आधारलेली आहे. विद्यार्थ्यांची ज्यावेळेस शैक्षणिक संपादणूक पाहिली जाते, त्यावेळेस विशिष्ट उद्दिष्ट म्हणजेच ज्ञान, आकलन, उपयोजन, कौशल्य यावर आधारित प्रश्नपत्रिकेचे स्वरूप दिसून येते. विद्यार्थी परीक्षेला सामोरे जात असताना विद्यार्थ्याला ज्ञान प्राप्ती किती प्रमाणात झाली, त्याला किती प्रमाणात समजले, त्याचे आकलन किती झाले व त्याने त्या प्राप्त ज्ञानाचे दैनंदिन जीवनात किंवा व्यावहारिक जीवनात किती उपयोग व उपयोजन करू शकतो हे पाहणे म्हणजेच त्या विद्यार्थ्यांची त्या विषयातील संपादणूक होय.

डॉ. ब्लूम यांनी मांडलेले उद्दिष्टांचे श्रेणीबद्ध वर्गीकणानुसार, विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक ही बोधात्मक क्षेत्रावर अवलंबून असते. थोडक्यात डॉ. ब्लूम यांच्या मते संज्ञानात्मक विकासाच्या पातळ्या शैक्षणिक प्रगतीला आकार देतात. प्रस्तुत संशोधन लेखातील विविध विषयांवर आधारीत माध्यमिक स्तरावरील शैक्षणिक संपादणूक चाचणी ही डॉ. बेंजामिन ब्लूम यांच्या उद्दिष्टांचे श्रेणीबद्ध वर्गीकरण या संकल्पनेवर आधारलेली आहे,

गरज व महत्त्व:

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे मोजमाप करण्यासाठी योग्य चाचणी / साधनांची निर्मिती करणे आवश्यक आहे.
विद्यार्थ्यांची विषयानुरूप प्रगती, संकल्पनात्मक आकलन, तर्कशक्ती व सर्जनशीलता जाणून घेण्यासाठी प्रामाणिक, वैध आणि विश्वासार्ह आशा चाचण्या वापरणे हे शैक्षणिक मूल्यमापनाचे महत्त्वाचे अंग आहे.

संशोधन लेखाचे समस्या विधान:

"माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीचे मूल्यमापन करण्यासाठी इंग्रजी, विज्ञान, गणित व समाजशास्त्र या विषयांवर आधारित चाचणीची निर्मिती करणे.

संशोधन लेखाची उद्दिष्ट्ये:

प्रस्तुत संशोधन लेख खालील उद्दिष्टांवर आधारित आहे.
१. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणुकीसाठी बहुविषयक प्रश्नपत्रिका तयार करणे.
२. बहुविषयक प्रश्नांच्या माध्यमातून ज्ञान, समज, अनुप्रयोग व तर्कशक्ती या पातळ्यांवर विद्यार्थ्यांची प्रगती मोजणे.
३. बहुविषयक शैक्षणिक संपादणूक चाचणीची वैधता व विश्वासार्हता तपासणे.

संशोधन लेखाची गृहीतके:

१. शैक्षणिक संपादणूक चाचणीद्वारे माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक परिणामकारकपणे मोजता येते.
२. इंग्रजी, विज्ञान, गणित व समाजशास्त्र या सर्व विषयांचा समावेश विद्यार्थ्यांची एकूण प्रगती मोजण्यासाठी उपयुक्त ठरते.

संकल्पनात्मक व्याख्या

माध्यमिक स्तर-

शालेय शिक्षणाची प्रामुख्याने प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आशा स्तरांमध्ये विभागणी करण्यात येते. यामध्ये इयत्ता ९ वी ते १० वी पर्यंतच्या शालेय शिक्षणाचा जो कालखंड आहे, त्याला माध्यमिक स्तर म्हणतात. (*महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम आराखडा.* (२०१०)).

महाराष्ट्रातील शैक्षणिक पुनर्रचनेनुसार आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ च्या शिफारशी नुसार उच्च प्राथमिक स्तर व उच्च माध्यमिक स्तर यांना जोडणारा दुवा ज्यात इयत्ता ९ वी व १० वी चे वर्ग असणारी शाळा म्हणजे माध्यमिक स्तर होय. (चित्ते, हेमंत. *शैक्षणिक संशोधन मांडणी व दिशा.*)

विद्यार्थी –

कोणतीही गोष्ट शिकत असलेल्या व्यक्तिला विद्यार्थी म्हणतात.

विद्यार्थी म्हणजे शाळा, महाविद्यालय किंवा इतर शैक्षणिक संस्थेत ज्ञान, कौशल्य, मूल्ये व संस्कार आत्मसात करण्यासाठी औपचारिक शिक्षण घेणारा शिकणारा घटक तो .शिक्षण प्रक्रियेतील केंद्रबिंदू असून ज्ञानप्राप्तीबरोबरच व्यक्तिमत्व विकासासाठी विविध

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

शैक्षणिक, सहशालेय व सामाजिक क्रियाकलापांमध्ये सहभागी होतो. (कुलकर्णी. डी. आर. (२००९). प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र. (पृष्ठ क्र. १५२). नागपूर: विद्या प्रकाशन.)

शैक्षणिक संपादणूक –

शैक्षणिक संपादणूक म्हणजे विद्यार्थ्याची त्यांच्या अभ्यासक्रमानुसार शैक्षणिक क्षेत्रात प्राप्त केलेले गुण. कौशल्ये, ज्ञान आणि प्राविण्य होय. हे शिक्षणतील यशाचे द्योतक असून त्यामध्ये परीक्षांचे गुण, प्रकल्प, वर्गातील कामगिरी इ. चा समावेश होतो.
डी. सी. मॅकले लँड आणि जे. डब्लू. आटकीन्सन यांच्या मते, सर्वोत्कृष्ट अशी जी काही असेल ते प्राप्त करून घेण्यासाठी स्पर्धा, धडपड करणे म्हणजे संपादणूक होय. (जोशी बी. आर. (२००८) पृष्ठ क्र. ३)

व्याप्ती व मर्यादा:

व्याप्ती

१. प्रस्तुत संशोधन लेख हा महाराष्ट्रातील मराठी माध्यमाच्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्याशी संलग्नित असलेल्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांशी संबंधित असेल.
२. प्रस्तुत संशोधन लेखाची व्याप्ती ही मराठी माध्यमाच्या इयत्ता नववी व दहावीच्या अभ्यासक्रमाअंतर्गत असलेल्या इंग्रजी, विज्ञान, गणित भाग-१ व भाग-२ तसेच समाजशास्त्र विषयांशी संबंधित असेल.
३. प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक संपादणूकी संबंधित आहे.

मर्यादा:

१. प्रस्तुत अभ्यास हा केवळ माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांपुरता मर्यादित आहे.
२. प्रस्तुत अभ्यास हा केवळ निवडक शाळांपुरता मर्यादित आहे.
३. प्रस्तुत शैक्षणिक चाचणी निर्मितीत केवळ इंग्रजी, विज्ञान, गणित व समाजशास्त्र या चारच विषयांचा समावेश करण्यात आलेला आहे.

संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधन लेखाचा मुख्य उद्देश माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक मोजण्यासाठी चाचणीची निर्मिती करणे हा आहे. प्रस्तुत संशोधन लेखासाठी संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे.

संशोधनाची जनसंख्या:

प्रस्तुत शैक्षणिक संशोधनासाठी जनसंख्या ही नाशिक जिल्ह्यातील मराठी माध्यमाच्या माध्यमिक विद्यालयांची निवड केली आहे.

नमुना:

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने जनसंख्येमधून मराठी माध्यमाच्या ग्रामीण भागातील ०२ व शहरी भागातील ०२ माध्यमिक विद्यालयांची निवड ही असम्भाव्यतेवर आधारित सहेतुक नमुना निवड पद्धतीद्वारे करून ५० विद्यार्थ्यांचा नमुना निवडला आहे.

संशोधनाची साधने:

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने माहिती संकलनासाठी **स्वनिर्मित शैक्षणिक संपादणूक चाचणी** या साधनाचा वापर केला आहे.

चाचणी निर्मितीची प्रक्रिया

टप्पा १: चाचणी साठी आवश्यक आशय निश्चिती

राज्य शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमावर आधारित इंग्रजी, विज्ञान, गणित भाग-१ व गणित भाग-२ आणि समाजशास्त्र या विषयातील घटक निश्चित करण्यात आला. यासाठी प्रत्येक विषयातील महत्त्वपूर्ण आशयाची निवड काळजीपूर्वक करण्यात आली. शैक्षणिक संपादणूक चाचणीची निर्मिती करण्यापूर्वी विविध साध्यता चाचण्यांचा अभ्यास करण्यात आला. चाचणीतील प्रश्नांचा प्रकार व संख्या निश्चित करण्यात आली आणि चाचणीचा आराखडा तयार करण्यात आला.

टप्पा २ : शैक्षणिक संपादणूक चाचणी तयार करणे

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची इंग्रजी, सामान्य विज्ञान व गणित या शालेय विषयातील व सामान्य ज्ञान या विषयातील शैक्षणिक संपादणूक पाहण्यासाठी संशोधकाने स्वनिर्मित १०० गुणांची चाचणी तयार केली. यामध्ये एकूण १६ प्रश्नांचा समावेश होता. या चाचणीचे एकूण चार भाग करण्यात आले.

शैक्षणिक संपादणूक प्रश्नपत्रिका (एकूण गुण १००)

- **इंग्रजी २० गुण : –** गद्य, पद्य, भाषिक अध्ययनावर आधारित प्रश्न.
- **विज्ञान २० गुण : –** संकल्पना, नियम, कारणमीमांसा व गणनात्मक उदाहरणे.
- **गणित ४० गुण : –** बीजगणित, भूमिती, संच व संख्याशास्त्रावरील प्रश्न.
- **समाजशास्त्र २० गुण : –** इतिहास, भूगोल, नागरीशास्त्र व राजकीय शास्त्रावर आधारित प्रश्न.

टप्पा ३ : प्रश्ननिर्मिती

संशोधकाने शैक्षणिक संपादणूक चाचणी निर्मितीसाठी खाली प्रश्न प्रकारांचा विचार केला आहे.

१. वस्तुनिष्ठ प्रश्न
२. लघुउत्तरी प्रश्न

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

३. दीर्घोत्तरी प्रश्न

बहुविषय शैक्षणिक संपादणूक चाचणी तयार करताना खालील मुद्द्यांचा विचार करण्यात आला.

- प्रत्येक प्रश्नाने विषयातील ज्ञान, आकलन, विश्लेषण आणि उपयोजन यांचे मापन केले.
- आशयातील गौण अथवा कमी महत्त्वाच्या बाबी मोजल्या नाहीत.
- प्रत्येक प्रश्नाने एकच उद्दिष्ट तपासले.
- माहिती संक्षिप्त, समजण्यास सुलभ व सरळ भाषेत मांडण्यात आली.
- प्रत्येक घटकावर मूलभूत व्याकरण, विरामचिन्हे आणि शब्दलेखन यांची तपासणी करण्यात आली.

टप्पा ४ : चाचणीचे प्रशासन

सदर स्वनिर्मित चाचणी तज्ञ मार्गदर्शकांकडून तपासून घेतली होती. त्यानंतर ती चाचणी नमुना गटातील ५० विद्यार्थ्यांना देण्यात आली. विद्यार्थ्यांना चाचणी सोडवितांना काही अडचण आली का याबाबत पडताळणी केली. चाचणी सोडवितांना योग्य ते मार्गदर्शन केले. चाचणी भरून घेतल्यानंतर ती तपासण्यात आली.

टप्पा ५ : चाचणीतील घटकांचे विश्लेषण

घटक विश्लेषणामध्ये प्रत्येक घटकाची उपयुक्तता सांख्यिकीय पद्धतीने तपासली जाते. आणि काठिण्य मूल्य (difficulty value) व भेदन क्षमता (discriminative power) यांच्या आधारे चाचणीतील घटक निवडणे किंवा वगळणे ही प्रक्रिया केली जाते. घटक विश्लेषण ही अशा प्रक्रियांची मालिका आहे, जी घटकांची वैधता व अचूकता दर्शविणारे निर्देशांक जाणून घेण्यासाठी वापरली जाते. फ्रान्झन यांच्या मते, घटक विश्लेषण हा अभिजात चाचणी सिद्धांत अंतर्गत चाचणी निर्मितीतील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. कारण त्याच्या साहाय्याने एखादा विशिष्ट घटक चाचणीतून काढून टाकावा, त्यात सुधारणा करावी की तो पुन्हा चाचणीत समाविष्ट करावा याचा निर्णय घेता येतो.

घटक विश्लेषणाची प्रक्रिया

- विद्यार्थ्यांचे गुण उतरत्या क्रमाने लावण्यात आले.
- २७ % निकषानुसार दोन उपगट तयार करण्यात आले.
- उच्च गटात सर्वाधिक गुण मिळविणारे वरचे २७ % विद्यार्थी आणि निम्न गटात सर्वात कमी गुण मिळविणारे खालचे २७% विद्यार्थी यांचा समावेश करण्यात आला.
- दोन्ही गट (उच्च व निम्न) स्वतंत्रपणे ठेवण्यात आले.
- मधले केंद्रस्थ ४६ % उत्तरपत्रिका बाजूला काढण्यात आल्या.
- उच्च गटात एखाद्या विशिष्ट घटकाला योग्य उत्तर देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोजण्यात आली.
- निम्न गटात त्या विशिष्ट घटकाला योग्य उत्तर देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोजण्यात आली.

घटक विश्लेषणासाठी प्रत्येक घटकाचे काठिण्य मूल्य (Difficulty Value – D.V.) आणि भेदन क्षमता (Discriminative Power – D.P.) यांची गणना करणे आवश्यक असते.

काठिण्य मूल्य (Difficulty Value – D.V.)

घटकाची काठिण्यता म्हणजे एखाद्या चाचणी घटकाला योग्य उत्तर देणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण होय. हे प्रमाण जितके जास्त, तितका तो घटक सोपा समजला जातोयामध्ये उलटा संबंध . आढळतो; म्हणजेच घटकाची कठीणता जितकी जास्त, तितका त्याचा निर्देशांक कमी असतो. एखाद्या घटकाची कठीणता ठरविण्यासाठी उच्च व निम्न या दोन्ही गटांमध्ये त्या घटकाला योग्य उत्तर देणाऱ्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या, उच्च व निम्न गटांतील एकूण विद्यार्थ्यांच्या संख्येने भागली जाते.

सूत्र : D.V. = (R.U + R.L) / (N.U + N.L)

R.U = उच्च गटात योग्य उत्तर देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या

R.L = निम्न गटात योग्य उत्तर देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या

N.U = उच्च गटातील विद्यार्थ्यांची संख्या

N.L = निम्न गटातील विद्यार्थ्यांची संख्या

भेदन क्षमता (Discriminative Power – D.P.)

एखाद्या प्रश्नाची हुशार विद्यार्थी व सामान्य विद्यार्थी यांच्यामधील भेद स्पष्ट करण्याची क्षमता म्हणजे भेदन क्षमता होय. भेदन क्षमता (D.P.) काढण्यासाठी खालील सूत्र वापरले जाते.

सूत्र : D.P. = (R.U – R.L) / N.U किंवा (R.U – R.L) / N.L

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

R.U = उच्च गटात योग्य उत्तर देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या

R.L = निम्न गटात योग्य उत्तर देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या

N.U = उच्च गटातील विद्यार्थ्यांची संख्या

N.L = निम्न गटातील विद्यार्थ्यांची संख्या

भेदन मूल्य निर्देशांक किंमत –1.00 ते 1.00 दरम्यान असते.

काठिण्य मूल्य आणि भेदन क्षमता या दोन्ही बाबी परस्परांशी संबंधित आहेत. काठिण्य मूल्य जेवढे अधिक तेवढा भेदन क्षमता सूचकांक कमी असतो.

टप्पा ६ : अंतिम चाचणीची निर्मिती व प्रमाणीकरण

प्रस्तुत चाचणी तयार केल्यानंतर सदर चाचणीबाबत तज्ञ संशोधक व मार्गदर्शक यांच्याशी चर्चा करून त्यांच्या सूचना व मार्गदर्शनातून त्यांनी सुचविलेल्या प्रश्नांबाबत दुरुस्ती करून योग्य ते बदल करण्यात आले. तसेच माध्यमिक शाळेतील या विषयाचे अध्यापन करणाऱ्या तज्ञ व अनुभवी शिक्षकांकडून सदर चाचणी तपासण्यात आली व त्यामध्ये योग्य ते बदल करण्यात आले.

कोष्टक क्र. १ संविधान तक्ता (blue Print)

अ. न.	विषय	ज्ञान	आकलन	उपयोजन	कौशल्य	एकूण
१.	इंग्रजी	०७	०५	०५	०३	२०
२.	विज्ञान	०५	०५	०८	०२	२०
३.	गणित भाग-१	०५	०५	०५	०५	२०
४.	गणित भाग -२	०५	०५	०५	०५	२०
५.	समाजशास्त्र	०७	०५	०५	०३	२०
	एकूण गुण	२९	२५	२८	१८	१००
	टक्केवारी	२९%	२५%	२८%	१८%	१००%

टप्पा ७ : चाचणीची सप्रमाणता व विश्वसनीयता

एखाद्या कसोटी वा चाचणीद्वारे ज्या क्षमतेचे मापन करावयाचे ठरविले आहे त्याच क्षमतेचे मापन अचूकपणे होत असेल तर ती कसोटी वा चाचणी सप्रमाण आहे असे म्हणतात. (भदाणे, एम. ए. व देसले सुनील, (२००८). मापन, मूल्यनिर्धारण व मूल्यमापन, पृष्ठ क्र. ५२ ते ५७.)

प्रस्तुत संशोधनात स्वनिर्मित चाचणीची सप्रमाणता पाहण्यासाठी संशोधकाने माध्यमिक विद्यालयातील इयत्ता नववीच्या ५० विद्यार्थ्यांवर पथदर्शक अभ्यास केला व चाचणीची विश्वसनीयता पडताळून पहिली.

ज्या साधनाने वा कसोटीने विशिष्ट उद्दिष्टाचे मापन केले असता सतत तेच निष्कर्ष येतात, त्या साधनाला किंवा कसोटीला विश्वसनीय आहे असे म्हणता येईल. कसोटीच्या द्वारे कोणीही, केव्हाही, कोठेही, कितीही वेळा मापन केले तरी मापणात फरक पडत नसेल तर त्या मापनाला विश्वसनीय मापन असे म्हणतात. (भदाणे, एम. ए. व देसले सुनील, (२००८). मापन, मूल्यनिर्धारण व मूल्यमापन, पृष्ठ क्र. ५२ ते ५७.) चाचणीची विश्वसनीयता तपासण्यासाठी क्रॉन्बॅक अल्फा गुणांक (Cronbach's Alpha) हे साधन वापरण्यात आले. Cronbach's Alpha हा विश्वसनीयतेचे मापन करण्यासाठी वापरला जाणारा एक सांख्यिकीय गुणांक आहे. तो विशेषतः आंतरिक सुसंगतता तपासण्यासाठी वापरला जातो. म्हणजेच एखाद्या प्रश्नावलीत किंवा स्केलमध्ये दिलेले सर्व प्रश्न ही एकाच संकल्पनेचे किती प्रमाणात मोजमाप करत आहेत? हे दाखवितो. हा गुणांक Lee Cronbach (1951) यांनी विकसित केला.

विश्वसनीयता स्थापित करण्यासाठी विविध पद्धती वापरण्यात येतात. त्यात प्रामुख्याने

१. पुन्हा चाचणी पद्धत (Test-Retest)

२. समतुल्य फॉर्म्स (Equivalent Forms)

३. स्प्लिट हाफ पद्धत (Split-Halves)

४. अंतर्गत सुसंगती पद्धत (Internal Consistency Method)

प्रस्तुत चाचणीची विश्वसनीयता स्थापित करण्यासाठी अंतर्गत सुसंगती पद्धत वापरण्यात आली. कारण ही पद्धत सर्वाधिक वापरली जाते. अंतर्गत सुसंगतीचे प्रमाण 'क्रॉन्बॅक अल्फा' (Cronbach's Alpha) या गुणकाद्वारे मोजले गेले. गुणकाची किंमत ० ते १ या दरम्यान असते. गुणक जितका १ च्या जवळ, तितकी सुसंगती जास्त. (Kerlinger, 1986)

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Bohrnstedt & Knoke (१९९४) यांच्या मते, क्रॉन्बॅक अल्फाचा निकाल ०.७० पेक्षा जास्त असेल तर प्रश्नावली विश्वासार्ह मानली जाते. प्रस्तुत चाचणीचा क्रॉन्बॅक अल्फा ०.७४ आलेला असून चाचणी स्विकारण्याजोगी विश्वसनीय असून तिची अंतर्गत सुसंगती चांगली आहे.

माहिती विश्लेषणाची साधने:

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने माहिती विश्लेषणासाठी क्रॉन्बॅक अल्फा गुणांक, शेकडेवारी व पायचार्ट या संख्याशास्त्रीय परिमाणाचा उपयोग केलेला आहे.

माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन:

कोष्टक क्र. २ बहुविषयातील शैक्षणिक संपादणूक चाचणीची विश्वसनीयता / सप्रमाणता दर्शविणारे कोष्टक

नमुना	क्रॉन्बॅक अल्फा गुणांक	शेरा
५० विद्यार्थी	०.७४	क्रॉन्बॅक अल्फाचा निकाल ०.७० पेक्षा जास्त असून चाचणी विश्वासार्ह आहे.

अर्थनिर्वचन :

१. चाचणीची विश्वसनीयता तपासण्यासाठी क्रॉन्बॅक अल्फा गुणांक (Cronbach's Alpha) हे साधन वापरण्यात आले.

२. बहुविषयक शैक्षणिक संपादणूक चाचणीत आंतरिक सुसंगतता तपासली असता सुसंगत दिसून आली.

३. चाचणीतील समाविष्ट सर्व प्रश्न हे संकल्पनेचे मोजमाप करत आहेत हे क्रॉन्बॅक अल्फा गुणांक दाखवितो.

४. क्रॉन्बॅक अल्फा गुणांका निकाल ०.७० पेक्षा जास्त असून चाचणी विश्वासार्ह आहे.

माहितीच्या आधारे निष्कर्ष:

१. तयार केलेली बहुविषय शैक्षणिक संपादणूक चाचणी माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक मोजण्यासाठी उपयुक्त व विश्वासार्ह आहे.

२. शैक्षणिक संपादणूक चाचणीतील प्रश्न विविध ज्ञानस्तरांना व्यापणारे असल्याने विद्यार्थ्यांची समज, आकलन, उपयोजन व विश्लेषणशक्ती यांचे मूल्यमापन होते.

३. ग्रामीण व शहरी तसेच लिंगानुसार विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणूकीत काही प्रमाणात फरक दिसून आला.

४. चाचणीचा वापर शिक्षकांसाठी अध्यापन परिणामकारकतेचा अंदाज घेण्यासाठी उपयोगी ठरू शकतो.

समारोप:

या संशोधन लेखातून माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी, विज्ञान, गणित व समाजशास्त्र या विषयांतील शैक्षणिक संपादणूक मोजण्यासाठी एक वैध व विश्वसनीय चाचणी विकसित करण्यात आली आहे. ही चाचणी शिक्षक, संशोधक व शैक्षणिक प्रशासक यांना अत्यंत उपयुक्त ठरेल. प्रस्तुत तयार केलेली १०० गुणांची बहुविषय शैक्षणिक संपादणूक चाचणी बहुविषयक मूल्यांकनासाठी उपयुक्त ठरते. याआधारे इतर शैक्षणिक स्तरांवरही भविष्यात अशा प्रकारच्या चाचण्या विकसित करता येऊ शकतात.

संदर्भ:

- पंडित, ब., शिक्षणातील संशोधन, २०१०, नित्यनुतन प्रकाशन, पुणे.
- जगताप ह. ना., अध्ययनाचे मूल्यनिर्धारण व मूल्यमापन, २०१५, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, पेज नं. ९.
- मुळे रा. श. व उमाठे, वि. तु., शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे,१९८८, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, औरंगाबाद.
- डॉ. भोसले र. व डॉ. डोणे उ., शिक्षणातील बदलते विचार प्रवाह, २००९, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
- वेखंडे विलास सीताराम, ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक संपादन व जीवन कौशल्ये यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास, २०१, Pune Research Scholar, ISSN 2455-314X, Volume – 5, Issue – 4)
- मेहेंदळे सुभाष, साधन निर्मितीद्वारे संशोधन, पुष्प पंधरावे,२०१५, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
- खांदेवाले. श्री. श., संशोधनासाठी विविध चाचण्यांचे उपयोजन, पुष्प दहावे, २०१५, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

इंग्रजी संदर्भ सूची

- APA Dictionary of Psychology, Academic Achievement, 2022, APA.
- Blood, D.F. & Budd, W.C., Educational Measurement and Evaluation, 1972, Harper and Row.
- Bloom, B.S., Taxonomy of Educational Objectives, 1956, McKay.
- Nunnally, J.C., Educational Measurement and Evaluation, 1972, McGraw-Hill.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

कृषी पर्यटन विकासाची आवश्यकता आणि महत्व

ए.आर.वसावे
संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग
कै.म.दि.सिसोदे कला,वाणिज्य आणि सो.उषाताई प्रसादराव तनपुरे
विज्ञान महाविद्यालय,नरडाणा ता.शिंदखेडा जि.धुळे

Manuscript ID:
JRD -2026-180224
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 105-108
February 2026

Submitted: 25 Jan. 2026
Revised: 31 Jan. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश (Abstract)

भारतीय समाज हा प्रामुख्याने शेतीप्रधान असून आजही ७०% लोक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कृषी क्षेत्रावर अवलंबून आहेत. राष्ट्रीय उत्पादनात कृषी क्षेत्राचा १८.८% वाटा असला आणि हरितक्रांतीमुळे देश अन्नधान्यात स्वयंपूर्ण झाला असला तरी, निसर्गाच्या लहरीपणामुळे ग्रामीण भागातील शेतकरी आजही आर्थिकदृष्ट्या मागेच आहे. अशा परिस्थितीत ग्रामीण भागाचे जीवनमान सुधारण्यासाठी आणि बेरोजगारी दूर करण्यासाठी 'कृषी पर्यटन' हे एक नवे आणि प्रभावी दालन ठरत आहे. प्रस्तुत शोधनिबंधात कृषी पर्यटनाची आवश्यकता, महत्त्व आणि या व्यवसायातील आव्हानांचा अभ्यास करण्यात आला आहे. कृषी पर्यटन म्हणजे शहरी पर्यटकांना ग्रामीण जीवनशैली, शेतीची कामे आणि निसर्गाचा प्रत्यक्ष अनुभव देणे होय. महाराष्ट्रात २००५ पासून पुणे जिल्ह्यातील बारामती येथून या चळवळीला गती मिळाली असून आज राज्यात ३५४ हून अधिक अधिकृत केंद्रे कार्यरत आहेत. या व्यवसायामुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळते, स्थानिक रोजगाराच्या संधी निर्माण होतात आणि शहरी व ग्रामीण भागातील दरी कमी होण्यास मदत होते. मात्र, पायाभूत सुविधांचा अभाव, भांडवलाची कमतरता आणि सरकारी धोरणातील संदिग्धता यांसारख्या समस्या या क्षेत्रासमोर आहेत. सरकारने या क्षेत्राला आर्थिक सहकार्य आणि पायाभूत सुविधा पुरवल्यास, कृषी पर्यटन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा ठरू शकतो असा निष्कर्ष या अभ्यासातून मांडण्यात आला आहे.

मुख्य शब्द :- *कृषी पर्यटन अर्थ,शेती व्यवसाय,ग्रामीण जीवनव ज्ञान,रोजगार निर्मिती,अडचणी,उपाय*

प्रस्तावना

भारतीय ग्रामीण समाज हा शेतीप्रधान, निसर्गाशी जुळवून घेणारा आणि परंपरेने बांधलेला समाज म्हणून कृषीक्षेत्राकडे पाहिले जाते.भारताला स्वातंत्र्यानंतर आज ७८ वर्ष ओलाडली असली तरी ७०% लोक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे कृषीक्षेत्रावर,अवलबून आहेत.राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेमध्ये कृषीक्षेत्रास महत्वाचे स्थान प्राप्त असून भारताच्या राष्ट्रीय उत्पादनामध्ये कृषीक्षेत्राचा १८.८ % मोलाचा भाग आहे.स्वातंत्र्योत्तर काळात भारतात पंचवार्षिक योजनांचे पर्व सुरू झाले. नियोजनबद्ध विकासाच्या प्रयत्नांमध्ये कृषीक्षेत्रला भरपूर महत्त्व देणे आवश्यकच होते. कृषीवरील योजनेत करण्यात आले.यात हरितक्रांती, भारतातील स्वातंत्र्योत्तर कृषी योजना प्रामुख्याने अन्नधान्य स्वयंपूर्णता, उत्पादकता वाढ, आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यावर केंद्रित आहेत. हरित क्रांती (१९६० चे दशक) योजना, PM-KISAN, PMFBY (पीक विमा), आणि मृदा आरोग्य पत्रिका यांसारख्या प्रमुख उपक्रमांनी शेतीचे आधुनिकीकरण करण्याचा प्रयत्न केले आहे.राज्य सरकार आणि केंद्रसरकार यांच्या कृषी योजना,उपक्रमामुळे शेतीक्षेत्रात आमुलाग्र बदल आणि प्रगती झाली असून आज आपले राज्य,देश अन्नधान्यांमध्ये स्वयंपूर्ण आहोत.गेल्या दोन दशकामध्ये कृषी उत्पादनात हरित क्रांती, श्वेत क्रांती आणि नीळ क्रांतीमुळे उत्पादनात वाढ झाली आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
ए.आर.वसावे , संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग कै.म.दि.सिसोदे कला,वाणिज्य आणि सो.उषाताई प्रसादराव तनपुरे विज्ञान महाविद्यालय,नरडाणा ता.शिंदखेडा जि.धुळे

How to cite this article:
वसावे, . ए . आर . (2026). कृषी पर्यटन विकासाची आवश्यकता आणि महत्व. *Journal of Research and Development,* 18(2(*XIV*)), 105–108. https://doi.org/10.5281/zenodo.18797465

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18797465

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

गहू, तांदूळ या अन्नधान्यांसह, दुग्धजन्य पदार्थ, डाळी, तेलबिया आणि फळ,फुले,भाज्यांच्या उत्पादनात भारत आत्मनिर्भर बनला आहे. सध्या भारत जगातील दुसरा मोठा कृषी उत्पादक देश असून, बासमती तांदूळ व विविध कडधान्ये निर्यातीमध्ये भरीव प्रगती झाल्याचे दिसते. तरीही देशाचा अन्नदाता "शेतकरी राजा "आजही आपल्या जीवनात फारशी प्रगती करू शकला नाही.शिवाय ग्रामीण दारिद्रय कमी करण्यामध्ये अपेक्षे प्रमाणे यश मिळू शकले नाही.अशावेळी ग्रामीण भागाचे जीवनमान सुधारण्यासाठी व बेरोजगारी दूर करण्याकरिता ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारे,ग्रामिण लोकांची जीवनशैलीतील सुधारणा,बदलण्यास उपयुक्त ठरणारे नवे दालन म्हणून कृषी पर्यटनाकडे लक्ष केंद्रित आणि विकास केला पाहिजे.

आपल्या देशातील,विविध राज्यातील सांस्कृतिकदृष्ट्या विविधता,नैसर्गिक सौंदर्य ,ऐतिहासिक वारसा व धार्मिक स्थळे, समुद्र,नैसर्गिक रानमेव्याचे विविध प्रकार यामुळे विदेशी आणि देशांतर्गत या दोन्ही पर्यटकांना आकर्षित करण्याच्या दृष्टीने कृषी पर्यटन विकासाला एक उत्तम संधी उपलब्ध आहेत.त्यादिशेने महाराष्ट्रात कृषी पर्यटनाची संकल्पना प्रामुख्याने २००५ मध्ये पुणे जिल्ह्यातील बारामती येथे पांडुरंग तावरे यांच्या पुढाकाराने सुरू झाली हा उपक्रम ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना पूरक उत्पन्न मिळवून देण्यासाठी सुरू करण्यात आली होती. आज ही सेवा महाराष्ट्रात कोकण,पश्चिम महाराष्ट्र, पुणे, अहमदनगर आणि रायगड परिसरातील मामाचा मळा,अरोज सृष्टी.सागूना बाग आणि मोरची चिंचोली सह देशाच्या अनेक भागात आकार घेताना दिसून येत आहेत.देशात वाढणारे शहरीकरण,बदलणारी जीवनशैली,कुटुंब प्रेमाचा अभाव,जीवनमान सुधारण्यासाठी इत्यादी अनेक कारणामुळे कृषी पर्यटन उद्योग व्यवसायाला राज्यात,देशात उत्तम वातावरण निर्माण झाले आहे.या क्षेत्राचा शाश्वत विकास होण्यासाठी परिणामकारक विपणन व्यवस्था असणे विपणन प्रक्रियेची आवश्यकता आहे.कृषी पर्यटन इतर सेवाप्रमाणे केवळ व्यापारी दृष्टीकोन समोर न ठेवता कृषी पर्यटकांचे समाधन केले पाहिजे.तेव्हाच कृषी पर्यटन विकास आणि व्यवसाय जीवनमान सुधारण्यासाठी फलदायी ठरेल. कृषी पर्यटन म्हणजे शेतकऱ्यांनी शहर पर्यटकांना प्रत्यक्ष आपल्या शेतावर नेऊन ग्रामीण जीवनशैली, शेतीची कामे, स्थानिक संस्कृती आणि निसर्गाचा अनुभव नैसर्गिक रित्या आनंद व ज्ञान देणारी व्यवहार्य कृती करणे होय.

अभ्यासाची उद्दिष्टे :-

कृषी पर्यटन देशाच्या ग्रामीण कृषी विकासाकरिता मोलाचा विचार केला जाऊ शकतो. ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, बेरोजगारांना रोजगारी तसेच आर्थिक व सामाजिक विकास घडून येऊ शकतो आणि शहरी पर्यटकांना शेती व ग्रामीण संस्कृतीची ओळख करून देणे या दृष्टीने संशोधनाचे महत्व आहे.

१.कृषी पर्यटन व्यवसायाचे महत्व समजून घेणे.
२.कृषी पर्यटन विकासाच्या अडचणी विषयी माहिती घेणे.
३.कृषी पर्यटन व्यवसायाच्या संधीविषयी माहिती घेणे.
४.ग्रामीण भागातील शेतीपूरक व्यवसायांविषयी माहिती जाणून घेणे.
५.कृषी पर्यटन विकासासाठी परिणामकारक आवश्यक त्या शिफारशी करणे.

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत शोध निबंध दुय्यम माहिती संकलनावर आधारित आहे.काही प्रमाणात उत्तम शेती करणारा शेतकरी मुलाखती,कृषी पर्यटक कृषी पर्यटन तज्ञ,कृषी पर्यटन केंद्राचे संचलक आणि या क्षेत्रताल्या अनुभवी व्यक्ती, प्रत्यक्ष निरीक्षण याच्याशी अनोपचारिक संपर्क संवाद साधून माहितीचे संकलन करण्यात आले आहे.प्रस्तुत शोध निबंधात विशेषता: पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, नाशिक कोकण आणि सांगली जिल्ह्यांत अनेक उत्तम कृषी पर्यटन व्यासायाच्या संधी आणि त्यांचा गतीने होणारा विकास या दृष्टीने निरीक्षण करण्यात येऊन विकासासाठी आवश्यक शिफारशी करण्याचे प्रयत्न संशोधकाने केला आहे.

कृषी पर्यटनाचे महत्व उपयुक्तता :-

कृषी पर्यटन ग्रामीण विकासाचा एक मार्ग म्हणून पाहिले पाहिजे. पर्यटकांना आकर्षित करून, ते शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण करते, ज्यामुळे त्यांना त्यांच्या उत्पन्नात विविधता आणता येते आणि त्यांच्या उपजीविकेला आधार मिळतो. याव्यतिरिक्त, शेतीमध्ये राहिल्याने स्थानिक समुदायांमध्ये रोजगाराच्या संधी निर्माण होतात, ज्यामुळे आर्थिक वाढ आणि सामाजिक कल्याणाला चालना मिळते.म्हणून कृषी पर्यटन ग्रामीण क्षेत्राकडे आर्थिक विकासाची संधी म्हणून पाहिले पाहिजे. कृषी पर्यटन म्हणजे ग्रामीण संस्कृती आणि शेतीचा अनुभव घेणारा प्रवास, जिथे पर्यटक थेट शेतकऱ्यांकडून उत्पादने खरेदी करतात आणि शेतीकामात सहभागी होतात. अमेरिका, इटली, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, थायलंड, तैवान आणि भारत इत्यादी देशात कृषी पर्यटन व्यवसाय मोठ्याप्रमाणावर सुरु आहे.

भारतातील प्रेक्षणीय ठिकाणे विविधतापूर्ण असून ऐतिहासिक स्मारके, नैसर्गिक सौंदर्य, थंड हवेची ठिकाणे आणि धार्मिक स्थळांनी नटलेली आहेत. ताजमहाल आग्रा, लडाख, केरळचे बॅकवॉटर्स, राजस्थानचे किल्ले, गोवा बीच, आणि महाराष्ट्रातील अजिंठा-वेरूळ लेणी,ज्योतिबा,जेजुरी,पंढरपूर,तुळजापूर,अक्कलकोट,शिर्डी,नाशिक अनेक किल्ले,ही भारतातील प्रमुख पर्यटन आकर्षक स्थळे

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

आहेत.त्यामुळे अशा परीसराबरोबरच मोठ्या शहराच्या आसपास कृषी पर्यटन व्यवसायाच्या विकासाला अतिशय चांगला वाव आहेत.प्रेक्षणीय आणि ऐतिहासिक स्थळे ही सातत्याने हजारो देश विदेशातील पर्यटकांनी गजबजलेली असतात.अनेक ठिकाणी बगीचे,वाटर पार्कसं अतिशय सुंदर विकसित केले आहेत.अशाठिकाणी अनेक पर्यटकांना थाबावे वाटते परंतु महागाई,गर्दी.कृतिमता इत्यादी अनेक कारणामुळे आपली इच्छा असूनही थांबु शकत नाही.त्याचप्रमाणे वाढते शहरीकरण,ओद्योगीकण,धावपळ,ताणतणाव यापासून मुक्ती मिळवण्यासाठी शहरातील अनेक शहरी कुटुंब कुटुंबासमवेत मोकळ्या नैसर्गिग पर्यटन व इतिहासिक स्थळांना, नैसर्गिग शेती ठिकाणी राहण्याचा मार्ग निवडतात.यामुळे अशा ठिकाणी ग्रामीण पर्यटन विकास करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे महत्वाचे ठरेल. महाराष्ट्रात कृषी पर्यटन चळवळ वेगाने विस्तारत असून, हा ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारा एक महत्त्वाचा उद्योग बनला आहे.

भारताला स्वातंत्र्यानंतर आज ७८ वर्ष ओलाडली असली तरी शेती व्यवसाय निसर्ग लहरीवर अवलंबून आहे.निसर्ग लहरी संकटामुळे शेतकरी उत्पादन करून देखील शेतकरी सुखी व समृद्ध होऊ शकला नाही.त्यामळे शेतक-याचे दारिद्र्य निर्मलन करण्यात अपयशी ठरलो आहोत.अशा प्रसंगी शाश्वत शेतीच्या दृष्टीने शेतक-यासाठी कृषी पर्यटन क्षेत्र उपयुक्त ठरणार आहे.यामळे ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी चालून येतील.शिवाय त्या परिसरातील शेतक-याच्या कृषी मालास चांगला भाव व बाजारपेठ निर्माण होईल.उत्तम पोषणयुक्त असलेल्या भाज्य,फोळे,पालेभज्या,रानभाज्य,नैसर्गिक कडधान्ये,इत्यादी अनेक वस्तू कृषी पर्यटकाच उपलब्ध होईल.परिणामतः शेतक-याची आर्थिक प्रगती आणि रोजगार उपलब्ध होतील. महाराष्ट्रात कृषी पर्यटन चळवळ वेगाने विस्तारत असून, हा ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारा एक महत्त्वाचा उद्योग बनला आहे.

कृषी पर्यटनाचे महत्व :-

१.कृषी पर्यटनातून कृषी क्षेत्राचा आर्थिक विकास :- कृषी पर्यटन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट करणारे एक महत्त्वाचे क्षेत्र म्हणून पाहिले पाहिजे.शेतीपूरक व्यवसाय, अतिरिक्त उत्पन्न आणि रोजगार निर्मितीद्वारे शेतकरी व ग्रामीण समुदायाचा आर्थिक विकास केला पाहिजे.शेतावर पर्यटकांना आकर्षित करून प्रत्यक्ष अनुभव देण्यामुळे शेतीमालाची थेट विक्री केली पाहिजे. ज्यामुळे उत्पादकांना अधिक नफा मिळतो आणि ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी होते महाराष्ट्र हे कृषी पर्यटनात अग्रेसर राज्य असून, इथे शेतीला व्यवसायाची जोड देऊन शेतक-यांचे जीवनमान उंचावण्याचे प्रयत्न यशस्वीपणे केला पाहिले.

२.कृषी पर्यटनातून रोजगाराच्या संधी :- भारतीय शेती निसर्गावर अवलंबून आणि शेतीची निराशजनक स्थिती पाहता शेतीला जर शेतीला कृषी पर्यटन या व्यवसायाची जोड दिल्यास ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उलब्ध होतील. कृषी पर्यटन हा ग्रामीण भागात अतिरिक्त उत्पन्न आणि रोजगाराच्या संधी निर्माण करणारा एक उत्तम पर्याय मिळू शकतो. शेतीपूरक व्यवसाय, निवास व्यवस्था, अस्सल ग्रामीण जेवण, आणि स्थानिक कला-संस्कृतीच्या माध्यमातून हे क्षेत्र ग्रामीण नवयुवक, महिला व बचत गटांना रोजगार, बाजारपेठ मिळवून दिली पाहिजे.

३.ग्रामीण मुलभूत सुविधामध्ये वाढ :- कृषी पर्यटनामुळे ग्रामीण भागातील निवासाच्या आणि मनोरंजनाच्या मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करता येतील. कृषी पर्यटनामुळे ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचा रस्ते, वीज, पाणी यांचा विकास होऊन स्थानिक रोजगार निर्मितीसह शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ होईल.पर्यटकांच्या सोयीसाठी ग्रामीण भागात राहण्याची सोय, स्वच्छता आणि सुरक्षितता वाढल्यामुळे पर्यटनाला चालना मिळून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी होण्यास मदत होईल.

४.कृषी पर्यटन आणि शैक्षणिक मूल्य :- कृषी पर्यटन हे शिक्षण आणि मनोरंजनाचा एक उत्तम मिलाफ आहे, जो शहरी आणि ग्रामीण भागांमधील दरी कमी करणारा दुवा ठरू शकतो. कृषी पर्यटन ही ग्रामीण जीवन, शेती आणि निसर्गाचा अनुभव देणारी संकल्पना आहे, जी पर्यटकांना शेतीकामात सहभागी करून घेते, ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करते आणि शाश्वत विकासाला चालना देऊ शकते.

५.मनोरंजनातून ग्रामीण संस्कृतीची ओळख :- कृषी पर्यटन हे मनोरंजन, शिक्षण आणि ग्रामीण संस्कृतीचा संगम आहे, जे शहरी लोकांना शेती आणि ग्रामजीवनाचा अनुभव देण्यास मदत करते. कृषी पर्यटन केंद्रांवर सहल, मुक्काम आणि मनोरंजनातून गाणी, लोकनृत्य शहराच्या धावपळीपासून दूर शांत, प्रदूषणमुक्त वातावरणात आनंद मिळवण्यास मदत करते. महाराष्ट्रात कृषी पर्यटन केंद्रे शेतीला एक चांगला पूरक व्यवसाय म्हणून पाहिले पाहिजे.

६.ग्रामीण खेळ व निसर्गाचा अनुभव :- कृषी पर्यटन हे ग्रामीण जीवन, संस्कृती आणि निसर्गाचा प्रत्यक्ष अनुभव देणारा उत्तम मार्ग आहे. यामध्ये शेतीची कामे, बैलगाडी सफर, ग्रामीण खेळ, गावरान जेवण आणि निसर्ग भ्रमंती यांसारख्या उपक्रमांद्वारे पर्यटकांना शहराच्या धावपळीतून शांतता व ग्रामीण जीवनशैलीचा थरारक अनुभव मिळण्यास मदत करते.

७.ग्रामीण खाद्य संस्कृतीची ओळख :-

कृषी पर्यटन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट करणारे एक महत्त्वाचे क्षेत्र म्हणून पाहिले पाहिजे.शेतीपूरक व्यवसाय, अतिरिक्त उत्पन्न आणि रोजगार निर्मितीद्वारे शेतकरी व ग्रामीण समुदायाचा आर्थिक विकास केला पाहिजे.शेतावर पर्यटकांना आकर्षित करून प्रत्यक्ष

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

अनुभव देण्यामुळे शेतीमालाची थेट विक्री केली पाहिजे. ज्यामुळे उत्पादकांना अधिक नफा मिळतो आणि ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी होते महाराष्ट्र हे कृषी पर्यटनात अग्रेसर राज्य असून, इथे शेतीला व्यवसायाची जोड देऊन शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याचे प्रयत्न यशस्वीपणे केला पाहिले.

कृषी पर्यटन व्यवसायासमोरील समस्या :-

कृषी पर्यटन व्यवसायाला सध्या पर्यटकांचा चांगला प्रतिसाद मिळत असला, तरी कृषी पर्यटना समोर अनेक समस्या आव्हाने आहेत.त्यात पायाभूत सुविधांचा अभाव रस्ते,वीज,पाणी प्रभावी बाजारपेठाची कमी,प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता.नेसर्गिक हवामान बदल यामुळे होणारे नुकसान या प्रमुख समस्या भेडसावत आहेत याशिवाय, सरकारी धोरणांमधील संदिग्धता आणि योग्य मार्गदर्शनाचा अभाव हे मोठे अडथळे आहेत. कृषी पर्यटन व्यवसायाला चालना मिळत असली तरी, पायाभूत सुविधांचा अभाव, मार्केटिंगमधील कमतरता, अपुरे भांडवल, हंगामी स्वरूप, आणि पर्यटकांच्या सुरक्षेशी संबंधित जोखीम या मुख्य समस्या आहेत, यासोबतच, आधुनिक सुविधा पुरवण्यातील अडचणी आणि अपुरे प्रशिक्षण यांमुळे शेतकऱ्यांना हा व्यवसाय करताना आव्हानांना सामोरे जावे लागते.ग्रामीण भागात रस्ते, वीज, पाणी आणि इंटरनेटची योग्य व्यवस्था नसते. पर्यटकांना चांगली सुविधा देण्यासाठी लागणाऱ्या निधीची कमतरता आणि कर्ज मिळण्यात अडचणी या समस्यांमुळे अनेकदा शेतकऱ्यांना ग्रामीण पर्यटनात टिकून राहणे कठीण जात आहेत.

आज महाराष्ट्रात कृषी पर्यटन धोरण लागू झाल्यापासून ३५४ पेक्षा जास्त अधिकृत कृषी पर्यटन केंद्रे सुरू झाली आहेत, त्यापैकी सर्वाधिक १४३ केंद्रे पुणे जिल्ह्यात आहेत. ग्रामीण भागात पर्यटनाला चालना देण्यासाठी हे एक मोठे व्यावसायिक क्षेत्र बनले आहे, जिथे पर्यटक सेंद्रिय शेती, ग्रामीण संस्कृती आणि ताज्या कृषी उत्पादनांचा आनंद घेऊ शकतील.

निष्कर्ष :-

कृषी पर्यटन हा ग्रामीण जीवनशैली आणि पर्यटनाचा एक शाश्वत संगम आहे, जो शेतकऱ्यांना उत्पन्नाचा अतिरिक्त उत्पन्न मिळवून देतो आणि शहराच्या धकाधकीपासून दूर निसर्गाच्या सानिध्यात निवांतपणा देत असतो. हा एक महत्त्वाचा ग्रामीण आर्थिक घटक असून, ग्रामीण संस्कृती, पारंपरिक खाद्यपदार्थ आणि शेतीची ओळख नवीन पिढीला करून देण्यास मदत करतो.आर्थिक विकास आणि रोजगार निर्मितीची क्षमता आहे.कृषी पर्यटनाला चालना देण्यासाठी सरकारची भूमिका महत्वाची आहे.मुलभूत सुविधेसाठी गुंतवणूक महत्वाची आहे.

कृषी पर्यटन म्हणजे शेती, संस्कृती आणि निसर्ग यांचा एकत्रित अनुभव असून, ते शेतकऱ्यांच्या उज्वल भविष्यासाठी एक आश्वासक पाऊल आहे. शेवटी, कृषी पर्यटन स्थळे विविध प्रकारच्या कृषी उपक्रमांची ऑफर देतात ज्यामुळे अभ्यागतांना ग्रामीण भागातील सौंदर्य अनुभवता येते, शाश्वत शेती, प्राणी कल्याण आणि पर्यावरणाबद्दल जाणून घेता येते.

महत्वाच्या शिफारीशी :

१.कृषी पर्यटनासाठी पायाभूत सुविधेसाठी सरकारने शासकीय धोरण निश्चित करावे.
२.कृषी पर्यटन केंद्रासाठी योग्य जागा निवडावी.
३.कृषी पर्यटन ठिकाणी आवश्यक सुविधा व सुरक्षितता जपावी.
४.स्थानिक लोकांचा कृषी पर्यटनात सहभाग करावा.
५.कृषी पर्यटनातून पर्यावरण पूरक विकासाला चालना द्यावी.
६.कृषी पर्यटन ठिकाणी दळणवळण व इंटरनेट सुविधा पुरवाव्या.
७.कृषी पर्यटन विकासाठी सरकारने आर्थिक सहकार्य करावे.

कृषी पर्यटनातून एक शाश्वत विकास आणि भवितव्य ग्रामीण शेतकऱ्यासाठी वरदान आहे.पर्यटकांसाठी ग्रामीण जीवन संस्कृती,कला आणि निसर्ग,ऐतिहासिक स्थळाचे शिवाय एकूणच ग्रामीण जीवनाविषयी माहिती मिळते.शहरात आणि गावात एक उत्तम समवाय साधला जातो.त्यामुळे कृषी पर्यटन ग्रामीण कृषी उत्पनाची एक नवी दिशा आहे.असे मानायला हरकत नाही.

संदर्भ :

१.पर्यटन भूगोल – शिंदे डॉ.एस.बी.फडके प्रकाशन,कोल्हापूर
२.डॉ.घारपुरे विठ्ठल (२००१) पर्यटन भूगोल,पिपाळापूरे अंड कंपनी पब्लिकेशन,नागपूर
३.कृषी पर्यटन,चन्द्रशेखर भडसावले,२००७
४.कृषी पर्यटनाची आवश्यकता,प्रभाकर काटेकर,२००७
५.प्रा.अ.वि.भागवत (१९९८) पर्यटन भूगोल,अश्वमेघ प्रकाशन, पुणे
६.प्रकाश सावंत: भारताचा भूगोल,फडके प्रकाशन,कोल्हापूर
७.डॉ.घारपुरे,विठ्ठल मानवी भूगोल
७.www.agritourism.in
8.www.agritourismaustralia.com
9.Maharashtra Krishi Paryatan vistr yogana 2008

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

एक देश, एक निवडणूक" ची विकसित भारत @2047 साठी भूमिका

डॉ अरुण पांडुरंग वनारसे
राज्यशास्त्र विभाग
लोकनेते व्यंकटराव हिरे स्वायत्त महाविद्यालय पंचवटी,नाशिक

Manuscript ID:
JRD -2026-180225
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 109-117
February 2026
Submitted: 25 Jan. 2026
Revised: 31 Jan. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश (Abstract)

हा अभ्यास "एक देश, एक निवडणूक" (ONOE) या निवडणूक सुधारणेचे भारताच्या २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याच्या महत्त्वाकांक्षी लक्ष्यासोबतचे परस्परसंबंध विश्लेषित करतो. भारतात १९५१ ते १९६७ या काळात लोकसभा आणि विधानसभांच्या एकसंध निवडणुका यशस्वीरित्या घेतल्या गेल्या. १९६८-६९ नंतर अकाली विघटनांमुळे ही पद्धत भंग पडली. २०२३ मध्ये रामनाथ कोविंद समितीची स्थापना आणि २०२४ मध्ये संसदेत घटनादुरुस्ती विधेयक मांडणे या पुनर्स्थापनेच्या महत्त्वाच्या टप्पे आहेत. " एक देश, एक निवडणूक" ची आहे (१) घटनात्मक पाया (कलम ८३, ८५, १७२, १७४ मध्ये दुरुस्त्या), (२) लोकसभा-विधानसभा समक्रमण, (३) स्थानिक स्वराज्य संस्था एकत्रीकरण, आणि (४) प्रशासकीय-तार्किक तयारी. या चार टप्प्यांमध्ये अंमलबजावणीची शिफारस करण्यात आली" एक देश, एक निवडणूक" चा विकसित भारत २०४७ शी संबंध आहे एकत्रित निवडणुकांमुळे GDP मध्ये १.५% अतिरिक्त वाढ अपेक्षित आहे, जी ३०-४० ट्रिलियन डॉलर्सच्या अर्थव्यवस्थेच्या लक्ष्यासाठी महत्त्वाची आहे. यामुळे आदर्श आचारसंहितेचे व्यत्यय वर्षातून २-३ महिन्यांपुरते मर्यादित राहतील, धोरण सातत्य सुधारेल, पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती मिळेल आणि निवडणूक खर्चाची बचत विकासासाठी उपलब्ध होईल. " एक देश, एक निवडणूक" मुळे शासन स्थिरता, दीर्घकालीन धोरण निर्मिती, गुंतवणुकीला प्रोत्साहन, केंद्र-राज्य समन्वय, शिक्षण-आरोग्य सेवांमध्ये सातत्य, आणि सामाजिक विकासाला चालना. असे काही फायदे सुद्धा होणार आहेत सद्यस्थितीत ३९ सदस्यीय संयुक्त संसदीय समिती (JPC) या प्रस्तावाचे परीक्षण करत आहे. घटनात्मक दुरुस्त्यांसाठी विशेष बहुमत आणि राज्यांची संमती आवश्यक असल्याने ही प्रक्रिया आव्हानात्मक आहे.

प्रस्तावना

भारताने स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षी, म्हणजे २०४७ पर्यंत विकसित राष्ट्राच्या स्थितीत पोहोचण्याचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य ठेवले आहे. या दृष्टीकोनाच्या प्राप्तीसाठी विविध सुधारणा आणि धोरणात्मक उपक्रमांची आवश्यकता आहे, ज्यामध्ये निवडणूक प्रक्रियेतील सुधारणा महत्त्वाची भूमिका बजावतात. "एक देश, एक निवडणूक" (ONOE) ही संकल्पना भारताच्या निवडणूक चक्राला समक्रमित करून शासन व्यवस्थेत स्थिरता आणि आर्थिक विकासाला चालना देण्याचा प्रयत्न करते. 'वन नेशन, वन इलेक्शन' (One Nation, One Election - ONOE) ही संकल्पना भारतीय राजकीय चर्चेचा एक महत्त्वाचा आणि वादग्रस्त विषय बनली आहे. या कल्पनेनुसार देशातील लोकसभा, राज्यांच्या विधानसभा आणि कालांतराने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्यात याव्यात. भारत सरकारने 2024 मध्ये संसदेत या प्रस्तावासाठी विधेयक मांडले आहे, ज्यामुळे याबाबत देशव्यापी चर्चा सुरू झाली आहे. भारताने स्वातंत्र्यानंतर 1951 ते 1967 या काळात एकसाथ निवडणुका घेण्याची प्रथा यशस्वीरित्या पाळली होती.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ अरुण पांडुरंग वनारसे , राज्यशास्त्र विभाग लोकनेते व्यंकटराव हिरे स्वायत्त महाविद्यालय पंचवटी,नाशिक

How to cite this article:
वनारसे, . अरुण . पांडुरंग . (2026). एक देश, एक निवडणूक" ची विकसित भारत @2047 साठी भूमिका. *Journal of Research and Development,* 18(2(*XIV*)), 109–117. https://doi.org/10.5281/zenodo.18797582

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18797582

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

1951-52, 1957, 1962 आणि 1967 या वर्षी लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी झाल्या. या काळात भारतीय लोकशाही या एकत्रित निवडणूक पद्धतीने सुरळीतपणे चालू होती. 1960 च्या दशकाच्या उत्तरार्धात काही राज्यांच्या विधानसभा आणि लोकसभेचे अकाली विघटन झाल्यामुळे ही एकसंध निवडणूक पद्धती भंग पडली. 1968-69 नंतर काही राज्यांच्या विधानसभांचे अकाली विघटन झाले आणि त्यानंतर 1970 मध्ये लोकसभा देखील वेळेआधी विसर्जित झाली. यानंतर भारतात वेगवेगळ्या वेळी निवडणुका घेण्याची परंपरा सुरू झाली , जी आजपर्यंत चालू आहे. विधी आयोगाने (Law Commission) आपल्या 170 व्या अहवालात (1999) या एकसंध निवडणूक पद्धतीवर पुनर्विचार करण्याची शिफारस केली. यानंतर 2015 मध्ये NITI Aayog ने या विषयावर एक अभ्यास पत्र प्रकाशित केले. 2018 मध्ये विधी आयोगाने पुन्हा या विषयावर एक मसुदा तयार केला. 2023 मध्ये माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली, ज्याने एकसंध निवडणुकांच्या व्यवहार्यतेचा अभ्यास केला

वन नेशन, वन इलेक्शन संकल्पना आणि व्याप्ती

वन नेशन, वन इलेक्शन (One Nation, One Election या संकल्पनेचा अर्थ आहे भारतातील लोकसभा, सर्व राज्य विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना एकाच वेळेस घेणे. यामध्ये निवडणूक चक्र आणि वेगवेगळ्यावेळी घेण्यात येणाऱ्या निवडणुकांना समक्रमित करून निवडणुक वेळ आणि निवडणुक खर्च वाचवण्यासाठी तसेच राजकीय स्थैर्य वाढवण्यासाठी प्रस्तावित केलेले आहे.

सार्वजनिक निवडणुका एकत्रितपणे (General simultaneous elections): भारतातील लोकसभा आणि सर्व राज्य विधानसभांच्या निवडणुकांना एकाच वेळी घेणे.

स्थानिक स्वराज्य निवडणुका: पुढच्या टप्प्यात पंचायत आणि नगरपालिकांच्या निवडणुकाही एकाच वेळी घेण्याचा **वन नेशन, वन इलेक्शन चा प्रस्ताव**

संपूर्ण देशात एकाच वेळी (Nationwide simultaneity): प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांतील विधानसभांची व लोकसभेची निवडणूक एकाच दिवशी होईल.

निवडणूक चक्र समक्रमित करणे (Synchronization of electoral cycles): विविध प्रदेशांतील मतदान कालावधी वेगळे असल्यामुळे ते एकसंध करण्याची प्रक्रिया.

वन नेशन, वन इलेक्शन प्रस्तावाची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी प्रक्रिया

'वन नेशन, वन इलेक्शन' (ONOE) च्या प्रक्रियेत कायदेशीर, प्रशासकीय आणि राजकीय स्तरावर अनेक महत्त्वपूर्ण बदल करावे लागतील.

पहिला टप्पा: कायदेशीर आणि घटनात्मक पाया घालणे

ही प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी, एक मजबूत कायदेशीर चौकट तयार करणे आवश्यक आहे. हा पहिला आणि सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे.

१. घटनादुरुस्ती

'वन नेशन, वन इलेक्शन' सध्याच्या घटनात्मक चौकटीत बसत नाही, कारण लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभा यांचे कार्यकाळ वेगवेगळे आहेत आणि ते स्वतंत्रपणे विसर्जित होऊ शकतात. त्यामुळे, संविधानात काही महत्त्वाच्या दुरुस्त्या करणे आवश्यक आहे:

कलम ८३ आणि १७२ मध्ये दुरुस्ती: कलम ८३ लोकसभेच्या आणि कलम १७२ राज्यांच्या विधानसभांच्या पाच वर्षांच्या कार्यकाळाशी संबंधित आहे. या कलमांमध्ये दुरुस्ती करून लोकसभा आणि विधानसभांचा कार्यकाळ एकाच वेळी सुरू आणि समाप्त होईल, अशी तरतूद करावी लागेल.

कलम ८५ आणि १७४ मध्ये दुरुस्ती: ही कलमे अनुक्रमे राष्ट्रपतींना लोकसभा आणि राज्यपालांना विधानसभा विसर्जित करण्याचे अधिकार देतात. या अधिकारांवर मर्यादा आणून, केवळ विशिष्ट परिस्थितीतच (उदा. सरकार पडल्यास) सभागृह विसर्जित करता येईल, अशी तरतूद करावी लागेल.

एक नवीन 'सामायिक निवडणूक चक्र' कलम: संविधानात एक नवीन कलम जोडून 'सामायिक निवडणूक चक्राची' (Common Electoral Cycle) व्याख्या करावी लागेल, जेणेकरून भविष्यात हे चक्र बिघडणार नाही

मध्यावधी सरकारांसाठी तरतूद: जर एखादे सरकार (राज्य किंवा केंद्र) आपला कार्यकाळ पूर्ण करण्यापूर्वी कोसळले, तर नवीन सरकार केवळ मूळ सभागृहाच्या 'उर्वरित कालावधीसाठीच' सत्तेत राहील, अशी घटनात्मक तरतूद करणे आवश्यक आहे. यामुळे पाच वर्षांचे सामायिक चक्र कायम राहील.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

रचनात्मक अविश्वास ठराव (Constructive Vote of No-Confidence): सरकारवर अविश्वास ठराव आणतानाच पर्यायी सरकार कोण स्थापन करणार आहे, याचाही प्रस्ताव देणे बंधनकारक करणारी घटनादुरुस्ती सुचवण्यात आली आहे. यामुळे अनावश्यक राजकीय अस्थिरता टाळता येईल.

या सर्व घटनादुरुस्त्यांना संसदेच्या दोन्ही सभागृहात दोन-तृतीयांश विशेष बहुमताने आणि देशातील किमान ५०% राज्यांच्या विधानसभांच्या मंजुरीने संमत करावे लागेल.

दुसरा टप्पा: लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांचे सिंक्रोनाइझेशन

एकदा घटनात्मक चौकट तयार झाल्यावर, प्रत्यक्ष अंमलबजावणीचा दुसरा टप्पा सुरू होईल. यात देशातील सर्व विधानसभांच्या निवडणुका लोकसभेच्या निवडणुकीसोबत घेण्यासाठी एक संक्रमणकालीन योजना (Transition Plan) आखली जाईल.

१. विधानसभांची गटवारी करणे

या योजनेअंतर्गत, देशातील सर्व विधानसभांची त्यांच्या सध्याच्या निवडणूक वेळापत्रकानुसार गटवारी केली जाईल:

गट १: ज्या राज्यांच्या विधानसभा निवडणुका आगामी लोकसभा निवडणुकीच्या आसपास (उदा. सहा महिने आधी किंवा नंतर) होणार आहेत.

गट २: ज्या राज्यांच्या विधानसभा निवडणुका लोकसभा निवडणुकीनंतर साधारणतः एक ते दीड वर्षाने येतात.

गट ३: ज्या राज्यांच्या विधानसभा निवडणुका लोकसभा निवडणुकीनंतर साधारणतः अडीच ते तीन वर्षांनी येतात.

२. कार्यकाळाचे समायोजन (Synchronization)

या गटवारीनुसार, प्रत्येक गटातील विधानसभांचा कार्यकाळ लोकसभा निवडणुकीशी जुळवण्यासाठी कमी किंवा जास्त केला जाईल

गट १ साठी: या राज्यांच्या विधानसभांचा कार्यकाळ काही महिन्यांनी वाढवून किंवा कमी करून त्यांच्या निवडणुका थेट लोकसभेसोबत घेतल्या जातील. यासाठी राज्यांची संमती मिळवणे तुलनेने सोपे असेल.

गट २ आणि ३ साठी: या राज्यांच्या विधानसभांचा कार्यकाळ लक्षणीयरीत्या कमी करावा लागेल किंवा काही प्रकरणांमध्ये वाढवावा लागेल. उदाहरणार्थ, जर २०२९ मध्ये लोकसभा निवडणूक होणार असेल आणि एखाद्या राज्याची निवडणूक २०३१ मध्ये नियोजित असेल, तर त्या राज्याच्या विधानसभेचा कार्यकाळ दोन वर्षांनी कमी करून २०२९ मध्येच निवडणुका घ्याव्या लागतील. हा या प्रक्रियेतील सर्वात वादग्रस्त आणि राजकीयदृष्ट्या संवेदनशील भाग आहे.

या समायोजनासाठी राष्ट्रपतींच्या अधिसूचनेद्वारे एक 'निश्चित तारीख' (Appointed Date) जाहीर केली जाईल, ज्या दिवसापासून सर्व नवीन लोकसभा आणि विधानसभांचा पाच वर्षांचा सामायिक कार्यकाळ सुरू होईल.

तिसरा टप्पा: स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे एकत्रीकरण

पहिल्या टप्प्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका यशस्वीपणे एकाच वेळी घेतल्यानंतर, तिसऱ्या टप्प्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (नगरपालिका आणि पंचायती) निवडणुका या मोठ्या निवडणूक चक्राशी जोडल्या जातील.

१. राज्य कायद्यांमध्ये बदल

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेणे हे राज्य निवडणूक आयोगाच्या अखत्यारीत येते आणि ते राज्यांच्या कायद्यानुसार चालते. त्यामुळे, 'वन नेशन, वन इलेक्शन' अंतर्गत या निवडणुका आणण्यासाठी सर्व राज्यांना आपापल्या नगरपालिका आणि पंचायती राज कायद्यांमध्ये बदल करावे लागतील.

२. एकाच मतदार यादीचा वापर

सध्या लोकसभा/विधानसभा निवडणुकांसाठी भारतीय निवडणूक आयोग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोग वेगवेगळ्या मतदार याद्या वापरतात. या प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी, संपूर्ण देशासाठी एकच मतदार यादी (Common Electoral Roll) तयार करण्याची शिफारस करण्यात आली आहे. यासाठी संविधानाच्या कलम २४३K आणि २४३ZA मध्ये दुरुस्ती करून राज्य निवडणूक आयोगांना भारतीय निवडणूक आयोगाच्या मतदार यादीचा वापर करणे बंधनकारक करावे लागेल.

३. निवडणुकांचे वेळापत्रक

उच्चस्तरीय समितीच्या शिफारशीनुसार, लोकसभा आणि विधानसभा निवडणुका पूर्ण झाल्यानंतर १०० दिवसांच्या आत संपूर्ण देशातील नगरपालिका आणि पंचायतींच्या निवडणुका घेण्याची योजना आहे. यामुळे प्रशासकीय यंत्रणेवरील ताण कमी होईल आणि सर्व निवडणुका एकाच वर्षात पूर्ण होतील.

चौथा टप्पा: प्रशासकीय आणि लॉजिस्टिक तयारी

या कायदेशीर आणि राजकीय प्रक्रियेसोबतच, प्रचंड मोठ्या प्रमाणावरील प्रशासकीय आणि लॉजिस्टिक तयारी करणे आवश्यक आहे, जी संपूर्ण प्रक्रियेदरम्यान समांतरपणे चालू राहील.

१. इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (EVM) आणि VVPAT ची व्यवस्था

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

एकाच वेळी निवडणुका घेण्यासाठी मोठ्या संख्येने EVM आणि VVPAT मशीन्सची आवश्यकता असेल. अंदाजानुसार, यासाठी सध्याच्या संख्येच्या दुप्पट मशीन्सची गरज भासेल. या मशीन्सची खरेदी, साठवणूक आणि वाहतूक यासाठी मोठ्या प्रमाणावर नियोजन आणि गुंतवणूक करावी लागेल.

२. मनुष्यबळ आणि सुरक्षा दले

निवडणूक कर्मचारी: संपूर्ण देशात एकाच वेळी निवडणुका घेण्यासाठी मोठ्या संख्येने निवडणूक कर्मचाऱ्यांची (उदा. मतदान अधिकारी, क्षेत्रीय अधिकारी) आवश्यकता असेल. त्यांचे प्रशिक्षण आणि नियुक्ती यासाठी एक राष्ट्रीय योजना तयार करावी लागेल.

सुरक्षा दले: निवडणुका शांततेत आणि निष्पक्षपणे पार पाडण्यासाठी केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (CAPF) आणि राज्य पोलीस दलांची मोठ्या प्रमाणावर गरज भासेल. त्यांच्या तैनातीचे नियोजन करणे हे एक मोठे आव्हान असेल.

'वन नेशन, वन इलेक्शन' ची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी प्रक्रिया ही एक अत्यंत गुंतागुंतीची, वेळखाऊ आणि आव्हानात्मक मोहीम आहे. यात केवळ कायदेशीर किंवा प्रशासकीय बदल अपेक्षित नसून, त्यासाठी प्रबळ राजकीय इच्छाशक्ती आणि सर्व राजकीय पक्षांमध्ये व्यापक सहमती निर्माण करणे आवश्यक आहे. प्रत्येक टप्प्यावर संभाव्य अडथळ्यांचा विचार करून आणि त्यावर उपाययोजना करूनच या दूरगामी सुधारणेला प्रत्यक्षात आणणे शक्य होईल. ही प्रक्रिया यशस्वी झाल्यास भारतीय निवडणूक प्रणालीत आमूलाग्र बदल घडून येईल, परंतु तिच्या अंमलबजावणीचा मार्ग अत्यंत काळजीपूर्वक आणि सर्वसमावेशक चर्चेनेच निश्चित करावा लागेल.

वर्तमान राजकीय परिस्थिती आणि संसदीय प्रक्रिया

२०२४ च्या लोकसभा निवडणुकांनंतर, भाजप नेतृत्वाखालील रालोआ आघाडीला २९३ जागा मिळाल्या, तर विरोधी इंडिया आघाडीला २३३ जागा मिळाल्या. संविधान सुधारणा पारित करण्यासाठी आवश्यक असलेल्या दोन तृतीयांश बहुमताच्या अनुपस्थितीत, हा प्रस्ताव अधिक आव्हानात्मक झाला आहे. तथापि, मोदी मंत्रिमंडळाने १८ सप्टेंबर २०२४ रोजी या विधेयकाला मान्यता दिली आणि १७ डिसेंबर २०२४ रोजी संविधान (एकशे एकोणतीसवी सुधारणा) विधेयक, २०२४ लोकसभेत सादर केले. या विधेयकावर विभाजित मतदान झाले, ज्यामध्ये २६९ सदस्यांनी समर्थन दिले आणि १९८ सदस्यांनी विरोध केला. लोकसभेने ३९ सदस्यीय संयुक्त संसदीय समिती (JPC) मंजूर केली आहे, ज्यामध्ये २७ लोकसभा सदस्य आणि १२ राज्यसभा सदस्य आहेत. या समितीचे नेतृत्व पी. पी. चौधरी करत आहेत आणि त्यात सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या प्रमुख नेत्यांचा समावेश आहे,

विकसित भारत २०४७: दृष्टीकोन आणि उद्दिष्टे

विकसित भारत २०४७ ही भारत सरकारची महत्त्वाकांक्षी योजना आहे, जी भारताला २०४७ पर्यंत, म्हणजे स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षी विकसित राष्ट्रात रूपांतरित करण्याचे ध्येय ठेवते. या दृष्टीकोनाचे प्राथमिक आर्थिक उद्दिष्ट २०४७ पर्यंत ३० ते ४० ट्रिलियन डॉलर्सचा सकल देशांतर्गत उत्पन्न (GDP) साध्य करणे आहे. यासह प्रति व्यक्ती उत्पन्न १५,००० ते १८,००० डॉलर्सपर्यंत वाढवणे, शून्य गरिबी साध्य करणे, सर्वांसाठी दर्जेदार शिक्षण आणि आरोग्यसेवा सुनिश्चित करणे ही प्रमुख उद्दिष्टे आहेत. या दृष्टीकोनाचे चार मुख्य स्तंभ आहेत: युवा, गरीब, महिला आणि शेतकरी , जे सरकारच्या प्राथमिकतेच्या लोकसंख्याशास्त्रीय गटांना दर्शवतात. "सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास" हे मार्गदर्शक तत्त्व सर्वसमावेशकता आणि सामूहिक प्रयत्नांवर भर देते.

एक देश, एक निवडणूक आणि विकसित भारत: परस्पर संबंध

भारताच्या स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षी, २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याचे ध्येय आणि "एक देश, एक निवडणूक" ही निवडणूक सुधारणा यांच्यातील संबंध भारताच्या भविष्यासाठी महत्त्वाचे आहेत. विकसित भारत २०४७ ची महत्त्वाकांक्षी ३०-४० ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था साध्य करण्याचे लक्ष्य आणि एकत्रित निवडणुकांद्वारे मिळणारी शासन स्थिरता या दोन्ही उपक्रमांमधील परस्परसंबंध भारताच्या विकास प्रवासाला नवीन दिशा देऊ शकतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, हे दोन्ही उपक्रम "सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास" या तत्त्वावर आधारित आहेत.

ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि सद्यस्थिती

भारतात १९५२ ते १९६७ पर्यंत लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या निवडणुका एकत्रितपणे घेतल्या जात होत्या. परंतु काही राज्य विधानसभा कालबाह्य झाल्या किंवा विसर्जित झाल्या, ज्यामुळे निवडणूक चक्र विखुरले गेले. आता भारतात जवळजवळ प्रत्येक वर्षी कोठे ना कोठे निवडणुका होतात. याच काळात, भारताने २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याचे स्वप्न पाहिले आहे, ज्यासाठी सतत उच्च आर्थिक वाढ, स्थिर शासन आणि प्रभावी धोरण अंमलबजावणी आवश्यक आहे.

पूर्व राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीची २ सप्टेंबर २०२३ रोजी स्थापना करण्यात आली. या समितीने एकत्रित निवडणुकांची व्यवहार्यता आणि फायदे यांचा सखोल अभ्यास केला. तर दुसरीकडे, विकसित भारत २०४७ उपक्रमाने

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

३० ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था, १५,००० ते १८,००० डॉलर्स प्रति व्यक्ती उत्पन्न आणि शून्य गरिबी साध्य करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

आर्थिक विकासातील परस्परसंबंध

GDP वाढीतील थेट योगदान

एकत्रित निवडणुकांचा विकसित भारताच्या आर्थिक लक्ष्यांवर थेट परिणाम होतो. कोविंद समितीच्या अहवालाने स्पष्ट केले की एकत्रित निवडणुकांनंतरच्या वर्षी भारताची GDP वाढ १.५ ट्रिक्ल गुणांनी अधिक असू शकते. हे सुमारे ४.५ लाख कोटी रुपयांच्या अतिरिक्त उत्पादनाच्या बरोबरीचे आहे. विकसित भारत २०४७ साठी ३० ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था साध्य करण्यासाठी दरवर्षी ८-९.२% वाढ आवश्यक आहे. एकत्रित निवडणुकांद्वारे मिळणारी १.५% अतिरिक्त वाढ या लक्ष्याच्या साध्यतेत महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकते.

गुंतवणूक आणि भांडवल निर्मिती

वारंवार निवडणुकांमुळे निर्माण होणारी धोरणात्मक अनिश्चितता खाजगी गुंतवणुकीसाठी प्रतिकूल असते. CII, FICCI आणि ASSOCHAM सारख्या व्यवसाय संघटनांनी एकत्रित निवडणुकांचे समर्थन केले आहे, कारण हे आर्थिक स्थिरता वाढवते. विकसित भारत २०४७ साठी प्रचंड पायाभूत सुविधा गुंतवणूक आवश्यक आहे - परिवहन, ऊर्जा आणि डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये. एकत्रित निवडणुकांमुळे मिळणारी धोरण सातत्य या गुंतवणुकीला चालना देईल. NITI Aayog चा अंदाज आहे की भारताची निर्यात २०४७ पर्यंत ८.६७ ट्रिलियन डॉलर्स असेल. हे साध्य करण्यासाठी दीर्घकालीन निर्यात धोरणे आवश्यक आहेत, जी स्थिर शासन वातावरणात अधिक प्रभावीपणे अंमलात आणता येतील. एकत्रित निवडणुकांमुळे सरकार पाच वर्षांच्या कालावधीत सुसंगत व्यापार धोरणे राबवू शकेल

उत्पादन क्षेत्र आणि रोजगार

विकसित भारत २०४७ उत्पादन आणि सेवा क्षेत्राला GDP मध्ये महत्त्वपूर्ण योगदान देण्यावर भर देते. 'मेक इन इंडिया', PLI योजना आणि PM गति शक्ती सारख्या उपक्रमांना वेग देण्यासाठी स्थिर शासन आवश्यक आहे. आदर्श आचारसंहितेमुळे वारंवार होणारे व्यत्यय उत्पादन प्रकल्पांना विलंबित करतात. एकत्रित निवडणुकांमुळे हे व्यत्यय वर्षात फक्त २-३ महिन्यांपुरते मर्यादित राहतील, ज्यामुळे उत्पादन क्षेत्राला गती मिळेल. CII आणि EY च्या अहवालानुसार, भारताला २०४७ पर्यंत ऊर्जा पुरवठा तिप्पट करावा लागेल, ज्यातील दोन तृतीयांश नॉन-फॉसिल इंधनातून असावा. यासाठी दीर्घकालीन ऊर्जा धोरणे आवश्यक आहेत, जी एकत्रित निवडणुकांमुळे मिळणाऱ्या धोरण सातत्याने सुलभ होतील.

राजकोषीय व्यवस्थापन आणि संसाधन वाटप

निवडणूक खर्चाची बचत विकसित भारताच्या इतर उद्दिष्टांसाठी वापरली जाऊ शकते. २०१९ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये ५०,००० कोटी रुपये खर्च झाला. एकत्रित निवडणुकांमुळे होणारी बचत पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि कौशल्य विकासासाठी उपलब्ध होईल. विकसित भारत २०४७ साठी प्रधानमंत्री आवास योजना, भारतमाला, सागरमाला सारख्या मोठ्या प्रकल्पांना निधी आवश्यक आहे. निवडणूक खर्चाची बचत या प्रकल्पांना गती देईल.

शासन स्थिरता आणि धोरण सातत्य

आदर्श आचारसंहितेचे व्यत्यय कमी करणे

आदर्श आचारसंहिता लागू असताना सरकार नवीन धोरणे राबवू शकत नाही आणि विकासकामे सुरू करू शकत नाही. सध्याच्या व्यवस्थेत वर्षभर निवडणुका होत असल्याने हा कालावधी वर्षात ५-६ महिने असतो. विकसित भारत २०४७ साठी आवश्यक असलेल्या परिवर्तनात्मक सुधारणा या व्यत्ययांमुळे मंदावतात. एकत्रित निवडणुकांमुळे सरकार १० महिने शासनावर लक्ष केंद्रित करू शकेल. १६व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष अरविंद पनगरिया यांनी नमूद केले की एकत्रित निवडणुका शासन आणि धोरण अंमलबजावणी सुधारतात. विकसित भारत २०४७ साठी श्रम सुधारणा, भूमी सुधारणा, GST सरलीकरण आणि बँकिंग सुधारणा आवश्यक आहेत. या सुधारणांना सतत लक्ष आवश्यक आहे, जे एकत्रित निवडणुकांमुळे सुलभ होईल.

दीर्घकालीन धोरण निर्मिती

निवडणुका राजकीय पक्षांना अल्पकालीन लोकप्रियतेऐवजी दीर्घकालीन धोरण निर्मितीवर लक्ष केंद्रित करण्यास भाग पाडतात . विकसित भारत २०४७ चे ध्येय साध्य करण्यासाठी २५ वर्षांची दृष्टी आवश्यक आहे. उदाहरणार्थ, Maritime Amrit Kaal Vision 2047 ने २५ वर्षांचा रोडमॅप दिला आहे. अशा दीर्घकालीन योजनांना वारंवार निवडणुकांमुळे व्यत्यय येत नाही हे महत्त्वाचे आहे. मोदी ३.०ची मंत्रिमंडळाने धोरण सातत्य आणि स्थिरतेवर भर दिला आहे. आर्थिक, औद्योगिक आणि कृषी सुधारणा, आर्थिक वाढ आणि रोजगार निर्मिती यांना प्राधान्य दिले जात आहे. एकत्रित निवडणुका या प्राधान्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीला समर्थन देतील.

केंद्र-राज्य समन्वय

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

विकसित भारत २०४७ साठी केंद्र आणि राज्यांमधील सहकार्य महत्त्वाचे आहे. भारतीय संघराज्यवाद आर्थिक विकासाच्या क्षेत्रात राज्यांना स्वायत्तता देतो. एकत्रित निवडणुका सहकारी संघराज्यवाद प्रोत्साहित करू शकतात, ज्यामुळे राष्ट्रीय आणि प्रादेशिक दोन्ही चिंता अधिक प्रभावीपणे संबोधित होतील . राज्यांना स्पर्धात्मक आर्थिक सुधारणा राबवण्याची परवानगी आहे. एकत्रित निवडणुकांमुळे राज्ये या सुधारणांवर केंद्रित राहू शकतील. राज्य-विशिष्ट विकास प्रकल्प आणि केंद्रीय योजनांचे समन्वय सुधारेल.

पायाभूत सुविधा विकासातील संबंध

परिवहन नेटवर्क विकास

विकसित भारत २०४७ उच्चदर्जाच्या रस्ते, पूल आणि परिवहन नेटवर्कवर भर देते. भारतमाला आणि सागरमाला सारखे प्रकल्प देशभर कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी डिझाइन केले आहेत. आदर्श आचारसंहितेमुळे या प्रकल्पांना वारंवार विलंब होतो. एकत्रित निवडणुकांमुळे बांधकाम कामे सतत चालू राहतील, ज्यामुळे प्रकल्प वेळेवर पूर्ण होतील.

PM गति शक्ती उपक्रमाचा उद्देश विविध मंत्रालयांच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचे समन्वय साधणे आहे. यासाठी सतत समन्वय आवश्यक आहे, जो वारंवार निवडणुकांमुळे व्यत्यय येतो. एकत्रित निवडणुकांमुळे या उपक्रमाला गती मिळेल.

स्मार्ट शहरे आणि ग्रामीण विकास

विकसित भारत २०४७ स्वच्छ शहरे आणि स्मार्ट गावे विकसित करण्याचे लक्ष्य ठेवते. प्रधानमंत्री आवास योजनेचा उद्देश सर्वांसाठी घर उपलब्ध करून देणे आहे. या योजनांची अंमलबजावणी स्थानिक प्रशासनावर अवलंबून असते, ज्यांना निवडणुकीदरम्यान इतर कर्तव्ये दिली जातात. एकत्रित निवडणुकांमुळे प्रशासकीय संसाधने नियमित विकासकामांसाठी उपलब्ध राहतील. ग्रामीण विकासासाठी पंचायती राज संस्था मजबूत करणे आवश्यक आहे. उच्चस्तरीय समितीने पंचायत निवडणुका राष्ट्रीय आणि राज्य निवडणुकांसोबत समक्रमित करण्याचा सल्ला दिला आहे . यामुळे स्थानिक शासनात क्रांती होईल आणि तळागाळातील विकासाला गती मिळेल.

डिजिटल पायाभूत सुविधा

विकसित भारत २०४७ डिजिटल परिवर्तनावर जोर देते. ५G नेटवर्क, ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी आणि डिजिटल साक्षरता सुधारणा आवश्यक आहेत. डिजिटल इंडिया उपक्रमाला सतत समर्थन आवश्यक आहे. एकत्रित निवडणुकांमुळे या उपक्रमांना धोरणात्मक सातत्य मिळेल. तंत्रज्ञान आणि नवकल्पनाला प्रोत्साहन देणे विकसित भारत २०४७ च्या प्राथमिकतांपैकी एक आहे. स्टार्टअप इंडिया आणि डिजिटल तंत्रज्ञान उपक्रमांना स्थिर धोरण वातावरणाची गरज आहे. एकत्रित निवडणुकांमुळे मिळणारी शासन स्थिरता या क्षेत्रातील गुंतवणुकीला प्रोत्साहन देईल.

सामाजिक विकास आणि समावेशन

शिक्षण आणि कौशल्य विकास

विकसित भारत २०४७ चे लक्ष्य १०० टक्के दर्जेदार शिक्षण आणि कुशल श्रम साध्य करणे आहे. शिक्षण संस्थांचा वारंवार मतदान केंद्र म्हणून वापर केल्याने शैक्षणिक कार्यक्रम विस्कळीत होतात . शिक्षक निवडणूक कर्तव्ये आणि प्रशिक्षणामध्ये गुंतलेले असतात . कोविंद समितीच्या अहवालाने दर्शवले की निवडणुकांदरम्यान शाळेत प्रवेश ०.५% कमी होतो.

एकत्रित निवडणुकांमुळे शिक्षक नियमित शिक्षण कर्तव्यांवर लक्ष केंद्रित करू शकतील. यामुळे शिक्षणाची गुणवत्ता सुधारेल. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अंमलबजावणीला सतत लक्ष आवश्यक आहे, जे एकत्रित निवडणुकांमुळे सुलभ होईल.

कौशल्य विकास आणि उद्योजकता विकास कार्यक्रमांना विकसित भारत २०४७ मध्ये प्राधान्य दिले आहे. स्थिर शासनामुळे औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) आणि कौशल्य विकास केंद्रांचे नेटवर्क विस्तारणे सुलभ होईल.

आरोग्य सेवा सुधारणा

विकसित भारत २०४७ सर्वांसाठी दर्जेदार आरोग्य सेवा सुनिश्चित करण्यावर लक्ष केंद्रित करते. आयुष्मान भारत आणि आरोग्य कल्याण केंद्रांचे नेटवर्क विस्तारणे आवश्यक आहे. आदर्श आचारसंहितेमुळे आरोग्य पायाभूत सुविधा बांधकामात विलंब होतो. एकत्रित निवडणुकांमुळे रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि वैद्यकीय महाविद्यालयांचे बांधकाम सतत चालू राहील. महामारीच्या तयारीसाठी दीर्घकालीन योजना आवश्यक आहे. एकत्रित निवडणुकांमुळे आरोग्य धोरणांना सातत्य मिळेल.

महिला सशक्तीकरण

विकसित भारत २०४७ चे चार मुख्य स्तंभांपैकी एक महिला आहे. महिलांचे आर्थिक सहभाग वाढवणे आणि नारी शक्तीला प्रोत्साहन देणे महत्त्वाचे आहे. एकत्रित निवडणुकांमुळे महिलांना राजकारणात सहभागी होणे सोयीचे होईल. महिला आरक्षण कायदा आणि इतर सशक्तीकरण उपक्रमांना स्थिर धोरण वातावरणाची गरज आहे.

युवा आणि शेतकरी कल्याण

युवा आणि अन्नदाता (शेतकरी) विकसित भारत २०४७ चे इतर दोन स्तंभ आहेत. युवकांसाठी रोजगार निर्मिती आणि उद्योजकता संधी महत्त्वाच्या आहेत. स्टार्टअप इकोसिस्टम विकसित करणे आणि नवकल्पनाला प्रोत्साहन देणे स्थिर शासनामुळे सुलभ होईल. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी कृषी पायाभूत सुविधा विकास आवश्यक आहे. MSP सुधारणा, कृषी मार्केटिंग सुधारणा आणि शेती तंत्रज्ञान प्रसार यांना दीर्घकालीन दृष्टीकोन आवश्यक आहे. एकत्रित निवडणुकांमुळे कृषी धोरणांना स्थिरता मिळेल.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

विकसित भारत २०४७ च्या ध्येयात्मक स्तंभांसोबत एकरूपता

आर्थिक वाढ आणि विकास

विकसित भारत २०४७ चे ध्येय ७-१० टक्के सततची वार्षिक वाढ राखून ३०-४० ट्रिलियन डॉलर्सचा GDP साध्य करणे आहे. एक देश, एक निवडणूक या उद्दिष्टाच्या साध्यतेमध्ये योगदान देऊ शकते कारण GDP मध्ये १.५ टक्क्यांची वाढ होऊ शकते. हे अतिरिक्त आर्थिक उत्पादन उत्पादकता वाढवण्यासाठी, निर्यातीला चालना देण्यासाठी आणि MSME आणि स्टार्टअपला समर्थन देण्यासाठी वापरले जाऊ शकते.

पायाभूत सुविधा विकास

विकसित भारत २०४७ पायाभूत सुविधांच्या परिवर्तनात्मक विस्ताराचे लक्ष्य ठेवते, ज्यामध्ये वाहतूक नेटवर्क, स्मार्ट शहरे आणि उच्च-गती कनेक्टिव्हिटीचा समावेश आहे. समक्रमित निवडणुकांमुळे सरकारला या प्रकल्पांवर सतत लक्ष केंद्रित करता येईल, कारण आदर्श आचारसंहितेमुळे वारंवार विलंब होणार नाही.

सामाजिक प्रगती

विकसित भारत २०४७ आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, क्रीडा, संस्कृती आणि काळजीसांभाळ घेणारा समाज यावर लक्ष केंद्रित करते. निवडणुकांच्या व्यत्ययांमुळे शाळेत प्रवेश कमी होतो, त्यामुळे समक्रमित निवडणुका या समस्येवर मात करण्यास मदत करतील. याशिवाय, स्थिर शासन व्यवस्थेमुळे सामाजिक कल्याण कार्यक्रमांची अंमलबजावणी अधिक प्रभावी होईल.

शासन आणि सुरक्षा

विकसित भारत २०४७ सर्व स्तरांवर प्रभावी आणि नैतिक शासन व्यवस्थेचे लक्ष्य ठेवते. एक देश, एक निवडणूक शासन स्थिरता सुधारू शकते आणि धोरण निर्मितीतील व्यत्यय कमी करू शकते. केंद्र आणि राज्यांमधील समन्वय सुधारल्यास, नवीन नागरी सेवा मंडळ, न्यायपालिकेला अधिक न्यायाधीश देणे आणि तंत्रज्ञान-सक्षम कराराची अंमलबजावणी यासारख्या संस्थात्मक सुधारणा अधिक प्रभावीपणे अंमलात आणता येतील.

नवकल्पना, विज्ञान आणि तंत्रज्ञान

विकसित भारत २०४७ R&D मध्ये प्रगती, स्टार्टअपना प्रोत्साहन, डिजिटल परिवर्तन आणि तंत्रज्ञान आणि अंतराळ अन्वेषणामध्ये नेतृत्व यावर लक्ष केंद्रित करते. स्थिर शासन व्यवस्थेमुळे दीर्घकालीन तंत्रज्ञान धोरणे आणि गुंतवणूक निर्णय घेणे सुलभ होईल.

पर्यावरण शाश्वतता

विकसित भारत २०४७ नवीकरणीय ऊर्जा स्वीकारणे, कचरा व्यवस्थापन समाधाने आणि नेट-शून्य उत्सर्जनाचे लक्ष्य ठेवते. समक्रमित निवडणुकांमुळे पर्यावरणीय धोरणे अधिक सुसंगतपणे अंमलात आणता येतील, कारण राजकीय नेतृत्व सतत प्रचारात गुंतणे ऐवजी दीर्घकालीन शाश्वत उपक्रमांवर लक्ष केंद्रित करू शकेल.

थोडक्यात ," एक देश, एक निवडणूक" मुळे निवडणूक खर्चात बचत, संसाधनांचा कार्यक्षम वापर,शासन स्थिरता, दीर्घकालीन धोरण निर्मिती, गुंतवणुकीला प्रोत्साहन, केंद्र-राज्य समन्वय, शिक्षण-आरोग्य सेवांमध्ये सातत्य, आणि सामाजिक विकासाला चालना. GDP त वाढ असे काही फायदे सुद्धा होणार आहेत याशिवाय संघराज्यवाद धोका निर्माण होणे, राजकीय एकाधिकार निर्माण होणे , राष्ट्रीय पक्षांचे वर्चस्व वाढणे, स्थानिक मुद्द्यांकडे दुर्लक्ष होणे ,घटनात्मक जटिलता निर्माण होणे, कलम ८३, ८५, १७२ मध्ये दुरुस्त्या करणे अवघड काम व ५०% राज्यांची मंजुरी मिळविणे अवघड काम, मतदार भ्रम निर्माण होणे, प्रादेशिक पक्षांवर प्रतिकूल परिणाम, बहुलवादी लोकशाहीच्या विरोधात,असे काही तोटे सुद्धा होणार आहेत

निष्कर्ष

"एक देश, एक निवडणूक" ही संकल्पना भारताच्या विकसित राष्ट्र बनण्याच्या प्रवासात एक द्विधा मनस्थितीचा सुधारणा आहे. एकीकडे, 1.5% GDP वाढ, खर्च बचत, शासन स्थिरता आणि पायाभूत विकासाला गती मिळणे हे निर्विवाद फायदे आहेत जे विकसित भारत २०४७ च्या आर्थिक लक्ष्यांना साध्य करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात. दुसरीकडे, लोकशाही उत्तरदायित्व कमकुवत होणे, संघराज्य तत्त्वांचे संभाव्य उल्लंघन, प्रादेशिक पक्षांचे दुर्बलीकरण आणि राज्य स्वायत्ततेवर होणारा परिणाम ही गंभीर चिंता आहेत. या सुधारणेची यशस्वी अंमलबजावणी केवळ घटनात्मक बहुमत मिळवण्यापुरतीच मर्यादित नाही, तर विविध राजकीय पक्षांमध्ये व्यापक सहमती निर्माण करणे, राज्यांच्या चिंतांचे निरसन करणे आणि संघराज्य संरचनेचे संरक्षण करणारे मजबूत संरक्षण उपाय समाविष्ट करणे यावर अवलंबून आहे. सध्याच्या राजकीय परिस्थितीत, जिथे NDA कडे आवश्यक बहुमत नाही आणि अनेक विरोधी पक्ष आणि राज्य सरकारे आशंका व्यक्त करीत आहेत, तिथे या सुधारणेचा मार्ग अत्यंत आव्हानात्मक आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

थोडक्यात , ONOE ची संकल्पना आर्थिक कार्यक्षमता आणि लोकशाही जिवंतपणा यांच्यातील नाजूक संतुलन साधण्याची गरज अधोरेखित करते. विकसित भारत २०४७ चे स्वप्न केवळ आर्थिक समृद्धीवरच नाही तर मजबूत लोकशाही संस्था, संघराज्य सहअस्तित्व आणि सर्वसमावेशक विकासावर आधारित असले पाहिजे.

मार्गदर्शक शिफारशी

या अभ्यासाच्या आधारे, खालील शिफारशी केल्या जाऊ शकतात:

१. टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी: पहिल्या टप्प्यात केवळ लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांचे समक्रमण करणे आणि नंतरच स्थानिक स्वराज्य संस्थांचा समावेश करणे अधिक व्यावहारिक असेल.

२. संघराज्य सुरक्षा उपाय: राज्यांच्या स्वायत्ततेचे संरक्षण करणाऱ्या घटनात्मक तरतुदी समाविष्ट करणे आवश्यक आहे. मध्यावधी सरकार पडल्यास, उर्वरित कालावधीसाठीच नवीन सरकार नियुक्त करणे हा योग्य उपाय असू शकतो.

३. सर्वसमावेशक चर्चा: सर्व राजकीय पक्षांसह, विशेषतः प्रादेशिक पक्षांसह, गहन चर्चा आणि सहमती निर्माण करणे आवश्यक आहे. ३९ सदस्यीय संयुक्त संसदीय समितीने या चिंतांचा गांभीर्याने विचार केला पाहिजे.

४. प्रायोगिक अंमलबजावणी: काही राज्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर ही पद्धत लागू करून त्याचे परिणाम तपासणे उपयुक्त ठरू शकते.

५. तांत्रिक सज्जता: EVM, VVPAT, मनुष्यबळ आणि सुरक्षा दलांच्या व्यवस्थेसाठी सखोल नियोजन आणि पुरेशी गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

"एक देश, एक निवडणूक" ही संकल्पना भारताच्या विकसित राष्ट्र बनण्याच्या प्रवासात एक उपयुक्त साधन ठरू शकते, परंतु तिची अंमलबजावणी अत्यंत सावधगिरीने आणि सर्वसमावेशक दृष्टिकोनातून केली पाहिजे. भारताची संघराज्य व्यवस्था, लोकशाही बहुलवाद आणि प्रादेशिक विविधता ही आपल्या राजकीय व्यवस्थेची मूलभूत शक्ती आहे, जिचे संरक्षण करणे अत्यावश्यक आहे. विकसित भारत २०४७ चे स्वप्न केवळ आर्थिक संख्यांमध्ये नसून समावेशक विकास, सामाजिक न्याय आणि लोकशाही मूल्यांच्या संवर्धनामध्ये आहे. एकत्रित निवडणुका या उद्दिष्टांना साध्य करण्याचे एक माध्यम असू शकतात, परंतु ते स्वतःच ध्येय नसून साधन आहेत. म्हणूनच, राष्ट्रीय सहमती, घटनात्मक वैधता आणि लोकशाही तत्त्वांच्या संरक्षणासह या सुधारणेचा विचार केला पाहिजे. भारताचा २०४७ चा प्रवास दीर्घ आहे आणि त्यात अनेक आव्हाने आहेत. ONOE यशस्वी झाल्यास विकासाला गती मिळू शकते, परंतु अपयशी झाल्यास राजकीय अस्थिरता आणि संघराज्य तणाव निर्माण होऊ शकतो. त्यामुळे, हा निर्णय केवळ राजकीय इच्छाशक्तीवर नव्हे तर व्यापक राष्ट्रीय संवाद, संवैधानिक शहाणपण आणि दूरदृष्टीवर आधारित असला पाहिजे. शेवटी, भारताच्या लोकशाहीचे यश त्याच्या जिवंतपणा, सहभाग आणि विविधतेच्या सन्मानामध्ये आहे. कोणतीही निवडणूक सुधारणा या मूलभूत तत्त्वांना बळकटी देणारी असली पाहिजे, त्यांना कमकुवत करणारी नसावी. सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास" - या तत्त्वाच्या प्रकाशात, एक देश, एक निवडणूक आणि विकसित भारत २०४७ हे दोन्ही उपक्रम भारताच्या समृद्ध, समावेशक आणि सशक्त भविष्याची दिशा दाखवतात, परंतु त्यांची यशस्वी अंमलबजावणी सामूहिक राष्ट्रीय प्रयत्नांवर अवलंबून आहे.

संदर्भ :

1.PRS Legislative Research. (2026, January 19). Simultaneous Elections in India.
https://prsindia.org/policy/report-summaries/simultaneous-elections-in-india
2.BBC News. (2024, December 17). Explained: India's one nation one election proposal.
https://www.bbc.com/news/articles/cly7vjp73zvo
3.Drishti IAS. (2024, September 26). Exploring the Prospects of One Nation One Election.
https://www.drishtiias.com/daily-updates/daily-news-editorials/exploring-the-prospects-of-one-nation-one-election
4.ForumIAS. (2024, January 30). Pros and Cons of Simultaneous Elections in India.
https://forumias.com/blog/simultaneous-elections-in-india-pros-and-cons-of-simultaneous-elections/
5.Vajiram & Ravi. (2025, June 29). One Nation One Election Bill: Key Takeaways, Latest Updates.
https://vajiramandravi.com/current-affairs/one-nation-one-election-bill/
6.ClearTax. (2025, September 1). What is One Nation One Election, How Does it Work…
https://cleartax.in/s/one-nation-one-election
7.StudyIQ. (2024, December 17). One Nation One Election: Advantages and Disadvantages…
https://www.studyiq.com/articles/one-nation-one-election/
8.Centre for Digital & Policy Perspectives (CDPP). (2025, March 24). One Nation, One Election: Balancing Efficiency and Representation in Indian Politics.
https://www.cdpp.co.in/articles/one-nation-one-election-balancing-efficiency-and-representation-in-indian-politics
9.The Wire. (2025, December 9). Does "One Nation, One Election" Threaten the Federal Structure of the Indian Republic?

https://m.thewire.in/article/government/does-one-nation-one-election-threaten-the-federal-structure-of-the-indian-republic
10.Vidhi Centre for Legal Policy. (2025, July 27). Federalism, democracy, and the idea of one nation one election. https://vidhilegalpolicy.in/blog/federalism-democracy-and-the-idea-of-one-nation-one-election/
11.JuWiss. (2025, January 22). One Nation, One Election: Electoral Synchronicity, Federal… https://www.juwiss.de/6-2025/
12.Vajirao Institute. (2024, September 30). One Nation One Election: What is, Advantage and Disadvantage… https://www.vajiraoinstitute.com/upsc-ias-current-affairs/one-nation-one-election-what-is-advantage-and-disadvantage.aspx
13.ForumIAS Blog. (2026, January 6). Advantages of holding simultaneous elections… (Answered post). https://forumias.com/blog/answered-discuss-the-advantages-and-disadvantages-of-holding-simultaneous-elections-for-lok-sabha-and-
14.Wikipedia. (n.d.). One Nation, One Election. https://en.wikipedia.org/wiki/One_Nation,_One_Election

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

सतत विकास लक्ष्यों (SDGs) के संदर्भ में सतत पर्यटन का अध्ययन : विकसित भारत मिशन 2047 की ओर अग्रसरता

डॉ. ज्योति रामचंद्र लष्करी
प्राचार्य
आर. एफ. एन. एस. शिक्षणशास्त्र
महिला महाविद्यालय, अक्कलकुवा
जिला – नंदुरबार

Manuscript ID:
JRD -2026-180226
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 118-
February 2026
Submitted: 25 Jan. 2026
Revised: 31 Jan. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

भारत की समग्र विकास प्रक्रिया में पर्यटन क्षेत्र का अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान है। विकसित भारत मिशन 2047 के अंतर्गत आर्थिक प्रगति के साथ-साथ पर्यावरणीय संतुलन एवं सामाजिक समावेशिता बनाए रखना आवश्यक है। इन उद्देश्यों की पूर्ति के लिए सतत पर्यटन की अवधारणा एक प्रभावी माध्यम के रूप में उभरकर सामने आती है। संयुक्त राष्ट्र द्वारा प्रतिपादित सतत विकास लक्ष्य (SDGs) पर्यटन विकास को दीर्घकालिक एवं उत्तरदायी दिशा प्रदान करते हैं। प्रस्तुत शोध लेख में सतत पर्यटन की अवधारणा, SDGs के साथ उसका संबंध, भारत में पर्यटन विकास की संभावनाएँ एवं चुनौतियाँ तथा 2047 तक विकसित भारत के निर्माण में सतत पर्यटन की भूमिका का अध्ययन किया गया है।

मुख्य शब्द : *सतत पर्यटन, SDGs, विकसित भारत 2047, पर्यावरण संरक्षण, पर्यटन नियोजन*

प्रस्तावना

पर्यटन भारत के सेवा क्षेत्र का एक गतिशील घटक है, जो रोजगार सृजन, स्थानीय आय में वृद्धि तथा सांस्कृतिक आदान-प्रदान में महत्त्वपूर्ण भूमिका निभाता है। किंतु पर्यटन के अत्यधिक विस्तार एवं उचित नियोजन के अभाव में पर्यावरणीय क्षति, प्राकृतिक संसाधनों का ह्रास तथा स्थानीय समुदायों पर सामाजिक-सांस्कृतिक दबाव उत्पन्न हो रहा है। इन समस्याओं के समाधान हेतु सतत पर्यटन की अवधारणा विकसित हुई है, जो आर्थिक विकास, पर्यावरण संरक्षण एवं सामाजिक उत्तरदायित्व के बीच संतुलन स्थापित करने पर बल देती है।

शोध के उद्देश्य

1. सतत पर्यटन की अवधारणा का विस्तृत अध्ययन करना।
2. सतत विकास लक्ष्यों एवं पर्यटन विकास के बीच संबंध को स्पष्ट करना।
3. भारत में सतत पर्यटन के विकास की संभावनाओं का विश्लेषण करना।
4. विकसित भारत मिशन 2047 के परिप्रेक्ष्य में सतत पर्यटन के योगदान का अध्ययन करना।

शोध परिकल्पनाएँ

5. सतत पर्यटन से पर्यटन क्षेत्र का दीर्घकालिक विकास संभव है।
6. SDGs आधारित पर्यटन नीतियाँ पर्यावरण संरक्षण को बढ़ावा देती हैं।
7. विकसित भारत 2047 के लक्ष्य की प्राप्ति में सतत पर्यटन महत्त्वपूर्ण भूमिका निभा सकता है

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. ज्योति रामचंद्र लष्करी, प्राचार्य, आर. एफ. एन. एस. शिक्षणशास्त्र , महिला महाविद्यालय, अक्कलकुवा जिला – नंदुरबार

How to cite this article:
लष्करी, . ज्योति . रामचंद्र . (2026). सतत विकास लक्ष्यों (*SDGs)* के संदर्भ में सतत पर्यटन का अध्ययन : विकसित भारत मिशन 2047 की ओर अग्रसरता. *Journal of Research and Development,* 18(2(*XIV)),* 118–120.
https://doi.org/10.5281/zenodo.18797679

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
10.5281/zenodo.18797679
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

शोध पद्धति

प्रस्तुत शोध में द्वितीयक आँकड़ा संकलन पद्धति का उपयोग किया गया है। इसके अंतर्गत संयुक्त राष्ट्र के SDGs से संबंधित प्रतिवेदन, online वेब साईड UNWTO के प्रकाशन, भारत सरकार के पर्यटन संबंधी दस्तावेज, शोध लेख एवं संदर्भ ग्रंथों का अध्ययन किया गया है। संकलित जानकारी का विश्लेषण वर्णनात्मक पद्धति से किया गया है।

सतत पर्यटन और SDGs के बीच संबंध

सतत विकास लक्ष्यों में से अनेक लक्ष्य प्रत्यक्ष रूप से पर्यटन क्षेत्र से संबंधित हैं। रोजगार सृजन, सतत शहरी एवं ग्रामीण विकास, उत्तरदायी संसाधन उपयोग, जलवायु परिवर्तन पर नियंत्रण तथा जैव विविधता संरक्षण जैसे लक्ष्य सतत पर्यटन के माध्यम से प्राप्त किए जा सकते हैं। इस प्रकार SDGs सतत पर्यटन के लिए एक प्रभावी एवं मार्गदर्शक ढाँचा प्रदान करते हैं।

भारत में सतत पर्यटन विकास की संभावनाएँ

भारत प्राकृतिक सौंदर्य, ऐतिहासिक धरोहर, धार्मिक स्थलों तथा ग्रामीण एवं आदिवासी संस्कृतियों से समृद्ध देश है। इको-टूरिज़्म, ग्रामीण पर्यटन, आध्यात्मिक पर्यटन एवं सांस्कृतिक पर्यटन के माध्यम से सतत पर्यटन का व्यापक विकास संभव है। केंद्र एवं राज्य सरकारों की विभिन्न पर्यटन योजनाओं से इस क्षेत्र को प्रोत्साहन प्राप्त हो रहा है।

चुनौतियाँ एवं समस्याएँ (संक्षिप्त व्याख्या)

1) पर्यावरणीय नियमों का अपर्याप्त क्रियान्वयन :

पर्यटन विकास हेतु निर्धारित पर्यावरण संरक्षण नियमों का कई स्थानों पर प्रभावी क्रियान्वयन नहीं हो पाता, जिससे प्रदूषण में वृद्धि तथा प्राकृतिक संसाधनों को क्षति होती है।

2) पर्यटन स्थलों पर आधारभूत सुविधाओं का अभाव :

अनेक पर्यटन स्थलों पर सड़क, स्वच्छता, जल आपूर्ति, परिवहन एवं आवास जैसी मूलभूत सुविधाएँ अपर्याप्त हैं, जिससे पर्यटन विकास में बाधा उत्पन्न होती है।

3) स्थानीय समुदायों की सीमित भागीदारी :

पर्यटन की योजना एवं क्रियान्वयन प्रक्रिया में स्थानीय लोगों की भागीदारी कम होने से उन्हें अपेक्षित आर्थिक एवं सामाजिक लाभ प्राप्त नहीं हो पाते।

4) सततता के प्रति जन-जागरूकता का अभाव :

पर्यटकों एवं स्थानीय नागरिकों में सतत पर्यटन के प्रति आवश्यक जागरूकता की कमी के कारण पर्यावरण-अनुकूल एवं उत्तरदायी पर्यटन का प्रभावी क्रियान्वयन नहीं हो पाता।

विकसित भारत मिशन 2047 में सतत पर्यटन का स्थान

विकसित भारत मिशन 2047 का प्रमुख उद्देश्य आर्थिक समृद्धि, सामाजिक समानता एवं पर्यावरणीय सततता की प्राप्ति है। सतत पर्यटन ग्रामीण क्षेत्रों में रोजगार सृजन, स्थानीय उद्योगों को बढ़ावा, महिला सशक्तिकरण तथा प्राकृतिक संसाधनों के संरक्षण में महत्त्वपूर्ण योगदान दे सकता है। इस प्रकार 2047 तक भारत को विकसित राष्ट्र बनाने में सतत पर्यटन एक प्रभावी माध्यम सिद्ध हो सकता है।

निष्कर्ष

सतत पर्यटन पर्यटन विकास की एक उत्तरदायी एवं दीर्घकालिक दिशा है। सतत विकास लक्ष्यों की रूपरेखा के अंतर्गत पर्यटन नीतियों का प्रभावी क्रियान्वयन भारत को आर्थिक, सामाजिक एवं पर्यावरणीय दृष्टि से संतुलित विकास की ओर ले जा सकता है। विकसित भारत मिशन 2047 की सफलता के लिए सतत पर्यटन को अपनाना अनिवार्य है।

संदर्भ

1. United Nations – Sustainable Development Goals
2. UNWTO – Sustainable Tourism and Development
3. भारत सरकार, पर्यटन मंत्रालय – अधिकृत प्रतिवेदन
4. पर्यटन एवं सतत विकास से संबंधित शोध लेख
5. https://www.untourism.int/global/publication/tourism-and-sustainable-development-goals-journey-2030?utm_source=chatgpt.com
6. https://tourism4sdgs.org/tourism-for-sdgs- platform/?utm_source=chatgpt.com
7. https://en.unwto-ap.org/faq/10707/?utm_source=chatgpt.com
8. **संदर्भ सूची (References with Web Sources)**
9. UN World Tourism Organization (UNWTO). *Tourism and the Sustainable Development Goals – Journey to 2030.* Publication by UNWTO and partners outlining how tourism contributes to SDGs and offers policy guidance. Tourism and the SDGs – Journey to 2030 (UNWTO)

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

10. United Nations Development Programme (UNDP). *Tourism and the Sustainable Development Goals – Journey to 2030.* Guide explaining how the tourism sector contributes towards implementing all 17 SDGs. Tourism and the SDGs – UNDP Publication
11. Sustainable Development Goals Knowledge Platform. *Sustainable tourism and SDGs.* Overview of how sustainable tourism is defined and connected to specific SDG targets, including targets 8.9, 12.b and 14.7. Sustainable tourism – UN SDG Topics
12. UNWTO. *Tourism for SDGs – Tourism for SDGs Platform.* Official platform by UNWTO encouraging tourism stakeholders to engage in achieving the 2030 Agenda through sustainable tourism initiatives. Tourism for SDGs Platform (UNWTO)
13. UNWTO. *Tourism in the 2030 Agenda.* Information on how tourism is integrated into the 2030 agenda for sustainable development and its role across multiple SDGs. Tourism in the 2030 Agenda (UNWTO)
14. UNWTO. *Initiatives on Tourism and SDGs.* Online FAQ explaining UNWTO initiatives, platforms, and tools to link tourism with SDGs. UNWTO Initiatives for SDGs (UN Tourism)
15. UNWTO. *G20 Tourism and SDG Dashboard.* Article about international tools developed in partnership with UNWTO to monitor tourism's contribution to sustainable development goals. G20 Tourism & SDGs Dashboard with UNWTO
16. Government of India & UNEP. *National Strategy for Sustainable Tourism and Responsible Traveller Campaign.* Press release explaining national efforts to align sustainable tourism initiatives with environmental and socio-economic goals. National Strategy for Sustainable Tourism – UN India

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

MOOC परिणामकारकतेच्या संदर्भात झालेल्या पूर्व संशोधनांचा आढावा

डॉ. सचिन अशोक पोरे 1 डॉ. सुभाष एस. सोनुने 2
[1]शैक्षणिक संयोजक (सहा. प्राध्यापक स्तर), प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
[2]सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
Email- sachinpore10@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180227
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 121-125
February 2026
Submitted: 25 Jan. 2026
Revised: 31 Jan. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश -

एकविसाव्या शतकातील वेब-आधारित तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे Massive Open Online Courses (MOOCs) हे उच्च शिक्षणातील एक महत्त्वाचे साधन म्हणून उदयास आले आहेत. गुणवत्तापूर्ण शिक्षणसामग्रीपर्यंत व्यापक प्रवेश, लवचिकता आणि आयुष्यभर शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे हे MOOCs चे प्रमुख उद्दिष्ट आहे. प्रस्तुत संशोधनात MOOCs ची परिणामकारकता, अंमलबजावणीतील आव्हाने, विद्यार्थी सहभाग, अभिप्रायाची भूमिका तसेच MOOC रचनेचा प्रभाव यांचा अभ्यास करण्यासाठी संबंधित साहित्याचा सखोल आढावा घेण्यात आला आहे. पूर्व संशोधनातून असे दिसून येते की MOOCs मुळे शिकणाऱ्यांना जागतिक स्तरावरील शिक्षणसंधी उपलब्ध होत असल्या तरी विद्यार्थी सहभागाचा अभाव, अभ्यासक्रम पूर्णता दर कमी असणे, प्रत्यक्ष संवादाची मर्यादा आणि प्रभावी अभिप्राय पद्धतींचा अभाव ही प्रमुख आव्हाने आहेत. भारतातील SWAYAM सारख्या राष्ट्रीय Platforms मुळे MOOCs ला संस्थात्मक मान्यता मिळाली असली तरी अभियांत्रिकी व विज्ञान शिक्षणासाठी आवश्यक असलेले कौशल्य विकास आणि प्रत्यक्ष संवाद पुरेशा प्रमाणात साध्य होत नसल्याचे आढळते. MOOCs वरील संशोधन प्रवृत्तींच्या अभ्यासातून असे स्पष्ट होते की बहुतांश संशोधन मर्यादित विषयक्षेत्रांवर केंद्रित असून, सैद्धांतिक चौकटींचा प्रभावी वापर तुलनेने कमी आहे. तसेच, विद्यार्थ्यांच्या सहभागावर अभिप्रायाचा महत्त्वपूर्ण प्रभाव असून, अभिप्रायाचा प्रकार, वेळ, आशय हे घटक सहभाग वाढविण्यात निर्णायक ठरतात. याशिवाय, कृतीसंशोधन आधारित MOOC डिझाइनमध्ये शिकणाऱ्यांचा सक्रिय सहभाग, सतत अभिप्राय आणि सहकार्यात्मक दृष्टिकोन यांमुळे अभ्यासक्रमाची गुणवत्ता आणि परिणामकारकता वाढू शकते, असे निष्कर्ष आढळून आले आहेत. सदर साहित्यसमीक्षेच्या आधारे असे म्हणता येते की, भविष्यात MOOCs अधिक प्रभावी करण्यासाठी सहभागवर्धक अभिप्राय पद्धती, आणि शिकणाऱ्यांच्या गरजांनुसार अभ्यासक्रम विकसन करणे अत्यावश्यक आहे. प्रस्तुत संशोधन हे MOOCs च्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी धोरणकर्ते, शिक्षक व संशोधकांसाठी मार्गदर्शक ठरते.

प्रस्तावना - माहिती व तंत्रज्ञानामुळे शिक्षण क्षेत्रात अनेक बदल झाले आहेत. संगणक, इंटरनेट, मोबाईल, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड तंत्रज्ञान आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्स यांच्या वापरामुळे शिक्षणाची संकल्पना पारंपरिक वर्गकेंद्रित शिक्षणापासून तंत्रज्ञानाधारित शिक्षणाकडे झपाट्याने वळली आहे. या बदलांमुळे शिक्षण अधिक सुलभ, सर्वसमावेशक, लवचिक आणि प्रभावी झाले आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. सचिन अशोक पोरे, शैक्षणिक संयोजक (सहा. प्राध्यापक स्तर), प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

How to cite this article:
पोरे, . सचिन . अशोक ., & सोनुने, . सुभाष . एस . (2026). *MOOC* परिणामकारकतेच्या संदर्भात झालेल्या पूर्व संशोधनांचा आढावा. *Journal of Research and Development,* 18(2(*XIV*)), 121–125.
https://doi.org/10.5281/zenodo.18797742

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18797742

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

NEP 2020 मध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, डिजिटल पायाभूत सुविधा, ऑनलाईन शिक्षण, MOOC आणि मिश्र (Blended) शिक्षण पद्धतींवर विशेष भर देण्यात आला आहे. SWAYAM, DIKSHA, NPTEL , MahaDnyandip यांसारख्या प्लॅटफॉर्म्सद्वारे शिक्षणाच्या संधी वाढवण्यात आल्या आहेत.

MOOC संकल्पनेचा उदय (Emergence of MOOC)

MOOC म्हणजे Massive Open Online Course. MOOC ही संकल्पना 2008 साली युनिव्हर्सिटी ऑफ प्रिन्स एडवर्ड आयलंड येथील डेव्ह कॉर्मिअर आणि नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर टेक्नॉलॉजी इन लिबरल एज्युकेशन येथील ब्रायन अलेक्झांडर यांनी मांडली.

MOOC हे मोठ्या संख्येने शिकणाऱ्यांसाठी खुले असलेले, इंटरनेटवर आधारित आणि बहुधा विनामूल्य उपलब्ध असलेले संरचित अभ्यासक्रम असतात. भारतामध्ये UGC, AICTE आणि शिक्षण मंत्रालयाने SWAYAM, NPTEL, DIKSHA यांसारखे MOOC प्लॅटफॉर्म सुरू केले आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 (NEP 2020) मध्ये डिजिटल शिक्षण, ऑनलाईन अभ्यासक्रम आणि MOOC चा प्रभावी वापर करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

"MOOC म्हणजे असा ऑनलाइन अभ्यासक्रम ज्यामध्ये मोफत व मुक्त नोंदणीची सुविधा, सार्वजनिकरीत्या सामायिक केलेला अभ्यासक्रम आणि खुल्या स्वरूपाचे परिणाम असतात. MOOCs मध्ये सामाजिक नेटवर्किंग, सहज उपलब्ध ऑनलाइन संसाधने यांचा समावेश असतो आणि शिक्षण क्षेत्रातील आघाडीच्या तज्ज्ञांकडून हे अभ्यासक्रम मार्गदर्शित केले जातात." (मॅकॉली, बोनी, जॉर्ज आणि डेव्ह, 2010)

2011 साली स्टॅनफोर्ड विद्यापीठ आणि मॅसेच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (MIT) यांनी सुरू केलेल्या एका खुल्या ऑनलाइन अभ्यासक्रमामुळे MOOCs विषयी जनतेमध्ये मोठ्या प्रमाणावर रस निर्माण झाला. या अभ्यासक्रमाला 190 पेक्षा अधिक देशांतील 1,60,000 हून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली (पोर्टर, 2015).

2015 मध्ये Coursera हे सर्वात मोठे MOOC व्यासपीठ ठरले असून एकूण MOOCs पैकी 33% अभ्यासक्रम Coursera वर उपलब्ध होते. याच काळात MiriadaX हे अमेरिकेबाहेरील पहिले MOOC व्यासपीठ ठरले, ज्यावर दहा लाखांहून अधिक नोंदणीकृत विद्यार्थी होते. जगभरातील स्पॅनिश भाषिक बाजारपेठेचा लाभ घेत MiriadaX ने ही कामगिरी साध्य केली.

SWAYAM-

भारत सरकारच्या SWAYAM मंचावरून विविध विद्यापीठे आणि संस्थानी MOOC उपलब्ध करून दिले आहेत. याचा लाभ अनेक विद्यार्थी घेत आहेत.

"महाज्ञानदीप" (MahaDnyandep)

महाज्ञानदीप हे महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षणाच्या डिजिटलीकरणासाठी विकसित करण्यात आलेले ऑनलाईन शिक्षण व्यासपीठ (Digital Learning Platform) आहे. हे व्यासपीठ प्रामुख्याने मुक्त व दूरस्थ शिक्षण (Open and Distance Learning) तसेच ऑनलाईन शिक्षण (Online Education) यांना चालना देण्यासाठी, भौगोलिक, आर्थिक व सामाजिक अडचणींमुळे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवणे. NEP 2020 नुसार लवचिक, सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची आवश्यकता MOOCs व ई-लर्निंगद्वारे आजीवन शिक्षणाला प्रोत्साहन देणे या साठी प्रामुख्याने तयार करण्यात आले आहे.

MOOCs संदर्भात भारतामध्ये व जागतिकस्तरावर झालेल्या पूर्व संशोधनांचा घेतलेला आढावा-

1. THE EFFECTIVENESS AND CHALLENGES OF MOOC FOR LEARNING

Lay Huah, Goh Wawasan Open University, Georgetown, Malaysia

Email: lhgoh@wou.edu.my

Asia Pacific Journal of Contemporary Education and Communication Technology (APJCECT) ISBN: 978 0 9943656 82; ISSN: 2205-6181 Year: 2017, Volume: 3, Issue: 1 www.apiar.org.au

या संशोधनात एकविसाव्या शतकातील वेब-तंत्रज्ञानाच्या साहाय्याने राबविण्यात आलेल्या Action Research आधारित MOOC (arMOOC) ची परिणामकारकता तपासण्यात आली आहे. वावासन ओपन युनिव्हर्सिटीने 3 महिन्यांच्या कालावधीत 4 मॉड्यूल्सचा ऑनलाइन अभ्यासक्रम राबविला. 10 देशांतील 368 सहभागी शिकणाऱ्यांच्या अनुभवांवर आधारित माहिती ऑनलाइन प्रश्नावलीद्वारे संकलित करण्यात आली. बहुसंख्य सहभागी विद्यार्थ्यांनी MOOC अनुभव चांगला किंवा उत्कृष्ट असल्याचे नमूद केले; मात्र शिकणाऱ्यांचा सातत्यपूर्ण सहभाग व अभ्यासक्रम पूर्णता दर कमी असणे ही प्रमुख आव्हाने आढळून आली.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

2. भारतातील अभियांत्रिकी व विज्ञान शिक्षणामध्ये MOOCs आणि वर्गाधारित शिक्षणाचे तुलनात्मक मूल्यमापन : MOOC धोरणाचे मूल्यमापन

अनुराग मेहरा,
भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT) मुंबई, भारत
प्रमथ कांत,
भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT) मुंबई, भारत

युरोपियन कॉन्फरन्स ऑन एज्युकेशन 2024

या संशोधनामध्ये २०१६ साली भारत सरकारने SWAYAM हे धोरण लागू केले. या धोरणानुसार भारतातील MOOCs (Massive Open Online Courses) हे उच्च शिक्षणामधील पारंपरिक वर्गाधारित शिक्षणाचा पर्याय म्हणून वापरता येऊ शकतात. या धोरणाचा मुख्य उद्देश गुणवत्तापूर्ण शिक्षणसामग्रीपर्यंत व्यापक प्रवेश देणे व श्रेयांकन (Credit Transfer) सुलभ करणे हा होता. मात्र, हे धोरण लागू झाल्यानंतर आजपर्यंत उच्च शिक्षणावर MOOCs धोरणाचा परिणाम अभ्यासणारे संशोधन मर्यादित आहे.

या संशोधनात धोरण मूल्यमापन चौकट (Policy Evaluation Framework) वापरून SWAYAM MOOC धोरणाचा उच्च शिक्षणातील प्रमुख हितधारकांवर—विद्यार्थी व प्राध्यापक—होणारा परिणाम तपासण्यात आला आहे. यासाठी देशभरातील विविध अभियांत्रिकी व विज्ञान महाविद्यालयांमधून संकलित करण्यात आलेल्या ५०० पेक्षा अधिक सर्वेक्षण प्रतिसादांचा वापर करण्यात आला. संख्यात्मक (Quantitative) व गुणात्मक (Qualitative) पद्धतींच्या आधारे विद्यार्थ्यांचे व प्राध्यापकांचे MOOCs आणि पारंपरिक वर्गाधारित शिक्षणाबाबतचे अनुभव व दृष्टिकोन तपासले गेले.

अभ्यासातून असे दिसून आले की SWAYAM अंतर्गत चालणारे सध्याचे MOOCs हे समोरासमोर चर्चा, प्रत्यक्ष कौशल्य विकास व वास्तव जीवनाशी निगडित अनुभव देण्यात अपयशी ठरतात, जे अभियांत्रिकी व विज्ञान शिक्षणासाठी अत्यावश्यक आहेत. तथापि, विद्यार्थी व प्राध्यापक दोघेही हे मान्य करतात की MOOCs मुळे शिक्षणातील लवचिकता वाढते आणि अभ्यासक्रमाबाहेरील ज्ञान समृद्ध होते. असे मत व्यक्त केले.

3. Massive Trends and Patterns in Massive Open Online Courses: Review and Content Analysis of Research on MOOCs (2008-2015)

Aras Bozkurt[1], Ela Akgün-Özbek[2], Olaf Zawacki-Richter[3]
[1],[2] Anadolu University, Turkey
[3] Carl von Ossietzky University of Oldenburg, Germany

या संशोधनामध्ये Massive Open Online Courses (MOOCs) ही संकल्पना सखोलपणे समजून घेण्यासाठी MOOCs वरील संशोधनातील प्रवृत्ती (trends) आणि नमुने (patterns) ओळखणे व त्यांचे मॅपिंग करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या उद्देशाने सदर संशोधनात 2008 ते 2015 या कालावधीत समिक्षित (peer-reviewed) नियतकालिकांत प्रकाशित झालेल्या 362 अनुभवाधारित (empirical) संशोधन लेखांचा आढावा घेण्यात आला आहे. या अभ्यासासाठी आशय विश्लेषण (Content Analysis) व संवाद विश्लेषण (Discourse Analysis) या पद्धती वापरण्यात आल्या. दरवर्षी प्रकाशित होणाऱ्या लेखांची वाढती संख्या पाहता MOOCs वरील संशोधन भविष्यात अधिक वाढण्याची शक्यता दिसून येते.

संशोधन क्षेत्रांच्या दृष्टीने पाहता असमतोल आढळून येतो, कारण एकूण पंधरा संशोधन क्षेत्रांपैकी केवळ तीन क्षेत्रे MOOCs वरील अर्ध्याहून अधिक संशोधन व्यापतात. MOOCs च्या प्रकारांबाबत पाहिले असता, **MOOCs** वरचे संशोधन अधिक प्रमाणात आढळते. MOOCs संदर्भातील संशोधन लेखांतील संवाद प्रामुख्याने तटस्थ स्वरूपाचा आहे; तथापि, सकारात्मक दृष्टिकोन असलेले लेख नकारात्मक लेखांपेक्षा अधिक आहेत आणि अलीकडील काळात चिकित्सक (critical) संवाद वाढत असल्याचेही आढळते. संशोधक प्रामुख्याने सैद्धांतिक किंवा संकल्पनात्मक अभ्यासांना प्राधान्य देतात; मात्र, MOOCs वरील बहुतेक संशोधन सैद्धांतिक चौकटींचा पुरेसा उपयोग करत नाही.

Impact of feedback in students' engagement: The case of MOOCs

Researcher- Nikolaos FLORATOS
Advisors: Dr. Teresa Guasch and Dr. Anna Espasa

Submitted in fulfilment of the requirements for the degree of Doctor of Philosophy
Doctorate School Universitat Oberta de Catalunya February 2021

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

या संशोधनात MOOCs मधील विद्यार्थ्यांच्या सहभागावर (Student Engagement) अभिप्रायाचा (Feedback) प्रभाव अभ्यासण्यात आला. MOOCs मध्ये विद्यार्थ्यांचा कमी सहभाग ही मोठी समस्या लक्षात घेऊन, या संशोधनाचा उद्देश वापरल्या जाणाऱ्या अभिप्राय पद्धती आणि त्यांचा सहभागावर होणारा परिणाम समजून घेणे हा होता. या अभ्यासासाठी 40 MOOCs मधील 2660 विद्यार्थ्यांच्या प्रतिसादांचे विश्लेषण करण्यात आले.

संशोधनातून असे आढळले की MOOCs मध्ये प्रामुख्याने स्वयंचलित प्रणाली, सहकारी विद्यार्थी (Peer) आणि काही प्रमाणात स्वमूल्यमापनाद्वारे अभिप्राय दिला जातो. बहुतेक अभिप्राय लेखी स्वरूपाचा, त्वरित दिला जाणारा आणि एकतर्फी असतो. अनेक वेळा अभिप्राय हा केवळ कौतुक किंवा प्रयत्नांचे अभिनंदन करणारा असतो; मात्र शिकण्यातील आशय स्पष्ट करणारा अभिप्राय तुलनेने कमी आढळतो.

अभिप्रायाचा प्रकार, आशय, वेळ आणि देणारा घटक यांचा विद्यार्थ्यांच्या सहभागावर लक्षणीय प्रभाव दिसून आला. संशोधनातून स्पष्ट झाले की विद्यार्थ्यांचा सहभाग केवळ त्यांच्या क्रियाशीलतेवर अवलंबून नसून, अभिप्रायाशी संबंधित विविध घटकांवरही तो अवलंबून असतो. या अभ्यासातून MOOCs मधील विद्यार्थी सहभाग मोजण्यासाठी उपयुक्त ठरतील असे सहा महत्त्वाचे घटक ओळखण्यात आले असून, भविष्यात प्रभावी व सहभागवर्धक अभिप्राय पद्धती विकसित करण्यासाठी हे निष्कर्ष मार्गदर्शक ठरू शकतात.

4. MOOCs in Higher Education: Current Trends in India and Developed Countries

Harsh Vardhan Pant,
Graphic Era Hill University, Bhimtal, India & Amrapali Institute, Haldwani, India
Manoj Chandra Lohani
https://orcid.org/0000-0002-3017-164X Graphic Era Hill University, Bhimtal, India **Jeetendra Pande**
https://orcid.org/0000-0003-1750-0231 Uttarakhand Open University, India

या संशोधनामध्ये भारतासारख्या देशात, जिथे दुर्गम व ग्रामीण भागात राहणाऱ्या मोठ्या लोकसंख्येला कौशल्यविकास व दर्जेदार शिक्षणाची पुरेशी संधी उपलब्ध नाही, तेथे MOOCs महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. भारतीय विद्यार्थ्यांमध्ये प्रमाणित (Standardized) शिक्षण मिळवण्यासाठी MOOCs विषयी निश्चितच वाढता कल दिसून येत आहे. या क्षेत्रात भारतीय विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर रस दाखवत असल्यामुळे सरकारचाही कल MOOCs कडे वाढताना दिसतो. हीच प्रवृत्ती कायम राहिल्यास, पुढील 2 ते 3 वर्षांत भारतात अनेक MOOC सेवा प्रदाते कार्यरत होतील, अशी शक्यता आहे. MOOCs समोरील आव्हानेही तितकीच महत्त्वाची आहेत. एड्युर्का (Edureka) या ऑनलाइन शिक्षण पोर्टलचे सहसंस्थापक विनीत चतुर्वेदी यांच्या मते, "अभ्यासक्रम पूर्ण करण्याची प्रेरणा आणि तात्काळ शंका निरसन ही शिकणाऱ्यांची मूलभूत गरज आहे; मात्र MOOCs मध्ये या गरजा पूर्णपणे भागवल्या जात नाहीत, त्यामुळे अनेक विद्यार्थी मध्येच अभ्यासक्रम सोडून देतात.

युरोपियन विद्यापीठे आणि इतर विकसित देशांच्या संदर्भात पाहता, त्यांनी MOOC विकास आणि अंमलबजावणीसाठी तातडीने अधिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. अन्यथा, हे संपूर्ण क्षेत्र इतर देशांमधून येणाऱ्या उपक्रमांनी व्यापले जाईल. युरोपियन देशांची सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी इतर देशांपेक्षा वेगळी असल्यामुळे, तेथील MOOCs स्थापन करण्यामागील प्रेरणा देखील वेगळी असू शकते. तथापि, MOOCs च्या प्रभावी वापरातून SDG-4 (सर्वांसाठी समावेशक व गुणवत्तापूर्ण शिक्षण) हे उद्दिष्ट निश्चितच साध्य करता येऊ शकते.

5. Building MOOC Design on Learners: An Action Research Study

Mrs. Meghan Perdue,
Graduate School of Education College of Professional Studies North eastern University Boston, Massachusetts March 23, 2023

Submitted in fulfilment of the requirements for the degree of Doctor of Education

या संशोधनामध्ये कृती संशोधनाद्वारे शिक्षण व कार्यक्षेत्रातील व्यावहारिक समस्या सोडवण्याचा अनुभव घेतला. सुरुवातीला, सहभागींचा संशोधनात समावेश करण्याची कल्पना अनोळखी वाटली, परंतु प्रकल्पादरम्यान सहभागींच्या सहभागामुळे संशोधन अधिक प्रभावी व परिणामकारक ठरले. लेखकाला या पद्धतीबाबत आदर निर्माण झाला आणि भविष्यातही ती वापरण्याचा मनोबळ मिळाला.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

सहभागींचे मत आणि अनुभव संशोधनात महत्त्वपूर्ण ठरले. प्रारंभिक चर्चांमुळे समस्या ओळखणे आणि अभ्यासक्रमाची दिशा निश्चित करणे शक्य झाले. फोकस गट आणि सहभागींच्या चर्चांमुळे संशोधनाचे गुणवत्ता वाढली. सहकार्यामुळे लेखकाला स्वतःच्या कामावर आत्मविश्वास मिळाला आणि नेतृत्व कौशल्य विकसित झाले.

संशोधकाने स्वतःच्या कार्यस्थळावर अभ्यास करून प्रणाली आणि निर्णय प्रक्रियेचे निरीक्षण केले. समुदाय व सहकाऱ्यांच्या सहयोगामुळे डेटा, संसाधने आणि कार्यसंस्कृती समजून घेता आल्या. संशोधनातून विद्यमान समस्यांवर प्रभाव पडला आणि समुदायास उपयुक्त निकाल मिळाले.

कृती संशोधनाने व्यावहारिक समस्या सोडवण्याची क्षमता, सहभागींच्या सहकार्याचे महत्त्व, नेतृत्व कौशल्य, आणि कार्यसंस्थांमध्ये प्रभावी प्रवेश शिकवले. यामुळे MOOCs व इतर शैक्षणिक उपक्रमांच्या मूल्यांकन व अंमलबजावणीसाठी प्रभावी मार्ग सुचतो.

संदर्भ -

1. John, W. Best and James, V. Kahn (2004). Research in Education (7th Ed.) New Delhi: Prentic Hall of India.
2. Creswell, J.W. (2005). Education Research (2nd Ed.) New Jersey. Pearson Prentic Hall.
3. Pamela, Lomax. And Jach, Whitehead. (2003) You and Your Action Research. Jean Mchiffi.
4. McAuley, A., Stewart, B., Siemens, G., & Cormier, D. (2010). *The MOOC model for digital practice*.
5. Hew, K. F., & Cheung, W. S. (2014). *Students' and instructors' use of massive open online courses (MOOCs): Motivations and challenges*.
6. Kizilcec, R. F., Piech, C., & Schneider, E. (2013). *Deconstructing disengagement: Analyzing learner subpopulations in MOOCs*.
7. Stringer, E. T. (2014). *Action Research* (4th ed.). Sage Publications.
8. Goh, L. H. (2017). *The effectiveness and challenges of MOOC for learning*. **Asia Pacific Journal of Contemporary Education and Communication Technology (APJCECT), 3**(1). ISBN: 978-0-9943656-82; ISSN: 2205-6181. Retrieved from https://www.apiar.org.au
9. Mehra, A., & Kant, P. (2024). *Comparative evaluation of MOOCs and classroom-based learning in engineering and science education in India: An evaluation of MOOC policy*. In **Proceedings of the European Conference on Education 2024**.
10. Bozkurt, A., Akgün-Özbek, E., & Zawacki-Richter, O. (2016). *Trends and patterns in massive open online courses: Review and content analysis of research on MOOCs (2008–2015)*. **International Review of Research in Open and Distributed Learning, 17**(5), 118–146.
11. Floratos, N. (2021). *Impact of feedback in students' engagement: The case of MOOCs* (Doctoral dissertation). Universitat Oberta de Catalunya, Spain.
12. Pant, H. V., Lohani, M. C., & Pande, J. (2020). *MOOCs in higher education: Current trends in India and developed countries*. **International Journal of Education and Development Using Information and Communication Technology**, 16(2), 58–72.
13. Perdue, M. (2023). *Building MOOC design on learners: An action research study* (Doctoral dissertation). Northeastern University, Boston, MA, USA.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

नंदुरबार जिल्ह्यातील पर्यटनाचा विकास, संधी, समस्या आणि उपाययोजना एक अभ्यास (सारंगखेडा, प्रकाशा, तोरणमाळ)

डॉ. रघुनाथ धनालाल चौधरी
एस. जे. एम. एस. एम. चे
श्री. बापूसाहेब व्हि. सी. चौधरी
कला व वाणिज्य महाविद्यालय खापर,
जि. नंदुरबार
Email-rdcchinu1973@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180228
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 126-129
February 2026
Submitted: 25 Jan. 2026
Revised: 31 Jan. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

महाराष्ट्राच्या उत्तर-पश्चिम भागात वसलेल्या खानदेशात नंदुरबार जिल्हा आहे. १ जुलै १९९८ रोजी नंदुरबार जिल्ह्याची निर्मिती झाली. नंदुरबार हा आदिवासी बहुल जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यात भिल्ल, पावरा, कोकणी हया प्रमुख आदिवासी जमाती असून येथे शेती हा मुख्य व्यवसाय आहे. तापी ही मुख्य नदी असुन सारंगखेडा व प्रकाशा ही धार्मिक स्थळे तापी नदी किनारी आहेत. तापी नदीवर सारंगखेडा व प्रकाशा येथे मोठे बॅरेज बांधण्यात आले आहे. नंदुरबार जिल्ह्याच्या उत्तरेला सातपुडाच्या पर्वत रांगा असून हया पर्वत रांगेत तोरणमाळ हे महाराष्ट्रातील क्रमांक दोनचे थंड हवेचे ठिकाण आहे. भोगोलिक, पर्यावरणीय, सांस्कृतिक व धार्मिक वैशिष्ट्यांमुळे येथे पर्यटनाच्या दृष्टीने मोठी संधी आहे. परंतु पायाभूत सुविधांचा अभाव, प्रचार-प्रसाराच्या मर्यादा इ. बाबींमुळे पर्यटनाचा अपेक्षित विकास झालेला नाही. या शोधनिबंधात सारंगखेडा, प्रकाशा आणि तोरणमाळ येथील पर्यटन विकासाच्या समस्या, संधी व उपाययोजना यांचा अभ्यास करुन पर्यटनाच्या माध्यमातून जिल्ह्याचा विकास कसा साधता येईल याचे विश्लेषण करण्यात आले आहे.

प्रस्तावना-

पर्यटन हा सामाजिक-आर्थिक विकासाचा महत्त्वाचा घटक असून दुर्गम व आदिवासी भागाच्या विकासासाठी प्रभावी साधन ठरु शकते. पर्यटन हा आधुनिक काळातील वेगाने विकसित होणारा उद्योग असून तो केवळ विरंगुळयाचे साधन न राहता रोजगार निर्मिती, पायाभूत सुविधा, सांस्कृतिक जतन आणि प्रादशिक समतोल विकासाचे माध्यम बनले आहे. भारतात पर्यटन क्षेत्राला सेवा क्षेत्राचा कणा मानले जाते. महाराष्ट्रात कोकण, सहयाद्री, विदर्भ व खानदेश अशा विविध भौगालिक विभागांमध्ये पर्यटनाच्या मोठ्या संधी आहेत. खानदेशातील नंदुरबार जिल्हा हा आदिवासीबहुल, डोंगराळ व दुर्गम भाग असून येथे नैसर्गिक सौंदर्य व सांस्कृतिक वारसा मोठ्या प्रमाणावर आढळतो, नंदुरबारला लागून गुजरात व मध्यप्रदेशच्या सिमा आहेत. सारंगखेडा येथे सर्वात मोठी यात्रा भरते, प्रकाशा हे दक्षिण काशी म्हणून ओळखले जाते, तोरणमाळ हे महाराष्ट्रातील क्रमांक दोनचे थंड हवेचे ठिकाण आहे. . नंदुरबार हे जिल्ह्याचे ठिकाण असुन येथे मिरची व्यापारीची मोठी बाजारपेठ आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. रघुनाथ धनालाल चौधरी, एस. जे. एम. एस. एम. चे श्री. बापूसाहेब व्हि. सी. चौधरी कला व वाणिज्य महाविद्यालय खापर, जि. नंदुरबार

How to cite this article:
चौधरी, . रघुनाथ . धनालाल . (2026). नंदुरबार जिल्ह्यातील पर्यटनाचा विकास, संधी, समस्या आणि उपाययोजना एक अभ्यास (सारंगखेडा, प्रकाशा, तोरणमाळ). *Journal of Research and Development,* 18(2(*XIV*)), 126–129.
https://doi.org/10.5281/zenodo.18797861

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18797861

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

उद्दीष्टे-

सारंगखेडा, प्रकाशा आणि तोरणमाळ येथील सद्यस्थिती अभ्यासणे.
पर्यटन विकासातील प्रमुख समस्या ओळखणे.
सारंगखेडा, प्रकाशा आणि तोरणमाळ येथील पर्यटन विकासातील संधीचा अभ्यास करणे.
सामाजिक व आध्यात्मिक पर्यटन संकल्पना समजून घेणे.
पर्यटनस्थळांचे आध्यात्मिक महत्व अभ्यासणे.

संशोधन पध्दती-

हा शोधनिबंध वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीने साकार करण्यात आला आहे. यासाठी पुढील संदर्भ साधनांचा वापर करण्यात आला आहे.

पर्यटन, संस्कृती व धर्मावरील पुस्तके, शासकीय प्रकाशने व पर्यटन अहवाल, खानदेश जिल्हा गॅझेटियर
संशोधन लेख व वृत्तपत्रे.

पर्यटनाची संकल्पना-

पर्यटन हा शब्द १३ व्या शतकापासून प्रचलित झाला आहे. Tourism या इंग्रजी शब्दाचे पर्यटन हे मराठी रुपांतर होय. Tour या लॅटिन अमेरिकन भाषेतील Tourism या शब्दापासून तयार झाला आहे.

पर्यटक- पर्यटन संकल्पनेचा मूल आधारच पर्यटक हा आहे. पर्यटक (Tourist) हा शब्ददेखील लॅटिन शब्द Tornus पासूनच निर्माण झालेला आहे. Tornus पासून Tour व पूढे Tourist अर्थात प्रवास करणारा या प्रमाणे पर्यटक संकल्पना उदयास आली.

सन १९४५ मध्ये युनोने पुढील प्रमाणे पर्यटकाची व्याख्या केली आहे. "एखादया देशात २४ तासांपेक्षा जास्त आणि कायम स्वरुपाची वस्ती न करण्याच्या हेतूने सहा महिन्यांपेक्षा कमी वास्तव्य करणारी व्यक्ती म्हणजे पर्यटक होय."

सारंगखेडा-

खानदेशात अनेक ठिकाणी यात्रा भरतात. प्रत्येक ठिकाणच्या यात्रेचे महत्व वेगळे असते. परंतु या सर्व यात्रांमध्ये सर्वात मोठी आणि जास्त काळ चालणारी यात्रा ही सारंगखेडा येथे भरते. सारंगखेडा हे तापी नदी किनारी वसलेले गाव असून शहादा शहरापासून १५ कि.मी. अंतरावर आहे. याठिकाणी एकमुखी दत्ताचे मंदिर असुन दरवर्षी दत्त जयंती निमित्त येथे भव्य यात्रा भरते. या यात्रेला सुमारे ३०० वर्षाचा इतिहास आहे. सारंखेडा यात्रा ग्रामीण पर्यटनाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. शहरातील पर्यटकांना ग्रामीण जीवन, आदिवासी संस्कृती व पारंपारिकतेचे दर्शन घडते. या यात्रेमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठा फायदा होतो. स्थानिक हस्तकला विक्री, खाद्यपदार्थ, वाहतूक व्यवसाय, निवास व्यवस्था, गाडी पार्किंगची सोय इ. बाबींमुळे स्थानिकांना हंगामी रोजगार उपलब्ध होतो. सारंगखेडा हे ठिकाण गुजरात आणि मध्यप्रदेश या दोन राज्यांच्या सिमेवर आहे. त्यामुळे या यात्रेत मोठ्या संख्येने लोक येतात. परिणामी सामाजिक व जातीय सलोखा प्रस्थापित होतो. ऐकमेकांच्या विचारांचे आदान प्रदान होते. परंपरा आणि संस्कृतीचे जतन होते. नवीन पिढीला सांस्कृतिक वारशाची ओळख मिळते. सारंगखेडा येथील तापी नदीवर मोठे बॅरेज बांधण्यात आले आहे. या ठिकाणी अडविलेल्या पाण्यामुळे ११,५१९ हेक्टर जमीन सिंचनाखाली आली.

आर्थिक महत्व-

चेतक महोत्सव- दत्त जयंती निमित्ताने आयोजित केलेल्या यात्रेत चेतक महोत्सव आयोजित केला जातो. हा भारतातील क्रमांक दोनचा मोठा घोडे बाजार आहे. जिथे मारवाडी, काठियावाडी, नुकरा आणि पंजाबी जातीचे घोडे येतात. या बाजारात मोठी आर्थिक उलाढाल होते. डिसेंबर २०२५ मध्ये भरलेल्या यात्रेत सुमारे २८०० पेक्षा जास्त घोडे विक्रीसाठी दाखल झाले होते. त्यापैकी ३१५ घोड्यांच्या विक्रीतून सुमारे १ कोटी ५३ लाख ९९ हजार ६०० रुपयांची उलाढाल झाली.

यात्रेदरम्यान शेती अवजारांची मोठी खरेदी-विक्री होते. अनेक शेतकरी त्यांना वर्षाभरासाठी लागणारे साहित्य येथे खरेदी करतात. यामुळे मोठी आर्थिक उलढाल होते. तसेच मुलांचे खेळणी, घरासाठी दैनंदिन लागणाऱ्या वस्तू, भांडी इ. मोठया प्रमाणावर खरेदी होते. यासाठी महाराष्ट्र, गुजराथ आणि मध्यप्रदेशातील व्यापारी येतात. डिसेंबर २०२५ मध्ये भरलेल्या यात्रेत सुमारे विस हजार लोकांना रोजगार उपलब्ध झाला.

प्रकाशा- भारतातील विविध भागातील तीर्थक्षेत्र आणि धार्मिक स्थळे लाखो भक्तांचे आकर्षण असतात. खानदेशातील नंदुरबार जिल्हयातील प्रकाशा हे तीर्थक्षेत्र दशातील धार्मिक परंपरेतील महत्वाचे केंद्र मानले जाते. प्रकाशा हे दक्षिण काशी म्हणून ओळखले जाते.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

प्रकाशा हे ठिकाण ऐतिहासिक माहिती प्रमाणे प्राचीन काळापासून तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिध्द आहे. येथे अनेक प्राचिन मंदिर व धार्मिक स्थळे आहेत. त्यामुळे येथे देशभरातून भाविक येत असतात. विविध पुराणकथा व पौराणिक मान्यता प्रकाशाला हिंदू धर्मीय दृष्या पवित्र मानतात. प्रकाशा येथे प्रमुख केदारेश्वर मंदिर आणि संगमेश्वर मंदिर यांसारखी मंदिरे आहेते. माहितीनुसार येथे १०८ शिवमंदिरे आहेत. त्यामुळे येथे भक्तांचे नित्य आगमन होते. उत्तर भारतातील वाराणसी येथील काशीला जे महत्व आहे ते दक्षिणेच्या भागात प्रकाशाला आहे. त्यामुळेच प्रकाशाला दक्षिण काशी म्हणतात. येथे दर बारा वर्षांनी ध्वज पर्वणी असते. या कार्यक्रमाला लाखो भाविक भेट देतात. ही पर्वणी धार्मिक आणि आध्यात्मिक भावनेचा उत्कृष्ट अनुभव देते. तसेच श्रावण महिन्यात येथे मोठ्या प्रमाणावर भावीक येतात.

प्रकाशा येथे तापी आणि गोमाई नदीचा संगम होतो. येथे तापी सिंचन विकास योजने अंतर्गत २००८ मध्ये एक बॅरेज बांधण्यात आले आहे. या बॅरेज मध्ये २०२४ टीएमसी एवढे पाणी अडवले जाते. या पाण्यावर ८८५६ हेक्टर जमीन ओलीताखाली आली आहे.

तोरणमाळ-

तोरणमाळ हे नंदुरबार जिल्हयातील सातपुडा पर्वतरांगामध्ये वसलेले महाराष्ट्रातील क्रमांक दोन चे थंड हवेचे ठिकाण आहे. तोरणमाळ हे केवळ निसर्गसौंदर्याने नटलेले ठिकाण नसून त्याला धार्मिक, ऐतिहासिक आणि आदिवासी संस्कृतीचे महत्वाचे ठिकाण आहे. तोरणमाळ हे सातपुडा पर्वतरांगेतील सुमारे ११५० मीटर उंचीवर वसलेले आहे. तोरणमाळचे हवामान वर्षभर आल्हाददायक असते. येथे घनदाट वनराई, धबधबे, सीता खाई, खोल दऱ्या आणि डोंगररांगा, सूर्योदय व सूर्यास्ताची मनोहारी दृश्य, यशवंत तलाव, तोरणादेवी मंदिर, गोरखनाथ मंदिर, भगवान शिव व इतर देवस्थाने इ. बाबी असलेले ठिकाण आहे.

तोरणमाळ येथे धार्मिक उत्सवा प्रसंगी आणि पर्यटनासाठी महाराष्ट्र, गुजरात आणि मध्यप्रदेशातील लोक मोठ्या प्रमाणावर येतात. येथे गोरखनाथ मंदिर परिसरात महाशिवरात्रीच्या दिवशी यात्रा भरते. तसेच तोरणादेवी फेस्टिव्हलचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमामुळे स्थानिक व्यापाऱ्यांच्या वस्तूंची विक्री मोठ्या प्रमाणावर होते.

नंदुरबार जिल्हयातील सारंगखेडा, प्रकाशा आणि तोरणमाळ यांचे वैशिष्ट म्हणजे यांचे एकमेकांपासूनचे अंतर खूप कमी आहे. त्यामुळे पर्यटकाला हे तिनही ठिकाणे केवळ दोन दिवसात पाहता येईल. आध्यात्मिक, धार्मिक आणि पर्यटनासाठी या ठिकाणी अनेक सोयी आज आपल्याला दिसतात. सारंगखेडा येथे एकमुखी दत्ताचे मंदिर आहे. हेमंदिरे दुर्मिळ असल्याचे समजले जाते. अनेक लोक प्रकाशा येथे धार्मिक विधी करण्यासाठी येतात, परिसरातील लोक अंत्यविधी आणि अस्थिविसर्जन साठी प्रकाशा येथे येतात. तोरणमाळ येथे सद्या पर्यटनाच्या विकासासाठी कामे सुरु आहेत. असे असले तरी वरिल तिनही ठिकाणी खालील बाबींची पुर्तता केल्यास भारतभरातील पर्यटक येथे येतील,

पर्यटन विकासाच्या समस्या आणि उपययोजना-

सारंगखेडा- सारंगखेडा येथे यात्रा दरम्यानच्या काळातच पर्यटक किंवा यात्रात सहभागी होणारे लोक येतात. ऐरवी येथे दत्तभक्त दर्शनासाठी येतात. तापी नदीवर एक बॅरेज बांधण्यात आले आहे. त्या बॅरेजच्या पाण्याचा उपयोग जलसिंचनासाठी होतो. पण येथे बोटिंग, मासेमारी करण्याच्या सोयी, पोहण्याच्या सोयी, मोठे बगीचे, नवीन पध्दतीचे कारंजे यासारख्या सोयी होणे अपेक्षीत आहे. यामुळे पर्यटक वर्षभर येवू शकतील. तसेच पर्यटकांना राहण्यासाठी चांगले निवासस्थान व उच्च दर्जाच्या हॉटेल असाव्यात. पुष्कर येथील घोडेबाजार भारतात क्रमांक एक वर आहे तर सारंगखेडा येथील घोडेबाजार क्रमांक दोन वर आहे. यावरुन येथील घोडेबाजार महत्त्वाचा असल्याचे दिसते. परंतु यात्रा संपल्यानंतर घोडेबाजार अस्तित्व नाहिसे होते. म्हणून वर्षातील काही दिवस विविध कार्यक्रम आयोजित करुन घोडेबाजाराचे स्थानीक अस्तित्व कायम प्रसिध्दी झोतात ठेवले पाहिजे. असे केल्यास स्थानिकांना रोजगार मिळेल. परिसराचा विकास होईल.

प्रकाशा- उत्तरेत वाराणसी येथील काशीला जागतीक महत्त्व आहे. प्रकाशाला दक्षिण काशी म्हणतात. एकूणच उत्तरेच्या बरोबरीने प्रकाशाला महत्व हवे होते. परंतु तसे दिसत नाही. फक्त यात्रा दरम्यान आणि श्रावण महिन्यात येथे भाविकांची प्रचंड गर्दी असते. येथील मंदीरांचा प्रचार आणि प्रसार करणे गरजेचे आहे. प्रकाशाचे सामाजिक व आध्यात्मिक महत्व विषद करावे. वाराणसी येथे गंगा घाटावर दररोज गंगा आरती केली जाते. तापी नदीला सुर्यकन्या म्हणतात. तापी नदीच्या घाटावर गंगा आरती प्रमाणे आरतीची सोय करावी. तसेच त्याचे महत्व प्रसिध्द करावे. प्रकाशा बॅरेजच्या पाण्यावर पर्यटकांसाठी बोटिंग, पोहणे, मासेमारी यासारख्या सोयी कराव्या.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

निवासासाठी चांगल्या दर्जाच्या हॉटेल सुरु कराव्या. यामुळे पर्यटक वर्षभर येतील. स्थानीकांना रोजगार उपलब्ध होईल. परिसराचा विकास होऊन आर्थिक विकास होण्यास मदत होईल.

तोरणमाळ- तोरणमाळ हे सातपुड्याच्या पर्वतरांगामध्ये वसले आहे. हे महाराष्ट्रातील क्रमांक दोनचे थंड हवेचे ठिकाण आहे. परिसरात अनेक प्रेक्षिनिय स्थळे आहेत. परिसर जंगलाने वेढलेला आहे. अनेक पशु पक्षी येथे वास्तव्य करतांना आढळतात. अनेक प्रकारच्या वन्य औषधी उपलब्ध आहेत. असे असले तरी महाराष्ट्रातील महाबळेश्वर, लोणावळा, खंडाळा यांचा जो विकास झालेला आहे तो अद्यापावेतो येथे झालेला नाही. त्यामुळे पर्यटकांची संख्या मोजक्या प्रमाणावर असते. येथे पर्यटनाच्या दृष्टीने विकास केला तर पर्यटकांना आदिवासी संस्कृतीचे दर्शन होईल, येथील सण-उत्सवाची माहिती होईल, आदिवासींच्या हस्तकलेची ओळख होईल, पर्यटक व स्थानिक लोकांमधील परस्पर संवादामुळे सांस्कृतिक देवाण घेवाण होईल, येथील गोरखनाथ मंदिर, शिव मंदिर आणि तोरणाई मातेचे मंदिर भक्तांना आध्यात्मिकसाठी अनुकूल आहे. त्यामुळे पर्यटकांना आध्यात्मिक शांतता मिळेल. यशवंत तलावावर आधुनिक पध्दतीच्या बोटिंगची सोय व्हावी, पोहणे, मासेमारी यासारख्या बाबींच्या सोयी होणे गरजेचे आहे. यासारख्या सोयी केल्यास पर्यटकांची संख्या वाढेल, स्थानिकांना रोजगार मिळेल.

निष्कर्ष-

नंदुरबार जिल्हयातील सारंगखेडा, प्रकाशा आणि तोरणमाळ ही आध्यात्मिक समृध्दीची महत्वाची केंद्रे आहेत. हा जिल्हा पर्यटन विकासासाठी अत्यंत सक्षम आहे. नैसर्गिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक संपत्ती असूनही तो आजही विकासापासून लांब आहे. योग्य नियोजन, शासकीय धोरणे व स्थानिकांच्या सहभागातून पर्यटनाचा विकास साधने शक्य आहे. पर्यटन विकासामुळे केवळ आर्थिक प्रगतीच नव्हे तर सांस्कृतिक जतन व सामाजिक विकासही साधला जाईल.

संदर्भ साधने-

1. शेंडे प्रशांत- प्रवास आणि पर्यटन व्यवस्थापन
2. वाघ, सोनवणे- पर्यटन भूगोल
3. भाटेवाल, बाविस्कर- पर्यटन भूगोल
4. देशमुख, बी. के. – महाराष्ट्राचा इतिहास, पुणे
5. कुलकर्णी, अ. रा. – खानदेशाचा सांस्कृतिक इतिहास
6. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ – वार्षिक अहवाल
7. भारत सरकार – पर्यटन मंत्रालय अहवाल
8. धुळे जिल्हा गॅझेटियर
9. zpnandurbar.maharashtra.gov.in
10. nandurbar.gov.in
11. महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ – पर्यटन माहिती पुस्तिका

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

मराठी कादंबरी आणि विविधता

डॉ.अतुल पाटील
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगाव
जि. जळगाव
ईमेल-atulp5577@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180229
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 130-133
February 2026
Submitted: 25 Jan. 2026
Revised: 31 Jan. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

प्रस्तुत लेख 'मराठी कादंबरी आणि विविधता' यामध्ये मराठी कादंबरी या साहित्यप्रकाराचा उगम, विकास आणि त्यातील वैविध्यपूर्ण प्रवाहांचा आढावा घेण्यात आला आहे. लेखकाने प्रामुख्याने ग्रामीण कादंबरीवर लक्ष केंद्रित केले असून, १९२० पासून ते २००० नंतरच्या कालखंडातील बदलांचे टप्पे स्पष्ट केले आहेत. सुरुवातीला 'खेड्याकडे चला' या घोषणेमुळे ग्रामीण जीवनाचे चित्रण सुरू झाले, परंतु ते काहीसे अद्‌भुत आणि कल्पनारम्य होते. १९४५ नंतर बा.सि. मर्ढेकर, श्री. ना. पेंडसे आणि गो.नी. दांडेकर यांच्या लेखनातून ग्रामीण वास्तव, निसर्ग आणि माणसाचे नाते अधिक प्रकर्षाने उमटू लागले. १९६० नंतर, ग्रामीण भागातील कष्टकरी लेखक स्वतः लिहायला लागल्याने या साहित्यात सत्याच्या जाणिवा आणि वास्तववादी चित्रण अधिक गडद झाले. लेखामध्ये केवळ ग्रामीणच नव्हे, तर प्रादेशिक, ऐतिहासिक, पौराणिक आणि सामाजिक कादंबऱ्यांच्या वैशिष्ट्यांचीही चर्चा केली आहे. ऐतिहासिक कादंबरीमध्ये इतिहास आणि कल्पनाशक्तीचा संगम कसा साधला जातो, हे 'मोचनगड', 'स्वामी' यांसारख्या उदाहरणांतून स्पष्ट केले आहे. शेवटी, कादंबरी हा प्रकार मानवी जीवनाच्या विविध स्तरांवरील अनुभवांचे आणि भावनिक संघर्षाचे प्रभावी माध्यम असल्याचे लेखकाने नमूद केले आहे.

कीवर्ड्स (Keywords): *मराठी कादंबरी, ग्रामीण साहित्य, वास्तववाद, ऐतिहासिक कादंबरी, सामाजिक आणि राजकीय चित्रण*

प्रस्तावना

मराठी कादंबरी, ग्रामीण साहित्य, वास्तववाद, ऐतिहासिक कादंबरी, सामाजिक आणि राजकीय चित्रणकादंबरी एक साहित्यप्रकार असून त्यातील विषय आणि आशय यांच्यात नेहमी लेखकाच्या अभिव्यक्तीने बदल होतात. लेखक आपापल्या कुवतीप्रमाणे जीवनाला सामोरा जात असतो. त्याचे अनुभव तो त्या कादंबऱ्यांमध्ये समाविष्ट करतो. लेखक विविध अनुभव संग्रहित करीत असतो. व स्वतःची कुवत आणि धर्मानुसार विषयाच्या मांडणीकडे लक्ष देऊन कादंबरीला आकार देत असतो. वाचकांच्या सोयीसाठी कादंबरीचे विविध प्रकार लेखक निर्माण करत असतो. कादंबरीतील अनुभवविश्वावरून आपण साहित्यप्रकाराचे वेगवेगळ्या पद्धतीचे वर्गीकरण करतो.

ग्रामीण जीवनातील सुखदुःखाचे चित्रण करणारी, ग्रामीण जीवनाचे अनुभवविश्व प्रकट करणारी कादंबरी, ग्रामीण कादंबरी म्हणून ओळखली जाते. तसेच एखाद्या प्रदेशाचे चित्रण करणारी कादंबरी तिला प्रादेशिक कादंबरी असे म्हटले जाते. त्याचप्रकारे भावनांचे विश्लेषण करणारी कादंबरी तिला भावनिक कादंबरी असे म्हटले जाते. समाजाचे चित्रण करणारी कादंबरी तिला सामाजिक कादंबरी असे म्हटले जाते. किंवा राजकीय विश्वाचे चित्रण करणारी कादंबरी राजकीय कादंबरी या सदरात मोडली जाऊ शकते. म्हणून या कादंबऱ्यांच्या वेगवेगळ्या प्रकारावरून त्यातला आशयही आपले स्वरूप वेगळ्या प्रकारचे धारण करून वाचकांच्या समोर प्रदर्शित होत असतो.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ.अतुल पाटील , कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगाव जि. जळगाव

How to cite this article:
पाटील, . अतुल . (2026). मराठी कादंबरी आणि विविधता. *Journal of Research and Development,* 18(2(*XIV*)), 130–133. https://doi.org/10.5281/zenodo.18797936

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18797936
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

ग्रामीण जीवनाची संस्कृती आपल्या वेगळेपणाने उठून दिसते. आनंद यादव यांची 'गोतावळा', सदानंद देशमुखांची 'बारोमास' या कादंबऱ्या मराठी साहित्यामध्ये अत्यंत लोकप्रिय असणाऱ्या कादंबऱ्या आहेत. प्रादेशिक कादंबरी आणि ग्रामीण कादंबरी सारख्या वाटत असल्या तरी त्यांच्यामध्ये मूल्यभेद असतो. 'प्रादेशिक' कादंबरीत तेथील प्रदेशाला मध्यवर्ती स्थान असते. तसेच ग्रामीण कादंबरीत ग्रामीण जीवनाचे भावनिक संबंध महत्त्वाची भूमिका बजावतात.

1960 नंतरच्या कादंबरी लेखनामध्ये प्रादेशिक कादंबरीमुळे मोठ्या प्रमाणात बदल झाले. कल्पनारम्यतेच्या विरुद्ध जाऊन वास्तववादी कादंबरी लेखन व्हायला लागले. वास्तववादी कादंबरी लेखनाच्या मुळाशी सभोवतालच्या सृष्टीचे चित्रण करण्याची प्रवृत्ती असते. समाजामधल्या तळागाळातील लोकांच्या जीवनाची चित्रणे रेखाटन, सगळ्या प्रकारची बंधनं झुगारून देऊन समाज जीवनाच्या सर्वच अंगांचे यथार्थ चित्रण या कादंबरी लेखनामध्ये केलेले असतं. लेखक किंवा कादंबरीकार हा सत्य आणि वास्तव घटनांवरच अधिक भर देताना दिसतो. उदाहरणार्थ वि.वा. शिवाडकर यांची 'वैष्णव' त्याचप्रकारे मराठी कादंबरीमध्ये संज्ञाप्रवाह आणि मनोविश्लेषण या दोन्हीही पद्धतीने कादंबरी लिहिली गेलेली आहे. या कादंबऱ्या लेखकांच्या पसंतीसही उतरलेल्या आपल्याला लक्षात येतात. कादंबरीचे ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक, राजकीय, स्त्रीवादी असे प्रकार आपण बघतो. या सगळ्यांचा विचार स्थूल मानाने प्रस्तुत लेखांमध्ये करण्याचा प्रयत्न केला आहे.

1920 नंतर महात्मा गांधीं सारख्या महान नेत्यांच्या नेतृत्वाचा उदय झाला. त्यातून राजकीय आणि सामाजिक कार्यकर्ते यांचे लक्ष खेड्याकडे वळले. 'खेड्याकडे चला' या घोषणेचा परिणाम मानवी जीवनावर खूप मोठ्या प्रमाणावर त्या काळात झाला. त्याचेच प्रतिबिंब म्हणजे भा.वि. वरेरकर यांची 'सात लाखातील एक', रा.भा. पाटील यांची 'सीता', वि.वा.हडप यांची 'गोदाराणी' या कादंबऱ्यांचा विचार केला तर असे दिसते की, खेड्याचा उद्धारातच देशाचा उद्धार आहे. या भावनेतून हे लेखन झालेले दिसते. नंतरच्या कालखंडात 'पाणकळा', 'सराई', 'समरांगण', 'रेशमाच्या गाठी', 'सावलीच्या उन्हात', 'जंगलातील छाया' इत्यादी कादंबऱ्यांमधून ग्रामीण जीवनाचे फारच त्रोटक चित्रण आले आहे. अद्‌भुतरम्यता, कल्पनारम्यता, रंजकता यामुळे खेड्याचं जीवन चित्रीत होते. मात्र वास्तव दर्शनाकडे लेखकाचे दुर्लक्ष झालेलं दिसतं. त्यानंतर 1945 च्या नंतर परिवर्तनाचा काळ आलेला दिसतो. त्यात बा.सि. मर्ढेकर यांनी 'तांबडी माती', 'पाणी' या कादंबऱ्यांमधून आधुनिकीकरणामुळे उध्वस्त होणाऱ्या ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवलेले आहे. या कालखंडात मराठी कादंबरीने समाजनिष्ठ आणि जीवनवादी दृष्टिकोनातून ग्रामीण जीवनातील विविध व्यथा वेदना, समस्या मुखर केल्या आहेत. त्यात विभावरी शिरूरकर यांची 'बळी' श्री. ना. पेंडसे यांची 'एल्गार', 'गारंबीचा बापू', 'कलंदर' गो.नी. दांडेकर यांची 'शितू', 'पडघवली' इत्यादी कादंबऱ्यांचा उल्लेख करता येतो. खेड्यातील लोकजीवनात रूढ असलेल्या धार्मिक समजुती, विधी, रितीरिवाज यांचेही दर्शन या कादंबऱ्यांमधून घडते. याविषयी प्रसिद्ध लेखिका जयश्री नाफडे असे म्हणतात की, "ग्रामीण साहित्य हे खऱ्या अर्थाने माणुसकीचे साहित्य आहे. हे लक्षात घेऊन माणूस आणि निसर्ग, माणूस आणि समाज, माणूस आणि विश्व, माणूस आणि कुटुंब व माणसामाणसातील विविध नात्यांची गुंफण या कादंबऱ्यांनी प्रकट केली आहे."[१] यावरून असे लक्षात येते की, ग्रामीण साहित्य लेखनामधूनच खऱ्या अर्थाने मानवाच्या अंतरंगाचे दर्शन घडते. कारण तेथील माणूस, त्याचे निसर्गाशी असणारे संबंध, समाजाशी असणारे संबंध, त्याच्या कुटुंबातले नातेसंबंध या सगळ्यांचे चित्रणे आपल्याला ग्रामीण साहित्य लेखनात प्रकर्षाने वास्तवावर आधारित असलेले दिसतात. मनोहर तल्हार यांची 'माणूस' कादंबरी या वास्तव चित्रणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. मराठी ग्रामीण दृष्टीने लिहिल्या जाणाऱ्या कादंबऱ्यांच्या पुढच्या अभिनव वाटचालीचा संदर्भ असणाऱ्या ह्या कादंबऱ्या आहेत. 1945 ते 60 या कालखंडाचा विचार केला तर या कालखंडातले ग्रामीण कादंबरीकार हे शहरातून खेड्यात आलेले किंवा समाजातील मध्यमवर्गीय पांढरपेशा वर्गातील नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने शहरात स्थायिक झालेले होते. 1960 नंतर मात्र हळूहळू ही परिस्थिती बदलत गेलेली आहे. मध्यमवर्गीय समाजातील लेखकांबरोबरच खरे कष्टकरी जीवन जगणारा ग्रामीण माणूस लेखन करू लागला. समाजातून संवेदनशील असणारे व्यक्तिमत्व मोठ्या प्रमाणात लिहू लागलेले होते. त्यांच्या कादंबऱ्यांमधून व्यक्त होणाऱ्या जाणीवा ह्या ग्रामीण माणसांच्या सत्याच्या जाणिवा वाटतात. 1960 पर्यंतच्या एकूण ग्रामीण कादंबरीचा आढावा घेतला तर विविध विषयांच्या आणि जीवन अंतरंगांचे वास्तव दर्शन घडवण्याच्या भूमिकेतून हे लेखन झालेले आहे असे दिसते. अण्णाभाऊ साठे यांच्या 'माकडीचा माळ', 'आवडी', 'वैर', 'रानगंगा', 'पाझर', 'वारणेचा वाघ' इत्यादी कादंबऱ्यांमधून रंजकता जाणवत असली तरी वारणेच्या खोऱ्यातील हे लेखन वेगळ्या स्वरूपाचा आशय प्रदर्शित करते. या कादंबऱ्यांमधून पारंपारिक सत्तेविरुद्धचा उद्रेक आणि जातीजातींमधील तणाव, हिंदू मुस्लिम संघर्ष ही स्वातंत्र्योत्तर काळातील वास्तव चित्रणे या कालखंडात लेखनामध्ये आलेले आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागात आणि जीवनात अनेक परिवर्तन येऊ लागली. त्याचे पडसाद साहित्यातही उमटू लागले 1973 साली प्रसिद्ध झालेल्या ना.धो. महानोरांच्या

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

लेखनात रजाकारी चळवळ आणि तिची खेड्यापाड्यांमधून असणारी दहशत चित्रीत झाले आहे. मधु मंगेश कर्णिक यांची 'भाकरी आणि फुल' म्हणजे कोकणातील एका दलित कुटुंबाच्या तीन पिढ्यांची कहाणी आहे. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत विचारांचा प्रभाव आणि परिवर्तनासाठीचा दलितांचा संघर्ष या कादंबरी चित्रीत झालेला आहे. 1980 ते 1990 च्या दशकात ग्रामीण साहित्याची चळवळ मोठ्या प्रमाणात जोर धरू लागली होती. म्हणून या चळवळीने अनेक नव्या लेखकांना लेखनासाठी प्रवृत्त केले होते. 1985 मध्ये गणेश आवटे यांची 'गणगोत' या कादंबरीत एका विवाहित ग्रामीण तरुणीची माहेराकडून होणारी उपेक्षा, सासरी हुंड्यासाठी व मानपाण्यासाठी होणारा छळ आणि स्वतःच्या नवऱ्याकडून होणारी अक्षम्य अवहेलना यातून होणारी मानसिक अवस्था याचं प्रभावी दर्शन या कादंबरीतून घडते. ग्रामीण बोली, भाषेतील निवेदन आणि म्हणी, वाक्प्रचार, प्रतिमांचा वापर या कादंबरीत महत्त्वाचा आहे. 1985 मध्ये बाबाराव मुसळे यांची 'हाल्या हाल्या दूध दे' या कादंबरीमध्ये शेतकऱ्याचे कर्ज घेतल्यामुळे किती मोठ्या प्रमाणावर हाल होतात. याचं प्रत्ययकारी चित्रण केलेले आहे. तसेच रवींद्र शोभणे यांच्या 'कोंडी' या कादंबरीमध्ये सरंजामी अवशेष असणारे जमीनदार आणि आजच्या राजकारणामध्ये निर्माण झालेले नवे नेतेही सामान्य ग्रामीण शेतकऱ्याकडे कोणत्या नजरेने पाहतात. याचे वास्तव चित्रण मांडले आहे. तर ग्रामीण भागात राहणाऱ्या जनतेला आकर्षण असणाऱ्या तमाशाच्या फडातील कलावंतांना कोणकोणत्या समस्या आणि अडचणीतून जावे लागते. हे उद्धव शेळके यांच्या 'डाळिंबाचे दाणे' आणि 'नटरंग' या कादंबऱ्यांच्या माध्यमातून चित्रण प्रकट झाले आहे. खेड्यातील समाजकारण आणि राजकारण हे किती मोठ्या प्रमाणावर विघातक आहे. हे नागनाथ कोत्तापल्ले यांनी 'उलट चालीला प्रवाह' किंवा 'मध्यरात्र' या कादंबऱ्यांच्या माध्यमातून चित्र स्पष्ट केले आहे. 'झेलझपाट' या मधुकर वाकोडे लिखित कादंबरीत आदिवासींमधील माणसांच्या माणूसपणाची बदलती भूमिका आणि सामाजिक संघर्ष याचे विश्लेषण आलेले आहे. पुरुषोत्तम बोरकर यांची 'मेड इन इंडिया' ही कादंबरी बदलत्या ग्रामीण भावविश्वाचे चित्रण करते. रामचंद्र पठारे यांची 'पायल' तसेच सहकार क्षेत्रातील प्रदूषणावर प्रहार करणारी 'विषवृक्षाच्या मुळ्या' ही वासुदेव मुलाटे यांची कादंबरी आणि बोराडे यांची 'आमदार सौभाग्यवती', 'चारापाणी' या कादंबऱ्याही ग्रामीण माणसाचे भयावह वास्तव चित्रण करताना दिसतात. 1991 पासून झालेल्या लेखनामध्ये विश्वास पाटील यांची 'झाडाझडती' रंगनाथ पठारे यांची 'ताम्रपट' सरदार जाधव यांची 'कोयता' सदानंद देशमुख यांची 'तहान' या कादंबऱ्यांमधून राजकारणातील तिरस्कार, द्वेष यांची पार्श्वभूमी, भ्रष्टाचाराचे माजलेले रान आणि ग्रामीण माणसांच्या महत्त्वाच्या प्रश्नांकडे करण्यात आलेली डोळेझाक या सगळ्या प्रवृत्तींकडे ह्या कादंबऱ्यातील लेखन बोट दाखवताना दिसते.

वरील कादंबरी लेखनाचा विचार करता त्यामध्ये राजकारण, समाजकारण, नैसर्गिक आपत्ती, धर्मांधता इत्यादींच्या माध्यमातून ग्रामीण माणसांच्या अडचणींमध्ये होणारी वाढ, शोषण या सगळ्या मागे असणाऱ्या कारणांचा शोध घेणे हे कादंबरी लेखनाचे वैशिष्ट्य आहे. 2000 नंतरच्या कालखंडात ग्रामीण वास्तवातून निर्माण झालेल्या, वास्तव प्रश्नांचा शोध घेणाऱ्या, बदलत्या समाजाचा शोध घेणाऱ्या ज्या लक्षणीय कादंबऱ्या निर्माण झाल्या त्यात 'बारोमास' या कादंबरीचा उल्लेख करावा लागतो. शेतकरी जीवनाला वर्षाचे बारा महिने वेढून बसलेल्या वेदनांमधून या ग्रामीण कादंबरीचा जन्म झालेला आहे. ग्रामीण माणसाची नाळ ही शेतीशी जोडलेली असते. अशा प्रकारचे चित्र कादंबऱ्यांमधून येताना दिसतात. या सगळ्या लेखनाचा विचार केला तर मराठी कादंबरी लेखन जसे जसे वाढत गेले. त्या प्रमाणात तिच्यात बदलही होत गेलेले दिसतात. मराठी ग्रामीण कादंबरी आपले एक वेगळेच स्थान मराठी साहित्यात निर्माण करताना दिसते. 1920 नंतरच्या सुरुवातीच्या कालखंडात ग्रामीण कादंबरी ही प्राथमिक अवस्थेत निर्मित झालेली दिसते. परंतु नवे नवे अनुभव आणि शिक्षणाचा विस्तार झाला. त्यामुळे नवीन लेखक लिहायला लागले. त्यामुळे ग्रामीण कादंबरीचे स्वरूप ज्या प्रमाणात विकसित झाले त्या प्रमाणात कादंबरी ही आशयाच्या दृष्टीने समृद्ध झालेली दिसते. त्यामुळे ग्रामीण कादंबरीची व्यापकता ही मोठ्या प्रमाणावर विस्तृत झाली आहे असे अभ्यासावरून लक्षात येते. वेगवेगळ्या कालखंडामध्ये विविध विषयांची मांडणी या कादंबरी लेखनामध्ये झालेली आहे. सर्व कादंबऱ्यांच्या लेखनामधून समाजातल्या विविध भावना आणि वास्तवाचा आभास या जाणवतो

त्याचप्रमाणे ऐतिहासिक कादंबरी लेखनामधून इतिहासातल्या बारकाव्यांची चित्रे वास्तव आणि कल्पनारम्यतेच्या आधारावर समोर येताना दिसतात. रा. भी. गुंजीकर यांची 'मोचनगड' ही मराठीतली पहिली ऐतिहासिक कादंबरी आहे. ऐतिहासिक कादंबरी ही त्या त्या काळातील जीवनावर आधारलेली असते. त्या त्या काळातील वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न लेखक ऐतिहासिक कादंबरीत करत असतो. इतिहास आणि कल्पना यांचे मिश्रण हे या प्रकारात आढळते. ऐतिहासिक कादंबरी लेखक विशिष्ट कालखंडाचा संदर्भ ऐतिहासिक सत्याला धक्का न लावता देत असतो. त्यामुळे ऐतिहासिक कादंबरीकार वास्तवच मांडण्याचा प्रयत्न करत असतो. ऐतिहासिक कादंबरी लेखनामध्ये अनेक कादंबरीकारांनी हात आजमावले आहेत. त्यात रणजीत देसाई यांची 'स्वामी' ना.स. इनामदार यांची 'झेप', 'झुंज' या कादंबऱ्यांचा विचार करता येतो. एकूणच या कादंबरी प्रकारांमध्ये लेखनाच्या माध्यमातून ऐतिहासिक गोष्टी समोर येतात आणि

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

एका वेगळ्याच संदर्भांचा शोध घेता येतो. त्याचप्रमाणे पौराणिक कादंबऱ्या यांचाही विचार करता येतो. पौराणिक कादंबरी म्हणजे इतिहास समाविष्ट असणाऱ्या कादंबरी सारखेच या प्रकाराचेही स्वरूप असते. या प्रकारामध्ये कल्पनाशक्ती वापरून लेखक घटनांना शब्दबद्ध करतो. तसेच सामाजिक कादंबरी लेखनाचा विचार करताना या कादंबरी लेखनात समाजाच्या जीवनाचे चित्रण समाविष्ट होत असते. सभोवतालच्या समाजाचे सूक्ष्म अवलोकन करून लेखक त्यातील वर्तमान आणि भविष्याच्या कल्पनांचा आभास करण्याचा प्रयत्न करत असतो. मानवी समाजजीवनावर सभोवतांच्या निसर्गाचे प्रतिबिंब उमटत असते. अशा प्रकारचे लेखन अनेक साहित्यिकांनी केले आहे त्यामध्ये काशीबाई कानिटकर यांची 'पालखीचा गोंडा', विभावरी शिरूरकर यांची 'शबरी', 'हिंदोळ्यावर' या कादंबऱ्यांचा उल्लेख करता येतो. त्याचप्रमाणे राजकीय कादंबरी, दलित कादंबरी, आदिवासी कादंबरी अशा अनेक वेगवेगळ्या प्रवाहातून कादंबरी लेखन करण्याचा अनेक लेखकांनी प्रयत्न केलेला आहे.

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की कादंबरी हा प्रकार विस्तृत असला तरी त्यातून वेगवेगळ्या स्तरावर जीवन भावनिकदृष्ट्या अभिव्यक्त होते.

संदर्भ ग्रंथ-

१. जयश्री नाफडे, ग्रामीण प्रादेशिक कादंबरी, विजय प्रकाशन, नागपूर.
२. वसंत बापट, मराठी कादंबरी: तंत्र आणि विकास.
३. नागनाथ कोत्तापल्ले, ग्रामीण साहित्य:स्वरूप आणि शोध, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद,.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी आणि मागास प्रदेशांमध्ये पर्यटनाद्वारे उपजीविकेचे विविधीकरण

सुरेश विठ्ठल चव्हाण [1] डॉ. एस. बी. घुगे [2]

[1]संशोधक विद्यार्थी (अर्थशास्त्र विभाग)

लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पंचवटी, नाशिक.

[2]मार्गदर्शक , सहयोगी प्राध्यापक, कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मनमाड (नाशिक)

ईमेल: sureshchavan75857@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180230
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 134-139
February 2026

Submitted: 25 Jan. 2026
Revised: 31 Jan. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश :

नाशिक जिल्हा हा भौगोलिक, नैसर्गिक व सांस्कृतिक वैविध्याने समृद्ध असून या जिल्ह्यात आदिवासी व मागास समुदायांचे प्रमाण जास्त आढळते. आदिवासी व मागास समुदायांची उपजीविका प्रामुख्याने अल्पउत्पादक शेती, जंगलाधारित साधनसंपत्ती, असंघटित मजुरी आणि पारंपरिक व्यवसायांवर अवलंबून आहे. तथापि, अनिश्चित हवामानातील, शेतीतील मर्यादा, रोजगाराच्या अपुऱ्या संधी आणि वाढते स्थलांतर यांमुळे त्यांच्या सामाजिक-आर्थिक विकासावर मर्यादा येत आहेत. अशा पार्श्वभूमीवर पर्यटन क्षेत्र हे उपजीविकेचे विविधीकरण घडवून आणणारे एक महत्त्वपूर्ण पर्यायी साधन म्हणून पुढे येत आहे. सदर संशोधनात नाशिक जिल्ह्यातील आदिवासी व मागास प्रदेशांमध्ये पर्यटनाद्वारे उपजीविकेचे विविधीकरण कसे घडून येते, याचे विश्लेषण करण्यात आले आहे. धार्मिक, निसर्गाधारित, साहसी, सांस्कृतिक व ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार संधी, उत्पन्नवाढ, आर्थिक सुरक्षितता तसेच जीवनमानातील बदल यांचा अभ्यास करण्यात आला आहे. अभ्यासातून असे निदर्शनास येते की, पर्यटन विकासामुळे पारंपरिक उपजीविकेवरील अवलंबित्व कमी होऊन स्थानिक आदिवासी व मागास समुदायांसाठी उत्पन्नाच्या विविध संधी उपलब्ध होत आहेत. तथापि, पायाभूत सुविधांचा अभाव, कौशल्य विकासाची कमतरता, भांडवलाची मर्यादा व पर्यावरणीय संवर्धनाशी संबंधित आव्हाने ही पर्यटन विकासातील प्रमुख अडथळे ठरत आहेत. त्यामुळे स्थानिक समुदायांचा सक्रिय सहभाग, कौशल्याधारित प्रशिक्षण, शाश्वत पर्यटन धोरणे व शासकीय–खासगी भागीदारी यांच्या माध्यमातून पर्यटन विकास केल्यास आदिवासी व मागास प्रदेशांच्या सर्वांगीण सामाजिक व आर्थिक विकासास चालना मिळू शकते.

प्रस्तावना :

पर्यटन क्षेत्र हे जागतिक तसेच राष्ट्रीय पातळीवर आर्थिक विकास, रोजगारनिर्मिती व सामाजिक परिवर्तनाचे एक प्रभावी माध्यम म्हणून उदयास आले आहे. पर्यटन उद्योगाद्वारे केवळ राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होत नाही, तर स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण होऊन ग्रामीण, आदिवासी व मागास प्रदेशांच्या सामाजिक-आर्थिक विकासाला चालना मिळते. विशेषतः विकासाच्या प्रवाहापासून तुलनेने वंचित राहिलेल्या समुदायांसाठी पर्यटन हे उपजीविकेचे पर्यायी व पूरक साधन ठरू शकते. देशामध्ये आदिवासी व मागास भाग हे प्रामुख्याने डोंगराळ, जंगलयुक्त व दुर्गम स्वरूपाचे असून तेथे शेतीची उत्पादकता मर्यादित आहे. हवामानातील अनिश्चितता, सिंचन सुविधांचा अभाव, औद्योगिक विकासाची मर्यादा व रोजगाराच्या संधींची कमतरता यांमुळे या भागांमध्ये दारिद्र्य, बेरोजगारी व स्थलांतराचे प्रमाण तुलनेने खूपच अधिक आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
सुरेश विठ्ठल चव्हाण , 1संशोधक विद्यार्थी (अर्थशास्त्र विभाग) लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पंचवटी, नाशिक.

How to cite this article:
चव्हाण, . सुरेश . विठ्ठल ., & घुगे, . एस . बी . (2026). नाशिक जिल्ह्यातील आदिवासी आणि मागास प्रदेशांमध्ये पर्यटनाद्वारे उपजीविकेचे विविधीकरण. *Journal of Research and Development,* 18(2(*XIV*)), 134–139.
*https://doi.org/*10.5281/*zenodo.*18797996

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18797996

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

या पार्श्वभूमीवर नैसर्गिक संसाधने, जैवविविधता, धार्मिक स्थळे व सांस्कृतिक वारसा यांचा शाश्वत वापर करून पर्यटन विकास केल्यास या प्रदेशांमध्ये उपजीविकेचे विविधीकरण घडवून आणता येऊ शकते.

महाराष्ट्रराज्यातील नाशिक जिल्हा हा सह्याद्री पर्वतरांगांमध्ये वसलेला असून येथे त्र्यंबकेश्वर, सप्तशृंगी गड, मंगीतुंगी, अंजनेरी, हरिहर किल्ला यांसारखी धार्मिक व निसर्गाधारित पर्यटनस्थळे त्याचप्रमाणे समृद्ध आदिवासी संस्कृती आढळते. जिल्ह्यातील पेठ, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर, दिंडोरी, कळवण व इगतपुरी तालुक्यांमध्ये आदिवासी व मागास समुदायांचे मोठ्या प्रमाणावर वास्तव्य आहे. या समुदायांची उपजीविका प्रामुख्याने अल्पउत्पादक शेती, जंगलाधारित साधनसंपत्ती व असंघटित मजुरीवर अवलंबून असलेली दिसून येते.

अशा परिस्थितीत पर्यटन क्षेत्राद्वारे स्थानिक संसाधनांचा वापर करून रोजगारनिर्मिती, उत्पन्नवाढ व आर्थिक सुरक्षितता साध्य करता येऊ शकते. तथापि, पर्यटन विकासाचा लाभ स्थानिक समुदायांपर्यंत कितपत पोहोचतो, पर्यटनामुळे उपजीविकेचे विविधीकरण कशा प्रकारे घडते, त्याचप्रमाणे या प्रक्रियेत कोणती आव्हाने आहेत, याचा अभ्यास होणे आवश्यक आहे. या उद्देशाने अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

या संशोधनाची उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

i) नाशिक जिल्ह्यातील आदिवासी व मागास प्रदेशांची सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी अभ्यासणे.

ii) पर्यटन क्षेत्रामुळे निर्माण होणाऱ्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार संधींचे विश्लेषण करणे.

iii) पर्यटन विकासाचा स्थानिक आदिवासी व मागास समुदायांच्या उत्पन्न, रोजगार व जीवनमानावर होणारा परिणाम अभ्यासणे.

iv) पर्यटन विकास प्रक्रियेत स्थानिक समुदायांच्या सहभागाची पातळी व स्वरूप अभ्यासणे.

संशोधन पद्धती :

दुय्यम माहिती जनगणना अहवाल, जिल्हा सामाजिक-आर्थिक आढावा, पर्यटन विभागाचे प्रकाशन, संशोधन नियतकालिके व संदर्भग्रंथ यांमधून संकलित करण्यात आली. प्राप्त माहितीचे विश्लेषण सांख्यिकीय तक्त्याच्या साहाय्याने करण्यात आली आहे.

नाशिक जिल्ह्याची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी :

नाशिक जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या उत्तर-पश्चिम भागात वसलेला असून भौगोलिक, सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून अत्यंत वैविध्यपूर्ण असा जिल्हा आहे. सह्याद्री पर्वतरांग, विस्तीर्ण पठार प्रदेश, नदीखोरे व डोंगराळ भूभाग यांचा संयोग हा नाशिक जिल्ह्यात आढळतो. गोदावरी, गिरणा व दारणा या प्रमुख नद्यांमुळे जिल्ह्यातील काही भाग हा शेतीच्या दृष्टीने विकसित झालेला आहे. परंतु डोंगराळ व आदिवासी बहुल भाग तुलनेने मागास राहिलेला दिसून येतो. सामाजिक दृष्ट्या नाशिक जिल्ह्यात विविध जातीय, धार्मिक व सांस्कृतिक समुदायांचे सहअस्तित्व आढळते. जिल्ह्यामध्ये कोकणा, भिल्ल, कोळी, वारली, ठाकूर, महादेव कोळी, कातकरी इत्यादी आदिवासी जमातींचे लक्षणीय प्रमाण आहे. हे आदिवासी समुदाय प्रामुख्याने पेठ, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर, दिंडोरी, कळवण, बागलाण व इगतपुरी तालुक्यांमध्ये वास्तव्यास आहेत. शिक्षण, आरोग्य व मूलभूत सुविधा यांमध्ये या भागांमध्ये तुलनेने मागासलेपण दिसून येते.

आर्थिकदृष्ट्या नाशिक जिल्ह्याची अर्थव्यवस्था प्रामुख्याने कृषी, कृषी-आधारित उद्योग, औद्योगिक क्षेत्र व पर्यटनावर आधारित आहे. द्राक्ष व डाळींब उत्पादन, कांदा व इतर बागायती पिकांमुळे जिल्ह्याचा काही भाग आर्थिकदृष्ट्या प्रगत झाला आहे. तथापि, आदिवासी व डोंगराळ भागांमध्ये शेती ही अल्पउत्पादक, पावसावर अवलंबून व पारंपरिक स्वरूपाची आहे. परिणामी, या भागांमध्ये रोजगाराच्या संधी मर्यादित असून हंगामी स्थलांतराचे प्रमाण अधिक आहे. उद्योग व सेवा क्षेत्राचा विकास प्रामुख्याने नाशिक शहर व त्याच्या आसपासच्या परिसरापुरता मर्यादित आहे. त्यामुळे आदिवासी व मागास तालुक्यांमध्ये आर्थिक असमतोल निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत पर्यटन क्षेत्र हे नाशिक जिल्ह्यातील आदिवासी व मागास प्रदेशांसाठी रोजगारनिर्मिती, उत्पन्नवाढ व उपजीविकेचे विविधीकरण साध्य करण्याचे एक महत्त्वपूर्ण माध्यम ठरू शकते.

पर्यटनाचे प्रकार व उपजीविकेच्या संधी :

पर्यटन क्षेत्र हे विविध स्वरूपांत विकसित होत असून त्याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम स्थानिक पातळीवरील उपजीविकेच्या संधींवर होतो. नाशिक जिल्ह्यातील नैसर्गिक, धार्मिक व सांस्कृतिक वैशिष्ट्यांमुळे येथे पर्यटनाचे विविध प्रकार विकसित होण्याची मोठी क्षमता आहे. या पर्यटन प्रकारांमुळे आदिवासी व मागास प्रदेशांमध्ये उपजीविकेचे विविधीकरण साध्य होऊ शकते.

i) धार्मिक पर्यटन -

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

नाशिक जिल्ह्यात त्र्यंबकेश्वर, सप्तशृंगी गड, मंगीतुंगी, काळाराम मंदिर इत्यादी प्रमुख धार्मिक पर्यटनस्थळे आहेत. या ठिकाणी वर्षभर भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. धार्मिक पर्यटनामुळे स्थानिक लोकांना निवास व्यवस्था, भोजनालये, प्रसाद व पूजासाहित्य विक्री, फुलांची विक्री, वाहतूक सेवा, मार्गदर्शन व इतर सहाय्यक सेवांद्वारे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. विशेषतः आदिवासी व मागास समुदायातील कुटुंबांसाठी धार्मिक पर्यटन हे स्थिर व नियमित उत्पन्नाचे साधन ठरते.

ii) निसर्गाधारित पर्यटन -

सह्याद्री पर्वतरांग, धबधबे, जंगलसंपदा, नद्या व निसर्गरम्य परिसर यांमुळे नाशिक जिल्ह्यात निसर्ग पर्यटनाची मोठी शक्यता आहे. अंजनेरी, हरिहर किल्ला, इगतपुरी परिसर, त्र्यंबक घाट, सप्तशृंगी गड परिसर, भिवतास धबधबा यांसारखी ठिकाणे पर्यटकांना आकर्षित करतात. निसर्ग पर्यटनामुळे स्थानिक युवकांना ट्रेकिंग गाईड, पोर्टर, कॅम्प व्यवस्थापक, वाहनचालक तसेच स्थानिक उत्पादनांच्या विक्रीतून रोजगाराच्या संधी निर्माण होतात.

iii) साहसी पर्यटन -

डोंगराळ भूभाग, किल्ले, जंगल व घाटमार्ग यांमुळे नाशिक जिल्हा साहसी पर्यटनासाठी उपयुक्त आहे. ट्रेकिंग, रॉक क्लाइंबिंग, जंगल सफारी यांसारख्या साहसी उपक्रमांमुळे स्थानिक युवकांना कौशल्याधारित रोजगार मिळू शकतो. यामुळे बेरोजगारी व स्थलांतराचे प्रमाण कमी होण्यास मदत होते.

iv) सांस्कृतिक व आदिवासी पर्यटन -

आदिवासी समाजाची पारंपरिक कला, नृत्य, संगीत, हस्तकला, सण-उत्सव व जीवनशैली यांवर आधारित सांस्कृतिक पर्यटनाला मोठी संधी आहे. आदिवासी महिलांच्या स्वयं-सहायता गटांद्वारे हस्तकला, पारंपरिक खाद्यपदार्थ व कलाकृतींच्या विक्रीमुळे उत्पन्नाचे साधन निर्माण होते. यामुळे सांस्कृतिक जतनासोबतच आर्थिक सबलीकरण घडून येते.

v) ग्रामीण व कृषी पर्यटन -

ग्रामीण जीवनशैली, शेतीपद्धती, द्राक्षबागा, स्थानिक अन्नसंस्कृती यांवर आधारित ग्रामीण व कृषी पर्यटनामुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळू शकते. या प्रकारच्या पर्यटनामुळे कृषी क्षेत्र व पर्यटन क्षेत्र यांमध्ये परस्परसंबंध निर्माण होतो.

६. उपजीविकेचे विविधीकरण (प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार) :

i) प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार तक्ते आणि विश्लेषण

अ) प्रत्यक्ष रोजगार तक्ता -

अ.क्र.	प्रत्यक्ष रोजगाराचा प्रकार	रोजगाराचे स्वरूप	आदिवासी व मागास समुदायांचा सहभाग
१	हॉटेल, लॉज, धर्मशाळा	स्थिर / हंगामी	मध्यम ते उच्च
२	होम-स्टे व्यवस्था	स्थिर	उच्च
३	भोजनालये व चहागृहे	स्थिर / हंगामी	मध्यम
४	पर्यटक मार्गदर्शक	हंगामी	उच्च
५	ट्रेकिंग व साहसी गाईड	हंगामी	उच्च
६	वाहतूक सेवा (ऑटो, जीप, खासगी वाहन)	स्थिर	मध्यम
७	कॅम्प व्यवस्थापन व सुरक्षा	हंगामी	मध्यम

विश्लेषण:

वरील, तक्त्यातून स्पष्ट होते की धार्मिक, निसर्ग व साहसी पर्यटन स्थळांभोवती प्रत्यक्ष रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असून आदिवासी युवकांचा सहभाग प्रामुख्याने मार्गदर्शक, गाईड व कॅम्प व्यवस्थापनामध्ये अधिक आहे.

ब) अप्रत्यक्ष रोजगार -

अ.क्र.	अप्रत्यक्ष रोजगाराचा प्रकार	रोजगाराचे स्वरूप	लाभार्थी घटक
१	हस्तकला व कलावस्तू विक्री	हंगामी	आदिवासी महिला
२	पारंपरिक खाद्यपदार्थ विक्री	हंगामी	स्वयं-सहायता गट
३	कृषी व वनउत्पादन विक्री	हंगामी	शेतकरी, आदिवासी
४	किरकोळ व्यापार	स्थिर	स्थानिक दुकानदार
५	वाहन दुरुस्ती व सेवा	स्थिर	स्थानिक युवक
६	अन्नप्रक्रिया उद्योग	अर्ध-स्थिर	महिला बचत गट

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

विश्लेषण:

अप्रत्यक्ष रोजगार संधी प्रामुख्याने स्थानिक संसाधनांवर आधारित असून महिलांचे आर्थिक सबलीकरण या माध्यमातून अधिक प्रभावीपणे घडून येते.

ii) नाशिक जिल्ह्यातील तालुका-निहाय पर्यटनाधारित रोजगार वितरण -

अ) तालुका-निहाय पर्यटनाधारित रोजगार वितरण

अ.क्र.	तालुका	पर्यटनाचा प्रमुख प्रकार	प्रत्यक्ष रोजगाराची पातळी	अप्रत्यक्ष रोजगाराची पातळी
१	त्र्यंबकेश्वर	धार्मिक व निसर्ग पर्यटन	उच्च	उच्च
२	सुरगाणा	निसर्ग व आदिवासी पर्यटन	मध्यम	मध्यम
३	पेठ	निसर्ग व साहसी पर्यटन	मध्यम	मध्यम
४	दिंडोरी	धार्मिक व ग्रामीण पर्यटन	मध्यम	मध्यम
५	कळवण	धार्मिक व निसर्ग पर्यटन	मध्यम	कमी ते मध्यम
६	इगतपुरी	निसर्ग व साहसी पर्यटन	उच्च	मध्यम

तालुका-निहाय रोजगार वितरणाचे विश्लेषण -

वरील, तक्त्यानुसार त्र्यंबकेश्वर व इगतपुरी तालुक्यांमध्ये पर्यटनाधारित प्रत्यक्ष रोजगाराची पातळी तुलनेने अधिक आहे. धार्मिक पर्यटनामुळे त्र्यंबकेश्वर तालुक्यात स्थिर व हंगामी दोन्ही प्रकारचे रोजगार मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाले आहेत. इगतपुरी तालुक्यात निसर्ग व साहसी पर्यटनामुळे युवकांना मार्गदर्शक व साहसी गाईड म्हणून रोजगाराच्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत.

सुरगाणा, पेठ व दिंडोरी या आदिवासी बहुल तालुक्यांमध्ये पर्यटनाची क्षमता असूनही पायाभूत सुविधांच्या अभावामुळे रोजगारनिर्मितीचे प्रमाण मध्यम स्वरूपाचे आहे. कळवण तालुक्यात धार्मिक पर्यटन असूनही अप्रत्यक्ष रोजगाराची पातळी तुलनेने कमी दिसून येते.

एकूणच, तालुका-निहाय विश्लेषणातून असे स्पष्ट होते की ज्या तालुक्यांमध्ये पर्यटन पायाभूत सुविधा, वाहतूक व प्रचार-प्रसार चांगल्या प्रमाणात विकसित आहेत, तेथे रोजगारनिर्मितीचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे आदिवासी व मागास तालुक्यांमध्ये पर्यटनाधारित रोजगार वाढविण्यासाठी संतुलित व शाश्वत विकास धोरणांची आवश्यकता आहे.

७. सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक परिणाम :

पर्यटन विकासाचा प्रभाव केवळ आर्थिक क्षेत्रापुरता मर्यादित नसून त्याचे सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रांवरही व्यापक परिणाम होताना दिसून येतात. नाशिक जिल्ह्यातील आदिवासी व मागास प्रदेशांमध्ये पर्यटनामुळे सामाजिक रचना, सांस्कृतिक अभिव्यक्ती व आर्थिक व्यवहार यांमध्ये लक्षणीय बदल घडून आले आहेत.

i) सामाजिक परिणाम -

पर्यटन विकासामुळे स्थानिक समुदायांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्याने बेरोजगारीचे प्रमाण काही प्रमाणात कमी झाले आहे. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारामुळे उत्पन्नाची नियमितता वाढली असून स्थलांतराचे प्रमाण घटल्याचे निदर्शनास येते. तसेच पर्यटनाशी निगडित प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे युवक व महिलांमध्ये कौशल्य विकास, आत्मविश्वास व सामाजिक सहभाग वाढलेला आढळतो. पायाभूत सुविधा, जसे की रस्ते, वाहतूक, स्वच्छता, वीज व दळणवळण सेवा यांचा विकास झाल्यामुळे स्थानिक रहिवाशांच्या जीवनमानात सुधारणा झाली आहे. तथापि, काही पर्यटनस्थळांवर लोकसंख्येचा ताण वाढणे व सामाजिक असमतोल निर्माण होण्याची शक्यता देखील आढळते.

ii) सांस्कृतिक परिणाम -

पर्यटनामुळे आदिवासी संस्कृती, कला, नृत्य, संगीत, सण-उत्सव व परंपरांचे जतन व प्रसार होण्यास चालना मिळाली आहे. सांस्कृतिक कार्यक्रम, हस्तकला व पारंपरिक खाद्यपदार्थांच्या माध्यमातून स्थानिक संस्कृतीला नवे व्यासपीठ प्राप्त झाले आहे. यामुळे सांस्कृतिक अस्मिता बळकट होत असल्याचे दिसून येते. मात्र, काही ठिकाणी संस्कृतीचे व्यापारीकरण, परंपरांचा विकृत वापर व सांस्कृतिक शोषण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सांस्कृतिक संवर्धन व संरक्षणाच्या दृष्टीने नियोजनबद्ध धोरणांची आवश्यकता आहे.

iii) आर्थिक परिणाम -

पर्यटन विकासामुळे स्थानिक पातळीवर उत्पन्नवाढ, रोजगारनिर्मिती व आर्थिक क्रियाशीलता वाढली आहे. शेतीवर आधारित एकांगी अर्थव्यवस्थेला पर्यायी उत्पन्नाचे स्रोत उपलब्ध झाल्यामुळे आर्थिक विविधीकरण साध्य झाले आहे. स्थानिक बाजारपेठ,

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

लघुउद्योग, स्वयं-सहायता गट व सेवा क्षेत्र यांना चालना मिळाली आहे. तथापि, हंगामी स्वरूपाचा रोजगार, उत्पन्नातील अस्थिरता व बाह्य गुंतवणूकदारांकडून होणारा लाभाचा केंद्रीकरण हा आर्थिक विकासातील एक महत्त्वाचा अडथळा आहे.

८. आव्हाने :

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी व मागास प्रदेशांमध्ये पर्यटनाद्वारे उपजीविकेचे विविधीकरण करण्यास मोठी क्षमता असली, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या प्रक्रियेत अनेक सामाजिक, आर्थिक, पायाभूत व संस्थात्मक आव्हाने आढळतात. या आव्हानांचा सखोल विचार केल्याशिवाय पर्यटन विकासाचे अपेक्षित लाभ स्थानिक समुदायांपर्यंत पोहोचणे कठीण ठरते.

i) पायाभूत सुविधांचा अभाव -

आदिवासी व डोंगराळ भागांमध्ये रस्ते, वाहतूक, वीजपुरवठा, पिण्याचे पाणी, निवास व्यवस्था व स्वच्छता सुविधा अपुऱ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. या पायाभूत मर्यादांमुळे पर्यटन विकासाची गती मंदावते तसेच पर्यटकांचा कालावधी व खर्च मर्यादित राहतो.

ii) कौशल्य विकास व प्रशिक्षणाची कमतरता -

स्थानिक आदिवासी व मागास समुदायांमध्ये पर्यटनाशी संबंधित व्यावसायिक कौशल्ये, भाषा ज्ञान, व्यवस्थापन क्षमता व सेवा गुणवत्ता यांचा अभाव आढळतो. परिणामी, पर्यटन क्षेत्रातील उच्च उत्पन्न देणाऱ्या संधी बाह्य कामगारांकडे वळतात आणि स्थानिकांचा सहभाग मर्यादित राहतो.

iii) भांडवल व वित्तीय सहाय्याची मर्यादा -

लघुउद्योग, होम-स्टे, हस्तकला व सेवा क्षेत्र सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले भांडवल स्थानिकांकडे मर्यादित असते. बँकिंग सुविधा, कर्जप्रक्रिया व आर्थिक साक्षरतेचा अभाव ही देखील एक महत्त्वाची अडचण ठरते.

iv) पर्यावरणीय आव्हाने -

अनियंत्रित पर्यटनामुळे जंगलतोड, कचरा व्यवस्थापनाची समस्या, जलस्रोतांवर ताण व जैवविविधतेला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. पर्यावरणीय संतुलन न राखल्यास पर्यटन विकास दीर्घकालीन स्वरूपात टिकाऊ ठरणार नाही.

v) स्थानिक सहभागाचा अभाव -

पर्यटन विकासाच्या नियोजन व निर्णय प्रक्रियेत स्थानिक समुदायांचा मर्यादित सहभाग आढळतो. परिणामी, विकासाचे लाभ समतोल पद्धतीने वितरित होत नाहीत व सामाजिक असंतोष निर्माण होण्याची शक्यता वाढते.

९. शाश्वत पर्यटनासाठी उपाययोजना :

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी व मागास प्रदेशांमध्ये पर्यटनाद्वारे उपजीविकेचे विविधीकरण दीर्घकालीन व समावेशक स्वरूपात साध्य करण्यासाठी शाश्वत पर्यटन विकासाची धोरणात्मक अंमलबजावणी अत्यावश्यक आहे. शाश्वत पर्यटनाचा उद्देश आर्थिक विकासासोबतच सामाजिक न्याय, सांस्कृतिक संवर्धन व पर्यावरणीय संतुलन साधणे हा आहे. या दृष्टीने पुढील उपाययोजना महत्त्वपूर्ण ठरू शकतात.

i) स्थानिक समुदायांचा सक्रिय सहभाग -

पर्यटन विकासाच्या नियोजन, अंमलबजावणी व व्यवस्थापन प्रक्रियेत स्थानिक आदिवासी व मागास समुदायांचा सक्रीय सहभाग सुनिश्चित करणे आवश्यक आहे. ग्रामसभा, स्वयं-सहायता गट व सहकारी संस्था यांच्या माध्यमातून निर्णयप्रक्रियेत सहभाग दिल्यास पर्यटनाचे लाभ स्थानिक पातळीवर समानतेने वितरित होऊ शकतात.

ii) कौशल्य विकास व क्षमता निर्माण -

पर्यटनाशी संबंधित मार्गदर्शन, पाहुणचार व्यवस्थापन, भाषा प्रशिक्षण, हस्तकला विकास व डिजिटल कौशल्ये यांसाठी नियमित प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. यामुळे स्थानिक युवक व महिलांचा रोजगारक्षमतेत वाढ होऊन उच्च उत्पन्न देणाऱ्या संधी उपलब्ध होतील.

iii) पर्यावरणपूरक पर्यटन धोरण -

जंगल, जलस्रोत व जैवविविधतेचे संरक्षण लक्षात घेऊन पर्यावरणपूरक पर्यटन धोरणांची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. कचरा व्यवस्थापन, प्लास्टिक वापरावर निर्बंध, निसर्गसंवर्धन जनजागृती व वहनक्षमता (Carrying Capacity) आधारित पर्यटन नियोजन आवश्यक आहे.

iv) पायाभूत सुविधांचा संतुलित विकास -

रस्ते, वाहतूक, स्वच्छता, निवास व्यवस्था व डिजिटल संपर्क सुविधा यांचा विकास करताना पर्यावरणीय व सामाजिक परिणामांचा विचार करणे आवश्यक आहे. स्थानिक गरजांनुसार व टप्प्याटप्प्याने पायाभूत विकास केल्यास पर्यटनाचा शाश्वत विस्तार शक्य होईल.

v) वित्तीय व संस्थात्मक पाठबळ -

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

होम-स्टे, हस्तकला, ग्रामीण पर्यटन व लघुउद्योगांसाठी सुलभ कर्ज, अनुदान व विमा सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. स्वयं-सहायता गट व सूक्ष्म वित्त संस्थांच्या माध्यमातून आर्थिक समावेशन वाढविता येईल.

vi) सांस्कृतिक संवर्धन व संरक्षण -

आदिवासी संस्कृती, कला, परंपरा व जीवनशैलीचे जतन करण्यासाठी नियोजनबद्ध सांस्कृतिक पर्यटन विकसित करणे आवश्यक आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांचे व्यापारीकरण टाळून स्थानिक मूल्यव्यवस्थेचा सन्मान राखणे गरजेचे आहे.

vii) शासकीय–खासगी भागीदारी -

पर्यटन विकासासाठी शासकीय संस्था, खासगी क्षेत्र व स्थानिक समुदाय यांच्यात प्रभावी भागीदारी निर्माण करणे आवश्यक आहे. यामुळे गुंतवणूक, व्यवस्थापन कौशल्य व विपणन क्षमता वाढून पर्यटन विकास अधिक परिणामकारक ठरू शकतो.

निष्कर्ष :

अभ्यासातून असे स्पष्ट होते की पर्यटन क्षेत्र हे पारंपरिक अल्पउत्पादक शेती, जंगलाधारित उपजीविका व असंघटित मजुरीवर असलेले अतिवलंबित्व कमी करण्यासाठी एक प्रभावी पर्यायी व पूरक साधन ठरू शकते. धार्मिक, निसर्गाधारित, साहसी, सांस्कृतिक व ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होऊन उत्पन्नाच्या विविध स्रोतांची निर्मिती होत आहे.

पर्यटन विकासामुळे स्थानिक आदिवासी व मागास समुदायांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा, स्थलांतरात घट, महिलांचे आर्थिक सबलीकरण तसेच सामाजिक सहभागात वाढ झाल्याचे आढळून येते. यासोबतच स्थानिक संस्कृती, कला व परंपरांचे संवर्धन घडून येत असून सामाजिक ओळख अधिक बळकट होत आहे. तथापि, पायाभूत सुविधांचा अभाव, कौशल्य विकासाची कमतरता, वित्तीय मर्यादा, पर्यावरणीय ऱ्हासाची शक्यता व स्थानिक सहभागाचा अपुरा समावेश ही पर्यटन विकासातील प्रमुख आव्हाने आहेत.

अभ्यासातून असे निष्कर्ष निघतात की शाश्वत, समावेशक व नियोजनबद्ध पर्यटन धोरणांच्या अंमलबजावणीद्वारेच पर्यटनाचे दीर्घकालीन लाभ स्थानिक समुदायांपर्यंत प्रभावीपणे पोहोचू शकतात. स्थानिक सहभाग, कौशल्याधारित प्रशिक्षण, पर्यावरणपूरक दृष्टीकोन व शासकीय-खासगी भागीदारी यांवर आधारित पर्यटन विकास धोरणे स्वीकारल्यास नाशिक जिल्ह्यातील आदिवासी व मागास प्रदेशांच्या सर्वांगीण सामाजिक व आर्थिक विकासाला भक्कम चालना मिळू शकते.

संदर्भसूची (References) :

i. महाराष्ट्र शासन (२०२२), नाशिक जिल्हा सामाजिक-आर्थिक आढावा, पृपृ. ४५ – ६८.
ii. महाराष्ट्र शासन (२०१९), महाराष्ट्र पर्यटन धोरण, पर्यटन संचालनालय, मुंबई, पृपृ. २५ – ४७.
iii. महाराष्ट्र शासन (२०२१), आदिवासी विकास अहवाल, आदिवासी विकास विभाग, मुंबई, पृपृ. ५८ – ७६.
iv. शिंदे, अ. (२०२०), आदिवासी विकास व पर्यटन, विद्या प्रकाशन, पुणे, पृपृ. ११२ – १४०.
v. देशमुख, र. (२०१९), ग्रामीण अर्थव्यवस्था व पर्यटन, हिमालय प्रकाशन, मुंबई, पृपृ. ७५ – १०१.
vi. Government of India (2011), Census of India 2011, Office of the Registrar General and Census Commissioner, New Delhi, pp. 45 – 68.
vii. Sharma, K. K. (2012), Sustainable Tourism and Regional Development, Sarup and Sons, New Delhi, pp. 94 – 121.
viii. Deshpande, R. S. (2014), Rural Development in India, Sage Publications, New Delhi, pp. 201 – 225.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

प्राचीन भारतीय कला : संगीत, नृत्य आणि नाट्य

डॉ. नंदा पंढरीनाथ कंधारे
कै. न्हानाभाऊ म. तु. पाटील
कला महाविद्यालय, मारवड,
ता. अमळनेर, जि. जळगाव

Manuscript ID:
JRD -2026-180231
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 140-145
February 2026
Submitted: 30 Jan. 2026
Revised: 04 Feb. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

गोषवारा –

भारताच्या विविध प्रदेशात विविध कला विकसील झाल्या आहेत. त्यामुळे भारतीय संस्कृतीची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. भारतीय परंपरेनुसार कला त्या सर्व क्रियांना म्हटले जाते, ज्यामध्ये कोणतेही कौशल्य अपेक्षित असते. कला म्हणजे विविध घटकांची अनुभूती देणारी मांडणी होय. प्राचीन भारतात ६४ कला शिकविल्या जात होत्या. या ६४ कलांना चार श्रेणींमध्ये विभागले जात होते. कला – ज्ञान (ज्ञान), कला-शास्त्र (कौशल्यकला), कला-रुप (दृश्यकला) आणि कला-क्रिया (विधीविषयक कला). या सर्व ६४ कलांचे एकच ध्येय आहे, जे देव आणि मानव यांच्यात सुसंवाद निर्माण करणे आहे. कला शब्दाचा सर्वप्रथम शब्दप्रयोग भरत मुनीने 'नाट्यशास्त्र' या ग्रंथात केला आहे. भरतमुनीच्या 'नाट्यशास्त्र' त्या ग्रंथात नाट्यकलेचे विविध पैलू नियमावली आणि तत्व यांचे विवेचन केले आहे. भारतीय संगीत प्राचीन काळापासून संपन्न आहे. निरनिराळे राग, ताल आणि वाद्यांचा वापर भारतीय संगीतात केला जातो. भारतीय नृत्यकलेचा इतिहासही गौरवशाली आहे. भरतनाट्यम, कथकली, कुचिपुडा इत्यादी नृत्यप्रकार भारतात प्रसिध्द आहेत.

सुचक शब्द – *कला, संगीत, नाट्य, संस्कृती,शास्त्रीय नृत्य, लोकनृत्य*

प्रस्तावना -

भारतीय संस्कृतीचा महत्वाचा भाग संगीत, नृत्य, नाट्य, लोककला आणि कळसूत्री बाहुल्या आहेत. भारताची संस्कृती ही समृद्ध संस्कृती आहे. प्राचीन भारतीय कला प्रकारांमध्ये प्रदर्शनात्मक आणि दृश्यकला, चित्रकला, शिल्पकला, गीत, वाद्य वादन, संगीत, नृत्य आणि नाट्य इत्यादींचा समावेश आहे. पूर्वीपासूनच संगीत, नृत्य, नाटक हे एक संस्कृतीचा भाग आहेत. पूर्वी सामाजिक प्रबोधन, मनोरंजन, धार्मिक उत्सव साजरे करण्यासाठी याचा उपयोग होत असे. भारतातील प्रत्येक व्यक्ती आपले सांस्कृतिक सण-उत्सव आनंदाने साजरा करतात. उत्साहाने लोकगीत म्हणतात, नृत्य करतात. मानवी जीवनाचे वेगवेगळ्या भागाचं प्रतिबिंब नाटके, लोकगीत, नृत्यातून दिसून येते. आदिवासी भागातील व ग्रामीण भागातील लोकांच्या सांस्कृतिक जीवनामध्ये नाटक, लोकगीत, नृत्य, यांना महत्वाचे स्थान आहे. आता शहरी भागातही महत्व प्राप्त झाले आहे. शाळा महाविद्यालयामध्ये संगीत, नृत्य, नाटक यांना महत्वाचे स्थान आहे. शेती हंगामाच्यावेळी, बाळाच्या जनमानंतर, विवाहप्रसंगी, धार्मिक-विधीच्या वेळी उत्सव साजरे केले जातात. त्यावेळी हे उत्सव संगीत, नृत्यामधून साजरे केले जातात.

संशोधनाचा उद्देश -

1) प्राचीन भारतीय कला संगीत, नृत्य आणि नाट्य यांचे अध्ययन करणे.
2) हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत व कर्नाटक संगीत यांचे अध्ययन करणे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. नंदा पंढरीनाथ कंधारे , कै. न्हानाभाऊ म. तु. पाटील कला महाविद्यालय, मारवड, ता. अमळनेर, जि. जळगाव

How to cite this article:
कंधारे, . नंदा . पंढरीनाथ . (2026). प्राचीन भारतीय कला : संगीत, नृत्य आणि नाट्य. *Journal of Research and Development*, 18(2(*XIV*)), 140–145. https://doi.org/10.5281/zenodo.18798082

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18798082

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

3.भारतातील नृत्य प्रकाराचे अध्ययन करणे.

4.भारतात विविध प्रदेशातील विविध लोकनाट्य प्रकाराचे अध्ययन करणे.

गृहितकृत्य -

1) भारतीय संस्कृतीचा महत्वाचा भाग संगीत, नृत्य नाट्य आहेत.
2) हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत व कर्नाटक संगीत यात साम्य आहे.
3) भारतीय नृत्यकला दोन मुख्य परंपरामध्ये विभागली आहे.
4) विविध प्रदेशात विविध लोकनाट्य प्रकार विकसीत झाले.

संशोधन पध्दती -

'प्राचीन भारतीय कला : संगीत, नृत्य आणि नाट्य' या विषयावर अध्ययन करत असतांना, दुय्यम स्त्रोतांचा उपयोग केलेला आहे. त्यामध्ये संदर्भग्रंथ, मासिके, वर्तमानपत्र, इंटरनेटवरील माहिती यांसारख्या साधनांचा उपयोग केलेला आहे.
पयोग केला आहे.

शोधनिबंधाचे महत्व -

प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश प्राचीन भारतीय कला संगीत, नृत्य आणि नाट्यांचे अध्ययन करणे आहे. भारतीय समाजात विविध कला प्रकार आहेत. त्यामुळे भारतीय संस्कृतीची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. भारतातील प्रत्येक व्यक्ती आपले सांस्कृतिक सण- उत्सव आनंदाने साजरा करतात. संगीत, नृत्य, नाटके यांना त्यांच्या जीवात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधाचे अध्ययन केले आहे. याचा उपयोग समाजातील लोक, सर्वसामान्य अभ्यासक, विद्यार्थी यांना होवू शकेल. म्हणून हा विषय महत्वाचा आहे.

ललीत कलांच्या संकल्पना –

मानवी मनाच्या वेगवेगळया वैशिष्ट्यांचे सुंदर सादरीकरण म्हणजे कला. मानवाची सर्व वैशिष्ट्ये 'रस' म्हणून प्रसिध्द आहेत. 'रस' चा हिंदी अनुवाद म्हणजे साखरेचा पाक. कला मानवी भावना प्रतिबिंबीत करतात. त्यात हास्य, भयानक, शौर्य, वीर, विभत्स, शृंगार, करुणा, अद्‌भूत, शांती मानवाच्या भावना प्रतिबिंबीत करतात. याची अभिव्यक्ती संगीत, नृत्य, नाटक अशा विविध प्रकारातून व्यक्त होते. यामध्ये काही प्रकार हे प्रत्यक्ष सादर केले जातात. यापैकी काही दृश्य स्वरुपात समोर येतात. रेखाटन, शिल्पकला व चित्रकला या दृश्य कला होत. भारतात या सर्वात संगीत ही लोकप्रिय कला आहे. प्राचीन काळापासून भारताला संगीताची एक समृध्द परंपरा आहे. संगीताचा उगम सामवेदातून झाला आहे. मंदिरात देवी देवतांच्या पूजेत संगीताला महत्वाचे स्थान आहे.

मध्ययुगीन काळात स्तुती आणि भक्ती संगीताला प्रोत्साहन दिले. सुफो पंथात कव्वाली गायल्या जात असत. तर भक्तिसंगीतात किर्तन व भजन हे भक्ति पंथालीत संतामध्ये लोकप्रिय झाले.

1) भारतीय संगीत -

शास्त्रीय संगीत

शास्त्रीय संगीत हे भारतीय संगीताचा अत्यंत प्राचीन भाग आहे. याची सुरुवात वैदिक काळात झाली.
शास्त्रीय संगीताच्या दोन प्रमुख शाखा आहेत.

१. हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत (उत्तर भारतीय संगीत)
२. कर्नाटक शास्त्रीय संगीत (दक्षिण भारतीय संगीत)

या दोन्ही संगीत शाखांमध्ये काही साम्य आहे. परंतु त्यांची गायनशैली, रागांची रचना, ताल यामध्ये फरक आहे.

१) हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत -

हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत उत्तर भारतात प्राचलित आहे. हिंदुस्तानी संगीतामध्ये धृपद, धमार, ठुंबरी, ख्याल, तरणा आणि टप्पा हे प्रमुख गायन प्रकार आहेत. तानसेन, अल्लादिया खान, कुमार गंधर्व आणि भीमसेन जोशी यांनी हिंदुस्थानी संगीताच्या परंपरेला समृद्ध केले आहे. याबाबत संत संगीताचा भाग म्हणून भजन आणि अभंग हे प्रकार प्रचलित आहेत.

भारतातील सर्वात लोकप्रिय राग भैरवी, बहार, दरबारी, देस, जय जयवंती, मेघ मल्हार, यमन, शाम कल्याण, खमाज, भीम पलास, हंस, ध्वनी, तोडी हे आहेत. भारतात संगीत वाद्यांचीही परंपरा आहे. सतार, सरोद, सारंगी व संतूर ही तंतू वाद्य आहोत. पखवाज, तबला, मृदंग, ढोल ही ताल देणारी वाद्य आहेत. तर श्वास वाद्य बासरी, शहनाई, नादस्वरम ही आहेत.

भारतामध्ये जयपूर, ग्वालीयर, किराणा ही संगीताची प्रसिध्द घराणे आहेत.

२) कर्नाटक संगीत-

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

कर्नाटकीय शास्त्रीय संगीत दक्षिण भारतात प्रवलीत आहे. कर्नाटकात शास्त्रीय संगीताचे जनक पुरंदरदास आहेत. इ. स. १७०० ते १८५० दरम्यान रचलेल्या कर्नाटक संगीताचे श्रेय शामशास्त्री, मुथ्थू-स्वामी दिक्षितार व त्यागराज या तीन संगीतकारांना दिले जाते. त्यागराज हे एकाचवेळी संत संगीतकार व कर्नाटक शैलीचे आद्य संगीतकार मानले जातात.

महा वैद्यनाथ अय्यर, रामनाथ श्रीनिवास अय्यगर आणि परनम सुब्रम्हण्यम या तीन संगीतकारांनी संगीतात नवीन रचनाचे प्रयोग केले. त्यांनी वीणा, बासरी, मृदंगम, घटम, नादस्वरम ही वाद्य वापरत असत.

कर्नाटक संगीताच्या प्रमुख शैली वर्णम, जावाली, तिल्लना आहेत. त्याशिवाय भारतात सुगम संगीत प्रचलित आहे. त्याच्याही विविध शैली आहेत. त्यात गझल, कव्वाली, कीर्तन, होरी, लोकसंगीत या शैली आहेत.

हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत व कर्नाटक संगीतातील साम्य -

हिंदुस्थानी संगीतातील अलाप तर कर्नाटक संगीतातील अलपना, हिंदुस्थानी संगीतातील तराणा तर कर्नाटक संगीतातील तिल्लाना यात साम्य आहे. दोन्ही संगीतात तालांवर भर दिला आहे.

३) आधुनिक भारतीय संगीत -

प्राचीन काळी संगीताचे कार्यक्रम फक्त उच्चभ्रू लोकांसाठी होते. आता सामान्य लोकही संगीताचे कार्यक्रम घेत आहेत. प्राचीन काळी संगीताचे शिक्षण गुरु हो शिष्यांना देत असत. आधुनिक काळात संगीताचे शिक्षण हे संगीत देणाऱ्या संस्थेद्वारे दिले जाते. त्यागराज, मुथ्थुस्वामी दिक्षितार, पं. विनायकराव पटवर्धन, स्वामी हरिदास, अमीर खुस्रो, सदारंग अदारंग, मियाँ तानसेन, पं. भीमसेन जोशी, पं. कुंभार गंधर्व, श्रीमती गंगुबाई हलगल, केसरबाई केसकर, उस्ताद फैयाज खान, उस्ताद बडे गुलाब अली खाँ हे सर्व प्रसिद्ध गायक आहेत. वाद्य संगीतात उस्ताद बिसमिल्ला खान, बाबा अल्लाउद्दीन खाँ, उस्ताद अल्लारखा खान हे प्रसिद्ध वादक आहेत.

४) लोकसंगीत-

लोकसंगीताच्या माध्यमातून प्राकृतिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थितीचा परिचय करून देण्याचे कार्य केले जाते. भारतात लोकसंगीत हे भारताच्या विविध प्रदेशातील लोकसंस्कृतीचे प्रतिबिंब आहे. लोकसंख्येत हा आदिवासी भागातील लोकांच्या ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनाचा एक भाग आहे. त्याचे सण-उत्सव, धार्मिक विधी यावेळी लोकसंगीताला अत्यंत महत्वाचे स्थान आहे.

लोकसंगीताचे प्रकार -

महाराष्ट्रात- लावणी, पवाडा, पंजाब - भांगडा, गिद्धा, केरळ- ओप्पना, मोपन्ना पाट्ट, सोपर नाट्टम, राजस्थान - मांड, पणिहारी, बंजारा, गोरबंद, गुजरात - गरबा, दांडिया, आसाम - बिहू अशा प्रकारे भारतीय लोकसंगीताचे विविध प्रकार आहेत.

२) भारतीय नृत्य प्रकार -

संगीत सारखी भारतीय नृत्याला एक समृद्ध परंपरा आहे. भारतीय संस्कृतीत नृत्याला विशेष महत्व आहे. नृत्य हे सांस्कृतिक परंपराचा साक्षात्कार घडविण्यासाठी उपयोगी पडते. ऋग्वेदामध्ये नृत्याचा उल्लेख आहे. नृत्यामध्ये कथाकथन करतांना भावना व हावभाव यांना विशेष स्थान आहे.

सिंधू संस्कृतीत (मोहेंजोदडो, हडप्पा) उत्खलनात जी साधने सापडली आहेत. त्या आधारे संगीत व नृत्यकलेच्या विकासास या काळात सुरुवात झाली होती असे म्हणता येईल. धार्मिक विधी, पूजाअर्चा, सण-उत्सव साजरी करतांना, संगीत व नृत्यकला विकसित झाली. प्राचीन काळातील उत्खलित साधन, लेणी, वास्तू, चित्रकला, मूर्तिकला, मंदिरे यातून नृत्यांग, नृत्य, वाद्य यातून कलेचे पुरावे मिळतात.

भारतीय नृत्यकला दोन मुख्य परंपरेमध्ये विभागली जाते. शास्त्रीय नृत्य आणि लोकनृत्य.

अ) शास्त्रीय नृत्य-

शास्त्रीय नृत्य धार्मिक आणि अध्यात्मिक विचारसरणीवर आधारित आहे. या नृत्यांमध्ये शारीरिक हालचाली, ताल, लयबद्धता आणि नृत्यकथनाचा समावेश असतो. भारताच्या अनेक भागात विविध प्रकारची शास्त्रीय नृत्ये प्रचलित आहे. ते पुढील प्रमाणे.

१) भरतनाट्यम -

भरतनाट्यम हे तमिळनाडू राज्याचे पारंपरिक शास्त्रीय नृत्य आहे. हे नृत्य प्रामुख्याने भक्तीपर कथा सांगण्यासाठी सादर केले जात असे. भरतनाट्यामध्ये अंगविक्षेप, हस्तमुद्रा आणि पदभेद यांचा वापर केला जातो. भरतनाट्यामध्ये प्राचीन संस्कृत आणि तामिळ ग्रंथावर आधारित कथनांचे सादरीकरण केले जाते

२) कथ्थक -

कथक हा उत्तर भारतातील प्रमुख शास्त्रीय नृत्य प्रकार आहे. 'कथक' या शब्दाचा अर्थ 'कथा सांगणारा' असा होतो. प्राचीन काळात कथक नृत्याद्वारे देवी-देवतांच्या कथांचे सादरीकरण केले जात असे. कालांतराने राजदरबारात हा नृत्यप्रकार अधिक सुसंस्कृत झाला.

३) कथकली -

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

कथकली हे केरळमधील शास्त्रीय नृत्यप्रकार आहे. या नृत्य प्रकारात रंगीत मुखवटे, भव्य पोशाख आणि नाट्यमय हावभावांचा वापर करून पौराणिक कथा सादर केल्या जातात. रामायण आणि महाभारत यांच्या प्रसंगांचे सादरीकरण यात होते.

४) कुचिपुडी -

कुचिपुडी शास्त्रीय नृत्य प्रकार हा आंध्रप्रदेशातील आहे. कुचिपुडी नृत्य हे नृत्य आणि नाटकाचा मिलाफ आहे. हे नृत्य भागवत आणि पुराणांवर आधारित असते. वेद आणि उपनिषदांच्या प्रसारासाठी हे महत्वपूर्ण नृत्य आहे.

५) मोहिनीअट्टम -

मोहिनीअट्टम हा केरळमधील प्रसिद्ध शास्त्रीय नृत्यप्रकार आहे. मोहिनीअट्टम मध्ये कोमल हालचाली, हळुवार हावभाव आणि सौंदर्याचा समावेश असतो. या नृत्य प्रकारात नृत्य, संगीत आणि अभिनय दिसून येतो.

६) मणिपुरी -

मणिपुरी नृत्य हे मणिपूर राज्याचे पारंपरिक शास्त्रीय नृत्य प्रकार आहे. हे नृत्य धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सादर केले जात. मणिपुरी नृत्यात वैष्णव पंथाच्या प्रसंगाचे वर्णन केले जाते.

7) ओडिशी -

ओडिशी नृत्य हे ओडिशा राज्याचे आहे. ऑडिशी नृत्यामध्ये वैष्णव पंथाच्या प्रसंगांचे वर्णन केले जाते. भगवान जगन्नाथ यांना हे समर्पित आहे. मंदिरामध्ये देवदासी ईश्वराला प्रसन्न करण्यासाठी हे नृत्य करीत.

अशा प्रकारे भारतात शास्त्रीय नृत्य प्रचलित आहेत.

ब) लोकनृत्य -

भारतामध्ये प्रत्येक राज्यात लोकनृत्याचे विविध प्रकार आढळून येतात. प्रत्येक राज्याचे लोकनृत्य हे त्या राज्याचे सांस्कृतिक वैशिष्ट्य आहे. लोकनृत्य सण-उत्सव, धार्मिक विधी, विवाहप्रसंगी केले जाते. भारतातील प्रमुख लोकनृत्य खालीलप्रमाणे आहेत.

१) लावणी -

लावणी हे महाराष्ट्रातील लोकप्रिय लोकनृत्य आहे. हे नृत्य अदाकारी, आकर्षक आहे. हे नृत्य मराठी लोकसंगीतावर आधारित आहे.

२) भांगडा -

भांगडा हे पंजाब राज्याचे लोकनृत्य आहे. हे नृत्य शेतकऱ्यांच्या हंगामी सणांमध्ये सादर केले जाते. भांगडा नृत्य उत्साही आणि ऊर्जावान आहे.

३) बिहू -

बिहू हे आसाम राज्यातील लोकनृत्य आहे. हे नृत्य बिहू सणाच्या वेळेस सादर केले जाते. आसामच्या लोकांचा जो पारंपरिक पोशाख आहे तो परिधान करून नृत्य केले जाते.

४) गुमर -

गुमर हे राजस्थानचे लोकनृत्य आहे. गुमर सण आणि विवाहप्रसंगी सादर केले जाते. नर्तक गोलाकार धरून नृत्य सादर करतात.

५) गरबा -

गरबा हे गुजरात राज्याचे लोकनृत्य आहे. गरबस नवरात्र उत्सवाच्या वेळी केला जातो. हे नृत्य देवी दुर्गा उपासनेशी संबंधित आहे.

६) भवाई -

भवाई हे गुजरात आणि राजस्थान या दोन राज्यातील लोकनृत्य आहे. भवाई नृत्यात नृतक डोक्यावर अनेक मटकी ठेवून नृत्य करतात.

३) नाट्यकला -

नाट्यकला ही भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. नाटक ही एक ललित कला आहे. भारतीय नाट्यकलेचा विकास वैदिक काळापासून सुरू झाला आहे. या काळात संगीत, नृत्य आणि नाटक हे धार्मिक विधीचे घटक होते. 'नाट्यशास्त्र' हा ग्रंथ नाटक व इतर ललित कलाविषयी लिहिला गेलेला हा प्रमुख ग्रंथ आहे.

भारतीय नाट्यकलेच्या इतिहासात रामायण आणि महाभारत या महाकाव्यांचे महत्व आहे. या महाकाव्यातून तत्वज्ञान, नैतिकतेची मूल्य, धार्मिकता समाजापर्यंत पोहोचली. महाभारत महाकाव्य व्यास यांनी लिहिले. यात पांडव आणि कौरव यांच्यातील संघर्षाचे नाट्यरूप सादरीकरण करण्यात आले. तसेच रामायण हे वाल्मिकीने लिहिलेले महाकाव्य आहे. ज्यात रामाच्या जीवनातील विविध प्रसंगांचे चित्रण करण्यात आले आहे. रामायणातील कथांना नाटकात रूपांतर करून सादर केले जात आहे. पुराणांमध्येही नाट्यकलेचा वापर झाला उदा. विष्णुपुराण, शिवपुराण आणि देवीपुराण यासारख्या ग्रंथांमध्ये नाट्यकलेचा उपयोग करून देवतांच्या जीवनातील प्रसंगांचे दृश्यरूप साकारले आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

प्राचीन काळात १० व्या शतकापर्यंत शिकलेल्या लोकांची भाषा संस्कृत होती. म्हणून नाटके संस्कृत भाषेत सादर केली जात असे. कौटिल्याचे अर्थशास्त्र, कालिदासाचे अभिजात शांकुतल, वात्सायनाचे कामसूत्र ही सर्व संस्कृतीमध्ये लिहिलेला नाटके होती. १० व्या शतकात प्राकृत भाषेतली नाटके सुद्धा लोकप्रिय होऊ लागली.

नाटकाच्या संदर्भात दोन प्रकार होते. त्यात अभिजात नाटक व लोकनाट्य. जी प्रचलित बोलीभाषा होती ती लोकनाट्यात वापरली जायची. विविध प्रदेशात विविध लोकनाट्याचे प्रकार विकसित झाले. विविध प्रदेशात लोकनाट्य प्रकारांना विविध नावे दिली होती. त्यात महाराष्ट्र – तमाशा, ललिते, राजस्थान – रास, झुमर, खेलामारू, बंगाल – जत्रा, कीर्तन नाटक, तामिळनाडू, कर्नाटक, केरळ – कथकली, यक्षगान, बिहार – बिदिशा, उत्तर प्रदेश- रास, नौटंकी, स्वांग, भांड, गुजराथ - भवाई अशाप्रकारे विविध प्रदेशात लोकनाट्य प्रकारांना विविध नावे दिली होती.

मध्ययुगीन काळात संगीत व नृत्याला महत्व होते. परंतु नाटकाला तेवढे महत्व प्राप्त झाले नव्हते. भारतात ब्रिटिशांच्या आगमनानंतर मात्र समाजात बदल घडायला लागले. एका ब्रिटिश व्यक्तीने कोलकत्यात नाट्यगृहाची स्थापना केली. होरासिम लेबेडेव्ह या नावाच्या रशियन व्यक्तीने स्थापन केलेल्या नाट्यगृहापासून आधुनिक भारतीय रंगभूमीची सुरुवात भारतात झाली. शेक्सपिअरच्या इंग्रजी नाटकाचा मोठा प्रभाव भारतीय नाटकावर झाला. नाटकातून शोकांतिका, हास्यरसप्रधान व गुंतागुंत असलेले शहरी जीवन दाखविले जावू लागले. नाटके विविध प्रादेशिक भाषेत लिहिली जावू लागली. यासोबतच लोक नाटकातील जत्रा, नृत्य, नौटंकी सुद्धा भरभराटीस आले. लोकनाट्याचा ललित कलांवर मोठा प्रभाव पडला. कलांचा उपयोग एक माध्यम म्हणून लोकांसाठी झाला.

अलीकडच्या काळात रंगभूमीमध्ये नाटकाचे अनेक प्रयोग होत आहेत. शंभूमित्र, विजय तेंडुलकर, फैजल अल्कांणी यांच्या शैलीवर पाश्चिमात्य प्रभाव आहे. आता अनेक प्रकारचे नाट्यप्रकार भरभराटीस येत आहेत. त्यात रंगमंच, कोपरा नाट्य, रेडिओ नाट्य, संगीत रंगभूमी, एक अंकी नाटक, एकपात्री प्रयोग, नाटिका आहेत.

भारतात नाटकाला मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. नृत्य व संगीत ही नाटकांची आवश्यक अंगे आहेत म्हणून उल्लेख आहे. रामायण, महाभारत व कालिदास, बाणभट्ट व भास यांनी लिहिलेल्या नाटकांमध्ये संगीत, नृत्य व नाटक या तिन्हींचा संगम आढळतो.

निष्कर्ष -

१) भारताच्या विविध प्रदेशात विविध कला विकसित झाल्या आहेत.
२) प्रतीक भारतात ६४ कला शिकविल्या जात होत्या.
३) भारतीय संस्कृतीचा महत्वाचा भाग संगीत, नृत्य, नाटक आहेत.
४) भारतीय नृत्यकलेच्या इतिहासही गौरवशाली आहे. भरतनाट्यम, कथकली, कुचीपुडी इत्यादी नृत्य प्रकार भारतात प्रसिद्ध आहेत.
५) प्राचीन काळापासून भारताला संगीताची एक समृद्ध परंपरा आहे.
६) हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत व कर्नाटक संगीत यात साम्य आहे.
७) कला मानवाला आत्मविश्वास निर्माण करतात व परिस्थितीशी जुळवून घेणे शिकवितात.

शिफारशी -

१) आधुनिक काळात महाविद्यालयातून प्राचीन काळातील ६४ कला शिकविल्या जाव्यात.
२) भारतीय संस्कृतीचे शिक्षण शाळा, महाविद्यालयातून दिले जावे.
३) आदिवासी भागातील व ग्रामीण भागातील जी लोकगीत व नृत्यांना प्रोत्साहन मिळावे.
४) नाट्यकला शहरी भागात जास्त प्रमाणात असलेली दिसून येते तर तिचा जास्त प्रमाणात प्रसार आदिवासी, ग्रामीण भागातही केला जावा.
५) नाट्यकलेचे शिक्षण शाळा, महाविद्यालयापासून मिळावे.

सारांश -

प्राचीन भारतीय संस्कृती समृद्ध परंपरेचे दर्शन घडविते. या कला मानवाच्या जीवनाच्या विविध अंगाशी संबंधित आहेत. कला या केवळ कलात्मक नाहीत तर व्यवहारिकदृष्ट्याही अत्यंत महत्वाच्या आहेत.

संगीत, नृत्य आणि नाट्य या कला जीवनात आनंद, उत्साह निर्माण करतात. या कला मानवाच्या जीवनात मनोरंजन करतात. कलेच्या माध्यमातून बुद्धी आणि आत्मा यांचे सत्य झळकत असते. कला मानवाला दुःख विसरण्यास मदत करतात. जात, धर्म, वंश, भेदभाव नष्ट करून व्यापकता प्रदान करतात. कला जीवनाला सत्यम्, शिवम, सुंदरम बनवतात. एकंदरीत मानवी जीवनात कलेच्या अस्तित्वाला अनन्यसाधारण महत्व आहे.

संदर्भ ग्रंथ –

१. सोनजे विजय, 'प्राचीन भारतीय ज्ञानप्रणाली' कुमुद पब्लिकेशन्स, जळगाव, २०२४

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

२. मीना आर. एन., 'भारतीय संस्कृती आणि वारसा', राष्ट्रीय मुक्त विद्यालयीन शिक्षा संस्थान ए-२४-२५. इन्टिट्यूशनल एरिया, सेक्टर – ६२, नोएडा – २०१ ३०९ (उ.प्र.)
३. वाघ शैलेशकुमार, सोनवणे सिद्धार्थ, पाटील मुकेश, खैरनार सुभाष, 'भारतीय ज्ञानप्रणाली', अथर्व पब्लिकेशन्स, धुळे २०२४
४. पाटील दीपक, कनोर सतीलाल, 'प्राचीन भारतीय ज्ञान परंपरा', अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, २०२४

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

भारताचा संरक्षण क्षेत्रातील वाढता खर्च आणि आत्मनिर्भर भारत

डॉ. वासुदेव भिका माळी
सहयोगी प्राध्यापक
संरक्षण आणि सामारिक शास्त्र
सं.ज.म.शिक्षण संस्थेचे श्री.बापुसो व्ही.सी. चौधरी
कला व वाणिज्य महाविद्यालय,खापर
ता. अक्कलकुवा जि. नंदुरबार
ईमेल :- vbmali41@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180232
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 146-150
February 2026
Submitted: 30 Jan. 2026
Revised: 04 Feb. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश:-

2025 च्या अखेरीस भारताने जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था टप्पा गाठत जपानला मागे टाकले आहे. भारताचा जीडीपी 4.18 ट्रिलियन डॉलर्सवर पोहचला आहे. भारताचा वर्तमान विकास दर 8.02% इतका असून सध्या जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था ठरली आहे. 2024-25 मधील संरक्षण बजेट 6,21,940.00 कोटी रुपये इतका आहे. ते एकूण बजेटच्या तुलनेत 2% पेक्षा कमी आहे. जागतिक अर्थव्यवस्था क्रमवारी सध्या अमेरिका, चीन, जर्मनी, भारत, जपान अशी आहे. 'विकसित भारत- व्हिजन 2047' या दृष्टीने हि समाधानकारक बाब आहे. संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरते साठी निश्चित उद्देश्य आणि कृतीशील वाटचाल आवश्यक आहे. कारण संरक्षण धोरणापुढे विविध आव्हाने आणि मर्यादा आहेत. भारतीय संरक्षण खर्चात दरवर्षी विशिष्ट प्रमाणात वाढ होत आहे, तथापि हि वाढ काळाच्या दृष्टीकोनातून योग्य प्रमाणात आहे का हे पाहणे जरुरीचे आहे. चीन आणि पाकीस्तान सोबतच तणाव धोरण, अंतर्गत व बहिर्गत स्वरूपातील नवीन नवीन आव्हाने त्याच वेळी संरक्षण क्षेत्रातील आयात कमी करून संरक्षण संशोधन स्थळ-जल-वायुसेनेतील स्वदेशी उत्पादनावर भर देणे गरजेचे आहे. कारण संरक्षणावरचा खर्च हा लोकांच्या आणि प्रसारमाध्यमाचा सातत्याने टीकेचा विषय असतो. अर्थात कारगिल युद्धानंतर भारताने संरक्षण खर्चात वाढ केली त्याचा परिणाम म्हणजे या क्षेत्रात भारत आत्मनिर्भर साध्य करू पाहत आहे.

प्रास्ताविक:-

कोणत्याही राष्ट्राचे स्वातंत्र्य, सार्वभौमत्व आणि राष्ट्र हित हे त्याच्या सुरक्षा-संरक्षण क्षमतेवर अवलंबून असते. भारताच्या स्वातंत्र्यानंतर दीर्घकाळ संरक्षण साहित्य, शस्त्रास्त्रे, दारुगोळा, लढाऊ विमाने, जहाजे, तंत्रज्ञानासाठी परकीय देशांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहावे लागले. मात्र कारगिल युद्धानंतर भारताने काही महत्वाचे निर्णय घेतले. विशेषतः एकविसाव्या शतकात बदलत्या जागतिक राजकारण आणि सुरेक्षेच्या आव्हानेमुळे "संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरता" हि भारताची धोरणात्मक गरज बनली. आत्मनिर्भर भारत संकल्पनेत संरक्षण क्षेत्राला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. अलीकडच्या काळात लेफ्ट.जन. शेकटकर समित्री अहवालाच्या शिफारशी नुसार काही निर्णय घेण्यात आले. निर्धारित संरक्षण खर्चात वाढ करणे, त्याच बरोबर संरक्षण संशोधनाकडे दुर्लक्ष होणार नाही. भारताच्या सेनादलांना सुसज्ज करण्यासाठी सरकारी आणि खाजगी उद्योग धंद्यांना प्रोत्साहन देण्यात आले. यामुळे नवीनतम मानवरहित विमाने, ड्रोन्स, क्षेपणात्रे, लढाऊ जहाजे, पाणबुडी, नवीनतम रडार, नेव्हिगेशन तंत्रज्ञान, विविध प्रकारचे उपकरणे यांची निर्मिती करण्यात स्वदेशात होऊ लागली. प्रस्तुत शोध निबंधात भारताचा संरक्षण क्षेत्रातील वाढता खर्च आणि आत्मनिर्भर भारत यावर विश्लेषणात्मक मांडणी करण्यात आली आहे.

संशोधन उद्देश:-

1) विकसित भारत-व्हिजन 2047 करिता संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेची भूमिका मांडणे.
2) वाढत्या संरक्षण खर्चाची कारणे स्पष्ट करणे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. वासुदेव भिका माळी, सहयोगी प्राध्यापक संरक्षण आणि सामारिक शास्त्र सं.ज.म.शिक्षण संस्थेचे श्री.बापुसो व्ही.सी. चौधरी कला व वाणिज्य महाविद्यालय,खापर ता. अक्कलकुवा जि. नंदुरबार

How to cite this article:
माळी, . वासुदेव . भिका . (2026). भारताचा संरक्षण क्षेत्रातील वाढता खर्च आणि आत्मनिर्भर भारत. *Journal of Research and Development,* 18(2(*XIV*)), 146–150. https://doi.org/10.5281/zenodo.18798147

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18798147
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

संशोधन उद्देश:-

3) विकसित भारत-व्हिजन 2047 करिता संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेची भूमिका मांडणे.
4) वाढत्या संरक्षण खर्चाची कारणे स्पष्ट करणे.
5) भारताच्या राष्ट्रीय सुरेक्षेत संरक्षण सुधारणांसंबंधी झालेले प्रयत्न अभ्यासणे.
6) संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतासाठी उपाय योजना सुचविणे.

संशोधन गृहीतके :-

1) राष्ट्रीय सुरक्षा-संरक्षणासाठी आर्थिक तरतूद आवश्यक असते.
2) भारताच्या भु-राजकीय तणावामुळे संरक्षण खर्चात वाढ होत गेली आहे.
3) संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेसाठी भारताचे प्रयत्न सुरु आहेत.
4) भारताने संरक्षण क्षेत्रात स्वदेशी उत्पादनाबरोबर या क्षेत्रात निर्यातीकडे लक्ष्य केंद्रित केलेले आहे.

संशोधन पध्दती:-

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधकाने प्राथमिक आणि दुय्यम साधन सामुग्रीचा अवलंब केलेला आहे. प्राथमिक स्त्रोतमध्ये शासकीय रिपोर्ट, अहवाल, मूळ माहिती स्त्रोत, तर दुय्यम स्त्रोत संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, संकेत स्थळे इ. चा आधार घेण्यात आलेला आहे.

शोध निबंध महत्व:-

आंतरराष्ट्रीय राजकारणात सतत बदल होत असतात. आजचे मित्रत्वाचे संबंध कधी तणावाचे होतील, संघर्ष परिस्थिती दोन देशात निर्माण होईल सांगता येत नाही. भारत हे शांततावादी लोकशाही मूल्यांना प्राधान्य देणारे राष्ट्र असले तरी आपल्या स्वातंत्र्य व सार्वभौमत्वाचे रक्षण करणे हे राष्ट्रीय हित उद्दिष्ट वास्तवेला धरून आहे. तद्वत विकसित भारत-व्हिजन 2047 अंतर्गत राष्ट्रीय संरक्षणाला प्राध्यान्य देतांना या क्षेत्रात आत्मनिर्भरता, स्वदेशी लष्करी शक्तीसाठी विविध उपाय योजना करीत आहे. म्हणूनच भारताचा वाढता आर्थिक विकासाबरोबर संरक्षण खर्चात वाढ आणि आत्मनिर्भरता भारत यावर वैचारिक अभ्यासपूर्ण मांडणी प्रस्तुत शोध निबंधात करण्यात आलेला आहे.

संशोधनाच्या मर्यादा:-

प्रस्तुत शोध निबंधाचा विषय विस्तृत स्वरूपाचा आहे. भारताचा संरक्षण क्षेत्रातील वाढता खर्च, भारत सरकार, संरक्षण मंत्रायालाकडून वार्षिक अहवाल दरवर्षी प्रसिध्द होतो. त्यात संरक्षण खर्च वाढीची करणे, आर्थिक तरतूद, नवीन धोरण इत्यादी संबधित माहिती देनेला मर्यादा आहेत. त्यातील आवश्यक काही दाखले, सांखिकी माहिती देण्यात आलेली आहे. तसेच आत्मनिर्भर भारत, मेक इन इंडिया या बहु आयती संकल्पनात असून या ठिकाणी केवळ संरक्षण क्षेत्रातील काही स्वदेशी उत्पादनाची माहिती दिलेली आहे. संपूर्ण सेनादलांविषयी माहिती सदर करण्यास निश्चित मर्यादा आहे.

विश्लेषण:-

भारताच्या स्वातंत्र्यानंतर संरक्षण यंत्राने संबंधी राज्यकर्ते असलेला गैरसमज, भीती, विशेषतः अलिप्कता धोरण यामुळे बर्याच काळापर्यंत दुर्लक्षित राहिली. संरंक्षण यंत्रेनेला कडक नागरी नियंत्रणाशिवाय इतर कोणतेही मोठे बदल या यंत्रेनेत करण्यात आले नाहीत. शस्त्रास्त्र खरेदी, सीमा सुरक्षा, संराक्षणसंबंधीच्या विकास योजना, संरक्षण खर्च, गुप्तचर संघटना व त्यांचे व्यवस्थापन या विषयी कोणतेही महत्वाचे निर्णय 1950 च्या दशकात घेतले गेले नाहीत. या परिस्थितीत बदल 1962 च्या भारत-चीन युद्धानंतर झाले. या युद्धात भारताला ज्या समस्यांचा सामना करावा लागला त्यातून संरक्षण खर्च वाढ आणि सुधारणांची अपरिहार्यता स्पष्ट झाली. या युद्धानंतर भारताच्या संरक्षण यंत्रेनेत सुधारणा करण्यासाठी अनेक निर्णय घेण्यात आले. संरक्षण पंचवार्षिक योजना, केंद्रीय सचिवालयात एक संरक्षण योजना समिती, एक संयुक्त गुप्तचर समितीची स्थापन, संरक्षण संशोधन आणि विकास संघटना (DRDO) स्थापना, सशस्त्र सेनेचे तीन घटक अंग, त्यांच्या विकासाच्या योजना कार्यान्वित करण्यात आल्या. कारगिल युध्दानंतर भारताने आधुनिक शस्त्रास्त्र, उपकरण आयात करण्यापासून तर भारताचे संरक्षण उत्पादनावर भर देणे या करिता प्रोत्साहन देण्यात आले.

वित्तवर्ष 2024-25 संरक्षण मंत्रालयाचा एकूण बजट 6.22 लाख कोटी रुपये असून एकूण जीडीपीच्या 13% आहे. आधुनिकीकरण, शस्त्रास्त्र, विमान, युद्धनौका आणि उपकरणाच्या खरेदीसाठी एक लाख कोटीपेक्षा अधिक खर्च करण्यात आले. तद्वत आत्मनिर्भरतेला (Making in India) प्राथमिकता देत आयात कमी करण्यासाठी स्वदेशी उद्योगांसाठी प्राधान्य देण्यात आले आहे.

भारताच्या वाढत्या संरक्षण खर्चाची करणे:-

1. **भु-राजनैतिक तणाव:-** भारत हि उदेन्मुख अर्थसत्ता, विकसनशील राष्ट्र आहे. तथापि स्वातंत्र्यानंतर भारताचा कायमच चीन आणि पाकिस्तान सोबत सीमा विवाद, तणाव आणि सुरक्षात्मक आव्हाने राहिली आहेत. चीनचे विस्तारवादी धोरण, पाकिस्तानची पारंपारिक स्पर्धा यामुळे भारताला सातत्याने संरक्षण शक्तीत वाढ करणे क्रमप्राप्त होते.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

भारतीय साहित्य और संस्कृति

डॉ.वाल्मिक दशरथ सूर्यवंशी
हिंदी विभाग ,
महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान एवं वाणिज्य महाविद्यालय
मालेगांव कैंप, जि-नासिक महाराष्ट्रा
Email- valmiksuryawanshi23@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180235
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 165-167
February 2026
Submitted: 30 Jan. 2026
Revised: 04 Feb. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

शोध सार:-

साहित्य और संस्कृति का एक दूसरे से घनिष्ठ संबंध है | साहित्य जहाँ किसी संस्कृति के मूल्यों ,परम्पराओं और इतिहास की अभिव्यक्ति का माध्यम है| संस्कृति और साहित्य समाज को प्रेरणा प्रदान करते है |साहित्य किसी समाज का सांस्कृतिक प्रतिबिंब होता है , जिसमें उस समाज की भाषा , रीती-रिवाज ,मूल्य और विश्वास शामिल होते है | साहित्य के माध्यम से नए विचार विकसित है ,जो संस्कृति को प्रभावित करते है | लोगों को एकता में बांधते है ,और अपनी पहचान तथा विरासत से जोड़ते है |संस्कृति साहित्य के लिए प्रेरणा का स्रोत होती है ,संस्कृति समाज की मान्यताओं और मूल्यों को अपनाती है |आज समाज के लिए संस्कृति और साहित्य आदर्श मूल्यों का पथ है ,दोनों ने समाज को एकता के सूत्र में बांध रखा है |

बीज शब्द :- *संस्कृति , साहित्य, मानव ,परंपरा ,सभ्यता , मोक्ष,गुरुकुल , समाज ,संगीत ,प्रतिबिंब ,समृध्दी-*

शोधालेख :-

साहित्य और संस्कृति विषय दो प्रमुख पहलुओं का परिचय है |भाषा और भावनाओं की समृद्धि साहित्य है | साहित्य न केवल एक भाषा का उत्कृष्ट रूप है ,बल्कि यह उस समाज या संस्कृति की आदर्श छवि को प्रकट करता है जिसमें वह उत्पन्न होता है |इसी तरह, संस्कृति समृध्दी ,समर्थन और सम्प्रेषण का माध्यम होती है |साहित्य विज्ञान नवाविचार ,प्रेरणा और समाज की स्थितिया का विश्लेषण करता है |जबकि संजिविकरण ,सामाजिक समर्थन ,और सम्प्रेषण का कार्य कराती है |संस्कृति की विविधता में समाज ,धर्म ,इतिहास और भौगोलिक परिप्रेक्ष्यों का व्यापक अध्ययन शामिल होता है |साहित्य और संस्कृति का मिश्रण एक समृद्ध औरव्यापक परिप्रेक्ष्य प्रदान करता है ,जो एक समाज की अद्वितीयताऔर विकास को प्रकट करता है | भारतीय संस्कृति अद्वितीय ज्ञान प्रज्ञा का प्रतीक है । जिस में ज्ञान और विज्ञान लौकिक और पारलौकिक कर्म और धर्म तथा भोग व त्याग का अद्‌भुत समन्वय है । ऋग्वेद के समय से ही शिक्षा प्रणाली जीवन के नैतिक भौतिक, आध्यात्मिक और बौद्धिक मूल्य पर केंद्रित होकर, विनम्रता, सत्यता, अनुशासन, आत्मनिर्भरता और सभी के लिये सन्मान जैसे मूल्य पर जोर देती थी । वेदों में विद्या को मनुष्यता की श्रेष्ठता का आधार स्वीकार किया गया था । शिक्षा प्रणाली ने सीखने और शारीरिक विकास दोनों पर ध्यान केंद्रित किया । कर्म वही है ,जो बंधन से मुक्त करें और विद्या वही है ,जो मुक्ती का मार्ग दिखाये । इसके अतिरिक्त जो भी कर्म है , वह सब निपुणता देने वाले मात्र है ।शिक्षा के इस संकल्प को भारतीय परंपरा मे अंगीकृत कर तदनुरूप ही विश्वविद्यालय और गुरुकुल में शिक्षा दी जाती थी । घर, मंदिर, पाठशाला तथा गुरुकुल मे संस्कारयुक्त स्वदेशी शिक्षा दि जाते थी।

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ.वाल्मिक दशरथ सूर्यवंशी, हिंदी विभाग , महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान एवं वाणिज्य महाविद्यालय, मालेगांव कैंप, जि-नासिक

How to cite this article:
सूर्यवंशी, . वाल्मिक . दशरथ . (2026). भारतीय साहित्य और संस्कृति. *Journal of Research and Development,* 18(2(*XIV*)), 165–167. https://doi.org/10.5281/zenodo.18798335

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18798335

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

वैश्विक स्तर पर तेज बदलाव और विज्ञान और प्रौद्योगिकी में प्रगति से भारतीय समाज में नाटकीय परिवर्तन हुए हैं। निस्संदेह भारत ने वाणिज्य, प्रौद्योगिकी और विकास आदि क्षेत्रों में कई सीमाएं लांघी हैं, पर भारतीय संस्कृति तथा परंपरा से अलगाव और मूल्यों में गिरावट भी दिखी है।

संस्कृति का वर्तमान युग किसी समाज की दीर्घकाल तक अपना ही पद्धतियों का परिणाम होता है, और समाज के सदस्य के रूप में मनुष्य की सभी उपलब्धियां उसकी संस्कृति से प्रेरित मानी जा सकती है। संस्कृति की सहायता से ही उसने निरंतर प्रगति की हैं और विकास के विभिन्न सपनों को तय किया है ,यह भाषा के प्रति तथा उसके माध्यम से विचारों का संप्रेषण का ज्ञान विज्ञान का विकास एवं अपने चिंतन के परिणामों को भावी पीढ़ियां को हस्तांतरित कर सकता है। उसका मस्तिष्क कार्य और करण के तार्किक आधार को स्थापित कर सकता है । संपूर्ण जीवधारी में मनुष्य ही एक ऐसा प्राणी है, जिसमें संस्कृति का निर्माण और उसको परंपरागत रूप से बनाए रखने की क्षमता है। इसी कारण मनुष्य को संस्कृति का निर्माता भी कहा जाता है ।सामाजिक घटनाओं के विश्लेषण में व्यक्तिगत समाज और संस्कृति की महत्वपूर्ण भूमिका होती है। मनुष्य को कुछ निश्चित व्यवहार जन्म से या आनुवंशिक रूप से प्राप्त होते हैं लेकिन सामाजिक एवं सांस्कृतिक व्यवहार वह परिवार समूह व समाज में वह निवास करता है। संस्कृत क्रियाकलापों से सभ्यता का विकास होता है ,संस्कृति के अभाव में सभ्यता अपना अस्तित्व बनाए नहीं रख सकती ।संस्कृति और सभ्यता की प्रगति अधिकतर एक साथ होती है और दोनों का एक दूसरे पर प्रभाव भी पड़ता है।

प्राचीन काल की शिक्षा प्रणाली ज्ञान और परंपरा एवं प्रथाओं से मानवता को प्रोत्साहित करती थी ।पुराने ज्ञान को अप्रतिम माना गया है। भारत के तक्षशिला, नालंदा ,विक्रमाशीला ,बलभी, उज्जैनी और कासी आदी विश्व प्रसिद्ध शिक्षा एवं शोध के प्रमुख केंद्र थे। तथा या कई देशों के शिक्षार्थी ज्ञानार्जन के लिए आते थे।प्राचीन भारतीय सनातन ज्ञान परंपरा अति समृद्ध तथा प्रमुख उद्देश थे जैसे धर्म ,अर्थ, काम ,मोक्ष को प्रोत्साहित करते हुए व्यक्ति के संपूर्ण व्यक्तित्व को विकसित करता था । जब सारा विश्व अज्ञानरूपी अंधकार में भटकता तब संपूर्ण भारत में मनिषी उच्चतम ज्ञान का प्रसार करके मानव को पशुता से मुक्त कर श्रेष्ठ संस्कार से सं संस्कारयुक्त कर संपूर्ण मानव आदर्श मानव बनाया ।

संस्कृत शब्द संस्कृत भाषा की 'कृ'(करना) धातु से बना है, अंग्रेजी में संस्कृति के लिए 'कल्चर' कहा जाता है। 'कलर'शब्द लैटिन भाषा के 'कल्ट' या 'कल्टेकस' से लिया गया है ।जिसका अर्थ है जोड़ना या विकसित करना तथा परिष्कृत करना। नालंदा विशाल शब्द सागर के अनुसार किसी व्यक्ति, जाति, राष्ट्र आदि की यह सब बातें जो उसके मन ,रुचि ,आचार- विचार कला -कौशल और सभ्यता के क्षेत्र में बौद्धिक विकास की सूचक होती है।वह संस्कृत का अंग है। कैंब्रिज के इंग्लिश डिक्शनरी में संस्कृति की परिभाषा इस प्रकार दी गई है The way of life proper City clean the general customs and be lives of a particular group of people are a particular time अर्थात किसी विशेष कालावधि में एक विशेष मानव समूह के द्वारा अपनाई गई जीवन शैली विशेष रूप से उनकी परंपराएं और अवधारणाएं तथा विश्वास को संस्कृति कहा जा सकता है ।इस परिभाषा से आप यह समझ सकते हैं की संस्कृति व जीवन पद्धति है, जिसका निर्माण मानव व्यक्ति तथा समूह के रूप में करता है। यह उन आविष्कारों का संग्रह है जिनका अन्वेषण मानव में अपने जीवन में होता है ।संस्कृत के यह दोनों पक्ष एक दूसरे से संबंधित तथा एक दूसरे के पूरक होते हैं बिल्डिंग ने लिखा है की संस्कृति कृषि संबंधी प्रौद्योगिकीक सामाजिक तथा मानसिक तथ्यों की उपज है दूसरे शब्दों में संस्कृत में कृषि प्रौद्योगिकी की सामाजिक संगठन भाषा धर्म कल अधिकार समावेश होता है संस्कृति मनुष्य और उसकी कृतियां है मनुष्य की संस्कृति में भौतिक और भौतिक दोनों ही तत्व है जिनके हर्ष कोटी संस्कृति कहते हैं मानव जीवन पर संस्कृति और सामाजिक पर्यावरण का प्रभाव पड़ता है मानव का संपूर्ण सामाजिक पर्यावरण ही उसकी संस्कृति है प्रत्येक संस्कृत तत्व का उसकी उत्पत्ति के संबंध में एक इतिहास होता है चाहे वह इतिहास छोटा या बड़ा हो उधर न तो सर्वप्रथम घड़ी का आविष्कार किसने किया और कब किया आधुनिक एवं स्वयं क्रियाशील या अपने आप चलने वाली घड़ी का विकास कैसे हुआ आदि के संबंध में इतिहास है इसी प्रकार एक विशेष प्रकार के विश्वास का एक किसी पशु या पौधे का टोटे के रूप में स्वीकार करने इसी प्रकार एक विशेष प्रकार के विश्वास का इतिहास ढूंढा जा सकता है ऐसे ही भारत में जय हिंद अभिवादन या सांस्कृतिक एकता का प्रतीक है जय हिंद संस्कृत तत्व संस्कृत तत्वों का निजी अस्तित्व हुए भी संपूर्ण संस्कृत में गले मिले रहते हैं एक तत्व अन्य तत्वों पर आश्रित रहता है गतिशीलता संस्कृत तत्व की एक उल्लेखनीय विशेषता है उनकी संख्या में भी वृद्धि होती है संस्कृत तत्व से संबंधित व्यक्ति जैसे संस्कृत तत्व भी फैलने रहते हैं एक संस्कृति समूह दूसरे संस्कृति के समूह सेमिलता है तो सांस्कृतिक तत्वों का आदान प्रदान होता है आधुनिक युग में यातायात तथा संचार के साधनों में उन्नत होने के फल स्वरुप सांस्कृतिक तत्वों की गतिशीलता और बढ़ सकती है अनेक जनजातियों के संस्कृत तत्व भी शब्द समाजों में तेजी से फैलते जा रहे हैं यह विशेषता अंत तक सांस्कृतिक परिवर्तन का एक कारण बन जाती है और संस्कृत के ढांचे में परिवर्तन भी लाती है सांस्कृतिक तत्वों में पृथक पृथक रहने की प्रवृत्ति नहीं होती यह एक साथ मिलकर संस्कृति को एक या विविध आवश्यकताओं की पूर्ति करते हैं इन तत्वों को समझे बिना किसी भी संस्कृति को पूर्ण तैयार समझना संभव नहीं है

अतः संस्कृति और समाज का संबंध गहराई से और व्याप्त गुना के समग्र रूप का नाम है जो समाज के सोचने विचारने कार्य करने खाने पीने बोलने संगीत नृत्य गायन साहित्य कला वास्तु शिल्प दर्शन धर्म और विज्ञान रीति रिवाज परंपराओं पर्व जीने के तरीके और जीवन के विभिन्न पक्षों पर व्यक्ति विशेष के रूप में दृष्टिकोण आदि में प्रशिक्षित होते हैं मानव का शारीरिक मानसिक अस्तित्व जिन

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

साधनों से बना रहता है उन साधनों की समग्रता को ही संस्कृति कहते हैं वास्तव में जहां व्यक्ति संस्कृत प्रक्रियाओं का परिणाम है वह संस्कृति भी व्यक्ति की प्रक्रिया का परिणाम है इसके अंतर्गत वह बौद्धिक कलात्मक और सामाजिक आदर्श तथा संस्थाएं सम्मिलित हैं जिन्हें समाज के सदस्य अपनाते हैं संक्षेप में आप यह समझ सकते हैं की संस्कृति किसी समाज के वे सुषमा संस्कार है जिनके माध्यम से लोग परस्पर संप्रेषण करते हैं विचार करते हैं और जीवन के विषय में अपनी अभिवृत्तियों और ज्ञान का को दिशा देते हैं प्रत्येक संस्कृति के कुछ जीवन मूल्य होते हैं जिनका पालन करने की अपेक्षा उसे सांस्कृतिक परिवेश से जुड़े समाज के सदस्यों द्वारा की जाती है इसी प्रकार विभिन्न संस्कृतियों में विभिन्न प्रकार की धारणाएं और विश्वास भी प्रचलित होते हैं संस्कृत में जो संतुलन और संगठन होता है वह अनेक छोटे-छोटे तत्वों इकाइयों भागों और अप भागों की पारस्परिक संबंध तथा आत्मनिर्भरता के कारण बनता है विभिन्न संस्कृतियों में निहित तत्वों का अध्ययन करने से ज्ञात होता है कि विभिन्न समूह में एक दूसरे के विचारों और परंपराओं का आदान-प्रदान भी होता रहा है संस्कृत के विभिन्न उपादानों को जिसे उसके ढांचे का निर्माण होता है संस्कृत तत्व संस्कृत संकुल संस्कृति प्रतिमान और सांस्कृतिक क्षेत्र कहा जाता है|

भारत विविधताओं का देश है, जहां अलग-अलग धर्म, जाति, लिंग के लोग आपस में मिलजुल कर रहते हैं। अनेकता में एकता ही भारतीय संस्कृति की मूल पहचान है। भारतीय संस्कृति सबसे प्राचीन संस्कृति होने के बावजूद आज भी अपने नैतिक मूल्यों और परंपराओं को बनाए हुए है। भारतीय संस्कृति की सबसे बड़ी खासियत सहिष्णुता और सहनशीलता है। भारतीयों के साथ अंग्रेजी शासकों और आक्रमणकारियों द्वारा काफी क्रूर व्यवहार किया गया और उन पर असहनीय जुल्म ढाह गए, लेकिन भारतीयों ने देश में शांति बनाए रखने के लिए कई हमलावरों के अत्याचारों को सहन किया। वहीं सहनशीलता का गुण भारतीयों को उसकी संस्कृति से विरासत में मिला है। वहीं कई महापुरुषों ने भी सहिष्णुता की शिक्षा दी है। भारतीय संस्कृति, का मूल आधार आध्यात्मिकता है, जो कि मूल रूप से धर्म, कर्म एवं ईश्वरीय विश्वास से जुड़ी हुई है। भारतीय संस्कृति में रह रहे अलग-अलग धर्म और जाति के लोगों को अपने परमेश्वर पर अटूट आस्था एवं विश्वास है। भारतीय मूल के व्यक्ति की शिष्टता एवं अच्छे संस्कार जैसे बड़ों का आदर करना, अनुशासन में रहना, परोपकार एवं भलाई करना, जीवों के प्रति दया का भाव रखना एवं अच्छे कर्म करना ही भारतीय संस्कृति की सबसे बड़ी खासियत है। अत: मनुष्य के अंदर जो भी गुण समाहित होते हैं, वो उन्हे उनकी संस्कृति से विरासत में मिलते हैं और उसे एक सामाजिक एवं आदर्श मानव प्राणी बनाने में मदद करते हैं|

निष्कर्ष

साहित्य सांस्कृतिक पहचान को संरक्षित करने और पारंपरिक -सांस्कृतिक आदान-प्रदान को सुविधाजनक बनाने में मदद करता है।साहित्य मूल्यों को बढ़ावा देता है, जैसे कि प्रेम, न्याय, और सहिष्णुता, और इस तरह से एक बेहतर समाज के निर्माण में मदद करता है।साहित्य भाषा और कला का एक रूप है, जो लोगों को सोचने, महसूस करने और व्यक्त करने के लिए प्रेरित करता है।साहित्य सांस्कृतिक विरासत को संरक्षित करता है, जैसे कि लोक कथाएं, किंवदंतियाँ, और परंपराएं, और इस तरह से सांस्कृतिक पहचान को मजबूत करता है।साहित्य समाज के विकास में योगदान करता है, जैसे कि शिक्षा, कला, और संस्कृति के क्षेत्र में।साहित्य मानव जीवन को समृद्ध करता है, जैसे कि ज्ञान, समझ, और सहानुभूति के माध्यम से।साहित्य और संस्कृति का अध्ययन महत्वपूर्ण है, क्योंकि यह हमें खुद को और दुनिया को बेहतर ढंग से समझने में मदद करता है। जब साहित्य व्यापक चिंतन और श्रेष्ठतम विचारों को अभिव्यक्त करता है,तो संस्कृति भी व्यापक हो जाती है। जब-जब ये सकारात्मक चिंतन से पूर्ण होते हैं, तब- तब व्यक्ति और समाज प्रगति के पथपर चलते हैं साहित्य और संस्कृति विषय दो प्रमुख पहलुओं का परिचय प्रदान करते हैं | साहित्य न केवल एक भाषा का उत्कृष्ट रूप है, बल्कि यह उस समाज या संस्कृति की आदर्श छवि को प्रस्तुत करता है| साहित्य और संस्कृति एक शक्तिशाली शक्ति है जो समाज और संस्कृति को आकार देती है और उसे प्रतिबिंबित करती है। सामाजिक मुद्दों को संबोधित करने, मानदंडों को चुनौती देने और सहानुभूति को बढ़ावा देते है |

संदर्भ सूचि (ग्रंथ)

1) संस्कृत का समीक्षात्मक इतिहास -डॉ.कपिलदेव द्विवेदी -पृष्ठ- 102
2)भारतीय संस्कृति -डॉ,किरण टंडन- पृष्ठ -55
3)भारतीय संस्कृति की कहानी-रामधारीसिंह 'दिनकर'- पृष्ठ -79
4) हिंदी साहित्य का इतिहास -डॉ. आचार्य रामचंद्र- पृष्ठ -42
5) भारतीय संस्कृति-प्रो. शिवदत्त ज्ञानी- पृष्ठ -65

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

मंदिर व्यवस्थापन आणि सामाजिक उत्तरदायित्व : एक अभ्यास

ॲड. सुमित सुधाकर चोपडे[1] डॉ. माधुरी बबनराव खर्जुल[२]
[1]ॲडव्होकेट
नाशिक जिल्हा न्यायालय
[2]शैक्षणिक संयोजक (Asst. Prof. Level.)
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

Manuscript ID:
JRD -2026-180235
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 168-171
February 2026
Submitted: 30 Jan. 2026
Revised: 04 Feb. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

भारतात मंदिरे ही केवळ उपासनेची केंद्रे नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि सेवाभावी कार्याची महत्त्वाची संस्थात्मक केंद्रे आहेत. प्राचीन काळापासून मंदिरांमार्फत अन्नदान, शिक्षण, आरोग्य सेवा, आपत्ती निवारण, सांस्कृतिक जतन आणि गरीब-गरजूंसाठी विविध स्वरूपाची मदत दिली जात आहे. धार्मिक संस्थांचा हा सेवाभावी वारसा आजही समाजाच्या दुर्बल घटकांसाठी आधारस्तंभ ठरत आहे(8).

आधुनिक काळात मंदिर व्यवस्थापन अधिक संघटित, नियोजनबद्ध व उत्तरदायित्वपूर्ण होत असून सामाजिक उत्तरदायित्व (Social Responsibility) ही संकल्पना त्यामध्ये केंद्रस्थानी येत आहे. अनेक अभ्यासांनुसार भारतातील मंदिरे व मठ ग्रामीण व शहरी भागात सामाजिक विकासासाठी लोककल्याण उपक्रम राबविण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत(6). तसेच काही संशोधनांमध्ये मंदिरांना सामाजिक व पर्यावरणीय उपक्रमांसाठी प्रभावी केंद्र म्हणून वापरण्याची क्षमता असल्याचे नमूद करण्यात आले आहे(7). हा संशोधन पेपर महाराष्ट्रातील मंदिर व्यवस्थापनाची रचना, मंदिरांद्वारे राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांचे स्वरूप, त्यातील प्रवाह, मंदिर व्यवस्थापनासाठी लागू असलेली कायदेशीर चौकट तसेच मंदिर व्यवस्थापनासमोरील प्रमुख आव्हाने यांचा दुय्यम माहितीच्या आधारे अभ्यास करतो. महाराष्ट्र राज्यामध्ये धार्मिक व धर्मार्थ ट्रस्टच्या प्रशासनासाठी Charitable and Religious Trusts Act, 1920 तसेच Maharashtra Public Trusts Act, 1950 आणि विविध राज्यस्तरीय सार्वजनिक ट्रस्ट कायदे लागू असून या कायद्यांमुळे मंदिर ट्रस्टच्या नोंदणी, लेखा, देणगी व मालमत्ता व्यवस्थापनास वैधानिक चौकट प्राप्त होते(1;4;9).

अभ्यासातून असे दिसून येते की अनेक मंदिर ट्रस्ट व देवस्थान समित्या समाजहितासाठी विविध उपक्रम राबवत आहेत; मात्र संसाधनांचे योग्य नियोजन, पारदर्शकता, व्यावसायिक व्यवस्थापन कौशल्यांचा अभाव आणि उत्तरदायित्वाच्या स्पष्ट चौकटीचा अभाव ही प्रमुख आव्हाने आहेत (10). प्रभावी मंदिर व्यवस्थापन आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा संगम झाल्यास महाराष्ट्रातील समाजाच्या सर्वांगीण विकासास मोठे योगदान मिळू शकते.

मुख्य शब्द: *महाराष्ट्रातील मंदिर व्यवस्थापन, सामाजिक उत्तरदायित्व, महाराष्ट्र सार्वजनिक ट्रस्ट कायदा, धार्मिक संस्था, समाजकार्य*

प्रस्तावना

भारतीय समाजरचनेत धार्मिक संस्थांना विशेष स्थान आहे. विशेषतः महाराष्ट्र राज्यात मंदिरे ही श्रद्धेची प्रतीके असण्याबरोबरच सामाजिक एकात्मतेची, नैतिक मूल्यसंवर्धनाची आणि लोककल्याणाची केंद्रे म्हणूनही कार्य करतात. प्राचीन काळापासून मंदिरांमार्फत शिक्षण, आरोग्य, अन्नदान, निवारा, कला-संस्कृती संवर्धन आणि आपत्ती काळातील मदत अशा विविध सामाजिक उपक्रमांची परंपरा विकसित झालेली दिसून येते (8).

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
ॲड. सुमित सुधाकर चोपडे, ॲडव्होकेट नाशिक जिल्हा न्यायालय

How to cite this article:
चोपडे, . सुमित . सुधाकर ., & खर्जुल, . माधुरी . बबनराव . (2026). मंदिर व्यवस्थापन आणि सामाजिक उत्तरदायित्व : एक अभ्यास. *Journal of Research and Development,* 18(2(*XIV*)), 168–171.
https://doi.org/10.5281/zenodo.18799051

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18799051
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

संशोधन अभ्यासांनुसार भारतातील तसेच महाराष्ट्रातील मंदिरे व मठ ग्रामीण व शहरी भागात सामाजिक विकासासाठी लोककल्याण उपक्रम राबविण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. गरीब व वंचित घटकांसाठी अन्नदान, आरोग्य शिबिरे, शैक्षणिक मदत आणि सामाजिक सहाय्य या स्वरूपातील उपक्रम धार्मिक संस्थांमार्फत सातत्याने राबवले जातात (6).

आजच्या स्पर्धात्मक व गतिमान समाजात मंदिर व्यवस्थापन अधिक शिस्तबद्ध, नियोजनबद्ध आणि उत्तरदायित्वपूर्ण असणे आवश्यक झाले आहे. सामाजिक उत्तरदायित्व (Social Responsibility) ही संकल्पना केवळ उद्योगजगतात मर्यादित न राहता धार्मिक संस्थांपर्यंतही विस्तारत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील मंदिरांनी केवळ धार्मिक कार्यापुरते मर्यादित न राहता समाजहितासाठी अधिक संघटित व उद्दिष्टाधारित उपक्रम राबविण्याची गरज निर्माण झाली आहे (10).

याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील मंदिर व्यवस्थापन आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते, कारण प्रभावी व्यवस्थापनाच्या माध्यमातून मंदिरांची सामाजिक भूमिका अधिक बळकट होऊ शकते.

मंदिर व्यवस्थापन : संकल्पना व स्वरूप

मंदिर व्यवस्थापन म्हणजे मंदिराच्या दैनंदिन कार्यप्रणालीचे नियोजन, संघटन, समन्वय व नियंत्रण करणे होय. यामध्ये पूजा-विधी व्यवस्था, आर्थिक व्यवहार, कर्मचारी व्यवस्थापन, भक्तांसाठी सुविधा, सुरक्षा व्यवस्था तसेच सामाजिक उपक्रमांचे नियोजन यांचा समावेश होतो (10).

बहुतेक मंदिरे ट्रस्ट किंवा देवस्थान समित्यांमार्फत चालवली जातात. या संस्थांवर आर्थिक पारदर्शकता राखणे, निधीचा योग्य वापर करणे, लेखा नोंदी ठेवणे आणि लोकाभिमुख सेवा देणे ही महत्त्वाची जबाबदारी असते(1;9).

काही राज्यांमध्ये Hindu Religious and Charitable Endowments Acts (HR & CE Acts) अंतर्गत मंदिरांच्या आर्थिक व्यवहारांवर व प्रशासनावर शासनाचा प्रत्यक्ष सहभाग असतो, ज्यामुळे मंदिर व्यवस्थापन अधिक नियंत्रित आणि नियमनबद्ध स्वरूपात केले जाते (3).

यामुळे मंदिर व्यवस्थापन केवळ धार्मिक कार्यापुरते मर्यादित न राहता एक व्यापक सामाजिक संस्थात्मक स्वरूप धारण करते. प्रभावी मंदिर व्यवस्थापनाच्या माध्यमातून सामाजिक उत्तरदायित्वाची अंमलबजावणी अधिक परिणामकारकपणे करता येते.मंदिर व्यवस्थापनासाठी कायदेशीर चौकट : सार्वजनिक धर्मादाय ट्रस्ट कायदे मंदिर व्यवस्थापन म्हणजे मंदिराच्या दैनंदिन कार्यप्रणालीचे नियोजन, संघटन, समन्वय व नियंत्रण करणे होय. यामध्ये पूजा-विधी व्यवस्था, आर्थिक व्यवहार, कर्मचारी व्यवस्थापन, भक्तांसाठी सुविधा, सुरक्षा व्यवस्था तसेच सामाजिक उपक्रमांचे नियोजन यांचा समावेश होतो (10). आधुनिक काळात मंदिर व्यवस्थापन केवळ धार्मिक कार्यापुरते मर्यादित न राहता एक बहुआयामी प्रशासकीय प्रक्रिया म्हणून विकसित होत आहे. महाराष्ट्र राज्यातील बहुतेक मंदिरे ट्रस्ट किंवा देवस्थान समित्यांमार्फत चालवली जातात. या संस्थांवर आर्थिक पारदर्शकता राखणे, निधीचा योग्य वापर करणे, लेखा नोंदी ठेवणे, वार्षिक लेखापरीक्षण करणे आणि लोकाभिमुख सेवा देणे ही महत्त्वाची जबाबदारी असते (1;9). विशेषतः Maharashtra Public Trusts Act, 1950 अंतर्गत ट्रस्ट नोंदणी, लेखा-परीक्षण व मालमत्ता व्यवस्थापनाबाबत स्पष्ट तरतुदी करण्यात आलेल्या आहेत (9).काही राज्यांमध्ये Hindu Religious and Charitable Endowments Acts (HR & CE Acts) अंतर्गत मंदिरांच्या आर्थिक व्यवहारांवर व प्रशासनावर शासनाचा प्रत्यक्ष सहभाग असतो, ज्यामुळे मंदिर व्यवस्थापन अधिक नियंत्रित आणि नियमनबद्ध स्वरूपात केले जाते (3). जरी महाराष्ट्रात HR & CE Act लागू नसला, तरी महाराष्ट्र सार्वजनिक ट्रस्ट कायद्याच्या माध्यमातून मंदिरांच्या प्रशासनावर शासनस्तरीय देखरेख ठेवली जाते.यामुळे मंदिर व्यवस्थापन केवळ धार्मिक कार्यापुरते मर्यादित न राहता एक व्यापक सामाजिक संस्थात्मक स्वरूप धारण करते. प्रभावी मंदिर व्यवस्थापनाच्या माध्यमातून सामाजिक उत्तरदायित्वाची अंमलबजावणी अधिक परिणामकारकपणे करता येते आणि मंदिरांची समाजविकासातील भूमिका अधिक बळकट होते.सामाजिक उत्तरदायित्व: अर्थ व महत्त्वसामाजिक उत्तरदायित्व म्हणजे संस्थेने समाजाप्रती आपली जबाबदारी ओळखून समाजहितासाठी कार्य करणे होय. धार्मिक संस्थांच्या बाबतीत याचा अर्थ श्रद्धा आणि सेवाभाव यांचा संगम साधणे होय. महाराष्ट्रातील मंदिरांनी आपल्या धार्मिक कार्यांबरोबरच समाजातील दुर्बल व वंचित घटकांसाठी सेवा देणे ही त्यांची सामाजिक जबाबदारी मानली जाते (8).महाराष्ट्रातील अनेक मंदिर ट्रस्ट व देवस्थान समित्या सामाजिक उत्तरदायित्वाच्या चौकटीत विविध लोककल्याणकारी उपक्रम राबवत असल्याचे दिसून येते. हे उपक्रम समाजातील गरजू घटकांच्या तातडीच्या तसेच दीर्घकालीन गरजांवर केंद्रित असतात.मंदिरांचे सामाजिक उत्तरदायित्व पुढील बाबींमध्ये स्पष्टपणे दिसून येते –

अन्नदान व मोफत भोजन योजना
शैक्षणिक सहाय्य व शिष्यवृत्ती
आरोग्य शिबिरे व वैद्यकीय मदत

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

आपत्तीग्रस्तांसाठीमदत

गरीब व गरजूंसाठी निवारा व वस्त्रदान

संशोधन लेखांनुसार, भारतातील तसेच महाराष्ट्रातील मंदिरे व मठ ग्रामीण आणि शहरी भागात सामाजिक विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. गरीबांसाठी अन्नदान, आरोग्य शिबिरे आणि शैक्षणिक मदत यांसारखे उपक्रम धार्मिक संस्थांच्या सामाजिक उत्तरदायित्वाचे महत्त्वपूर्ण उदाहरण आहेत (6).

तसेच काही अभ्यासांमध्ये मंदिरांना सामाजिक व पर्यावरणीय उपक्रमांसाठी प्रभावी केंद्र म्हणून वापरण्याची क्षमता असल्याचे नमूद करण्यात आले आहे, ज्यामुळे सामाजिक उत्तरदायित्वाची व्याप्ती अधिक व्यापक होते(7). महाराष्ट्रातील काही मंदिरांमार्फत वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, प्लास्टिकमुक्त परिसर यांसारखे पर्यावरणीय उपक्रमही राबवले जात आहेत.

यामुळे असे स्पष्ट होते की सामाजिक उत्तरदायित्व ही मंदिरांच्या कार्यप्रणालीचा अविभाज्य भाग बनत असून, समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी मंदिरांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरत आहे.

भारतातील मंदिरांद्वारे सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांचे प्रकार

महाराष्ट्र राज्यातील अनेक प्रसिद्ध मंदिरे तसेच स्थानिक देवस्थाने विविध स्वरूपाचे सामाजिक उत्तरदायित्व उपक्रम राबवत आहेत. हे उपक्रम प्रामुख्याने समाजातील गरीब, वंचित आणि दुर्बल घटकांच्या गरजांवर केंद्रित असतात. मंदिर ट्रस्ट व देवस्थान समित्या धार्मिक कार्यांबरोबरच समाजकल्याणकारी उपक्रमांना महत्त्व देत असल्याचे दिसून येते.

काही मंदिरांमध्ये मोफत भोजन केंद्रे (अन्नछत्रे) नियमितपणे चालवली जातात, ज्यातून दररोज हजारो गरजू लोकांना अन्न उपलब्ध करून दिले जाते. तसेच अनेक देवस्थानांकडून विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मदत, शिष्यवृत्ती योजना, वह्या-पुस्तक वाटप आणि वसतिगृह सुविधा पुरविल्या जातात (8).

याशिवाय रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे, मोफत औषध वाटप, रुग्णवाहिका सेवा अशा आरोग्यविषयक उपक्रमांमध्येही मंदिरांचा सक्रिय सहभाग दिसून येतो. काही ठिकाणी महिलांसाठी कौशल्य प्रशिक्षण केंद्रे, स्वयंरोजगार प्रशिक्षण आणि बचत गटांना पाठबळ दिले जाते, ज्यामुळे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळते (6).

संशोधन अभ्यास दर्शवितात की मंदिरांना सामाजिक व पर्यावरणीय उपक्रमांसाठी प्रभावी केंद्र म्हणून वापरता येते. महाराष्ट्रातील काही मंदिरांमार्फत वृक्षारोपण, प्लास्टिकमुक्त अभियान, जलसंधारण, स्वच्छता मोहिमा आणि पर्यावरण जनजागृती कार्यक्रम राबवले जात आहेत, ज्यामुळे शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांना हातभार लागतो (7).

मंदिर व्यवस्थापनातील प्रवाह व नव्या दिशा

आधुनिक काळात महाराष्ट्रातील मंदिर व्यवस्थापनात माहिती-तंत्रज्ञानाचा वापर लक्षणीयरीत्या वाढत आहे. ऑनलाईन देणगी प्रणाली, ई-प्रसाद बुकिंग, भक्त नोंदणी प्रणाली, डिजिटल लेखा व लेखापरीक्षण व्यवस्था यामुळे मंदिरांचे आर्थिक व्यवहार अधिक पारदर्शक होत आहेत (10). काही मोठ्या मंदिर ट्रस्टकडून ई-गव्हर्नन्स प्रणालीचा अवलंब करून प्रशासन अधिक सुलभ व कार्यक्षम बनवण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

तसेच सीसीटीव्ही सुरक्षा, गर्दी व्यवस्थापन प्रणाली, ऑनलाइन तक्रार निवारण व्यवस्था, मोबाइल ॲप्सद्वारे सेवा अशा सुविधा विकसित होत असून भक्तांसाठी सोयीसुविधा वाढविण्यावर भर दिला जात आहे. या उपाययोजनांमुळे भक्तांचा अनुभव सुधारत असून मंदिर व्यवस्थापनात आधुनिकतेचा समावेश होत आहे.

सामाजिक उपक्रमही आता अधिक नियोजनबद्ध, उद्दिष्टाधारित आणि मोजमापयोग्य स्वरूपात राबवले जात आहेत. काही मंदिर ट्रस्ट वार्षिक अहवालांद्वारे आपल्या सामाजिक उपक्रमांची माहिती प्रसिद्ध करत आहेत, ज्यामुळे उत्तरदायित्व आणि पारदर्शकता वाढत आहे (9). महाराष्ट्र सार्वजनिक ट्रस्ट कायद्यानुसार अशा अहवालांची सादरीकरण प्रक्रिया बंधनकारक असल्याने मंदिर व्यवस्थापन अधिक शिस्तबद्ध होत आहे.

मंदिर व्यवस्थापनासमोरील आव्हाने

महाराष्ट्रातील मंदिर व्यवस्थापनास अनेक प्रकारची प्रशासकीय, आर्थिक व व्यवस्थापकीय आव्हाने भेडसावत आहेत.

- आर्थिक पारदर्शकतेचा अभाव
- प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता
- व्यवस्थापन व नेतृत्व कौशल्यांचा अभाव
- सामाजिक उपक्रमांसाठी मर्यादित संसाधने
- उत्तरदायित्वाच्या स्पष्ट धोरणांचा अभाव

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

संशोधन अहवालांनुसार, व्यवस्थापनातील संरचनात्मक व प्रशासकीय आव्हाने सामाजिक सेवा कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत अडथळा निर्माण करतात (10).

तसेच काही अभ्यासांमध्ये असेही नमूद केले आहे की कायदेशीर तरतुदी असूनही त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीत अडचणी येतात, ज्यामुळे मंदिर व्यवस्थापनाची एकूण कार्यक्षमता मर्यादित राहते (1;9).

चर्चा

महाराष्ट्रातील मंदिरे ही समाजाशी थेट जोडलेली असल्यामुळे त्यांच्या माध्यमातून सामाजिक उत्तरदायित्व प्रभावीपणे राबवता येऊ शकते. धार्मिक संस्थांना लोकांचा विश्वास आणि सक्रिय सहभाग मोठ्या प्रमाणात मिळत असल्यामुळे सामाजिक उपक्रमांची अंमलबजावणी तुलनेने अधिक प्रभावी ठरू शकते (8).

संशोधन अभ्यास दर्शवितात की भारतातील तसेच महाराष्ट्रातील मंदिरे व मठ ग्रामीण तसेच शहरी भागात लोककल्याण कार्यक्रम राबविण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. अन्नदान, आरोग्य शिबिरे, शैक्षणिक सहाय्य आणि महिलांसाठी कौशल्य विकास उपक्रम हे सामाजिक उत्तरदायित्वाचे ठोस उदाहरण मानले जातात(6).

तथापि, या उपक्रमांची परिणामकारकता मोठ्या प्रमाणात मंदिर व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. व्यवस्थापन अधिक व्यावसायिक, पारदर्शक व नियोजनबद्ध असल्यास सामाजिक उपक्रम अधिक व्यापक व परिणामकारक स्वरूपात राबवता येतात (10).

कायदेशीर चौकट आणि सामाजिक उद्दिष्टे यांचा समन्वय साधल्यास मंदिरांची सामाजिक भूमिका अधिक बळकट होऊ शकते. महाराष्ट्र सार्वजनिक ट्रस्ट कायदा, 1950 तसेच इतर सार्वजनिक धर्मादाय ट्रस्ट कायद्यांमुळे मंदिर व्यवस्थापनासाठी वैधानिक आधार उपलब्ध असून त्याचा योग्य वापर केल्यास उत्तरदायित्व आणि पारदर्शकता वाढू शकते (1;9).

निष्कर्ष

महाराष्ट्रातील मंदिर व्यवस्थापन आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा समन्वय समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे. मंदिरे केवळ धार्मिक उपासनेची केंद्रे न राहता सामाजिक विकासाची केंद्रे म्हणून उदयास येत आहेत.

संशोधनातून असे स्पष्ट होते की अनेक मंदिर ट्रस्ट व देवस्थान समित्या विविध सामाजिक उपक्रम राबवत असल्या तरी त्यामध्ये अधिक संघटन, नियोजन आणि व्यावसायिक दृष्टिकोनाची गरज आहे (10).

मंदिरांनी आपल्या धार्मिक भूमिकेबरोबरच सामाजिक भूमिकाही अधिक प्रभावीपणे पार पाडल्यास सामाजिक समता, न्याय आणि समावेशक विकासाला चालना मिळू शकते (6).

शिफारसी

मंदिर व्यवस्थापनासाठी नियमित प्रशिक्षण व क्षमता-विकास कार्यक्रम राबवावेत (10).

- सामाजिक उपक्रमांसाठी स्वतंत्र निधीची तरतूद करून त्याचा नियोजनबद्ध वापर करावा (9).
- आर्थिक पारदर्शकता वाढविण्यासाठी डिजिटल लेखा व लेखापरीक्षण प्रणाली स्वीकारावी (1).
- शासन, स्वयंसेवी संस्था आणि मंदिर व्यवस्थापन यांच्यात समन्वय वाढवावा, जेणेकरून सामाजिक उपक्रमांची व्याप्ती वाढेल (9).
- मंदिरांच्या सामाजिक उपक्रमांचे वार्षिक अहवाल प्रसिद्ध करून उत्तरदायित्व वाढवावे.

संदर्भ (References)

1. Charitable and Religious Trusts Act, 1920. (1920). Government of India.
2. Government of India. (n.d.). *The Constitution of India*. Ministry of Law and Justice.
3. Hindu Religious and Charitable Endowments Acts. (Various State Acts). Government of India / State Governments.
4. Government of Maharashtra. (1950). *Maharashtra Public Trusts Act, 1950*. Government Press.
5. National Legal Services Authority. (n.d.). *Reports and publications on legal services and social justice*. Government of India.
6. Rao, R. (2013). Religious organizations and social welfare: The role of temples and mutts in India's rural development. *Journal of Rural Development Studies, 28*(2), 145–160.
7. Sharma, S., & Mehta, P. (2020). Temples and sustainable development: Harnessing sacred spaces for environmental transformation in India. *International Journal of Social and Environmental Studies, 7*(1), 21–35.
8. Srinivasan, T. M. (2015). Hindu temples in charities and social services. In *Religion and social institutions in India* (pp. 489–504). Cambridge University Press.
9. Sundararajan, V., & Rao, S. (2019). *Governance and management of temples: A framework* (IIMB Working Paper No. 621). Indian Institute of Management Bangalore.
10. Government of Maharashtra. (1950). *Maharashtra Public Trusts Act, 1950*. Government Press.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

प्रल्हाद लुलेकर यांच्या साहित्याचे वैचारिक विश्लेषण

मनिषा राजेंद्र राजपूत [1] डॉ. विनोद कुमरे[2]
[1]संशोधक विद्यार्थी
[2]संशोधन मार्गदर्शक, मुंबई विद्यापीठ

Manuscript ID:
JRD -2026-180237
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 172-175
February 2026
Submitted: 30 Jan. 2026
Revised: 04 Feb. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश (Abstract)

प्रस्तुत शोधनिबंधात मराठी साहित्यातील प्रसिद्ध लेखक, समीक्षक आणि विचारवंत डॉ. प्रल्हाद लुलेकर यांच्या साहित्याचे वैचारिक विश्लेषण करण्यात आले आहे. मराठी साहित्यातील वैचारिक परंपरेत लुलेकर यांचे लेखन अत्यंत महत्त्वाचे असून, त्यांनी आपल्या साहित्यातून दलित समाजातील विषमता, जातीय अन्याय, शोषण आणि मानवी प्रतिष्ठेचे प्रश्न प्रभावीपणे मांडले आहेत. त्यांचे साहित्य केवळ भावनात्मक नसून ते तर्कशीलता, विवेकवाद आणि परिवर्तनवादी दृष्टिकोनावर आधारित आहे. संशोधनात गुणात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करून लुलेकर यांच्या लेखनावरील आंबेडकरी विचारांचा प्रभाव, सामाजिक वास्तवाचे भान आणि आत्मसन्मानाचा आग्रह या पैलूंचा अभ्यास केला आहे. निष्कर्षतः, प्रल्हाद लुलेकर यांचे साहित्य आजच्या काळातही सामाजिक न्याय आणि समतेच्या प्रस्थापनेसाठी दिशादर्शक असून, ते केवळ साहित्यिक दस्तऐवज नसून समाजपरिवर्तनाचे एक प्रभावी साधन ठरते.

महत्त्वाचे शब्द (Keywords): *प्रल्हाद लुलेकर, वैचारिक साहित्य, आंबेडकरी विचारधारा, दलित साहित्य, सामाजिक वास्तव, परिवर्तनवाद*

प्रस्तावना: -

मराठी साहित्य परंपरेत वैचारिक साहित्याला नेहमीच महत्त्वाचे स्थान राहिले आहे. मराठी साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते समाजाचे आरसे, समाजबदलाचे माध्यम आणि मानवी मूल्यांची पुनर्स्थापना करणारे प्रभावी साधन आहे. विशेषतः विसाव्या शतकानंतर मराठी साहित्यात सामाजिक वास्तवाचे भान देणारे, शोषित-वंचितांच्या वेदना व्यक्त करणारे आणि परिवर्तनाची प्रेरणा देणारे लेखन मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले. या प्रवाहात दलित साहित्याचा उदय हा मराठी साहित्याच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा मानला जातो. दलित साहित्याने केवळ साहित्यिक अभिव्यक्तीच दिली नाही, तर सामाजिक चळवळीला वैचारिक अधिष्ठान दिले. या परंपरेत प्रल्हाद लुलेकर यांचे लेखन विशेष महत्त्वाचे ठरते. त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजातील विषमता, जातीय अन्याय, शोषण, दडपशाही आणि मानवी प्रतिष्ठेचे प्रश्न प्रभावीपणे मांडले. त्यांच्या लेखनात अनुभवाची प्रामाणिकता आणि विचारांची स्पष्टता यांचा समन्वय दिसतो. त्यामुळे त्यांचे साहित्य वैचारिक साहित्याच्या चौकटीत अभ्यासण्यासने अत्यंत योग्य ठरते. प्रल्हाद लुलेकर यांनी आपल्या समग्र लेखनातून समाजातील दडपलेल्या घटकांचा आवाज बुलंद केला. "त्यांचे साहित्य केवळ भावनात्मक नसून, तर्कशीलता, विवेकवाद आणि परिवर्तनवादी दृष्टीकोन यांवर आधारित आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
मनिषा राजेंद्र राजपूत, संशोधक विद्यार्थी

How to cite this article:
राजपूत, . मनिषा . राजेंद्र .,& कुमरे, . विनोद . (2026). प्रल्हाद लुलेकर यांच्या साहित्याचे वैचारिक विश्लेषण. *Journal of Research and Development,* 18(2(*XIV*)), 172–175. https://doi.org/10.5281/zenodo.18799182

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18799182

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

म्हणूनच त्यांचे लेखन 'वैचारिक साहित्य' या संकल्पनेत चपखळ बसणारे ठरते".[१] लुलेकर यांचे लेखन सामाजिक वास्तवाशी घट्ट जोडलेले असून त्यातून दलित जीवनाचा अनुभव, संघर्षाची जाणीव आणि मुक्तीची आकांक्षा स्पष्टपणे व्यक्त होते.

या संशोधन लेखाचा उद्देश डॉ. प्रल्हाद लुलेकर यांच्या साहित्याचा वैचारिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे हा या संशोधन लेखाचा हेतू आहे. आजच्या सामाजिक वास्तवातही जात, वर्ग, लिंग आणि आर्थिक विषमता या समस्या कायम आहेत. अशा परिस्थितीत लुलेकर यांचे साहित्य केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून नव्हे, तर आजच्या समाजासाठीही दिशादर्शक ठरते. बदलत्या समाजरचनेत डॉ. प्रल्हाद लुलेकर यांचे समग्र लेखन नवविचारांना प्रेरणादायी ठरते. म्हणूनच प्रस्तुत संशोधन लेखामध्ये वैचारिक साहित्य आणि प्रल्हाद लुलेकर यांच्या योगदानाचा सविस्तर अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

प्रस्तुत संशोधन लेखाची उद्दिष्टे: -

प्रस्तुत संशोधन लेखाच्या निर्मितीसाठी प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे निश्चित केले आहेत –

अ) वैचारिक साहित्याची संकल्पना आणि स्वरूप स्पष्ट करणे.

आ) प्रल्हाद लुलेकर यांच्या साहित्याचा वैचारिक दृष्टिकोनातून सखोल अभ्यास करणे.

इ) त्यांच्या लेखनातील सामाजिक जाणीव, संघर्षशीलता आणि परिवर्तनवादी विचारांचे विश्लेषण करणे.

ई) दलित साहित्य परंपरेत लुलेकर यांच्या योगदानाचे मूल्यमापन करणे.

उ) त्यांच्या साहित्याची आजच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक संदर्भातील उपयुक्तता अधोरेखित करणे.

संशोधन पद्धती: -

सदर संशोधन लेखासाठी प्राधान्याने 'गुणात्मक संशोधन' पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. याचबरोबर ग्रंथालयीन संशोधन पद्धती, वर्णनात्मक पद्धत, विश्लेषणात्मक पद्धतीचा गरजेनुसार उपयोग केला आहे. संशोधन लेख हा प्रामुख्याने दुय्यम साधनसामग्रीवर आधारित आहे. संशोधन पद्धतीत पुढीलप्रमाणे इतर पद्धतींचा उपयोग केला आहे.

१) ग्रंथालयीन संशोधन पद्धती: - प्रल्हाद लुलेकर यांची उपलब्ध पुस्तके, लेख, भाषणे, नियतकालिकांतील लेखन तसेच दलित साहित्यावरील समीक्षात्मक ग्रंथ, संशोधन लेख आणि प्रबंध यांचा अभ्यास करण्यात आला.

२) वर्णनात्मक पद्धत: - लुलेकर यांच्या साहित्याचे स्वरूप, विषय, शैली, आशय आणि सामाजिक संदर्भ यांचे सविस्तर वर्णन करण्यात आले आहे.

३) विश्लेषणात्मक पद्धत: - त्यांच्या लेखनातील विचारधारा, सामाजिक भूमिका, आंबेडकरी प्रभाव आणि परिवर्तनवादी दृष्टिकोन यांचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे.

वरील सर्व संशोधन पद्धतीनचा गरजेनुसार, सुसंगत व विषयाचे शास्त्रीय आकलन करण्यासाठी गरजेनुसार वापर केला आहे.

विश्लेषण: -

"डॉ. प्रल्हाद गोविंदराव लुलेकर (जन्म: ३ मार्च १९५४) हे मराठी भाषा आणि साहित्याचे एक सुप्रसिद्ध लेखक आहेत, ते समीक्षक, विचारवंत, संशोधक आणि वक्ते देखील आहेत. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथील माजी मराठी विभाग प्रमुख व माजी परीक्षा नियंत्रक म्हणून कार्यरत होते."[२] त्यांच्या साहित्यकारकीरद्वारे समाज, इतिहास, दलित-बहुजन विचार, वाङ्मयसमीक्षा आणि मराठी साहित्यपरंपरेचा अभ्यास असा विस्तृत साहित्याचा क्षितिज उलगडलेला आहे. डॉ. प्रल्हाद लुलेकर हे केवळ लेखकच नाहीत, तर समाज-चिंतक आणि विचारप्रवर्तक म्हणूनही त्यांची ओळख आहे. त्यांच्या लेखनात फुले-शाहू-आंबेडकरांचा विचारपरंपरा स्पष्टपणे प्रतिबिंबित होते आणि वंचित, शोषित समाजाच्या स्थितीवर आधारित चिंतन त्यांचे लेखनाचे केंद्रबिंदू राहिले आहे.

वैचारिक साहित्याची संकल्पना: -

"वैचारिक साहित्य म्हणजे असे साहित्य जे समाजाला केवळ भावनिक पातळीवर स्पर्श करत नाही, तर बौद्धिक पातळीवर विचार करण्यास प्रवृत्त करते."[३] या साहित्याचा मुख्य उद्देश समाजातील वास्तव उघड करणे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, मानवी मूल्यांची पुनर्स्थापना करणे आणि परिवर्तनाची दिशा दाखवणे हा असतो. वैचारिक साहित्य हे नेहमीच सामाजिक बांधिलकी स्वीकारते. त्यांच्या लेखनात अनुभव आणि विचार यांचा सुंदर संगम दिसतो. केवळ वैयक्तिक दुःखाचे वर्णन न करता त्यांनी त्या दुःखामागील सामाजिक कारणांचा शोध घेतला. त्यामुळे त्यांचे साहित्य अधिक व्यापक अर्थाने सामाजिक दस्तऐवज ठरते.

मराठी साहित्यात महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ताराबाई शिंदे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, अण्णाभाऊ साठे, नामदेव ढसाळ, शरणकुमार लिंबाळे, उर्मिला पवार इत्यादी विचारवंत आणि लेखकांनी वैचारिक साहित्याची परंपरा समृद्ध केली

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

आहे. या परंपरेत प्रल्हाद लुलेकर यांचे लेखनही महत्त्वाचे स्थान मिळवते कारण त्यांचे साहित्य केवळ अनुभवकथन नसून समाजपरिवर्तनाची ठोस भूमिका घेते.

- **प्रल्हाद लुलेकर यांच्या साहित्याचे वैचारिक स्वरूप: -**

१) सामाजिक वास्तवाचे भान: -

प्रल्हाद लुलेकर यांच्या साहित्याचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक वास्तवाचे स्पष्ट भान. त्यांनी आपल्या लेखनातून दलित समाजाच्या जीवनातील दैनंदिन संघर्ष, अपमान, उपेक्षा, दारिद्र्य आणि असुरक्षिततेचे वास्तव चित्रण केले आहे. हे चित्रण केवळ करुणा निर्माण करण्यापुरते मर्यादित राहत नाही, तर समाजातील विषम रचना आणि सत्तासंबंधांवर प्रश्नचिन्ह निर्माण करते.

प्रल्हाद लुलेकराच्या लेखनातून असे स्पष्ट होते की जातीय विषमता ही नैसर्गिक नसून ती सामाजिक संरचनेतून निर्माण झालेली समस्या आहे. त्यामुळे ती बदलता येऊ शकते. ही भूमिका वैचारिक साहित्याची मूलभूत भूमिका मानली जाते.

२) आंबेडकरी विचारांचा प्रभाव: -

प्रल्हाद लुलेकर यांच्या लेखनावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा खोलवर प्रभाव दिसून येतो. "आंबेडकरांनी मांडलेली समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाची संकल्पना त्यांच्या लेखनातून सातत्याने प्रतिबिंबित होतात."[४] शिक्षण, संघटना आणि संघर्ष या त्रिसूत्रीवर त्यांचा ठाम विश्वास आहे. प्रल्हाद लुलेकर यांच्या लेखनात शिक्षणाला मुक्तीचे साधन मानले गेले आहे. समाजातील दडपलेल्या घटकांनी शिक्षणाच्या माध्यमातून आत्मबोध प्राप्त करावा आणि अन्यायाविरुद्ध उभे राहावे, हा संदेश त्यांच्या लेखनातून स्पष्टपणे दिसतो. त्यामुळे त्यांच्या साहित्य हे केवळ साहित्यिक निर्मिती न राहता सामाजिक चळवळीचे साधन बनते.

३) आत्मसन्मान आणि मानवी प्रतिष्ठा: -

प्रल्हाद लुलेकर यांच्या साहित्यामध्ये दलित समाजाच्या आत्मसन्मानाचा ठाम आग्रह दिसून येतो. ते केवळ शोषणाचे वर्णन करत नाहीत, तर दलित समाजाला स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी प्रेरित करतात. "मानवी प्रतिष्ठा ही जन्माधारित नसून ती प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत हक्क आहे, ही भूमिका त्यांच्या लेखनातून वारंवार अधोरेखित होते."[५] त्यांच्या साहित्यामुळे वाचकाच्या मनात आत्मभान जागृत होते. दलित समाजाने स्वतःला दुर्बल समजू नये, तर स्वतःच्या शक्तीची जाणीव ठेवावी, हा संदेश त्यांच्या लेखनाचा केंद्रबिंदू आहे.

४) परिवर्तनवादी दृष्टीकोन: -

वैचारिक साहित्याचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे परिवर्तनाची प्रेरणा. प्रल्हाद लुलेकर यांचे साहित्य निराशा पसरवणारे नसून ते आशा निर्माण करणारे आहे. त्यांच्या लेखनातून संघर्षाची प्रेरणा, प्रश्न विचारण्याची वृत्ती आणि सामाजिक जागृतीचा आग्रह दिसतो. लुलेकरांचे लेखन वाचकाला निष्क्रिय न ठेवता सक्रिय बनवते. 'शिक्षण घ्या, अन्यायाविरुद्ध उभे राहा, स्वतःचे हक्क ओळखा आणि समाजबदलासाठी योगदान द्या' हा संदेश त्यांच्या साहित्याचा गाभा आहे.

दलित साहित्य परंपरेतील योगदान: - दलित साहित्य परंपरेत प्रल्हाद लुलेकर यांचे योगदान महत्त्वाचे आहे कारण त्यांनी अनुभव आणि विचार यांची प्रभावी सांगड घातली आहे. त्यांचे साहित्य वैयक्तिक दुःखकथनापुरते मर्यादित न राहता सामूहिक जीवनानुभवाचे प्रतिनिधित्व करते. त्यामुळे त्यांचे लेखन व्यापक सामाजिक आशय घेऊन पुढे येते. दलित साहित्याचे प्रमुख उद्दिष्ट समाजपरिवर्तन हे आहे. या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी लुलेकर यांचे साहित्य महत्त्वाची भूमिका बजावते. त्यांच्या लेखनामुळे दलित साहित्याची वैचारिक बाजू अधिक बळकट होते आणि या साहित्यप्रवाहाला सुस्पष्ट दिशा मिळते.

याशिवाय, त्यांचे लेखन शैक्षणिक अभ्यासासाठीही उपयुक्त ठरते. अनेक संशोधक, विद्यार्थी आणि अभ्यासक त्यांच्या साहित्याचा अभ्यास वैचारिक साहित्याच्या संदर्भात करतात, हे त्यांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित करते. लुलेकर यांनी अनुभव आणि विचार यांची प्रभावी सांगड घातली आहे. त्यांचे साहित्य वैयक्तिक दुःखकथनापुरते मर्यादित न राहता सामूहिक जीवनानुभवाचे प्रतिनिधित्व करते

प्रल्हाद लुलेकरांच्या लेखनाची आजच्या संदर्भातील उपयुक्तता: -

आजच्या समाजातही जातीय विषमता, आर्थिक शोषण, सामाजिक अन्याय आणि मानवी हक्कांचे उल्लंघन या समस्या पूर्णतः संपलेल्या नाहीत. त्यामुळे प्रल्हाद लुलेकर यांच्या साहित्याची उपयुक्तता आज अधिकच वाढते. त्यांचे लेखन तरुण पिढीला सामाजिक भान देते आणि समाजातील प्रश्नांकडे चिकित्सक दृष्टीने पाहण्याची सवय लावते.

शैक्षणिक क्षेत्रात, सामाजिक चळवळींमध्ये आणि सांस्कृतिक क्षेत्रात लुलेकर यांचे विचार मार्गदर्शक ठरू शकतात. समतावादी समाजनिर्मितीसाठी त्यांच्या साहित्याचा अभ्यास आणि प्रचार आवश्यक आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

निष्कर्ष: -

प्रस्तुत संशोध लेखातून असे स्पष्ट होते की प्रल्हाद लुलेकर यांचे साहित्य हे वैचारिक साहित्याच्या परंपरेत अत्यंत महत्त्वाचे स्थान राखून आहे. त्यांच्या लेखनात सामाजिक वास्तवाचे भान, आंबेडकरी विचारांची प्रेरणा, आत्मसन्मानाचा आग्रह आणि परिवर्तनवादी दृष्टिकोन यांचा प्रभावी समन्वय दिसतो.

त्यांचे साहित्य केवळ साहित्यिक मूल्यापुरते मर्यादित न राहता सामाजिक परिवर्तनाचे साधन ठरते. त्यामुळे दलित साहित्याच्या इतिहासात आणि वैचारिक साहित्याच्या परंपरेत प्रल्हाद लुलेकर यांचे योगदान लक्षणीय मानावे लागते. आजच्या काळातही सामाजिक न्याय, समता आणि मानवी प्रतिष्ठा या मूल्यांची गरज कायम असल्यामुळे लुलेकर यांच्या साहित्याचे महत्त्व कमी होत नाही, उलट अधिक वाढते. म्हणूनच त्यांचे साहित्य अभ्यासासाठी, संशोधनासाठी आणि समाजप्रबोधनासाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

लेखक प्रल्हाद लुलेकर यांनी आपल्या लेखनातून समाजातील दडपलेल्या घटकांचा आवाज बुलंद केला. त्यांचे साहित्य केवळ भावनात्मक नसून, तर्कशीलता, विवेकवाद आणि परिवर्तनवादी दृष्टीकोन यांवर आधारित आहे. म्हणूनच त्यांचे लेखन 'वैचारिक साहित्य' या संकल्पनेत बसणारे ठरते. लुलेकर यांचे लेखन सामाजिक वास्तवाशी घट्ट जोडलेले असून त्यातून दलित जीवनाचा अनुभव, संघर्षाची जाणीव आणि मुक्तीची आकांक्षा स्पष्टपणे व्यक्त होते.

प्रल्हाद लुलेकर यांच्या साहित्याचे वैचारिक विश्लेषण करता असे स्पष्टपणे दिसून येते की –

अ) त्यांच्या साहित्याचा पाया आंबेडकरी विचारसरणीवर आधारित आहे.

आ) सामाजिक न्याय, समता, स्वातंत्र्य आणि मानवतावाद ही त्यांच्या लेखनाची मूलभूत मूल्ये आहेत.

इ) त्यांनी आपल्या लेखनातून समाजव्यवस्थेवर चिकित्सक दृष्टिकोन ठेवला आहे.

ई) त्यांच्या साहित्याची उपयुक्तता आजच्या काळातही कायम आहे.

म्हणूनच प्रल्हाद लुलेकर यांचे साहित्य हे मराठी दलित साहित्याच्या अभ्यासासाठी अत्यंत महत्त्वाचे मानावे लागते.

आधार सूची: -

१. प्रल्हाद लुलेकर, (२०१५) "***बलुतेदारांची हत्यारे आणि अवजारे***", पद्मगंधा प्रकाशन.
२. प्रल्हाद लुलेकर, (२०१९) "***सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक***", विद्या बुक्स पब्लिशर्स.
३. प्रल्हाद लुलेकर, (२०१५) "***अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा***", सायन पब्लिकेशन.
४. प्रल्हाद लुलेकर, (१९९७), "***मोगडा***", साहित्य सेवा प्रकाशन.
५. प्रल्हाद लुलेकर, "***पंचधारांचा प्रदेश***", चिन्मय प्रकाशन औरंगाबाद.
६. शिंदे, ह. वि., (२००५), "***मराठी दलित साहित्य : स्वरूप आणि वाटचाल***" औरंगाबाद: साकेत प्रकाशन.
७. लिमये, ग. मा., (२००१), "***दलित साहित्याचा इतिहास***", पुणे: पॉप्युलर प्रकाशन.
८. पवार, नामदेव, (१९९२), "***दलित साहित्य चळवळ***", मुंबई: ग्रंथाली.

संदर्भसूची: -

१. पवार, शरणकुमार, "***दलित साहित्य : स्वरूप आणि भूमिका***", औरंगाबाद : साक्षी प्रकाशन, २०१२. पृष्ठ क्र. ३४
२. लुलेकर, प्रल्हाद, "***निवडक लेखन***", (संपा.) नागपूर : परिवर्तन प्रकाशन, २०१५. पृष्ठ क्र. ०६.
३. कांबळे, दया पवार, "***दलित साहित्याचा इतिहास***", मुंबई : ग्रंथाली, २००८. पृष्ठ क्र. २२.
४. गायकवाड, गंगाधर, "***दलित साहित्य : विचार आणि वाटचाल***", पुणे : प्रतिमा प्रकाशन, २०१०. पृष्ठ क्र. ३८.
५. जाधव, अरुण, "***दलित साहित्याची वैचारिक भूमिका***", मराठी साहित्य समीक्षा, वर्ष १२, अंक २, २०१६. पृष्ठ क्र. ६१.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

लैंगिक समानता आणि सामाजिक सर्वसमावेशकता

संदीप ठाकरे
मराठी विभाग
नुविप्र, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
लासलगाव, ता. निफाड, जि. नाशिक – ४२२३०६
ईमेल – sthakare2112@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180238
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 176-179
February 2026

Submitted: 30 Jan. 2026
Revised: 04 Feb. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

लैंगिक समानता आणि सामाजिक सर्वसमावेशकता या संकल्पना आधुनिक लोकशाही समाजाच्या मूलभूत आधारस्तंभांपैकी आहेत. कोणत्याही समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी स्त्री, पुरुष तसेच तृतीयपंथीय व्यक्तींना समान संधी, अधिकार आणि सन्मान मिळणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, जात, वर्ग, धर्म, वंश, अपंगत्व, भाषा, लैंगिक ओळख किंवा आर्थिक स्थिती यांमुळे कोणीही सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय प्रवाहातून वगळले जाऊ नये, हीच सामाजिक सर्वसमावेशकतेची मूलभूत संकल्पना आहे.

या शोध निबंधाचा उद्देश लैंगिक समानता आणि सामाजिक सर्वसमावेशकता या दोन्ही संकल्पनांचा सैद्धांतिक व व्यावहारिक अभ्यास करणे हा आहे. निबंधात या संकल्पनांची व्याख्या, ऐतिहासिक पार्श्वभूमी, भारतीय सामाजिक रचना, घटनात्मक तरतुदी, शासकीय धोरणे, तसेच प्रत्यक्ष अंमलबजावणीतील आव्हाने यांचा सविस्तर आढावा घेतला आहे. विशेषतः भारतीय समाजातील पितृसत्ताक रचना, जातीय विषमता, आर्थिक असमानता आणि सांस्कृतिक रूढी यांचा लैंगिक समानतेवर कसा परिणाम होतो, याचे विश्लेषण करण्यात आले आहे.

अभ्यासातून असे दिसून येते की कायदे आणि धोरणे अस्तित्वात असूनही सामाजिक मानसिकता, सत्तासंबंध आणि संरचनात्मक असमानता यांमुळे लैंगिक समानता आणि सर्वसमावेशकता पूर्णतः साध्य झालेली नाही. त्यामुळे केवळ कायदेशीर उपायांपेक्षा शिक्षण, जनजागृती, आर्थिक सबलीकरण आणि सामाजिक परिवर्तन यांवर भर देणे आवश्यक आहे. हा निबंध धोरणकर्ते, संशोधक, विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्त्यांसाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येतो.

महत्वाचे शब्द*: लैंगिक समानता, सामाजिक सर्वसमावेशकता, पितृसत्ता, स्त्री-अधिकार, सामाजिक न्याय, भारतीय समाज, घटनात्मक मूल्ये*

प्रस्तावना

समाजाचा विकास केवळ आर्थिक प्रगतीने मोजता येत नाही, तर त्या समाजातील प्रत्येक घटकाला मिळणाऱ्या संधी, अधिकार आणि सन्मानावरही तो अवलंबून असतो. लैंगिक समानता आणि सामाजिक सर्वसमावेशकता या संकल्पना याच दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. लैंगिक समानता म्हणजे स्त्री, पुरुष आणि इतर सर्व लैंगिक ओळखी असलेल्या व्यक्तींना समान अधिकार, संधी आणि वागणूक मिळणे. तर सामाजिक सर्वसमावेशकता म्हणजे समाजातील सर्व घटकांना – विशेषतः दुर्बल, वंचित आणि उपेक्षित गटांना – सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रक्रियांमध्ये सहभागी करून घेणे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
संदीप ठाकरे , मराठी विभाग , नुविप्र, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लासलगाव, ता. निफाड, जि. नाशिक

How to cite this article:
ठाकरे, . संदीप . (2026). लैंगिक समानता आणि सामाजिक सर्वसमावेशकता. *Journal of Research and Development*, 18(2(*XIV*)), 176–179. https://doi.org/10.5281/zenodo.18799370

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18799370

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

भारतीय समाज हा विविधतेने नटलेला आहे. येथे जात, धर्म, भाषा, प्रदेश, लिंग आणि आर्थिक स्थिती यांवर आधारित असमानता दीर्घकाळापासून अस्तित्वात आहे. या पार्श्वभूमीवर लैंगिक समानता आणि सामाजिक सर्वसमावेशकता साध्य करणे हे मोठे आव्हान ठरते. संविधानाने समानतेचा अधिकार दिला असला, तरी प्रत्यक्ष सामाजिक वास्तव वेगळे असल्याचे चित्र समाजात दिसून येते.

२. लैंगिक समानता : संकल्पना आणि अर्थ

लैंगिक समानता ही आधुनिक समाजरचनेतील एक मूलभूत आणि महत्त्वाची संकल्पना आहे. कोणत्याही समाजाचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास साधायचा असेल, तर त्या समाजातील सर्व व्यक्तींना त्यांच्या लिंगाच्या आधारावर कोणताही भेदभाव न करता समान संधी, अधिकार आणि सन्मान मिळणे आवश्यक आहे. यालाच लैंगिक समानता असे म्हणतात. लैंगिक समानतेचा अर्थ केवळ स्त्री आणि पुरुष यांच्यातील समानतेपुरता मर्यादित नसून, त्यामध्ये तृतीयपंथीय तसेच प्रत्येक व्यक्तीने विविध लैंगिक ओळखी असलेल्या व्यक्तींनाही समान सामाजिक मान्यता आणि संरक्षण देणे अपेक्षित आहे.

लैंगिक समानतेची संकल्पना ही मानवाधिकारांशी निगडित आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेनुसार, प्रत्येक व्यक्तीला तिच्या लिंगाच्या आधारे भेदभाव न करता शिक्षण, आरोग्य, रोजगार, राजकीय सहभाग आणि निर्णयप्रक्रियेत समान संधी मिळाली पाहिजे. ही समानता केवळ कायद्यापुरती नसून सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय स्तरांवर प्रत्यक्षात दिसून यायला हवी. म्हणजेच, स्त्री आणि पुरुष यांना समान कायदेशीर हक्क असणे पुरेसे नाही, तर त्या हक्कांचा उपभोग घेण्यासाठी आवश्यक असलेल्या संधी आणि साधनांमध्येही समानता असणे गरजेचे आहे.

भारतीय समाजाच्या संदर्भात पाहिले असता, लैंगिक असमानतेची मुळे पितृसत्ताक सामाजिक व्यवस्थेत खोलवर रुजलेली आहेत. पारंपरिक मूल्यव्यवस्थेमध्ये पुरुषाला कुटुंबप्रमुख आणि निर्णयकर्ता मानले गेले, तर स्त्रीला घरगुती कामे, मुलांचे संगोपन आणि सेवा या भूमिकांपुरते मर्यादित ठेवले गेले. याचा परिणाम म्हणून स्त्रियांना शिक्षण, रोजगार आणि सार्वजनिक जीवनातील सहभाग यांमध्ये दुय्यम स्थान मिळाले. आजही वेतनातील असमानता, स्त्रियांवरील हिंसा, निर्णयप्रक्रियेत मर्यादित सहभाग आणि सामाजिक बंधने ही लैंगिक असमानतेची ठळक उदाहरणे आहेत.

लैंगिक समानतेचा अर्थ 'सर्वांना समान वागणूक देणे' असा सरळ नसून, 'समान परिणाम साध्य करण्यासाठी आवश्यक ते वेगळे उपाय करणे' असाही आहे. उदाहरणार्थ, स्त्रियांसाठी विशेष आरक्षण, मातृत्व रजा किंवा संरक्षणात्मक कायदे हे समानतेच्या विरोधात नसून, ऐतिहासिक आणि संरचनात्मक असमानता दूर करण्यासाठी आवश्यक असलेले उपाय आहेत. त्यामुळे लैंगिक समानता आणि लैंगिक समता (Gender Equity) या संकल्पना परस्परपूरक आहेत.

एकूणच लैंगिक समानता ही सामाजिक न्यायाची, लोकशाही मूल्यांची आणि मानवी प्रतिष्ठेची ग्वाही देणारी संकल्पना आहे. ती साध्य झाल्यास केवळ स्त्रियांचेच नव्हे, तर संपूर्ण समाजाचे सक्षमीकरण होते. कारण जेव्हा समाजातील सर्व घटक समान संधींसह विकास प्रक्रियेत सहभागी होतात, तेव्हा समाज अधिक समतोल, न्याय्य आणि प्रगत बनतो. म्हणूनच, लैंगिक समानता ही केवळ स्त्री-पुरुष प्रश्न नसून, संपूर्ण समाजाच्या विकासाशी निगडित असलेली व्यापक संकल्पना आहे.

३. सामाजिक सर्वसमावेशकता : संकल्पनात्मक चौकट

सामाजिक सर्वसमावेशकता ही आधुनिक समाजविज्ञानातील एक महत्त्वाची आणि व्यापक संकल्पना आहे. कोणताही समाज तेव्हाच न्याय्य आणि लोकशाही मूल्यांवर आधारित मानला जातो, जेव्हा त्या समाजातील सर्व व्यक्ती आणि समूहांना समान संधी, अधिकार आणि संसाधनांपर्यंत पोहोच मिळते. सामाजिक सर्वसमावेशकतेचा मूलभूत उद्देश म्हणजे समाजातील कोणताही घटक वंचित, उपेक्षित किंवा बहिष्कृत राहू नये, याची खात्री करणे. ही संकल्पना सामाजिक बहिष्करणाच्या (Social Exclusion) विरोधात उभी राहते.

सामाजिक सर्वसमावेशकतेची संकल्पनात्मक चौकट ही बहुआयामी आहे. ती सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक या सर्व स्तरांवर कार्य करते. सामाजिक स्तरावर सर्वसमावेशकतेचा अर्थ असा की जात, धर्म, लिंग, वंश, भाषा, अपंगत्व किंवा लैंगिक ओळख यांपैकी कोणत्याही आधारावर व्यक्तींना भेदभावाला सामोरे जावे लागू नये. समाजातील सर्व व्यक्तींना सामाजिक प्रतिष्ठा, सुरक्षितता आणि समान वागणूक मिळणे ही या चौकटीची मुख्य अट आहे.

आर्थिक स्तरावर सामाजिक सर्वसमावेशकता म्हणजे रोजगार, उत्पन्नाची साधने, जमीन, कर्ज, आणि बाजारपेठेतील संधी सर्वांसाठी खुल्या असणे. आर्थिक विषमता ही सामाजिक बहिष्करणाचे एक प्रमुख कारण आहे. जेव्हा विशिष्ट गट आर्थिकदृष्ट्या दुर्बल राहतात, तेव्हा ते शिक्षण, आरोग्य आणि इतर मूलभूत सुविधांपासून वंचित राहतात. त्यामुळे सामाजिक सर्वसमावेशकतेच्या चौकटीत आर्थिक सक्षमीकरणाला विशेष महत्त्व दिले जाते.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

राजकीय स्तरावर सर्वसमावेशकतेचा अर्थ निर्णयप्रक्रियेत सर्व घटकांचा सहभाग सुनिश्चित करणे असा आहे. लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार, प्रतिनिधित्व आणि धोरणनिर्मितीत सहभाग मिळणे आवश्यक आहे. महिला, अनुसूचित जाती-जमाती, अल्पसंख्याक आणि इतर वंचित घटकांचा राजकीय सहभाग वाढविणे ही सामाजिक सर्वसमावेशकतेची महत्त्वाची बाब आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण धोरणे याचे उत्तम उदाहरण आहेत.

सांस्कृतिक स्तरावर सामाजिक सर्वसमावेशकता म्हणजे विविधता स्वीकारणे आणि ती साजरी करणे. प्रत्येक समुदायाच्या भाषा, परंपरा, मूल्ये आणि ओळखीचा सन्मान केला जाणे आवश्यक आहे. एका विशिष्ट संस्कृतीला प्राधान्य देऊन इतर संस्कृतींना दुय्यम मानल्यास सामाजिक तणाव निर्माण होतो. त्यामुळे सर्वसमावेशक समाज हा बहुसांस्कृतिकतेवर आधारित असतो.

सामाजिक सर्वसमावेशकतेच्या संकल्पनात्मक चौकटीत लैंगिक समानतेला विशेष स्थान आहे. कारण महिला आणि लैंगिक अल्पसंख्याक हे अनेकदा इतर वंचित ओळखींशी जोडलेले असतात. उदाहरणार्थ, ग्रामीण भागातील दलित महिला या जात, वर्ग आणि लिंग या तिन्ही पातळ्यांवर भेदभावाला सामोरे जातात. त्यामुळे सामाजिक सर्वसमावेशकता ही केवळ एकाच घटकावर केंद्रित न राहता, आंतरछेदात्मक (Intersectional) दृष्टिकोन स्वीकारते.

४. ऐतिहासिक पार्श्वभूमी

लैंगिक समानता आणि सामाजिक सर्वसमावेशकता या संकल्पनांचा विकास हा दीर्घ ऐतिहासिक प्रक्रियेचा परिणाम आहे. मानवी समाजाच्या प्रारंभीच्या टप्प्यात सामाजिक रचना तुलनेने साधी होती आणि स्त्री-पुरुष यांच्यातील भूमिकांमध्ये फारसा कडक भेद नव्हता, असे अनेक मानववंशशास्त्रीय अभ्यास सूचित करतात. तथापि, शेतीव्यवस्थेच्या विकासानंतर आणि स्थिर समाजरचनेच्या उदयानंतर संपत्ती, सत्ता आणि वारसाहक्क यांवर पुरुषांचे नियंत्रण वाढत गेले आणि पितृसत्ताक व्यवस्था दृढ झाली. याच काळात लैंगिक असमानतेची मुळे खोलवर रुजली. भारतीय इतिहासाच्या संदर्भात पाहिले असता, प्राचीन काळात स्त्रियांची स्थिती एकसमान नव्हती. वैदिक काळात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार होता, त्या धार्मिक व बौद्धिक चर्चांमध्ये सहभागी होत असत आणि काही स्त्रिया ऋषींच्या रूपातही ओळखल्या जात. तथापि, कालांतराने सामाजिक, धार्मिक आणि राजकीय बदलांमुळे स्त्रियांचे स्थान खालावले. उत्तरवैदिक आणि मध्ययुगीन काळात बालविवाह, सतीप्रथा, विधवांवरील निर्बंध, आणि स्त्रीशिक्षणावरील मर्यादा वाढल्या. यामुळे स्त्रिया सामाजिक आणि सार्वजनिक जीवनातून मोठ्या प्रमाणावर वगळल्या गेल्या.

मध्ययुगीन काळात केवळ स्त्रियांनाच नव्हे, तर अनेक सामाजिक गटांनाही बहिष्करणाचा सामना करावा लागला. जातिव्यवस्था अधिक कठोर बनली आणि शूद्र, अतिशूद्र तसेच आदिवासी समुदायांना शिक्षण, धर्म आणि सत्तेपासून दूर ठेवले गेले. सामाजिक सर्वसमावेशकतेऐवजी सामाजिक बहिष्करण हेच या काळाचे प्रमुख वैशिष्ट्य होते.

ब्रिटिश कालखंडात भारतीय समाजात महत्त्वाचे बदल घडू लागले. एकीकडे वसाहतवादी शोषण सुरू असताना, दुसरीकडे आधुनिक शिक्षण, कायदे आणि सुधारणा चळवळींचा उदय झाला. राजा राममोहन रॉय, ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, ईश्वरचंद्र विद्यासागर यांसारख्या समाजसुधारकांनी स्त्रीशिक्षण, विधवा पुनर्विवाह आणि जातिभेदाच्या विरोधात चळवळी उभारल्या. सतीप्रथेचा अंत, स्त्रीशिक्षणाची सुरुवात आणि सामाजिक सुधारणांचे कायदे हे लैंगिक समानतेच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल होते. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात स्त्रियांचा आणि वंचित समुदायांचा सहभाग वाढला. गांधीजींनी स्त्रियांना सार्वजनिक जीवनात सहभागी होण्यास प्रोत्साहन दिले. या काळात सामाजिक समानतेचा विचार अधिक व्यापक स्वरूपात पुढे आला.

स्वातंत्र्योत्तर भारतात भारतीय संविधानाने लैंगिक समानता आणि सामाजिक न्यायाला कायदेशीर अधिष्ठान दिले. समानतेचा अधिकार, अस्पृश्यतेचे उच्चाटन आणि आरक्षण धोरणे यांमुळे सामाजिक सर्वसमावेशकतेची पायाभरणी झाली. तथापि, ऐतिहासिक असमानतेचा प्रभाव आजही समाजात दिसून येतो.

५. भारतीय संविधान आणि कायदेशीर तरतुदी

भारतीय संविधानातील अनुच्छेद १४, १५ आणि १६ समानतेचा अधिकार प्रदान करतात. अनुच्छेद १५(३) अंतर्गत महिलांसाठी विशेष तरतुदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. स्त्री हक्क संरक्षणासाठी अनेक कायदे करण्यात आले आहेत, जसे की – हिंदू विवाह कायदा, हुंडाबंदी कायदा, लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा इत्यादी. तथापि, कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी ही मोठी समस्या आहे.

६. शिक्षण, रोजगार आणि आरोग्य क्षेत्रातील लैंगिक समानता

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. स्त्रीशिक्षण वाढल्यास बालविवाह, मातामृत्यू आणि गरीबी यांसारख्या समस्या कमी होतात. तथापि, ग्रामीण भागात आजही मुलींचे शाळाबाह्य होण्याचे प्रमाण जास्त आहे. रोजगार क्षेत्रात वेतन असमानता,

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

असुरक्षित कामाची परिस्थिती आणि नेतृत्वाच्या संधींचा अभाव दिसून येतो. आरोग्य क्षेत्रातही महिलांच्या पोषण आणि आरोग्याकडे दुर्लक्ष केले जाते.

७. सामाजिक सर्वसमावेशकतेतील प्रमुख आव्हाने

दारिद्र्य, अशिक्षण, सामाजिक रूढी, आणि राजकीय इच्छाशक्तीचा अभाव ही सर्वसमावेशकतेतील प्रमुख अडथळे आहेत. विशेषतः महिला जर वंचित समुदायातील असतील, तर त्यांना दुहेरी भेदभावाला सामोरे जावे लागते.

८. धोरणे आणि उपाययोजना

लैंगिक समानता आणि सामाजिक सर्वसमावेशकता साध्य करण्यासाठी बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे. शिक्षणात लैंगिक संवेदनशील अभ्यासक्रम, महिलांचे आर्थिक सबलीकरण, स्वयं-सहायता गट, आणि माध्यमांद्वारे जनजागृती यांवर भर देणे गरजेचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचे आरक्षण हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

निष्कर्ष

लैंगिक समानता आणि सामाजिक सर्वसमावेशकता या केवळ संकल्पना नसून सामाजिक न्यायासाठी आवश्यक अटी आहेत. कायदे आणि धोरणे असूनही सामाजिक मानसिकतेत बदल न झाल्यास अपेक्षित परिणाम साध्य होणार नाहीत. त्यामुळे शिक्षण, संवाद आणि सहभाग यांद्वारे सर्वसमावेशक आणि समताधिष्ठित समाज घडविणे ही काळाची गरज आहे.

संदर्भ

1. आंबेडकर, भि. रा. (१९९४). *स्त्री आणि समाज*. मुंबई: लोकवाङ्मय गृह.
2. देशपांडे, नीलिमा. (२०१०). *स्त्री-अभ्यास : संकल्पना आणि वास्तव*. पुणे: साकेत प्रकाशन.
3. भारत सरकार. (१९५०). *भारतीय संविधान*. नवी दिल्ली: भारत सरकार प्रकाशन विभाग.
4. फुले, सावित्रीबाई. (२००६). *संपूर्ण वाङ्मय*. मुंबई: महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.
5. युनायटेड नेशन्स. (२०१८). *लैंगिक समानता आणि विकास*. नवी दिल्ली: युएनडीपी भारत.
6. जोशी, शारदा. (२०१२). *सामाजिक न्याय आणि स्त्री प्रश्न*. नागपूर: कॉन्टिनेंटल प्रकाशन.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

शस्त्र निर्मितीच्या क्षेत्रात विकसित भारताचे योगदान : एक विश्लेषणात्मक अभ्यास

प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील,
गंगामाई एज्युकेशन ट्रस्टचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नगाव,ता.जि.धुळे.

Manuscript ID:
JRD -2026-180239
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 180-183
February 2026
Submitted: 30 Jan. 2026
Revised: 04 Feb. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

प्रस्तुत लेख भारताच्या शस्त्रनिर्मिती क्षेत्रातील वाटचालीचे आणि 'विकसित भारत' संकल्पनेतील त्याच्या योगदानाचे विश्लेषण करतो. आधुनिक राष्ट्रराज्यासाठी संरक्षण क्षमता ही सार्वभौमत्वाची मूलभूत अट असून, भारताने स्वातंत्र्यानंतरच्या परकीय अवलंबनाचा काळ मागे टाकून आता 'आत्मनिर्भरते'कडे पाऊल टाकले आहे. २१ व्या शतकाच्या दुसऱ्या दशकानंतर, विशेषतः २०१४ पासून, 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' यांसारख्या धोरणांमुळे संरक्षण उत्पादनात आमूलाग्र बदल झाले आहेत.

भारताने DRDO, HAL आणि BEL यांसारख्या सार्वजनिक संस्थांच्या जोडीला आता टाटा, लार्सन अँड टुब्रो सारख्या खासगी क्षेत्रालाही वाव दिला आहे. यामुळे ब्राह्मोस, अग्नी, तेजस आणि 'स्टार' सारखी अत्याधुनिक क्षेपणास्त्रे व विमाने स्वदेशी बनावटीची झाली आहेत. आकडेवारीनुसार, भारताचे संरक्षण उत्पादन २०१३-१४ मधील ४६,४२९ कोटींवरून २०२४-२५ मध्ये १,५०,५९० कोटींपर्यंत पोहोचले आहे. तसेच, भारत आता केवळ आयातदार न राहता एक महत्त्वाचा निर्यातदार देश म्हणूनही उदयास येत असून २०२३-२४ मध्ये २१,०८३ कोटी रुपयांची निर्यात झाली आहे. तांत्रिक मर्यादा आणि निधीचे अभाव यांसारखी आव्हाने असली तरी, संरक्षण क्षेत्रातील हे स्वावलंबन भारताच्या सामरिक स्वायत्ततेसाठी आणि जागतिक राजकारणातील प्रभावासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

महत्त्वाचे शब्द (Keywords): *शस्त्रनिर्मिती (Arms Manufacturing), आत्मनिर्भर भारत (Self-reliant India) सामरिक स्वायत्तता (Strategic Autonomy), संरक्षण निर्यात (Defence Exports), सार्वजनिक-खासगी भागीदारी (PPP), DRDO, मेक इन इंडिया (Make in India)*

प्रस्तावना-

आधुनिक राष्ट्रराज्याच्या संकल्पनेत संरक्षण क्षमता ही सार्वभौमत्वाची मूलभूत अट मानली जाते. राज्याच्या अस्तित्वासाठी, अंतर्गत स्थैर्यासाठी आणि बाह्य धोके रोखण्यासाठी सक्षम संरक्षण व्यवस्था आवश्यक असते. या संरक्षण व्यवस्थेचा कणा म्हणजे शस्त्रनिर्मिती व संरक्षण उत्पादन क्षेत्र. शस्त्रनिर्मिती केवळ युद्धसज्जतेपुरती मर्यादित नसून ती राष्ट्राच्या राजकीय स्वायत्ततेचे, आर्थिक सामर्थ्याचे आणि तांत्रिक प्रगतीचे द्योतक मानली जाते.स्वातंत्र्यानंतर दीर्घकाळ भारत संरक्षण साहित्याच्या बाबतीत परकीय आयातीवर अवलंबून होता. या अवलंबनाचा परिणाम भारताच्या सामरिक निर्णयक्षमतेवर आणि परराष्ट्र धोरणावरही होत असल्याचे दिसून येते. मात्र एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकानंतर भारताने संरक्षण क्षेत्रात धोरणात्मक बदल घडवून आणत स्वदेशी उत्पादनाला प्राधान्य दिले. ही प्रक्रिया भारताच्या 'हार्ड पॉवर'च्या वृद्धीशी निगडित असून जागतिक राजकारणात भारताची भूमिका अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. स्वातंत्र्यानंतर भारताने संरक्षण व शस्त्रनिर्मितीच्या क्षेत्रात केलेली वाटचाल ही केवळ लष्करी गरजांपुरती मर्यादित नसून ती राष्ट्रीय सार्वभौमत्व, सामरिक स्वायत्तता, परराष्ट्र धोरण आणि आर्थिक विकासाशी घट्टपणे जोडलेली आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, गंगामाई एज्युकेशन ट्रस्टचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नगाव,ता.जि.धुळे.

How to cite this article:
पाटील, . एस . आर . (2026). शस्त्र निर्मितीच्या क्षेत्रात विकसित भारताचे योगदान : एक विश्लेषणात्मक अभ्यास. *Journal of Research and Development,* 18(2(*XIV*)), 180–183. https://doi.org/10.5281/zenodo.18799435

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18799435

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

अलीकडील काळात 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' यांसारख्या धोरणात्मक उपक्रमांमुळे भारताच्या संरक्षण उत्पादन क्षमतेत आणि निर्यातीत लक्षणीय वाढ झालेली दिसून येते. हा संशोधन लेख भारताच्या शस्त्रनिर्मिती क्षेत्रातील धोरणात्मक बदल, संस्थात्मक रचना, सार्वजनिक व खासगी क्षेत्राचे योगदान तसेच जागतिक राजकारणातील भारताची भूमिका यांचे विश्लेषण करतो. उपलब्ध आकडेवारीच्या आधारे संरक्षण उत्पादन व निर्यातीत झालेल्या वाढीचे चिकित्सक मूल्यमापन करून विकसित भारताच्या संकल्पनेत या क्षेत्राचे स्थान अधोरेखित करण्यात आले आहे

संशोधनाची उद्दिष्टे- संरक्षण उत्पादन धोरणे व त्यांचा प्रभाव विश्लेषित करणे,सार्वजनिक व खासगी क्षेत्राच्या योगदानाचे मूल्यमापन करणे व भारताच्या संरक्षण निर्यात क्षमतेचे विश्लेषण करणे.

विश्लेषण-

स्वातंत्र्यानंतर भारताने संरक्षण क्षेत्रात सार्वजनिक क्षेत्रावर आधारित मॉडेल स्वीकारले. 1950 च्या दशकात **DRDO (Defence Research and Development Organisation)** ची स्थापना झाली. HAL, BEL, BDL यांसारख्या सार्वजनिक उपक्रमांनी हवाई, नौदल व भूदलासाठी आवश्यक साधनसामग्री तयार करण्यास सुरुवात केली.तथापि, तंत्रज्ञान मर्यादा, निधीअभाव आणि परकीय अवलंबनामुळे भारताची संरक्षण आयात मोठ्या प्रमाणावर सुरू राहिली. 1991 नंतरच्या आर्थिक सुधारणांमुळे खासगी क्षेत्राचा सहभाग वाढू लागला आणि संरक्षण उद्योगात स्पर्धात्मकता निर्माण झाली.भारत सरकारने 2014 नंतर संरक्षण उत्पादनाला विशेष प्राधान्य दिले. 'मेक इन इंडिया', 'आत्मनिर्भर भारत अभियान' आणि संरक्षण अधिग्रहण प्रक्रिया (Defence Acquisition Procedure – DAP) यांसारख्या धोरणांनी स्थानिक उत्पादनाला चालना दिली. आयात प्रतिबंधित यादी (Negative Import List), संरक्षण उत्पादनासाठी FDI मर्यादा वाढविणे तसेच संरक्षण औद्योगिक कॉरिडॉरची स्थापना (उत्तर प्रदेश व तमिळनाडू) ही धोरणात्मक पावले महत्त्वाची ठरली.या धोरणांमुळे भारताच्या संरक्षण उत्पादन परिसंस्थेत संरचनात्मक बदल घडून आले. स्वदेशी संशोधन, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि सार्वजनिक–खासगी भागीदारी यांना चालना मिळाली असून संरक्षण क्षेत्रातील दीर्घकालीन आत्मनिर्भरतेचा पाया घातला गेला आहे.

नरेंद्र मोदी हे 2014 मध्ये पंतप्रधानपदी निवडून आल्यावर त्यांनी 27 सप्टेंबर ते 1 ऑक्टोबर या दरम्यान संयुक्त राष्ट्रांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेनिमित्ताने अमेरिकेला प्रथम भेट दिली.त्यावेळी अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा अणि पंतप्रधान मोदी यांच्यात बोलणी झाली.यावेळी दोन्ही राष्ट्रांनी संयुक्त निवेदन प्रसिद्ध केले.त्यात या दोन्ही नेत्यांनी अमेरिका आणि भारत यांच्यातील व्यापक रणनीतिक आणि जागतिक भागीदारीची स्तुती केली.त्यानुसार ही दोन्ही राष्ट्रे त्यांच्या नागरिकांसाठी आणि जगासाठी मोठ्या प्रमाणात समृद्धी आणि सुरक्षा निर्माण करत राहील. पंतप्रधान मोदींनी जबाबदार, प्रभावशाली जागतिक सामर्थ्य म्हणून भारताच्या उदयातील प्रमुख भागीदार असलेल्या अमेरिकेबरोबरच्या भागीदारीला महत्व दिले. सामायिक मूल्ये, लोकांमधील संबंध आणि बहुलवादी परंपरा पाहता राष्ट्राध्यक्ष ओबामा यांनी ओळखले की मित्र आणि भागीदार म्हणून भारताचा उदय अमेरिकेच्या हिताचा आहे. पुढील दहा वर्षांत जागतिक स्थैर्य आणि लोकांच्या जीवनासाठी प्रत्येक क्षेत्रात सहकार्य मजबूत आणि सखोल करण्यासाठी मार्गदर्शन म्हणून त्यांनी प्रथम "स्ट्रॅटेजिक पार्टनरशिपसाठी व्हिजन स्टेटमेंट" दिले. दोन्ही राष्ट्र "चालना साथ साथ Forward together we go" ह्या मंत्राने वचनबद्ध झाले.भारताने रशियाच्या मदतीने अनेक शस्त्र निर्मिती करण्याबाबत चांगले यश मिळविले.याचाही प्रभाव जाणवतो.

भारत व प्रमुख राष्ट्रांचे संरक्षण धोरण : तुलनात्मक चर्चा

संरक्षण धोरणांच्या तुलनात्मक अभ्यासातून विविध राष्ट्रांची सामरिक प्राधान्ये स्पष्ट होतात. अमेरिका, चीन आणि रशिया हे देश संरक्षण उत्पादनाच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर स्वावलंबी आहेत. अमेरिकेचे संरक्षण धोरण खासगी उद्योगांवर आधारित असून संशोधन व विकासासाठी प्रचंड निधी उपलब्ध करून दिला जातो. लॉकहीड मार्टिन, बोईंग यांसारख्या खासगी कंपन्या जागतिक संरक्षण बाजारात आघाडीवर आहेत.

चीनचे संरक्षण धोरण राज्यनियंत्रित असून 'Civil–Military Fusion' या संकल्पनेवर आधारित आहे. यामध्ये नागरी तंत्रज्ञानाचा लष्करी वापर केला जातो. रशियाचे संरक्षण धोरण पारंपरिक शस्त्रनिर्मितीवर केंद्रित असून निर्यातीवर भर दिला जातो.

या तुलनेत भारताचे संरक्षण धोरण मिश्र स्वरूपाचे आहे. सार्वजनिक क्षेत्राचा मजबूत पाया, खासगी क्षेत्राचा वाढता सहभाग आणि परकीय सहकार्य यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न भारत करीत आहे. ही बाब भारताच्या विकासशील अवस्थेशी सुसंगत ठरते.

विकसित भारताच्या संकल्पनेत संरक्षण धोरणांचे स्थान

'विकसित भारत' या संकल्पनेत संरक्षण धोरणांना महत्त्वाचे स्थान आहे. संरक्षण उत्पादनात आत्मनिर्भरता असल्यास आर्थिक संसाधनांची बचत होते, रोजगारनिर्मिती वाढते आणि तांत्रिक कौशल्य विकसित होते. शिवाय, सामरिक स्वायत्ततेमुळे भारत आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वतंत्र भूमिका घेऊ शकतो.राज्यशास्त्रीय दृष्टीने पाहता, संरक्षण धोरणे ही राष्ट्रीय हिताच्या पूर्ततेसाठी महत्त्वाची साधने आहेत. भारताचे संरक्षण धोरण आर्थिक विकास, परराष्ट्र धोरण आणि राष्ट्रीय सुरक्षेचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे शस्त्रनिर्मितीच्या क्षेत्रातील धोरणात्मक सुधारणा या विकसित भारताच्या दिशेने नेणाऱ्या ठोस पायऱ्या ठरतात.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

भारताच्या संरक्षण उद्योगाचा कणा आजही सार्वजनिक क्षेत्र आहे. HAL ने तेजस लढाऊ विमान, प्रचंड हेलिकॉप्टर विकसित केले. BEL ने रडार, कम्युनिकेशन सिस्टीम्समध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. BDL मार्फत क्षेपणास्त्र प्रणालींचे उत्पादन वाढविण्यात आले.DRDO च्या माध्यमातून अग्नी, पृथ्वी, ब्रह्मोस, आकाश यांसारख्या क्षेपणास्त्र प्रणाली विकसित करण्यात भारताला यश आले. यामुळे भारताची सामरिक स्वायत्तता वाढली.अलीकडील काळात खासगी कंपन्यांनी संरक्षण क्षेत्रात लक्षणीय योगदान दिले आहे. टाटा, लार्सन अँड टुब्रो, महिंद्रा डिफेन्स, भारत फोर्ज यांसारख्या कंपन्या संरक्षण उत्पादनात सक्रिय झाल्या आहेत.

खासगी क्षेत्रामुळे तंत्रज्ञान हस्तांतरण, कार्यक्षमता व नवोन्मेष वाढला आहे. सार्वजनिक-खासगी भागीदारी (PPP) मॉडेलमुळे उत्पादन खर्चात घट आणि गुणवत्तेत सुधारणा दिसून येते.

संरक्षण निर्यात आणि जागतिक योगदान

भारत आता केवळ संरक्षण साहित्याचा आयातदार न राहता निर्यातदार देश म्हणूनही उदयास येत आहे. संरक्षण मंत्रालयाच्या उपलब्ध आकडेवारीनुसार 2013–14 पासून भारताच्या संरक्षण निर्यातीत सातत्याने वाढ होताना दिसते. आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिका तसेच हिंद-प्रशांत क्षेत्रातील अनेक देश भारताकडून संरक्षण साहित्याची खरेदी करत आहेत. यामध्ये हलकी शस्त्रे, नौदल उपकरणे, रडार प्रणाली, क्षेपणास्त्र उपघटक, ड्रोन व दळणवळण साधने यांचा समावेश आहे.

संरक्षण निर्यातीमुळे भारताची जागतिक प्रतिमा एक जबाबदार व विश्वासार्ह संरक्षण भागीदार म्हणून निर्माण होत आहे. ही बाब भारताच्या परराष्ट्र धोरणासाठी सामरिक दृष्ट्या महत्त्वाची ठरते. संरक्षण कूटनीती (Defence Diplomacy) हा भारताच्या सॉफ्ट पॉवर व हार्ड पॉवर यांचा संगम म्हणून पुढे येत आहे.

संरक्षण उत्पादन व निर्यात (2013–14 ते 2024–25)-

भारत मोठ्या प्रमाणावर सशस्त्र ची निर्मिती करीत आहे 2014 -15 पासून सत्तेवर आलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने संरक्षण उत्पादनांचे देशातच उत्पादन करण्याच्या बाबतीमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू केले आणि तसे धोरण स्वीकारले. संरक्षण मंत्रालय व PIB च्या अहवालानुसार २०१३-१४ मध्ये ४६४२९ कोटी रु.किमतीचे स्वदेशी शस्त्र निर्मिती केली व त्यापैकी ६८६ कोटी रु ची निर्यात केली.२०१९-२० मध्ये नवीन धोरणाचा परिणाम म्हणून ७९०७१ कोटी रु.चे स्वदेशी शस्त्र उत्पादन भारताने केले व त्यापैकी १५२१ कोटी रु. स्वदेशी शस्त्र निर्यात केली.२०२३-२४ मध्ये १२७४३४ कोटी रु.उत्पादन केले व त्यापैकी २१०८३ रु.ची निर्यात केली.२०२४-२५ मध्ये १५०५९० कोटी रु.स्वदेशी शस्त्र उत्पादन भारताने केले ,त्यापैकी २३६२२ कोटी रु.शस्त्र निर्यात केली.यावरून भारत आत्मनिर्भर झाला असे दिसते.अलीकडच्या काळात भारताने पुढील शस्त्रे तयार केलीत.

ब्राह्मोस-

हे क्षेपणास्त्र रशियाच्या 'पी-७०० ग्रानित' या क्षेपणास्त्रावर आधारलेले मध्यम पल्ल्याचे क्षेपणास्त्र म्हणून विकसवायचे होते. मात्र रशियाने "क्षेपणास्त्र तंत्रज्ञान प्रतिबंध करारास" बांधील असल्याने हे क्षेपणास्त्र पी-८०० ओनिक्स या निम्न पल्ल्याच्या क्षेपणास्त्रावर आधारून विकसवले. या क्षेपणास्त्राचे प्रणोदन रशियन क्षेपणास्त्रावर आधारित असून मार्गदर्शन ब्राह्मोस कॉर्पोरेशनेने विकसित केले आहे.

स्टार-

आवाजाहून अधिक वेगाने कामगिरी बजावणाऱ्या क्षेपणासांना तोंड देण्यासाठी भारताने पूर्णतः स्वदेशी सुपरसॉनिक टार्गेट (Supersonic Target) अर्थात स्टार क्षेपणास्त्र विकसित केले. शत्रूच्या क्रूझ क्षेपणास्त्रांच्या धोक्यांचा सामना करण्यासाठी भारतीय सैन्यदलांची कौशल्ये विकसित करण्याचेही काम हे क्षेपणास्त्र करते.

प्रलय-

शत्रूचा अचूक वेध घेणाऱ्या भारताने स्वदेशी बनावटीच्या पहिल्या अर्धबॅलिस्टिक क्षेपणास्त्राची नुकतीच चाचणी घेतली. त्यामुळे 'ब्राह्मोस' आणि 'प्रहार 'पाठोपाठ भारताच्या संरक्षण क्षमतेत आणखी एका अस्त्राची भर पडली आहे. लवकरच ते भारतीय सैन्यदलात समाविष्ट होणार आहे.

अस्त्र

खास स्वदेशी बनावटीचे आणि हवेतून हवेत मारा करणाऱ्या या क्षेपणास्त्राची नुकतीच डीआरडीओ आणि भारतीय हवाई दलाने सुखोई विमानाद्वारे यशस्वी चाचणी घेतली. कोणत्याही वातावरणात तसेच दिवसरात्र कधीही शत्रूचा अचूक वेध घेण्याची क्षमता या क्षेपणास्त्रात आहे.

यावरून असे स्पष्ट होते की 2014 नंतर संरक्षण क्षेत्रात राबविण्यात आलेल्या धोरणात्मक सुधारणा, आत्मनिर्भर भारत उपक्रम आणि खासगी क्षेत्राच्या सहभागामुळे उत्पादन व निर्यात दोन्हीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. ही वाढ केवळ आर्थिक नसून भारताच्या सामरिक स्वायत्ततेचे द्योतक आहे.संरक्षण उद्योग हा राष्ट्रीय शक्तीचा एक महत्त्वाचा घटक मानला जातो. हॅन्स मॉर्गेंथॉ, केनेथ वॉल्ट्झ यांसारख्या वास्तववादी विचारवंतांनी मांडलेल्या 'राष्ट्रीय हित' आणि 'शक्ती संतुलन' या संकल्पनांच्या प्रकाशात शस्त्रनिर्मितीचे महत्त्व अधोरेखित होते. संरक्षण उत्पादनात स्वावलंबन असल्यास राष्ट्राला परकीय दबावापासून मुक्तपणे निर्णय घेता येतात.भारताच्या शस्त्रनिर्मिती क्षमतेत झालेली वाढ ही सामरिक स्वायत्ततेच्या दिशेने टाकलेले पाऊल आहे. संरक्षण उत्पादन व निर्यातीत वाढ झाल्यामुळे

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

भारत आंतरराष्ट्रीय स्तरावर केवळ सुरक्षा ग्राहक न राहता सुरक्षा पुरवठादार म्हणून पुढे येत आहे. त्यामुळे भारताचे स्थान जागतिक शक्ती-संतुलनात अधिक दृढ होत असल्याचे दिसून येते.तरी पुढील आव्हाने दिसून येतात.अत्याधुनिक तंत्रज्ञानाची कमतरता,संशोधन व विकासासाठी अपुरा निधी,विलंबित प्रकल्प व प्रशासकीय अडथळे,जागतिक स्पर्धा इ. वरील आव्हानांचा विचार करून आपल्याला धोरण ठरवावे लागेल

निष्कर्ष

शस्त्रनिर्मितीच्या क्षेत्रातील भारताची वाटचाल ही स्वातंत्र्यानंतरच्या संरक्षण धोरणातील परिवर्तनाची साक्ष देते. सुरुवातीच्या काळातील परकीय अवलंबनातून भारताने आत्मनिर्भरतेकडे निर्णायक पावले टाकली आहेत. सार्वजनिक क्षेत्रातील संरक्षण उपक्रम, DRDO सारख्या संशोधन संस्थांची भूमिका, खासगी क्षेत्राचा वाढता सहभाग आणि सरकारची धोरणात्मक बांधिलकी यांमुळे भारत आज संरक्षण उत्पादनाच्या बाबतीत एक सक्षम राष्ट्र म्हणून पुढे येत आहे.विश्लेषणातून असे दिसते की संरक्षण उत्पादन व निर्यातीत झालेली वाढ ही केवळ आकडेवारीपुरती मर्यादित नसून ती भारताच्या राज्यशास्त्रीय स्थानावर प्रभाव टाकणारी आहे. सामरिक स्वायत्तता, परराष्ट्र धोरणातील लवचिकता आणि जागतिक राजकारणातील प्रभाव या सर्व घटकांना संरक्षण उद्योग बळकटी देतो. त्यामुळे शस्त्रनिर्मितीच्या क्षेत्रातील भारताचे योगदान हे विकसित भारताच्या संकल्पनेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ ठरते.

References

1.Government of India. (2020). *Defence Acquisition Procedure*. Ministry of Defence.

२.Kumar, A. (2019). Defence manufacturing in India. *Journal of Defence Studies*, 13(2), 45-62.3.Pant, H. V. (2021). India's strategic autonomy. *International Affairs*, 97(3), 701-717.Singh, R. (2020). Atmanirbhar Bharat and defence sector. *Economic and Political Weekly*, 55(32), 12-18.4.DRDO. (2022). *Annual Report*. Government of India.

५.सकाळ अवतरण दिवाळी अंक २०२५ .पेज क्र.१८८

६. कुलकर्णी डॉ.शरद (२०२५)भारताचे परराष्ट्र संबंध - काल आणि आज-हर्षवर्धन पब्लिकेशन प्रा.लि.लिंबगणेश जि.बीड पेज क्र.८१

७. अनय जोगळेकर - भारत-अमेरिका साथ साथ, सा.विवेक दि.7/10/2014

८.. Joint Statement during the visit of Prime Minister to USA- https://www.pmindia.gov.in/en/news 30 Sep, 2014

९.wikipedia/brahmos

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

शाश्वत विकासासाठी भारत:एक जागतिक नेतृत्व

डॉ. शरद मधुकर कुलकर्णी,
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
गं.ए.ट्र. चे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नगाव, ता.जि. धुळे

Manuscript ID:
JRD -2026-180240
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 184-188
February 2026
Submitted: 30 Jan. 2026
Revised: 04 Feb. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

प्रस्तुत लेख शाश्वत विकासाच्या क्षेत्रात भारताने घेतलेल्या जागतिक नेतृत्वाचा आढावा घेतो. शाश्वत विकास म्हणजे आर्थिक वाढ, सामाजिक समानता आणि पर्यावरण संरक्षण यांचा समतोल साधणे होय, ज्याची मुळे भारतीय तत्त्वज्ञानातील 'वसुधैव कुटुंबकम्' आणि महात्मा गांधींच्या विचारांत आढळतात. २०१५ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी शाश्वत विकास ध्येये (SDGs) स्वीकारल्यापासून भारताने धोरणात्मक आणि संस्थात्मक स्तरावर सक्रिय भूमिका बजावली आहे. भारताचे नेतृत्व प्रामुख्याने G20 अध्यक्षपद (२०२३), आंतरराष्ट्रीय सौर आघाडी (ISA) ची स्थापना आणि Mission LiFE यांसारख्या उपक्रमांतून दिसून येते. भारत स्वतःला 'ग्लोबल साउथ' (Global South) चा आवाज मानतो आणि विकसित राष्ट्रांनी हवामान बदलाची ऐतिहासिक जबाबदारी स्वीकारावी, अशी भूमिका मांडतो. जन-धन योजना, मुद्रा योजना आणि सौर ऊर्जेचा प्रसार यांतून भारताने देशांतर्गत प्रगती साधली असली तरी, वित्तीय संसाधनांची कमतरता, प्रादेशिक असमतोल आणि प्रशासकीय समन्वय यांसारखी आव्हाने आजही कायम आहेत. सरतेशेवटी, भारताचा समावेशक आणि मानवकेंद्रित दृष्टिकोन जागतिक शाश्वत विकासासाठी एक आदर्श मार्ग ठरू शकतो.

महत्त्वाचे शब्द (Keywords): *शाश्वत विकास (Sustainable Development), ग्लोबल साउथ (Global South), वसुधैव कुटुंबकम् (Vasudhaiva Kutumbakam), आंतरराष्ट्रीय सौर आघाडी (ISA), Mission LiFE, आर्थिक समावेशकता (Financial Inclusion) हवामान कृती (Climate Action)*

प्रस्तावना

शाश्वत विकासाची संकल्पना आजच्या जागतिक धोरणात्मक चर्चांच्या अग्रस्थानी आहे. शाश्वत विकास म्हणजे आर्थिक वाढ, सामाजिक समानता आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात संतुलन साधण्याचा प्रयत्न करणे. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या, सामाजिक विविधता आणि विकसनशील अर्थव्यवस्था असलेल्या देशासाठी, शाश्वत विकास ही फक्त विकासाची एक दिशा नसून, एक राष्ट्रीय आवश्यकता आहे. २०१५ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी शाश्वत विकास ध्येये (SDGs) स्वीकारल्यानंतर, भारताने धोरणात्मक, संस्थात्मक आणि आंतरराष्ट्रीय स्तरांवर सक्रिय भूमिका घेतल्याचे दिसून आले आहे. भारत शाश्वत विकासाच्या विविध क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण प्रगती करत असला तरी, हा विकास भारताला जागतिक नेतृत्वासाठी खऱ्या अर्थाने सज्ज करतो का, हा मूलभूत संशोधनाचा प्रश्न आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

1. शाश्वत विकासाची सैद्धांतिक चौकट स्पष्ट करणे व भारतातील शाश्वत विकास धोरणांचा अभ्यास करणे.
भारताच्या जागतिक नेतृत्वाच्या भूमिकेचे विश्लेषण करणे.

संशोधन गृहितके

1. भारताची शाश्वत विकास धोरणे SDGs शी सुसंगत आहेत.
2. आंतरराष्ट्रीय मंचांवरील भारताची भूमिका विकासशील देशांसाठी मार्गदर्शक ठरत आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. शरद मधुकर कुलकर्णी, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, गं.ए.ट्र. चे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नगाव, ता.जि. धुळे

How to cite this article:
कुलकर्णी, . शरद . मधुकर . (2026). शाश्वत विकासासाठी भारत:एक जागतिक नेतृत्व. *Journal of Research and Development,* 18(2(*XIV*)), 184–188. https://doi.org/10.5281/zenodo.18799504

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18799504

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

विश्लेषण –

२१व्या शतकातील सर्वात महत्त्वाचे जागतिक आव्हान म्हणजे शाश्वत विकास होय. आर्थिक प्रगती, सामाजिक न्याय आणि पर्यावरणीय संरक्षण यांचा समतोल साधणे ही शाश्वत विकासाची मूलभूत संकल्पना आहे. वेगाने वाढणारी लोकसंख्या, औद्योगिकीकरण, हवामान बदल, नैसर्गिक संसाधनांची कमतरता आणि वाढती सामाजिक विषमता या पार्श्वभूमीवर शाश्वत विकास हा केवळ एक पर्याय न राहता आपली अपरिहार्य आवश्यकता बनली आहे. भारत प्राचीन सांस्कृतिक परंपरा आणि आधुनिक लोकशाही मूल्यांचा संगम असलेला देश असून, शाश्वत विकासाच्या क्षेत्रात भारत हळूहळू जागतिक नेतृत्वाची भूमिका बजावत आहे.

संयुक्त राष्ट्रांनी २०१५ मध्ये मांडलेल्या शाश्वत विकास उद्दिष्टां (Sustainable Development Goals – SDGs) संदर्भात भारताची भूमिकाअतिशय विशेष महत्त्वाची आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने जगातील दुसरा सर्वात मोठा देश असलेल्या भारतातील धोरणे आणि उपक्रम यांचा जागतिक शाश्वत विकासावर थेट परिणाम होतो. त्यामुळे "शाश्वत विकासासाठी भारत : एक जागतिक नेतृत्व" हा विषय अभ्यासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे.

शाश्वत विकासाची संकल्पना

शाश्वत विकास ही केवळ आर्थिक संकल्पना नसून ती बहुआयामी आणि सर्वसमावेशक विकासदृष्टी आहे. शाश्वत विकासाची व्याख्या सर्वप्रथम १९८७ साली ब्रुंडलँड अहवालात करण्यात आली. "सध्याच्या पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजा धोक्यात न आणणारा विकास" म्हणजे शाश्वत विकास होय . ब्रुंडलँड आयोगाच्या व्याख्येनुसार शाश्वत विकास हा पिढ्यान्-पिढ्यांतील न्याय (Intergenerational Equity) जपणारा विकास आहे. अमर्त्य सेन यांच्या क्षमतावादी दृष्टिकोनानुसार (Capability Approach) विकासाचा केंद्रबिंदू मानवी स्वातंत्र्य आणि जीवनमान असले पाहिजे. या सिद्धांतांचा प्रभाव भारतीय विकास धोरणांवर स्पष्टपणे दिसून येतो. या संकल्पनेत तीन प्रमुख स्तंभांचा समावेश होतो:

1. आर्थिक शाश्वतता
2. सामाजिक शाश्वतता
3. पर्यावरणीय शाश्वतता

भारतीय तत्त्वज्ञानातही निसर्गाशी सुसंवाद, मर्यादित उपभोग आणि सामूहिक कल्याण यावर भर देण्यात आला आहे. "वसुधैव कुटुंबकम्" ही संकल्पना शाश्वत विकासाच्या आधुनिक विचाराशी सुसंगत आहे.

भारतातील शाश्वत विकासाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

भारतीय शाश्वत विकासाची संकल्पना केवळ आधुनिक काळातील नसून तिची मुळे प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानात आढळतात. ऋग्वेदातील 'ऋत' ही संकल्पना निसर्गातील संतुलन दर्शविते. उपनिषदांतील "ईशावास्यमिदं सर्वं" हा विचार मर्यादित उपभोग व निसर्ग-संरक्षणावर भर देतो. महात्मा गांधी यांनी मांडलेले 'गरजांवर आधारित अर्थशास्त्र' हे शाश्वत विकासाचे नैतिक अधिष्ठान ठरते.स्वातंत्र्योत्तर काळात भारताने नियोजनाधारित विकास धोरण स्वीकारले. पंचवार्षिक योजनांद्वारऔद्योगिकीकरण, कृषी विकास व सामाजिक क्षेत्राचा विस्तार करण्यात आला. तथापि, सुरुवातीच्या टप्प्यात पर्यावरणीय बाबी तुलनेने दुर्लक्षित राहिल्या.१९७२ च्या स्टॉकहोम परिषदेनंतर भारतात पर्यावरणीय धोरणांना चालना मिळाली.१९८६ चा पर्यावरण संरक्षण कायदा हा या दिशेने महत्त्वाचा टप्पा ठरला.

१९९१ नंतरच्या आर्थिक उदारीकरणामुळे भारताचा विकासदर वाढला, मात्र त्याचबरोबर पर्यावरणीय ऱ्हास, शहरीकरण व सामाजिक विषमता तीव्र झाली. या पार्श्वभूमीवर शाश्वत विकासाचा विचार धोरणनिर्मितीच्या अग्रस्थानी आला (Planning Commission 2013).

भारतातील शाश्वत विकास :

आर्थिक शाश्वतता म्हणजे दीर्घकालीन, समावेशक आणि स्थिर आर्थिक वाढ. भारताने २०१४ नंतर समावेशक वाढीवर भर देणारी धोरणे स्वीकारली. 'सबका साथ, सबका विकास' ही संकल्पना आर्थिक शाश्वततेचा आधार ठरली आहे. प्रधानमंत्री जन-धन योजना अंतर्गत पन्नास कोटींपेक्षा अधिक बँक खाती उघडण्यात आली, ज्यामुळे आर्थिक समावेशनाला चालना मिळाली (Government of India 2023). मुद्रा योजना व स्टार्टअप इंडिया या योजनांमुळे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना वित्तीय आधार मिळाला. कृषी क्षेत्रात प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, मृदा आरोग्य कार्ड योजना व सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यात आले. २०१५ ते २०२२ या कालावधीत सिंचनाखालील क्षेत्रात लक्षणीय वाढ झाली (NITI Aayog 2022).

भारताचे शाश्वत विकासातील जागतिक नेतृत्व

शाश्वत विकासाच्या क्षेत्रात भारताचे जागतिक नेतृत्व फक्त आर्थिक किंवा तांत्रिक योगदानापुरते मर्यादित नसून ते वैचारिक, नैतिक आणि संस्थात्मक स्वरूपाचे आहे. भारताने स्वतःच्या विकासात्मक अनुभवांच्या आधारे जागतिक विकास चर्चेला नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे. 'वसुधैव कुटुंबकम्' ही भारतीय संकल्पना शाश्वत विकासाच्या जागतिक दृष्टिकोनाशी सुसंगत ठरते.

1. G20 मंचावरील भारताची भूमिका

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

२०२३ मध्ये भारताने जी-२० चे अध्यक्षपद भूषवले. या काळात, भारताने 'वसुधैव कुटुंबकम – एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य' ही संकल्पना आपली मुख्य संकल्पना म्हणून स्वीकारली. या माध्यमातून, शाश्वत विकास, सर्वसमावेशक वाढ, हवामान कृती आणि विकसनशील देशांचे मुद्दे जागतिक चर्चांमध्ये अग्रस्थानी आणले गेले. भारताने जी-२० घोषणेमध्ये शाश्वत विकास उद्दिष्टांची अंमलबजावणी, हवामान वित्तपुरवठा आणि तंत्रज्ञान हस्तांतरणावर भर दिला. भारताने विशेषतः 'ग्लोबल साउथ'मधील देशांसाठी कर्जमाफी आणि विकास वित्तपुरवठ्यासारख्या मुद्द्यांवरही पुढाकार घेतला. (G20 New Delhi Declaration 2023).भारताच्या अध्यक्षपदाच्या कार्यसूचीमध्ये युद्धे आणि अस्तित्वासाठीच्या संघर्षाचा अवलंब करण्याऐवजी जागतिक स्तरावर एकत्र काम करण्याच्या गरजेवर अधिक भर देण्यात आला आहे. पंतप्रधान मोदींनी आपल्या भाषणात जगासमोरच्या आजच्या सर्वात मोठ्या आव्हानांवर प्रकाश टाकला - जसे की हवामान बदल, दहशतवाद, स्थानिक आणि जागतिक महामारी - आणि ही आव्हाने लढून नव्हे, तर एकमेकांना सहकार्य करून कशी सोडवली जाऊ शकतात, हे सांगितले. कायमस्वरूपी आणि महत्त्वपूर्ण बदल घडवण्यासाठी जागतिक स्तरावर लागू करता येतील अशा डिजिटल उपाययोजना तयार करण्यासाठी तंत्रज्ञानाच्या वापरालाही महत्त्वाचे प्राधान्य दिले जाईल. भारताचे अध्यक्षपद हे मानवकेंद्रित जागतिकीकरणावर आधारित होते. आणि त्याचा आंतर-सरकारी धोरण निर्मिती आणि चर्चांवर मोठ्या प्रमाणावर परिणाम झाला आहे,परिणामी जागतिक व्यवस्था प्रभावित होईल आणि कोविड महामारीनंतरच्या जागतिक आर्थिक अजेंड्याची आखणी करण्यास मदत झाली..

2. आंतरराष्ट्रीय सौर आघाडी (International Solar Alliance)

आंतरराष्ट्रीय सौर आघाडी (ISA) ही भारताच्या नेतृत्वाखालील महत्त्वाची जागतिक सुरुवात मानली जाते. २०१५ मध्ये पॅरिस परिषदेदरम्यान भारत व फ्रान्स यांच्या संयुक्त प्रयत्नांतून या आघाडीची स्थापना करण्यात आली.कर्क वृत्त आणि मकर वृत्त यांच्या दरम्यान असलेल्या राष्ट्रात सूर्य प्रकाश भरपूर असतो .या देशांची ही संघटना आहे. १२० हून अधिक देश या आघाडीचे सदस्य आहेत.भारताने ही आघाडी १२० देशांच्या मदतीने सुरु केले आणी भारतच या संघटनेचे नेतृत्व करीत आहे. ISA चा मुख्य उद्देश उष्णकटिबंधीय देशांमध्ये सौर ऊर्जेचा प्रसार करणे, तंत्रज्ञान व वित्तपुरवठा सुलभ करणे हा आहे. यामुळे नवीकरणीय ऊर्जेच्या क्षेत्रात भारताने केवळ राष्ट्रीय नव्हे तर आंतरराष्ट्रीय नेतृत्व सिद्ध केले आहे.

3. Mission LiFE : पर्यावरणीय जीवनशैलीचा जागतिक संदेश

Mission LiFE (Lifestyle for Environment) ही संकल्पना भारताने 2022 मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या व्यासपीठावर मांडली. ही पहल पर्यावरण संरक्षणासाठी वैयक्तिक व सामूहिक वर्तनबदलावर भर देते.Mission LiFE च्या माध्यमातून भारताने 'उपभोग-केंद्रित विकास' ऐवजी 'जबाबदार जीवनशैली' ही संकल्पना जागतिक पातळीवर अधोरेखित केली. UN Environment Programme ने या उपक्रमाचे स्वागत केले असून अनेक देशांनी याचा स्वीकार केला आहे.

4. Global South साठी भारताचे नेतृत्व

भारत स्वतःला Global South चे नेतृत्व समजतो व तशी जबाबदारी पण घेतो.त्यामुळेच विकासशील देशांना भेडसावणाऱ्या दारिद्र्य, ऊर्जा गरिबी, हवामान बदल व विकास वित्तपुरवठ्याच्या समस्यांवर भारताने सातत्याने आंतरराष्ट्रीय मंचांवर भूमिका घेतली आहे.२०२३ मध्ये भारताने 'Voice of Global South Summit' आयोजित करून १२५ पेक्षा अधिक विकासशील देशांचा सहभाग सुनिश्चित केला. या परिषदेत शाश्वत विकास, आरोग्य, शिक्षण व तंत्रज्ञान हस्तांतरणावर भर देण्यात आला .

२१ व्या शतकातील भू-राजकारणातील वेगवान, मूलभूत बदलांच्या युगात, भारत आता ग्लोबल साउथला आकार देण्यात एक अभूतपूर्व, मध्यवर्ती भूमिका बजावत आहे. वसाहतवादविरोधी चळवळींशी असलेले ऐतिहासिक संबंध, वाढती अर्थव्यवस्था आणि धोरणात्मक प्रकल्पांच्या उभारणीमुळे अधिक न्याय्य जागतिक प्रशासनासाठी प्रयत्न करण्यामध्ये भारताची भूमिका वाढत आहे. भारताच्या ग्लोबल साउथ नेतृत्वाचा ऐतिहासिक संदर्भ वसाहतवादविरोधी चळवळीतील ऐतिहासिक सहभाग आणि अलिप्ततावादी चळवळीतील (NAM) महत्त्वपूर्ण भूमिकेमुळे भारताने ग्लोबल साउथमध्ये नेतृत्व मिळवले आहे. शीतयुद्धाच्या काळात, सार्वभौमत्व, अहस्तक्षेप आणि न्याय्य आंतरराष्ट्रीय संबंधांप्रति वचनबद्धतेचे प्रतीक म्हणून अलिप्ततावादी चळवळीची स्थापना झाली. तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली, भारताने अलिप्ततावादाच्या तत्त्वांचे सिद्धांत मांडण्यात, त्यांचा पुरस्कार करण्यात आणि ते आचरणात आणण्यात, तसेच ग्लोबल नॉर्थच्या वर्चस्वावर मात करण्यासाठी ग्लोबल साउथचा आवाज बुलंद करण्यात अग्रगण्य भूमिका बजावली होती . प्रथम १९५५ ची बांडुंग परिषद आणि नंतरच्या अलिप्ततावादी चळवळीच्या शिखर परिषदांनी ग्लोबल साउथसाठी जागतिक घडामोडींमध्ये भारताच्या अग्रणी कार्यासाठी पार्श्वभूमी तयार केलीच होती. आता वेगाने बहुध्रुवीय जग उदयास येत असतानाही, अलिप्ततावादी चळवळीची प्रासंगिकता आजही कायम आहे, आणि समकालीन आव्हानांना तोंड देण्यासाठी आवश्यक संरचनात्मक बदलांची त्यात भर घालण्याची गरज आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

विकसित राष्ट्रांनी ऐतिहासिकदृष्ट्या अधिक कार्बन उत्सर्जन केले असून, त्याची जबाबदारी विकसनशील देशांवर टाकली जात असल्याची टीका भारताने केली आहे. भारताने तुलनेने कमी प्रति व्यक्ति कार्बन उत्सर्जन राखत विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे. World Bank (2022) च्या आकडेवारीनुसार भारताचे प्रति व्यक्ति कार्बन उत्सर्जन अनेक विकसित राष्ट्रांपेक्षा लक्षणीयरीत्या कमी आहे.

मर्यादा व टीकात्मक निरीक्षण

भारताने शाश्वत विकासाच्या क्षेत्रात प्रभावी जागतिक नेतृत्व उभे केले असले, तरी या नेतृत्वाला काही महत्त्वाच्या मर्यादा आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतलेल्या वचनबद्धता आणि देशांतर्गत अंमलबजावणी यांतील दरी, प्रशासकीय क्षमतेच्या मर्यादा, वित्तीय संसाधनांची कमतरता आणि तांत्रिक अडचणी ही प्रमुख आव्हाने आहेत. विशेषतः बहु-स्तरीय शासनव्यवस्थेमध्ये (Multi-level Governance) केंद्र, राज्य व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील समन्वयाचा अभाव अंमलबजावणीवर प्रतिकूल परिणाम करतो. SDG India Index (2018–2023) च्या अहवालांनुसार राज्यांमध्ये शाश्वत विकास उद्दिष्टांच्या प्रगतीत लक्षणीय प्रादेशिक असमतोल आढळतो. शाश्वत विकासासाठी आवश्यक असलेली मोठ्या प्रमाणावरील वित्तीय गुंतवणूक ही भारतासमोरील आणखी एक गंभीर समस्या आहे. UNDP (2022) च्या मते, SDGs साध्य करण्यासाठी भारताला दरवर्षी मोठ्या प्रमाणात अतिरिक्त वित्तपुरवठ्याची गरज आहे. सार्वजनिक वित्तव्यवस्थेवरील ताण, सामाजिक क्षेत्रातील वाढती मागणी आणि मर्यादित खासगी गुंतवणूक यांमुळे ही अडचण अधिक वाढत जाते.यासोबतच, 'कोणालाही मागे न सोडणे' हा शाश्वत विकासाचा मूलभूत सिद्धांत असूनही भारतात सामाजिक व आर्थिक विषमता कायम आहे. आदिवासी समुदाय, स्थलांतरित कामगार, शहरी गरीब आणि ग्रामीण भागातील वंचित घटक शाश्वत विकासाच्या लाभांपासून अनेकदा दूर राहतात. लिंगभेद, शहरी–ग्रामीण दरी आणि प्रादेशिक असमतोल ही समावेशनाच्या मार्गातील प्रमुख अडथळे आहेत.पर्यावरणीय ऱ्हास आणि हवामान बदल ही भारतासमोरील आणखी एक गंभीर आव्हाने आहेत. औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि वाढता ऊर्जा वापर यांमुळे पर्यावरणावर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. IPCC (2022) च्या अहवालानुसार भारत हवामान बदलाशी संबंधित आपत्तींसाठी अत्यंत संवेदनशील देशांपैकी एक आहे. याशिवाय, आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल पायाभूत सुविधा आणि डेटा-संकलन क्षमतेतील असमानता—विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागांत—शाश्वत विकासाच्या अंमलबजावणीत अडथळा ठरते.जागतिक पातळीवरही आर्थिक व वित्तीय व्यवस्था अनेकदा विकासशील देशांच्या हितांना पूरक ठरत नाही. हवामान वित्तपुरवठा, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि व्यापार अटी यांमध्ये असलेला असमतोल भारतासह इतर विकासशील राष्ट्रांच्या शाश्वत विकासाच्या प्रयत्नांना मर्यादा घालतो.

एकूणच, प्रादेशिक असमतोल, प्रशासकीय व वित्तीय मर्यादा, सामाजिक विषमता आणि हवामान बदलाचे वाढते परिणाम ही भारताच्या शाश्वत विकासातील प्रमुख आव्हाने आहेत. या मर्यादांचा वास्तववादी स्वीकार करून, धोरणात्मक सुसंगती, प्रभावी बहु-स्तरीय शासन, लोकसहभाग आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य बळकट केल्यास भारताचे शाश्वत विकासातील जागतिक नेतृत्व अधिक प्रभावी, समावेशक व दीर्घकालीन ठरू शकते.

निष्कर्ष

संशोधनातून असे स्पष्ट होते की भारत शाश्वत विकासाच्या दिशेने केवळ प्रगती करत नाही तर जागतिक नेतृत्व घडवित आहे. आर्थिक समावेशकता, सामाजिक न्याय आणि पर्यावरणीय जबाबदारी यांचा समतोल साधण्याचा भारतीय दृष्टिकोन जागतिक पातळीवर अनुकरणीय ठरतो. तथापि, दीर्घकालीन यशासाठी संस्थात्मक सुधारणांबरोबरच लोकसहभाग, तांत्रिक नवोन्मेष आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य आवश्यक आहे.शाश्वत विकासाच्या दिशेने भारताने लक्षणीय प्रगती केली आहे. आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय क्षेत्रात राबवलेल्या धोरणांमुळे भारत जागतिक नेतृत्वाची भूमिका बजावण्यास सक्षम झाला आहे. तथापि, दीर्घकालीन यशासाठी समन्वयित प्रयत्न, नवोन्मेष आणि लोकसहभाग आवश्यक आहे. "वसुधैव कुटुंबकम्" या तत्त्वावर आधारित भारतीय दृष्टिकोन जागतिक शाश्वत विकासासाठी प्रेरणादायी ठरू शकतो.

References

1. Government of India. (2017). *Voluntary National Review on the Implementation of Sustainable Development Goals*. NITI Aayog.
2. Government of India. (2020). *Voluntary National Review on the Implementation of Sustainable Development Goals*. NITI Aayog.
3. International Energy Agency. (2021). *India Energy Outlook 2021*. IEA.
4. Intergovernmental Panel on Climate Change. (2023). *Climate Change 2023: Synthesis Report*. IPCC.
5. NITI Aayog. (2018). *SDG India Index and Dashboard*. Government of India.
6. NITI Aayog. (2021). *SDG India Index and Dashboard*. Government of India.
7. Sachs, J. D. (2015). *The Age of Sustainable Development*. Columbia University Press.
8. Sen, A. (1999). *Development as Freedom*. Oxford University Press.

9. United Nations. (2015). *Transforming Our World: The 2030 Agenda for Sustainable Development*. United Nations.
10. United Nations Development Programme. (2020). *Human Development Report 2020*. UNDP.
11. World Bank. (2020). *World Development Report 2020: Trading for Development in the Age of Global Value Chains*. World Bank.
12. World Bank. (2022). *World Development Indicators*. World Bank.
13. https://diplomatist.com/2025/01/15/indias-rising-influence-leading-the-global-souths-agenda-in-a-multipolar-world/
14. https://www.investindia.gov.in/team-india-blogs/indias-g20-presidency-vision-new-inclusive-world-order

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

संत एकनाथांचे साहित्य : भारतीय संस्कृती, वारसा आणि ज्ञानप्रणालीचे प्रतिबिंब

प्रा.वर्षा रविंद्र उपाध्ये
मूळजी जेठा (स्वायत्त) महाविद्यालय, जळगाव.

Manuscript ID:
JRD -2026-180241
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 189-191
February 2026
Submitted: 30 Jan. 2026
Revised: 04 Feb. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

प्रस्तुत लेख महाराष्ट्राच्या संत परंपरेतील महान संत एकनाथ यांच्या साहित्यातील सांस्कृतिक आणि ज्ञानमूल्यांचे विश्लेषण करतो. मध्ययुगीन काळात परकीय आक्रमणांमुळे विस्कळीत झालेली सांस्कृतिक परंपरा सांधण्याचे ऐतिहासिक कार्य संत एकनाथांनी केले, म्हणूनच त्यांचे वर्णन 'भागवत धर्माचा खांब' असे केले जाते. त्यांनी जातीभेद आणि अंधश्रद्धेने ग्रासलेल्या समाजात भक्ती, समता आणि नैतिकतेची मूल्ये रुजवली. संत एकनाथांनी 'एकनाथी भागवत', 'भावार्थ रामायण' यांसारख्या ग्रंथांतून आणि भारुड, गवळणी यांसारख्या लोकप्रकारांतून संस्कृतमधील कठीण ज्ञान सोप्या लोकभाषेत (मराठीत) सर्वसामान्यांसाठी खुले केले. त्यांच्या साहित्यात भारतीय संस्कृतीतील 'वसुधैव कुटुंबकम्' ही संकल्पना आणि अद्वैत तत्त्वज्ञानाचा व्यवहाराशी असलेला समन्वय दिसून येतो. विशेषतः त्यांच्या भारुडांमधून लोकसंस्कृती, ग्रामीण जीवन आणि अनुभवाधिष्ठित ज्ञानाचे दर्शन घडते. थोडक्यात, एकनाथांचे साहित्य हे भारतीय वारसा आणि ज्ञानप्रणालीचे एक सजीव प्रतिबिंब आहे, ज्याने संस्कृतीला लोकाभिमुख आणि मानवकेंद्रित दिशा दिली.

महत्त्वाचे शब्द (Keywords): *भागवत धर्म, लोकभाषा, भारुड, सांस्कृतिक वारसा, समन्वयवाद, अनुभवाधिष्ठित ज्ञान,अद्वैत तत्त्वज्ञान*

प्रस्तावना

भारतीय संस्कृतीला,बहुआयामी,सतत प्रवाही, समन्वयशील आणि समृद्ध अशी परंपरा आहे.या संस्कृतीला जपण्यासाठी संतांनी केलेले कार्य महत्त्वपूर्ण आहे. संतपरंपरेच्या दुरदृष्टीकोणामुळे, लोकाभिमुख विचारप्रवाहांमुळे संस्कृतीचे संवर्धन झाले आहे. मध्ययुगीन काळात संतांनी समाजात आध्यात्मिक मूल्ये, नैतिकता, सामाजिक समता, ज्ञानपरंपरा आणि संस्कृती रुजवली. महाराष्ट्राच्या संत परंपरेत संत एकनाथांचे स्थान अत्यंत मोलाचे आहे.त्यांच्या साहित्यात भारतीय संस्कृतीची मूल्ये, सामाजिक वारसा आणि ज्ञान प्रणालीचे प्रतिबिंब दिसते.

हेमंत विष्णू इनामदार म्हणतात,"थोर आणि संपन्न सांस्कृतिक परंपरा हे महाराष्ट्राचे वैशिष्ट्य आहे. या परंपरेत संतमंडळीच्या विचारधनाने आणि जीवनकार्याने मोठीच भर घालून मानवी जीवनाचे उन्नत आदर्श आपल्यापुढे ठेविले आहेत. महाराष्ट्रातल्या वारकरी परंपरेचा ज्ञानेश्वरांनी पाया घातला. नामदेवांनी पंढरीपासून पंजाबपर्यंत तिचा प्रसार केला, त्यानंतर मात्र अल्लाउद्दिन खिलजीच्या रूपाने जे यावनी आक्रमण झाले, त्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाला मोठेच ग्रहण लागले. नामदेवांच्या अवतारसमाप्ती नंतरचा सुमारे दोन-अडीचशे वर्षांचा काळ म्हणजे एक प्रकारचे अंधारयुगच ! संत दामाजी, कान्होपात्रा यांसारखे काही संत वगळता या काळात समाजाला मार्ग दाखविणारा नाव घेण्यासारखा संत झाला नाही. ही तुटलेली परंपरा जोडण्याचे कार्य संत एकनाथांनी केले. म्हणूनच 'जनार्दनी एकनाथ। खांब दिला भागवत ।' असे त्यांचे वर्णन संत बहिणाबाईंनी केले आहे."१ यावरूनच संत एकनाथांच्या अनमोल कार्याची प्रचिती आपल्याला येते.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
प्रा.वर्षा रविंद्र उपाध्ये, मूळजी जेठा (स्वायत्त) महाविद्यालय, जळगाव.

How to cite this article:
उपाध्ये, . वर्षा. रविंद्र. (2026). संत एकनाथांचे साहित्य: भारतीय संस्कृती, वारसा आणि ज्ञानप्रणालीचे प्रतिबिंब. Journal of Research and Development, *18(2(*XIV)), *189–191.*
https://doi.org/*10.5281/zenodo.18799551*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18799551
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

संत एकनाथांचा काळ आणि वैचारिक पार्श्वभूमी:-

संत एकनाथांचा काळ सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा होता. समाजात जातीभेद, कर्मकांड,अंधश्रद्धा, दुराचार वाढला होता. समाज अज्ञानाच्या अंधकारात बुडाला होता.अशा या परिस्थितीमध्ये संत एकनाथांनी भक्ती, सत्य, समता, समानता, नैतिकता, करुणा या मूल्यांचा पुरस्कार केला.त्यांचे विचार समाजासाठी प्रेरणादायी आणि दिशादर्शक होते. वारकरी परंपरेचा वारसा जपत त्यांनी, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव यांची परंपरा पुढे नेली. आणि तिला समाज कल्याणाच्या भावनेतून लोकाभिमुख स्वरूप प्राप्त करून दिले.

संत एकनाथांचे साहित्य:-

संत एकनाथांच्या साहित्याने साहित्यसंपदेमध्ये मौलिक भर घातली. चतुश्लोकी भागवत, रुक्मिणी स्वयंवर, एकनाथी भागवत, भावार्थरामायण या ग्रंथरचना आणि भारुडे, गवळणी, ओव्या या बहुविध स्वरूपाच्या साहित्यातून त्यांनी आपले विचार समाजासमोर मांडले. त्यांच्या या साहित्याची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे सर्वसामान्यांना समजेल अशा लोकभाषेचा वापर करून, साध्या, सरळ, सोप्या भाषेत त्यांनी मांडले.संस्कृत प्रधान ज्ञानसंपदा मराठी भाषेत आणून समाजातील सर्वसामान्य लोकांसाठी खुली करून दिली. हे त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

भारतीय संस्कृतीचे प्रतिबिंब:-

संत एकनाथांच्या साहित्यात भारतीय संस्कृती प्रतिबिंबीत होताना दिसते. सत्य,अहिंसा, सदाचार,करुणा,सहिष्णुता भूतदया ही भारतीय संस्कृतीची मूलतत्त्वे त्यांच्या रचनांमधून प्रकट होते. त्यांनी भक्तीला जीवन व्यवहाराशी जोडलेले दिसते. ईश्वर भक्ती म्हणजे केवळ पूजा-अर्चना नसून नैतिक जीवन जगणे, माणसाशी माणूस म्हणून वागणे एकोप्याने राहणे आणि समाजातील दुबळ्यांविषयी संवेदनशील असणे असा संदेश संत एकनाथांनी दिला. ही त्यांची दृष्टी भारतीय संस्कृतीतील व 'वसुधैव कुटुंबकम्' या संकल्पनेशी सुसंगत आहे. त्यांचे साहित्य सांस्कृतिक आत्मभान जागवणारे ठरते.

सांस्कृतिक वारसा आणि भक्ती परंपरा:-

संत एकनाथांनी फक्त संस्कृतीचे जतन केले नाही तर तिचे पुनर्वाचन आणि पुनर्निर्मिती केलेली दिसते. त्यांनी पुराणकथा, धार्मिक प्रतिके आणि पारंपारिक संकल्पनांना नव्या अर्थाने, नव्या स्वरुपाने मांडल्या.त्यांच्या साहित्यामुळे भक्ती परंपरा सामाजिक परिवर्तनाची शक्ती बनली. वारी, कीर्तन, भजन आणि नामस्मरण या परंपरांमध्ये त्यांचे अभंग, भारुड आजही गायली जातात. ही बाब सांस्कृतिक वारसाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

भारतीय ज्ञानप्रणाली : तत्वज्ञान:-

भारतीय ज्ञान प्रणाली केवळ सैद्धांतिक नसून ती व्यवहारप्रधान आहे.आध्यात्मिक, तात्विक आणि नैतिक विचारांवर ती आधारित आहे. संत एकनाथांच्या साहित्यात अद्वैत तत्त्वज्ञानाचा प्रभाव जरी असला तरी तो जीवन व्यवहाराशी जोडलेला दिसतो.ज्ञानभक्ती आणि कर्म यांचा उत्तम समन्वय त्यांनी साधलेला आहे. आत्मज्ञानी होण्यासाठी समाजापासून अलिप्त राहण्याची गरज नाही तर समाजात राहून विवेकपूर्ण आचरण करता येते असा त्यांचा दृष्टिकोन आहे. त्यांचा हा दृष्टिकोन, विचार भारतीय ज्ञानपरंपरेतील समन्वयवादी तत्त्वज्ञानाचे प्रतीक आहे.

भारुड, लोकसंस्कृती आणि अनुभवाधिष्ठीत ज्ञान :-

संत एकनाथांच्या भारुडांमधून लोकसंस्कृतीचा उत्कृष्ट, सखोल अभ्यास दिसून येतो. ग्रामीण जीवन, लोकव्यवहार, व्यावहारिकता, आणि लोकमानस यांचा त्यांनी प्रतिमात्मक वापर केलेला दिसतो. विनोद, नाट्य आणि कथन शैलीच्या माध्यमातून त्यांनी गूढ असलेले तत्त्वज्ञान भारुडाच्या माध्यमातून सहज मांडले.ही शैली भारतीय ज्ञान प्रणालीतील अनुभवाधिष्ठीत ज्ञानाच्या संकल्पनेला अधोरेखित करते. ज्ञान हे केवळ ग्रंथात नसून जीवनानुभवातून साकार होते हा संदेश त्यांच्या साहित्यातून स्पष्ट होतो.

संस्कृतीच्या दृष्टीने वासुदेव, डोंबारी, माळी, गोंधळी अशा लोक जीवनाशी निगडित पात्रांचा वापर करून संत एकनाथांनी लोककला, लोकधर्म व ग्रामीण जीवनाचे जतन केले आहे. उदा.वासुदेव या भारुडात ते म्हणतात,

"मी वासुदेव नामे फोडीतो नित्य टाहो |
देखिले पाय आता मागतो दान द्या हो ||"२

वासुदेव गावोगावी भिक्षा मागणारा, अभंग गाणारा लोकसंस्कृतीचा पाईक आहे.या भारुडात नामस्मरण, भक्ती, सत्संग, सद्गुरू कृपा, अनुभव यावर भर आहे. यात अद्वैत भाव आणि भक्तियोग यांचा समन्वय दिसतो. भोग, द्वैतभाव, अहंकार सोडून आत्मज्ञान मिळवण्याची

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

शिकवण आहे. त्यामुळे असे भारुडे लोक संस्कृती, तत्त्वज्ञान आणि साधनांपासून अनुभवांपर्यंतची संपूर्ण भारतीय ज्ञान परंपरा प्रतिबिंबीत करते.

निष्कर्ष:-

१) संत एकनाथांचे साहित्य हे भारतीय संस्कृती, वारसा आणि ज्ञानप्रणाली यांचे सखोल व सजीव प्रतिबिंब आहे.
२) संत एकनाथांच्या साहित्याने भारतीय सांस्कृतिक परंपरेला लोकाभिमुख, समन्वयशील आणि मानव केंद्रित दिशा दिलेली दिसते.
३) लोक भाषेच्या माध्यमातून त्यांनी शाश्वत ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवले.

संदर्भ:-

१)इनामदार हे. वि. संपादक, संत एकनाथ दर्शन, कॉन्टिनेन्टल प्रकाशन,द्वितियावृत्ती,२०१४,पृष्ठ क्रमांक १
२)देशमुख भगवंत संपादक,एकनाथ वाङ्मय दर्शन, साहित्य अकादमी प्रकाशन,प्रथामावृत्ती २०१४,पृष्ठ क्रमांक १०५

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

संत साहित्यातील पर्यावरणविचार : भारतीय सांस्कृतिक परंपरेतून शाश्वत विकासाची संकल्पना

डॉ.नेत्रा उपाध्ये-जोशी
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय धरणगांव,जिल्हा जळगाव.

Manuscript ID:
JRD -2026-180242
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 192-195
February 2026
Submitted: 30 Jan. 2026
Revised: 04 Feb. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

प्रस्तुत लेख महाराष्ट्रातील संत साहित्यातील पर्यावरणविषयक विचारांचे आणि 'शाश्वत विकासाच्या' संकल्पनेचे विश्लेषण करतो. संतांचा पर्यावरणीय दृष्टिकोन हा केवळ धार्मिक नसून तो निसर्गकेंद्री जीवनदृष्टी आणि जीवनाच्या शाश्वततेशी निगडित आहे. २१ व्या शतकातील हवामान बदल आणि नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास या पार्श्वभूमीवर संतांनी मांडलेले विचार अत्यंत मार्गदर्शक ठरतात. लेखात प्रामुख्याने तीन महान संतांच्या विचारांचा उहापोह केला आहे: संत नामदेव: त्यांनी वृक्षलागवडीला आध्यात्मिक मूल्य प्राप्त करून दिले. "जे वृक्ष लाविती सर्वकाळ" यातून त्यांनी वृक्षारोपण ही सामाजिक जबाबदारी आणि खरी भक्ती असल्याचे सांगितले आहे. संत तुकाराम: "वृक्षवल्ली आम्हा सोयरी" असे म्हणत त्यांनी निसर्गाला आप्तस्वकीयांचा दर्जा दिला. निसर्गाशी सुसंवाद आणि साधी जीवनशैली यातून शाश्वत विकासाची दिशा मिळते, असा विचार त्यांनी मांडला. संत ज्ञानेश्वर: त्यांनी सृष्टीतील हवा, पाणी, अन्न आणि वनस्पती यांच्यातील परस्परावलंबन अधोरेखित केले. विश्वातील प्रत्येक घटक जीवनासाठी आवश्यक असून मानव हा निसर्गाचाच एक भाग आहे, ही जाणीव त्यांच्या ओव्यांतून प्रकट होते.

थोडक्यात, संत साहित्य हे केवळ भक्तीसाठी नसून मानवाची निसर्गाशी तुटलेली नाळ पुन्हा जोडण्यासाठी आणि पर्यावरणीय संवेदनशीलता जागवण्यासाठी एक अमूल्य ठेवा आहे.

महत्त्वाचे शब्द (Keywords): *शाश्वत विकास , निसर्गकेंद्री जीवनदृष्टी , वृक्षवल्ली (Flora/Trees), परस्परावलंबन (Interdependence)*

वारकरी संप्रदाय

भारतीय संस्कृती ही निसर्गकेंद्री जीवनदृष्टीवर आधारित असल्याचे दिसून येते. प्राचीन काळापासून पृथ्वीला माता, नद्यांना देवता आणि वृक्षांना पूज्य मानण्याची परंपरा भारतीय समाजात रूढ आहे. या परंपरेचे सुस्पष्ट प्रतिबिंब महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाच्या संत साहित्यात आढळते. बाराव्या शतकापासून सुरू झालेल्या या संत परंपरेने समाजाला केवळ भक्ती व अध्यात्माचा मार्ग दाखवला नाही, तर मानवी जीवनाशी निगडित सामाजिक, नैतिक, आर्थिक आणि पर्यावरणीय प्रश्नांवरही मार्गदर्शन केले.आज एकविसाव्या शतकात मानव प्रचंड तांत्रिक प्रगती करत असताना पर्यावरणीय संकट अधिक तीव्र झाले आहे. हवामान बदल, जैवविविधतेचा ऱ्हास, पाणीटंचाई, प्रदूषण आणि नैसर्गिक संसाधनांचा अमर्याद उपभोग यामुळे मानवी अस्तित्वच धोक्यात आले आहे असेच म्हणावे लागेल अशा परिस्थितीत संत साहित्यातील पर्यावरणविषयक विचारांचा पुनर्विचार करणे अत्यंत आवश्यक ठरते. संतांचा पर्यावरणीय दृष्टिकोन हा केवळ धार्मिक भावनेतून आलेला नसून तो जीवनाच्या शाश्वततेशी निगडित आहे.

वारकरी संप्रदाय : सामाजिक आणि पर्यावरणीय संदर्भ

वारकरी संप्रदाय हा भागवत परंपरेशी संबंधित असला तरी त्याची वैशिष्ट्यपूर्ण ओळख सामाजिक समता, साधेपणा आणि करुणेच्या मूल्यांमुळे निर्माण झाली आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ.नेत्रा उपाध्ये-जोशी, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय धरणगांव,जिल्हा जळगाव.

How to cite this article:
उपाध्ये-जोशी, . नेत्रा . (2026). संत साहित्यातील पर्यावरणविचार : भारतीय सांस्कृतिक परंपरेतून शाश्वत विकासाची संकल्पना. Journal of Research and Development, *18(2*(XIV)), *192–195.*
https://doi.org/ *10.5281/zenodo. 18799635*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18799635

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

वारकरी संतांनी जातिभेद, विषमता, अंधश्रद्धा यांना विरोध केला आणि सर्व सजीवांमध्ये परमात्म्याचे अस्तित्व आहे, ही भूमिका मांडली. हीच भूमिका पर्यावरणीय दृष्टिकोनाचा पाया ठरते.निसर्गातील प्रत्येक घटक — वृक्ष, पशु, पक्षी, नदी, पर्वत — यांत ईश्वराचे अस्तित्व मानल्यामुळे निसर्गाचा आदर करण्याची भावना संत साहित्यातून व्यक्त होते. त्यामुळे संतांची भक्ती ही निसर्गापासून तुटलेली नसून निसर्गाशी एकरूप झालेली आहे.

संत साहित्यामधील निसर्गचित्रण आणि त्यामागील पर्यावरणीय अर्थ

संतांच्या अभंगांमध्ये निसर्गाचे वर्णन केवळ सौंदर्यदृष्टीने केलेले नाही. ते वर्णन जीवनतत्त्वज्ञानाशी जोडलेले आहे. वृक्षवल्ली, वेली, फुले, नद्या, सूर्य, चंद्र, वारा, पाऊस, पशु-पक्षी, कीटक — हे सर्व घटक संतांच्या साहित्यात प्रतीकात्मक आणि तत्त्वज्ञानात्मक अर्थाने येतात.उदाहरणार्थ, वृक्ष हा सहनशीलतेचे प्रतीक आहे. तो स्वतःच्या गरजा मर्यादित ठेवून इतरांना सावली, फळे आणि प्राणवायू देतो. नदी ही सातत्य आणि पवित्रतेचे प्रतीक आहे. पक्षी आणि पशु हे स्वातंत्र्य, सहजता आणि निसर्गनियमांशी सुसंगत जीवनाचे द्योतक आहेत. अशा प्रतीकांमधून संतांनी पर्यावरणपूरक जीवनपद्धतीचा संदेश दिला आहे.

संत नामदेव महाराज त्यांचा अंभगात म्हणतात,

"जे वृक्ष लाविती सर्वकाळ | तयावरी छत्राचे झल्लाळ |" १

नामदेव महाराजांच्या अभंगांमध्ये वृक्षदान, परोपकार, करुणा आणि लोककल्याण यांवर आधारित अनेक अभंग आहेत. हा अभंग वृक्षलागवड व पर्यावरण-संवर्धनाच्या महिमेचा विचार मांडणारा म्हणून अभ्यासकांनी मान्य केला आहे. संत नामदेव महाराज या अभंगातून वृक्षलागवडीचे महत्त्व अत्यंत लोकाभिमुख पद्धतीने अधोरेखित करतात. जे लोक सातत्याने झाडे लावतात, त्यांचे संगोपन करतात आणि निसर्गाची सेवा करतात, अशा लोकांवर निसर्ग स्वतःच आपली कृपाछाया धरतो, असा भाव या ओळीतून व्यक्त होतो. येथे "छत्राचे झल्लाळ" ही प्रतिमा संरक्षण, आश्रय आणि कल्याण यांचे प्रतीक आहे.नामदेव महाराजांच्या दृष्टीने वृक्ष हा केवळ भौतिक साधन नसून, तो मानवजातीचा निःस्वार्थ सेवक आहे. झाडे सावली देतात, फळे देतात, प्राणवायू देतात आणि पर्यावरणाचा समतोल राखतात; तरीही कोणत्याही प्रतिफळाची अपेक्षा करत नाहीत. म्हणूनच जो मनुष्य वृक्षलागवड करतो, तो प्रत्यक्षात समाजहिताचे आणि सृष्टीहिताचे कार्य करीत असतो, असा अर्थ या अभंगातून सूचित होतो.या अभंगात कर्मफलसिद्धांताचाही सूक्ष्म विचार दिसून येतो. वृक्ष लावणाऱ्या व्यक्तीवर भविष्यात संकटांच्या वेळी "छत्र" म्हणजेच संरक्षण प्राप्त होते. म्हणजेच निसर्गासाठी केलेले सत्कर्म मानवाच्या जीवनात सकारात्मक फलरूपाने परत येते, असा नैतिक संदेश नामदेव महाराज देतात.पर्यावरणीय दृष्टिकोनातून पाहता, हा अभंग आजच्या काळात विशेष महत्त्वाचा ठरतो. वाढते तापमान, जंगलतोड आणि नैसर्गिक आपत्ती याच्या पार्श्वभूमीवर वृक्षलागवड ही केवळ गरज नसून सामाजिक जबाबदारी आहे. संत नामदेव महाराजांचा हा विचार आधुनिक पर्यावरण-संवर्धनाच्या संकल्पनेशी थेट जुळणारा आहे.संत नामदेव महाराजांचा हा अभंग वृक्षलागवडीला आध्यात्मिक मूल्य बहाल करतो. निसर्गाची सेवा म्हणजेच मानवतेची सेवा, आणि तीच खरी भक्ती आहे—हा मूलभूत संदेश या अभंगातून प्रभावीपणे प्रकट होतो.

संत तुकाराम महाराज देखील निसर्गात रमताना दिसुन येतात ते म्हणतात,

"वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे । पक्षीही सुस्वरे आळविती ॥१॥
येणे सुखे रुचे एकांताचा वास । नाही गुणदोष अंगा येत ॥२॥
आकाश मंडप पृथिवी आसन । रमे तेथे मन क्रीडा करी ॥३॥
तुका म्हणे होय मनासी संवाद । आपुलीची वाद आपणासी ॥४॥"२

संत तुकारामांच्या अभंगांत निसर्ग हा निर्जीव घटक नसून सजीव, संवेदनशील आणि माणसाचा सहचर म्हणून उपस्थित राहतो. वृक्ष, वेली, पक्षी, आकाश आणि पृथ्वी हे सर्व त्यांच्या लेखनात मानवी भावनांशी संवाद साधताना दिसतात. "वृक्षवल्ली आम्हा सोयरी" असे म्हणताना संत निसर्गाला आप्तस्वकीयाचा दर्जा देतात. ही दृष्टी पर्यावरणीय समतेची आणि सहअस्तित्वाची भावना अधोरेखित करते.

एकांत आणि आत्मशांतीची संकल्पना

संत तुकारामांनी एकांतवासाला पलायन न मानता आत्मशुद्धीचा मार्ग मानले आहे. त्यांच्या अभंगांमध्ये एकांत म्हणजे सामाजिक जबाबदाऱ्यांपासून दूर जाणे नव्हे, तर मनावरील बाह्य ओझे दूर करून आत्म्याशी नाते जोडणे होय. गुण-दोष, मान-अपमान या संकल्पनांपासून मुक्त झाल्यावर मन नैसर्गिक स्थितीत पोहोचते. ही अवस्था मानसिक आरोग्यासाठीही अत्यंत महत्त्वाची ठरते.

निसर्ग : मुक्त साधनेचे स्थान

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

संत तुकारामांच्या मते, भक्ती किंवा साधनेसाठी भव्य मंदिरे आवश्यक नाहीत. आकाश हे मंडप आहे, पृथ्वी हे आसन आहे आणि निसर्गच साधनेचे स्थान आहे. अशा मांडणीतून ते भौतिक साधनांच्या मर्यादा दूर करतात. निसर्गाच्या सान्निध्यात मन मुक्तपणे विहार करते आणि ध्यान, चिंतन सहज साध्य होते. ही संकल्पना आधुनिक काळातील 'निसर्गोपचार' आणि 'पर्यावरणीय साधना' यांच्याशी सुसंगत आहे.

आत्मसंवादाची तत्त्वदृष्टी

अभंगातील "आपुलीची वाद आपणासी" ही ओळ आत्मसंवादाच्या संकल्पनेचे सूचक आहे. येथे संवाद बाह्य समाजाशी नसून अंतर्मनाशी आहे. ही अवस्था आत्मपरीक्षणाची असून व्यक्ती स्वतःच्या विचारांशी प्रामाणिकपणे संवाद साधते. अशा आत्मसंवादातूनच आत्मज्ञान आणि आत्मशांती प्राप्त होते, असे संत तुकाराम सूचित करतात.

समकालीन संदर्भातील महत्त्व

आजच्या औद्योगिकीकरण, पर्यावरणीय ऱ्हास आणि मानसिक तणावाच्या युगात संत तुकारामांची निसर्गाभिमुख जीवनदृष्टी अत्यंत उपयुक्त ठरते. निसर्गाशी मैत्री, मर्यादित गरजा, अंतर्मुख जीवनशैली या विचारांतून शाश्वत विकासाची दिशा मिळते. त्यामुळे संत तुकारामांचे साहित्य केवळ आध्यात्मिक नसून पर्यावरणीय आणि सामाजिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाचे ठरते.संत तुकारामांच्या अभंगांमधून प्रकट होणारी निसर्गदृष्टी ही मानवी जीवनाला संतुलन, शांती आणि नैतिक दिशा देणारी आहे. निसर्गाशी सुसंवाद, एकांतातील आत्मशोध आणि साधेपणाची जीवनशैली ही तत्त्वे आजच्या काळातही तितकीच महत्त्वाची आहेत. म्हणूनच संत तुकारामांचे साहित्य हे पर्यावरणीय जाणीवेच्या अभ्यासासाठी एक समृद्ध वैचारिक स्रोत ठरते.

संत ज्ञानेश्वर महाराज यांचे पर्यावरणीय विचार

संत ज्ञानेश्वर महाराज हे केवळ अध्यात्मिक संत नसून ते जीवन, सृष्टी आणि निसर्ग यांचे सूक्ष्म निरीक्षक होते. त्यांच्या साहित्यामध्ये मानवकेंद्रित दृष्टिकोन न दिसता, सृष्टीकेंद्रित जीवनदृष्टी प्रकट होते. त्यांनी विश्वातील प्रत्येक घटक—हवा, पाणी, अन्न, वनस्पती, प्राणी आणि मानव—यांना परस्परावलंबी मानले आहे. प्रस्तुत ओवी ही त्यांच्या या व्यापक निसर्गदृष्टीचे प्रभावी उदाहरण आहे.

"ओवीचे आशयसूत्र
एकें पवनेंचि पिती ।
एकें तृणास्तव जिती ।
एकें अन्नाधारें राहती ।
जळें एकें ।" ३

या ओवीत ज्ञानेश्वर महाराजांनी सृष्टीतील विविध जीवसृष्टीचे जीवन कोणकोणत्या नैसर्गिक घटकांवर आधारलेले आहे, हे सांगितले आहे. येथे कोणताही एक घटक श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरत नाही; उलट प्रत्येक घटक जीवनासाठी आवश्यक आहे, असा समतावादी दृष्टिकोन दिसतो.

पवन : जीवनाचा मूलाधार

ओवीतील पहिला विचार पवनाशी संबंधित आहे. काही जीव केवळ श्वासोच्छवासावर, म्हणजेच हवेमुळे अस्तित्वात राहतात. यामधून ज्ञानेश्वर महाराज हवा ही अदृश्य असली तरी जीवनासाठी अनिवार्य आहे, हे अधोरेखित करतात.

आजच्या संदर्भात पाहिले असता, वायूप्रदूषणामुळे श्वसनसंस्था विकार वाढत आहेत. त्यामुळे ज्ञानेश्वरांची ही मांडणी पर्यावरणीय आरोग्याशी थेट संबंधित ठरते.

तृण आणि वनस्पती : पोषणसाखळीचा पाया

दुसऱ्या चरणात संत म्हणतात की काही जीव तृण-वनस्पतींवर जगतात. यामध्ये शाकाहारी प्राणी, कीटक, तसेच अप्रत्यक्षपणे मानवाचाही समावेश होतो.

वनस्पती केवळ अन्न देत नाहीत, तर त्या प्राणवायू, पर्जन्यचक्र आणि मृदासंवर्धन यासाठीही आवश्यक आहेत. ज्ञानेश्वर महाराजांनी तृणासारख्या साध्या घटकालाही महत्त्व देऊन निसर्गातील लघुत्तम घटकाचेही मूल्य स्पष्ट केले आहे.

अन्न : स्थूल जीवनाचा आधार

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

तिसऱ्या ओळीत अन्नाचा उल्लेख आहे. काही जीव अन्नावर पूर्णतः अवलंबून असतात. येथे अन्न म्हणजे केवळ भौतिक पोषण नव्हे, तर जीवन टिकवणारी ऊर्जा आहे.ज्ञानेश्वर महाराज अन्ननिर्मितीमागील नैसर्गिक प्रक्रिया—शेती, पाणी, हवा, सूर्य—यांचा अप्रत्यक्ष संदर्भ देतात. त्यामुळे अन्नाचा प्रश्न हा सामाजिक, पर्यावरणीय आणि नैतिक स्तरावरचा प्रश्न ठरतो.

जल : सृष्टीचे प्राणतत्त्व

शेवटच्या चरणात पाण्याचे महत्त्व सांगितले आहे. काही जीवांचे संपूर्ण जीवन जलावर आधारित असते.पाणी हे सृष्टीतील सर्वांत महत्त्वाचे जीवनतत्त्व आहे. आज जलसंकट, नदीप्रदूषण आणि भूजलपातळी घट यांसारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत. अशा वेळी ज्ञानेश्वर महाराजांची जलविषयक जाणीव अत्यंत समकालीन वाटते.

परस्परावलंबनाचा तत्त्वविचार

या ओवीतील मुख्य आशय म्हणजे परस्परावलंबन. कोणताही जीव स्वतंत्र नाही. हवा, पाणी, अन्न आणि वनस्पती यांच्याशिवाय जीवन शक्य नाही.ज्ञानेश्वर महाराजांचा हा विचार अद्वैत तत्त्वज्ञानाशी सुसंगत आहे—सर्व सृष्टी एकाच तत्त्वातून निर्माण झाली आहे आणि एकमेकांशी जोडलेली आहे.

आधुनिक पर्यावरणीय संदर्भ

आज मानवाने स्वतःला निसर्गापासून वेगळे मानले आहे. त्यातूनच पर्यावरणीय असमतोल निर्माण झाला आहे. ज्ञानेश्वर महाराजांची ही ओवी मानवाला त्याची निसर्गाशी असलेली नाळ पुन्हा आठवण करून देते.शाश्वत विकास, पर्यावरण संरक्षण आणि सहजीवन या संकल्पना संत साहित्यात बीजरूपाने आढळतात.संत ज्ञानेश्वर महाराजांची ही ओवी केवळ अध्यात्मिक चिंतन नसून ती पर्यावरणीय तत्त्वज्ञानाचा मूलग्रंथीय आशय मांडते. सृष्टीतील प्रत्येक घटक जीवनासाठी आवश्यक आहे, हा संदेश आजच्या जागतिक पर्यावरण चर्चेसाठी मार्गदर्शक ठरतो.म्हणूनच संत ज्ञानेश्वरांचे साहित्य हे केवळ भक्तीसाठी नव्हे, तर पर्यावरणीय संवेदनशीलता जागवण्यासाठीही अत्यंत महत्त्वाचे आहे.

संत साहित्यातील पर्यावरणविचार हा भारतीय सांस्कृतिक परंपरेतील एक अमूल्य ठेवा आहे. मानव, निसर्ग आणि ईश्वर यांच्यातील अद्वैताची भावना संतांनी आपल्या साहित्यातून प्रभावीपणे मांडली आहे. म्हणूनच वारकरी संतांचा पर्यावरणीय दृष्टिकोन हा केवळ धार्मिक नाही, तर तो सामाजिक, नैतिक आणि पर्यावरणीय शाश्वततेचा आधार आहे.आजच्या जागतिक पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर संत साहित्याचा अभ्यास करणे म्हणजे भविष्याच्या दिशेने पाहणे होय. संतांनी दिलेला निसर्गसंवादाचा मार्ग स्वीकारल्यास मानव आणि पर्यावरण यांच्यातील तुटलेली नाळ पुन्हा जोडली जाऊ शकते.

संदर्भ

१) श्री नामदेव गाथा, अभंग क्र. १८७५ "महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ", मुंबई, प्रथमावृत्ती, २००५,

२) श्री संत तुकारामबावांच्या अभंगांची गाथा, अभंग क्र. १२८२,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, द्वितीय आवृत्ती, १९५५

३) श्री ज्ञानेश्वरी", अध्याय ७, ओवी क्र. ३८, पृ. क्र.११९ , महाराष्ट्र राज्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पुनर्मुद्रण २०१७.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

छत्रपती शिवाजी महाराज यांची गनिमी युद्धनीती आणि इतर राष्ट्रांचे नेतृत्व एक तुलनात्मक अभ्यास

प्रमोद रमेश पाटील
क्रांतिवीर नवलभाऊ कला महाविद्यालय नवलनगर ता. जि. धुळे

Manuscript ID:
JRD -2026-180243
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 196-197
February 2026
Submitted: 30 Jan. 2026
Revised: 04 Feb. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश -

सैन्य दृष्टिकोनातून आजवर अनेक नेतृत्व झालीत परंतु गनिमी युद्ध तंत्र या युद्धनीतीचे जनक आणि श्रेय छत्रपती शिवाजी महाराजांना जाते. त्यानंतर संपूर्ण जगामध्ये विविध राष्ट्रांत गनिमी युद्धतंत्राचा वापर करीत बलाढ्य किंवा विशाल महाकाय शक्तिशाली सत्तेविरुद्ध अनेक संघर्ष झालीत त्यात त्यांना यशही मिळालेले आहे. उदाहरणार्थ माओ - स्टे - तुंग यांनी चीनमधील क्रांती होय. फिडेल कॅस्ट्रो यांची क्युबा मधील अमेरिका धर्जिन्या बातीष्ठाच्या जुलमी राजवट उलटून टाकत महासत्ता हस्तगत केली. त्यांच्याबरोबर चे गव्हेरा यांचे योगदान आहे चीनमधील संत - झु तसेच व्हिएतनाम मधील जनरल झॅप फ्रान्समधील नेपोलियन बोनापार्ट यांनीही सत्ता उलथून टाकली अशा प्रकारे अनेक युद्ध गनिमी तंत्राने झालीत म्हणून त्यांची माहिती संशोधक करणे अपेक्षित आहे.

1) माओ - स्टे- तुंग यांचे चीनमधील क्रांती..

चीनमध्ये अवस्थेतून यांच्या नेतृत्वाखाली प्रथम 1927 पासून क्यूमींग टांग यांच्या राष्ट्रीय फौजदार विरुद्ध महायुद्ध काळात जपानी आक्रमण फौजदार विरुद्ध आणि नंतर पुन्हा 1959 पर्यंत राष्ट्रीय फौजअविरुद्ध लढा हा दीर्घकालीन जमिनी कावा युद्ध तंत्राने चालू होते. भावस्थेतून यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची रणनीती वापर करत जवळजवळ अर्धशतक चीनी साम्यवादी पक्षाची आणि राष्ट्राच्या उभारणीची धुरा वाहिली. या काळात त्यांनी जनतेच्या चीन सारख्या विशाल लोकसंख्येने मोठ्या असलेल्या व शेती शक्ती देशातील जनतेला परिवर्तनाच्या प्रयोगात सहभागी करण्याचे धाडस त्यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराजां प्रमाणे मावणे चीनमधील होणार की अंग सखी प्रांताच्या सर्वाधिवरील दर्या खो-्यात आपले सैन्य गोळा केले ते सैन्य लाल सैनिक म्हणून ओळखले गेले.

2) हो - ची - मिन्ह - व्हीएतनांमधील संघर्ष

आग्नेय आशियात व्हिएतनाम नावाचा छोटासा देश असून 8.5 कोटी लोकसंख्या असणा-्या छोटासा देश समुद्रकिना-्यावर सापासारखा लांबट पसरलेला आहे सन 1955 मध्ये अमेरिकेने प्रत्यक्षपणे आपले सैन्य पाठवून कम्युनिस्ट अशी युद्ध पुकारले वेतनामने आपल्या जंगलाचा वापर करत आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गनिमी कावायुद्ध पद्धतीचा वापर करत अमेरिकेशी प्रदीर्घ युद्ध सुरू ठेवले अमेरिका व्हिएतनाम युद्ध तब्बल वीस वर्ष चालले हो ची भिन्ह यांनी गनिमी काव्या करिता आपल्या देशातील भौगोलिक परिस्थितीचा फायदा घेतला अमेरिकेने हो चीमिन्ह यांना माउंटेन रॅट म्हणजेच सुरंग का चुहा असे म्हटले भौगोलिक साधनांचा आधार घेत छत्रपती शिवाजी महाराजांनी मोघलांना त्रस्त करून सोडले होते म्हणून त्यांना मोघलांनी "पहाड का चुहा" असे म्हटले होते.

3) क्युबा मधील क्रांती फिडेल व रडल कॅस्ट्रो- क्युबा देशामध्ये फिडेल कॅस्ट्रो तेथील हुकूमशहा बत्तीस्थाच्या विरुद्ध चालविलेली एक लष्करी चळवळी मोठे यश मिळवले. साधारणपणे मार्च 1952 मध्ये माजी राष्ट्राध्यक्ष बॅटिस्टा याने क्युबाची सत्ता बळकावली होती.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
प्रमोद रमेश पाटील, क्रांतिवीर नवलभाऊ कला महाविद्यालय नवलनगर ता. जि. धुळे

How to cite this article:
पाटील, . प्रमोद . रमेश . (2026). छत्रपती शिवाजी महाराज यांची गनिमी युद्धनीती आणि इतर राष्ट्रांचे नेतृत्व एक तुलनात्मक अभ्यास. *Journal of Research and Development,* 18(2*(XIV)*), 196–197.
https://doi.org/10.5281/zenodo.18799680

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.18799680

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

त्याचे धोरण कम्युनिस्ट पक्षाविरोधी होते त्यामुळे अमेरिकेने बत्तीस्थाला पाठिंबा दिला होता त्यांच्या हुकूमशाही धोरणा विरुद्ध फिडेल कॅस्ट्रो व रुडॉल्फ कॅस्ट्रो दोन्ही भावांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गनिमी युद्धनीतीचा अवलंब करत जगभर प्रसिद्ध असलेले चे ग्यावेरा यांच्या लहान फौज तयार करून बातिस्ता सैन्याशी गनिमी युद्ध तंत्राने लढा दिला. या प्रदीर्घ लढ्यात फिडेल कॅस्ट्रोला लष्करी यश प्राप्त झाले.

4) नेपोलियन बोनापार्ट आणि छत्रपती शिवाजी महाराज -

फ्रान्सचा जगप्रती प्रसिद्ध योद्धा नेपोलियन बोनापार्ट यांची तुलना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी केली जाते छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण करताना मोगल सत्ता आणि युरोपियन, फ्रेंच, डच, पोर्तुगीज, इंग्रज यांच्याशी वेगवेगळ्या रणनीतीचा किंवा युद्धनीतीचा वापर केला म्हणूनच त्यांना भारतीय आरमाराचे जनक असे म्हटले गेले छत्रपती शिवाजी महाराज आणि नेपोलियन बोनापार्ट हे दोघेही इतिहासातील अत्यंत कुशल युद्धनीती तज्ञ दूरदृष्टी असलेले राज्यकर्ते आणि लष्करी नेते होते शिवाजी महाराजांनी शून्यातून स्वराज्य निर्माण केले तर नेपोलियनने फ्रान्सच्या क्रांतीनंतर सत्तेवर येत युरोपमध्ये दबदबा निर्माण केला दोघेही गनिमी युद्ध आणि वेगवान हालचालीसाठी प्रसिद्ध होते. युद्धनीतीत यश जगाच्या इतिहासात एक असामान्य लष्करी सेनानी म्हणून नेपोलियनचे नाव प्रसिद्ध आहे त्यांच्या बाबतीत वेलिंग्टनने असे म्हटले आहे की नेपोलियनची रणांगणात उपस्थिती म्हणजे चाळीस हजार सैन्य असे होते छत्रपती शिवाजी महाराजांच्या बऱ्याच युद्धनीतीची साम्यता त्यांच्यात आढळते.

निष्कर्ष -

शिवरायांचे अनेक युद्ध कौशल्य विविध राष्ट्रांचे लष्करी नेत्यांनी अवलंब करून प्रस्थापित सत्याविरुद्ध क्रांतिकारक चळवळीने यश संपादन केले आहे .त्यात नेपोलियन बोनापार्ट, फिडेल कॅस्ट्रो ,हो - ची - मिन्ह ,गव्हेरा अशी अनेक उदाहरणे देता येतील. तसेच लष्करी नेत्यांशी ही तुलना केली जाते . अलेक्झांडर दि ग्रेट ,ज्युलियस सीझर, शार्ल मेन , ऑलिव क्रॉमवेल अशी काही नावे आपल्याला सांगता येतील .म्हणून हे गनिमी युद्ध पद्धती अवलंब संपूर्ण जगाने केला आहे.

संदर्भसूची-

1) डॉ. सिंह लल्लन, "सैन्यचिंतक ",रायबरेली बुक प्रकाशन बरेली, उत्तर प्रदेश.

2) प्रा. जाधव नामदेवराव, "गनिमी कावा ",जागतिक कीर्तीच्या मराठा युद्ध तंत्राचा खरा वेध ,राजमाता प्रकाशन, मुंबई.

3) https//maharashtrtims.com-13 august -2020

4) https//vishwakosh. marathi. gov

5) सापरा चारू एवं पसरिजा मिनू,"नेपोलियन बोनापार्ट युरोप का विलक्षण योद्धा एवं राजनीति तज्ञ", न्यू साधना पॉकेट बुक्स, रोशन आग्रा रोड, दिल्ली.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

धुळे जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची परिणामकारकता

डॉ. विनोद पी. राजपूत[1] मनोज आधार भोई [2]
1मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख
एसएसव्हीपीएस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिंदखेडा
[2]संशोधक, विषय – अर्थशास्त्र, कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Email- vinodpraj27@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180244
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 198-203
February 2026
Submitted: 30 Jan. 2026
Revised: 04 Feb. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

प्रस्तुत शोधनिबंध धुळे जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची (MSMEs) वाढ आणि त्यांच्या परिणामकारकतेचे विश्लेषण करतो. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून ते रोजगार निर्मिती, जीडीपी (GDP) मधील वाढ आणि प्रादेशिक विषमता दूर करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. केंद्र सरकारने १ जुलै २०२० पासून या उद्योगांची नवीन गुंतवणूक आणि उलाढाल आधारित व्याख्या लागू केली आहे. धुळे जिल्ह्याच्या संदर्भात, २०२१ ते २०२४ या कालावधीत सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या संख्येत, रोजगारात आणि भांडवल गुंतवणुकीत लक्षणीय वाढ झाली आहे. आकडेवारीनुसार, २०२१ मध्ये जिल्ह्यात ४,७११ उद्योग होते, जे २०२४ पर्यंत वाढून १४,०६७ इतके झाले आहेत. याच काळात भांडवल गुंतवणूक १०,३३७ लाख रुपयांवरून ३९,०१५ लाख रुपयांपर्यंत (जवळपास चार पट) वाढली आहे. जिल्ह्याची अर्थव्यवस्था जरी कृषीप्रधान असली तरी कापड, अन्न प्रक्रिया आणि अभियांत्रिकी यांसारख्या उद्योगांमुळे ग्रामीण भागात आर्थिक स्थैर्य निर्माण होत आहे. या उद्योगांनी स्थानिक युवकांना आणि महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या असून स्थलांतरास आळा बसण्यास मदत झाली आहे.

महत्त्वाचे शब्द *सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग, रोजगार निर्मिती , भांडवल गुंतवणूक ,आत्मनिर्भर भारत , प्रादेशिक विषमता, कृषीप्रधान अर्थव्यवस्था , उलाढाल*

प्रस्तावना

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग भारतीय विकसनशील अर्थव्यवस्थेचा कणा आहे. स्थूल देशांतर्गत उत्पादनामध्ये (GDP) वाढ, नवकल्पना, रोजगार निर्मिती आणि नवउद्योजक निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग हे असे व्यवसाय आहेत, ज्यांची गुंतवणूक कमी आकार कमी आणि उलाढाल देखील मोठ्या उद्योगांच्या मानाने कमी असते. भारतात लघुउद्योगांचा विकास आणि विस्तार होत असून रोजगार निर्मितीसाठी आणि आर्थिक वृद्धीसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. कौशल्य विकास कार्यक्रम, सरकारी विविध योजना व धोरणे, तंत्रज्ञानाची प्रगती या घटकांमुळे लघु उद्योगांचा विकास व विस्तारास हातभार लागला आहे. पायाभूत सुविधा, वित्तपुरवठा आणि कौशल्य विकासाच्या विविध योजनांमुळे भारतातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची मोठ्या प्रमाणात उभारणी होत आहे. नवीन कल्पना, उद्योजकतेचा उदय आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या स्वीकार केल्यामुळे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या विकासाला भारतात चालना मिळाली आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. विनोद पी. राजपूत, मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख एसएसव्हीपीएस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिंदखेडा

How to cite this article:
राजपूत, . विनोद . पी ., & भोई, . मनोज . आधार . (2026). धुळे जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची परिणामकारकता. *Journal of Research and Development,* 18(2(*XIV*)), 198–203.
https://doi.org/10.5281/zenodo.18799730

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18799730
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

उद्दिष्टे (Objectives) :-

१) जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे थोडक्यात अध्ययन करणे.

२) जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगातील रोजगार व गुंतवणुकीचे अध्ययन करणे.

गृहितके (Hypothesis) :-

१) धुळे जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या संख्येत वाढ होताना दिसत आहे.

२) सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगातील गुंतवणुकीत व रोजगारात वाढ झालेली दिसून येते.

माहिती संकलन (Data Collection) :-

'धुळे जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे अध्ययन' या संशोधन पेपर मध्ये माहितीचे संकलन करण्यासाठी दुय्यम साधनसामग्रीचा वापर करण्यात आला आहे. संशोधन पेपर, लेख, पुस्तके व शासकीय अहवाल ई. दुय्यम साधनांची मदत घेण्यात आली आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेत सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे योगदान

अर्थव्यवस्था कोणतीही असो त्यात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग रोजगार, उत्पादन व निर्यात वाढीत महत्वपूर्ण कामगिरी करतात. नेहमी संतुलित क्षेत्रीय विकास व बेरोजगारी दूर करण्याच्या उपायांच्या स्वरूपात लघुउद्योग महत्त्वाचे मानले जातात. भारत सारख्या विकसनशील देशाला विकासाकडे घेऊन जाण्यास सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे योगदान नाकारता येत नाही, कारण उत्पन्नातील विषमता दूर करणे, नवउद्योजकांना विविध संधी उपलब्ध करून देणे आणि विकेंद्रीकरणाची क्षमता सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगात आहे. भारतासारख्या विकसनशील व कृषी प्रधान अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या प्रकारची बेरोजगारी पाहायला मिळते, त्यात खुली व छुपी बेरोजगारी सांगता येते. कोणत्याही प्रकारची बेरोजगारी असू देत ती दूर करण्यासाठी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे महत्त्व वाढलेले आहे. भारतात प्रादेशिक विषमता अधिक प्रमाणात आहे. कारण लहान मोठे राज्य आहेत त्यांना कमी जास्त भूभाग लाभलेले आहेत त्यात देखील नैसर्गिक विषमता आहे परिणामी उत्पन्न व उत्पादनात विषमता दिसून येते. उत्पन्नाचे समान वाटप व प्रादेशिक सर्व समावेशी विकासाला प्रेरित करण्याचे काम हे उद्योग करतात. लघु उद्योगांची कमी भांडुलात उभारणी होणे शक्य आहे. सूक्ष्म व लघु उद्योगात कच्चा मालाची निर्मिती करून मध्यम व मोठ्या उद्योगांना पुरवठा करण्याची क्षमता आहे. त्यामुळे आयात पर्यायीकरण होऊन परकीय देशाकडून केली जाणारी आयात काही वस्तूंच्या बाबतीत कमी झालेली आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगामुळे निर्याती वाढल्या आहेत. निर्यातीत वाढ झाल्यामुळे भारताचा परकीय चलन साठा वाढण्यास मदत झाली आहे. भारतात भांडवलाची कमतरता असल्यामुळे परदेशातून भांडवल आयात करावी लागते. परंतु भारतात भांडवलाच्या तुलनेने श्रम मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. सूक्ष्म व लघु उद्योग कमी भांडवलात सुरू होतात, त्यात अधिक श्रमप्रधान तंत्राचा वापर केला जातो. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग प्रादेशिक आर्थिक असमानता दूर करण्यासाठी सहाय्यक ठरले आहेत. भारतात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगात विनिर्माण उत्पादन, सहाय्यक उद्योग तसेच सेवा उद्योग असे वर्गीकरण केले जाते. केंद्र सरकार द्वारा १९५० मध्ये लघु उद्योग कार्यक्रम तयार करण्यात आला परंतु 'लघुउद्योग विकास महामंडळाची' स्थापना १९५३ मध्ये करण्यात आली. भारत सरकार मार्फत लघु उद्योगांना सर्व प्रकारची सहायता देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. भारत सारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासासाठी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची भूमिका महत्त्वाची आहे.

सारणी – १, सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची अंदाजीत संख्या (लाखात)

वर्गीकरण	ग्रामीण	शहरी	एकूण	हिस्सा (%)
विनिर्माण	११४.१४	८२.५०	१९६.६५	३१
विज	०.०३	०.०१	०.०३	--
व्यापार	१०८.७१	१२१.६४	२३०.३५	३६
इतर सेवा	१०२.००	१०४.८५	२०६.८५	३३
एकूण	**३२४.८८**	**३०९.००**	**६३३.८८**	**१००**

स्त्रोत - सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय वार्षिक अहवाल- २०२२-२३

सारणी – २, उद्योगांचे वर्गवारीनुसार वितरण (संख्या लाखात)

क्षेत्र	सूक्ष्म	लघु	मध्यम	एकूण	हिस्सा (%)
ग्रामीण	३२४.०९	०.७८	०.०१	३२४.८८	५१
शहरी	३०६.४३	२.५३	०.०४	३०९.००	४९

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

एकूण	६३०.५२	३.३१	०.०५	६३३.८८	१००

स्त्रोत - सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय वार्षिक अहवाल- २०२२-२३

सारणी क्रमांक १ व २ नुसार, भारताच्या प्रत्येक भागात विस्तारित ६३ दशलक्ष सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचा भारताच्या एकूण निर्यातीत ४०% वाटा आहे. तसेच हे उद्योग देशाच्या उत्पादन विषयक स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात (GNP) २४.६३% इतके योगदान देणाऱ्या उद्योगांमध्ये वाढ करणे तसेच या उद्योगांमार्फत निर्यातित ५०% वाढ करून ५ ट्रिलियन अमेरिकी अर्थव्यवस्थेचे स्वरूप पूर्ण करण्याचे लक्ष केंद्र सरकारने योजिले आहे. MSMEs २०२२-२३ च्या वार्षिक अहवालानुसार भारतातील ग्रामीण व शहरी भागातील सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची संख्या शहरी भागात ३०९.०० लाख म्हणजे ४९% (MSME) आहेत, त्याचप्रमाणे ग्रामीण भागात ३२४.८८ लाख म्हणजे ५१% (MSME) ची संख्या आहे. भारतात एकूणचा विचार केल्यास सद्यस्थितीत ६३३.८८ लाख सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची संख्या आहे. भारतात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या एकूण संख्येपैकी उत्तरप्रदेश या राज्यात १४.२०% MSME उद्योगांची संख्या असून उत्तरप्रदेश राज्याचा देशात प्रथम क्रमांक लागतो.

भारतात कोविड-19 (कोरोना) विषाणूचा सामना करण्यासाठी संपूर्ण देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून २५ मार्च २०२० रोजी आर्थिक सेट डाऊन घोषित करण्यात आला. या निर्णयाच्या थेट परिणाम अर्थव्यवस्थेवर झाला तसेच लोकांच्या जीवन आणि रोजगारावर लक्षणीय परिणाम झाला आहे. पंतप्रधान मोदी यांनी २० लाख कोटी रुपयांची मदत पॅकेज आत्मनिर्भर भारत उपक्रमाचा भाग म्हणून प्रास्तावित केले. २०२० च्या मे महिन्यात MSMEs क्षेत्रासाठी कोणती पावले लागू केली जातील याची रूपरेषा अर्थमंत्र्यांनी दिली. १३ मे २०२० रोजी आत्मनिर्भर भारत पॅकेजच्या भाग म्हणून MSMEs व्याख्येमध्ये बदल घोषित करण्यात आला. या बदलाचा एक महत्त्वाचा घटक म्हणजे MSMEs म्हणून नोंदणीसाठीच्या अटींचे दीर्घ प्रतिक्षित समायोजन त्याच्या सारांश पुढील प्रमाणे दिलेला आहे.

- उत्पादन आणि सेवा उपक्रमांमधील फरक नष्ट करणे.
- सूक्ष्म, लघु किंवा मध्यम व्यवसाय म्हणून पात्र होण्यासाठी यंत्रसामग्री आणि उपकरणांमध्ये किमान आवश्यक गुंतवणूक वाढवणे.
- मूल्यमापन प्रक्रियेत मॉडेल घटक म्हणून 'उलाढाल' समाविष्ट करणे.

सारणी – ३ उपक्रम नुसार वर्गीकरण (MSMEs च्या व्याख्या १ जुलै २०२० नुसार)

उद्योग	गुंतवणूक	वार्षिक उलाढाल
सूक्ष्म	१ कोटीपर्यंत	५ कोटी पेक्षा जास्त नाही
लघु	१० कोटीपर्यंत	५० कोटी पेक्षा जास्त नाही
मध्यम	५० कोटीपर्यंत	२५० कोटी पेक्षा जास्त नाही

स्त्रोत - सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय वार्षिक अहवाल- २०२२-२३

१ जुलै २०२० मध्ये MSMEs या संस्थेच्या अहवालानुसार सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगातील भांडवल गुंतवणुकीनुसार नवीन व्याख्या करण्यात आलेली आहे. उत्पादन आणि सेवा क्षेत्रात ज्या उद्योगांची गुंतवणूक जास्तीत जास्त १ कोटी रुपये व वार्षिक उलाढाल ५ कोटी रुपये आहे अशा उद्योगांचा सूक्ष्म उद्योग गटात समावेश केला आहे. ज्या उद्योगात १० कोटी (कमाल) गुंतवणूक व ५० कोटी (कमाल) वार्षिक उलाढाल असेल अशा उद्योगांना लघुउद्योग म्हटले जाईल अशी व्याख्या करण्यात आली. ज्या उद्योगांची गुंतवणूक कमाल ५० कोटी रुपये व २५० कोटी वार्षिक उलाढाल आहे असे मध्यम उद्योग असतात.

धुळे जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे योगदान :-

धुळे जिल्ह्याची अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान असल्यामुळे जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग हे आर्थिक विकासाचे मुख्य साधन आहे ते रोजगार निर्मिती, ग्रामीण विकास, उद्योजकता आणि सामाजिक प्रगती यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देतात. योग्य नियोजन आणि तंत्रज्ञानाचा वापर तसेच शासकीय पाठबळ मिळाल्यामुळे हे उद्योग जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाची अधिक प्रभावी भूमिका बजावत आहेत. जिल्ह्यात प्रामुख्याने कृषीवर आधारित उद्योग, कापड, अन्न प्रक्रिया उद्योग, प्लास्टिक उत्पादने, अभियांत्रिकी, हस्तकला आणि पारंपरिक उद्योग स्थापन झालेले आहेत. या उद्योगामुळे स्थानिक शेतमालाला योग्य बाजारपेठ, किंमत वाढ आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले. यामुळे ग्रामीण भागात आर्थिक स्थैरनिर्माण होण्यास मदत होत आहे.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

धुळे जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग जिल्ह्याचा औद्योगिक, आर्थिक व सामाजिक विकासासाठी कणा म्हणून कार्य करीत आहेत. या उद्योगांचा सर्वात मोठा फायदा म्हणजे कमी भांडवलात स्थानिक तरुण, महिला व स्वयंरोजगार इच्छुकांना उद्योग सुरू करण्याची संधी मिळते. त्यामुळे बेरोजगारी कमी होऊन स्थलांतरास आढा बसतो. विशेषतः महिला उद्योजकतेला चालणा देण्यात या उद्योगांची भूमिका महत्त्वाची आहे. ग्रामीण व शहरी रोजगार निर्मिती, स्थानिक संसाधनांचा वापर आणि उद्योजकतेचा विकास या दृष्टीने या उद्योगांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या संदर्भातील २०२१ ते २०२४ या चार वर्षाच्या कालावधीत २०२१ च्या तुलनेत २०२४ पर्यंत अध्ययन केले असता लक्षात येते की, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणे रोजगार आणि भांडवल गुंतवणुकीत देखील बरीच वाढ झालेली दिसून येते. हे पुढील सारणीतून लक्षात येते.

सारणी – ४

धुळे जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची वर्षनिहाय माहिती वर्ष – २०२१ ते २०२४

अ. क्र.	वर्ष	सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची (संख्या)	रोजगार (लाख)	भांडवल गुंतवणूक (लाख)
१	२०२१	४७११	२२७११	१०३३७.००
२	२०२२	१७८९	१०३१३	३०७७.००
३	२०२३	११३२७	४१६४३	१७६१८.००
४	२०२४	१४०६७	०.४५	३९०१५.००

स्त्रोत - सामाजिक व आर्थिक समलोचन, धुळे जिल्हा अहवाल २०२१ ते २०२४

सारणी क्र. ४ यातून लक्षात येते की, धुळे जिल्ह्यात २०२१ या वर्षात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची संख्या ४७११ इतकी होती. तर २०२४ या वर्षापर्यंत १४०६७ इतकी वाढ झालेली आहे. याच वर्षात ०.४५ लाख लोकांना रोजगार प्राप्त झाला. तसेच या उद्योगांमध्ये ३९०१५ लाख भांडवल गुंतवणूक करण्यात आलेली आहे. निश्चितच २०२१ च्या तुलनेत २०२४ अखेरपर्यंत उद्योगांच्या संकेत, रोजगार व गुंतवणुकीत बऱ्याच प्रमाणात वाढ झालेली आहे.

सारणी – ५

धुळे जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची तालुकानिहाय माहिती वर्ष – २०२१

अ. क्र.	तालुका	सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची (संख्या)	रोजगार (लाख)	भांडवल गुंतवणूक (लाख)
१	शिरपूर	८९३	४८४३	१५३९.००
२	शिंदखेडा	३०४	१३०९	८४८.००
३	साक्री	७१०	४३४०	१८६९.००
४	धुळे	२८०४	१२२१९	६०८१.००
एकूण		**४७११**	**२२७११**	**१०३३७.४१**

स्त्रोत - सामाजिक व आर्थिक समलोचन, धुळे जिल्हा अहवाल २०२१

वरील सारणीतून लक्षात येते की २०२१ मध्ये ४७११ इतके सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग होते. याच वर्षात या उद्योगांनी हजारो लोकांना रोजगार दिलेला आहे.

सारणी – ६, धुळे जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची तालुकानिहाय माहिती वर्ष – २०२२

अ. क्र.	वर्ष	सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची (संख्या)	रोजगार (लाख)	भांडवल गुंतवणूक (लाख)
१	शिरपूर	२७३	२५९३	४७०.००
२	शिंदखेडा	१३६	७९९	२३३.००

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

३	साक्री	३१५	१२९०	५४२.००
४	धुळे	१०६५	५६३१	१८३२.००
एकूण		**१७८९**	**१०३१३**	**३०७७.००**

स्त्रोत - सामाजिक व आर्थिक समलोचन, धुळे जिल्हा अहवाल २०२२

२०२१ च्या तुलनेत २०२२ या वर्षात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या संख्येत, रोजगारात आणि गुंतवणुकी घट झालेली दिसून येते.

सारणी – ७

धुळे जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची तालुकानिहाय माहिती वर्ष – २०२३

अ. क्र.	वर्ष	सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची (संख्या)	रोजगार (लाख)	भांडवल गुंतवणूक (लाख)
१	शिरपूर	२८४४	८४३७	४८९१.००
२	शिंदखेडा	११२४	३३४२	१९३३.००
३	साक्री	२२७१	१२३२२	२०४३.००
४	धुळे	५०८८	१७५४२	८७५१.००
एकूण		**११३२७**	**४१६४३**	**१७६१८.००**

स्त्रोत - सामाजिक व आर्थिक समलोचन, धुळे जिल्हा अहवाल २०२३

२०२३ मध्ये सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या संख्येत ११३२७ इतकी वाढ झालेली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत उद्योगांच्या संख्येत, रोजगारात आणि गुंतवणुकीत भरमसाठ वाढ झालेली दिसून येते.

सारणी – ८

धुळे जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची तालुकानिहाय माहिती वर्ष – २०२४

अ. क्र.	वर्ष	सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची (संख्या)	रोजगार (लाख)	भांडवल गुंतवणूक (लाख)
१	शिरपूर	३५२९	०.०९	९८९१.००
२	शिंदखेडा	१८०९	०.०४	५४३३.००
३	साक्री	२९५६	०.१३	६०४३.००
४	धुळे	५७७३	०.१९	१७६४८.००
एकूण		**१४०६७**	**०.४५**	**३९०१५.००**

स्त्रोत - सामाजिक व आर्थिक समलोचन, धुळे जिल्हा अहवाल २०२४

धुळे जिल्ह्यातील चारही तालुक्यात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या संख्येत, रोजगार आणि भांडवल गुंतवणुकीत प्रचंड वाढ झालेली दिसते. २०२१ या वर्षात शिरपूर, शिंदखेडा, साक्री व धुळे या चार तालुक्यात अनुक्रमे ८९३, ३०४, ७१० व २८०४ इतकी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची संख्या होती. तर २०२४ अखेरपर्यंत अनुक्रमे ३५२९, १८०९, २९५६ व ५७७३ इतकी वाढ झालेली आहे.

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्राने २०२१ मध्ये शिरपूर, शिंदखेडा, साक्री व धुळे या तालुक्यात अनुक्रमे ४८४३, १३०९, ४३४० व १२२१९ लाख इतका लोकांना रोजगार दिला होता. २०२४ मध्ये या चार तालुक्यात अनुक्रमे ०.०९, ०.०४, ०.१३ व ०.१९ लाख लोकांना रोजगार दिलेला आहे.

२०२४ मध्ये सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगात भांडवल गुंतवणुक एकूण ३९०१५ लाख इतकी झालेली आहे. २०२१ च्या तुलनेत २०२४ मध्ये या उद्योग क्षेत्रात चार पटीने जास्त भांडवल गुंतवणूक झालेली दिसून येते.

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

निष्कर्ष

धुळे जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे अध्ययन केले असता लक्षात येते की, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या संख्येत २०२१ ते २०२४ या चार वर्षाच्या कालावधीत मोठी वाढ झालेली दिसून येते. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील उद्योगात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. या उद्योगांनी ग्रामीण व शहरी भागात जास्त प्रमाणात रोजगार दिलेला आहे. याचा अनुकूल परिणाम थेट लोकांच्या राहणीमानावर झालेला दिसतो.

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्रात या चार वर्षाच्या काळात भांडवल गुंतवणुकीत देखील वाढ झालेली आहे याचा फायदा म्हणजे या उद्योगांचा विस्तार आणि विकासास मदत झालेले आहे.

धुळे जिल्ह्याची अर्थव्यवस्था कृषीप्रधान असली तरी शिक्षण, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग, सहकार, सेवा क्षेत्र आणि सामाजिक पायाभूत सुविधांच्या माध्यमातून ती हळूहळू विविधांगी होत, विकासाकडे वाटचाल करत आहे. उपलब्ध संसाधनाच्या कार्यक्षम वापर, उद्योगांचा विकास, पायाभूत सुविधांचा विस्तार आणि मानवी संसाधनाच्या गुणवत्तेत सुधारणा केल्यास धुळे जिल्ह्याची अर्थव्यवस्था अधिक सक्षम, समतोल व गतिमान होऊ शकते.

संदर्भ

१) भारत सरकार, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय दिल्ली, वार्षिक अहवाल – २०२२-२३
२) महाराष्ट्र शासन, अर्थ व सांख्यिकी संचालनालय धुळे, सामाजिक व आर्थिक समालोचन – २०२१
३) महाराष्ट्र शासन, अर्थ व सांख्यिकी संचालनालय धुळे, सामाजिक व आर्थिक समालोचन – २०२२
४) महाराष्ट्र शासन, अर्थ व सांख्यिकी संचालनालय धुळे, सामाजिक व आर्थिक समालोचन – २०२३
५) महाराष्ट्र शासन, अर्थ व सांख्यिकी संचालनालय धुळे, सामाजिक व आर्थिक समालोचन – २०२४

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

महिला सक्षमीकरण व सामाजिक समावेशन : समाजकार्याचा अभ्यास

डॉ. पुर्णिमा नारायण संधानी
सहाय्यक प्राध्यापक
श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय, वाशिम
Sandhanipurnima@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180245
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 204-209
February 2026
Submitted: 30 Jan. 2026
Revised: 04 Feb. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

महिला सक्षमीकरण आणि सामाजिक समावेशन हे समतामूलक व न्यायाधिष्ठित समाजनिर्मितीसाठी अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. प्रस्तुत संशोधन प्रबंधाचा उद्देश महिला सक्षमीकरण व सामाजिक समावेशन या संकल्पनांचा समाजकार्याच्या अभ्यासाच्या दृष्टिकोनातून अभ्यास करणे हा आहे. या संशोधनात महिला सक्षमीकरणाच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय पैलूंचा तसेच सामाजिक समावेशनाच्या प्रक्रिया व धोरणांचा आढावा घेण्यात आला आहे. स्त्रीवादी सिद्धांत, मानवाधिकार दृष्टिकोन आणि सहभागाधारित विकास मॉडेल या सैद्धांतिक चौकटींचा उपयोग करून समाजकार्याची भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. स्वयं सहायता गट, कौशल्य विकास कार्यक्रम, जनजागृती मोहिमा, आरोग्य व कायदेविषयक साक्षरता यांसारख्या समाजकार्य उपक्रमांमुळे महिलांचा आत्मविश्वास, स्वावलंबन आणि निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढल्याचे आढळून आले आहे. तथापि, परंपरागत सामाजिक रूढी, संसाधनांची कमतरता व धोरणांच्या अंमलबजावणीत अडथळे ही प्रमुख आव्हाने असल्याचेही निदर्शनास आले आहे. अखेरीस, समावेशक धोरणे, पुरुष सहभाग, समुदाय आधारित हस्तक्षेप आणि प्रभावी मूल्यांकन यंत्रणेद्वारे महिला सक्षमीकरण व सामाजिक समावेशन अधिक प्रभावीपणे साध्य होऊ शकते, असा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

प्रस्तावना :

समाजाचा एक प्रगत व न्याय्य चेहरा तेव्हा निर्माण होतो जेव्हा समाजातील सर्व घटक समान संधी, समान अधिकार आणि समान सन्मान मिळवू शकतात. या संदर्भात महिला सक्षमीकरण (Women's Empowerment) आणि सामाजिक समावेशन (Social Inclusion) या संकल्पना आधुनिक सामाजिक विकासाच्या केंद्रस्थानी आहेत. विशेषतः भारतासारख्या विविध सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या देशात या विषयाचे महत्त्व अधिक दिसून येते. समाजकार्य (Social Work) या क्षेत्राने या समस्यांना तात्त्विक, व्यावहारिक आणि धोरणात्मक तोडी दिली आहे. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महिला सक्षमीकरण व सामाजिक समावेषण या संकल्पना अत्यंत महत्त्वाचा ठरतात कोणत्याही समाजाची प्रगती ही त्या समाजातील महिलाची स्थिती सहभाग आणि निर्णय क्षमतेवर अवलंबन असते . ऐतिहासिक सामाजिक व सांस्कृतिक कारणामुळे महिलांना दीर्घकाळ दुय्यम स्थान देण्यात आले असून त्यांच्या परिणाम त्यांच्या शिक्षण आरोग्य वेज रोजगार व सामाजिक सहभागावर झाला आहे त्यामुळे महिला सक्षमीकरणाची गरज ही केवळ महिलांचा विकासापूर्ती मर्यादित न राहता संपूर्ण समाजाच्या प्रगतीशी निगडित आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ. पुर्णिमा नारायण संधानी, सहाय्यक प्राध्यापक, श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय, वाशिम

How to cite this article:
संधानी, . पुर्णिमा . नारायण . (2026). महिला सक्षमीकरण व सामाजिक समावेशन : समाजकार्याचा अभ्यास. *Journal of Research and Development,* 18(2(*XIV*)), 204–209. https://doi.org/10.5281/zenodo.18799855

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18799855
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देऊन त्यांना सामाजिक आर्थिक राजकीय व मानसिक दृ ष्ट्या सक्षम बनवणे होय यामध्ये शिक्षण कौशल्य विकास आर्थिक स्वालंबन निर्णय प्रक्रियेत सहभाग आणि आत्मविश्वास वृद्धिगत करणे या बाबींच्या समावेश होतो तथापि महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत अनेक सामाजिक अडथळे जसे की लिंगभेद गरिबी अशिक्षण कौटुंबिक बंधने वा सांस्कृतिक रूढी आढळून येतात या अडथळांवर मात करण्यासाठी प्रभावी सामाजिक हस्तक्षेपाची आवश्यकता असते .
सामाजिक समावेशन ही संकल्पना समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान संधी मिळवून देणे आहे.

सन्मान व संसाधनामध्ये प्रवेश मिळून देण्यावर भर देते महिला दलित आदिवासी अपंग अल्पसंख्याक व इतर वंचित घटक अनेकदा सामाजिक प्रवाह पासून दूर राहता सामाजिक बहिष्कार यामुळे या घटकांचा विकास खुंटतो व सामाजिक विषमता तीव्र होते सामाजिक समावेशनाच्या माध्यमातून असा घटकांना मुख्य प्रवाहात आणून सामाजिक व न्याय व समानता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्न केला जातो समाजकार्य हा एक व्यवसायिक व शास्त्रीय अभ्यास असून तो व्यक्ती कुटुंब समूह समुदाय यांच्या समस्या समजून घेऊन त्यावर उपाय शोधण्याच्या कार्य करतो महिला सक्षमीकरण व सामाजिक समावेशन या दोन्ही प्रक्रिया मध्ये समाजकार्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे सामाजिक समाज कार्यकर्ते विविध पातळयांवर व्यक्तिगत समूह समुदाय स्तरावर हस्तक्षेप करून महिलांना सक्षम बनवायचा प्रयत्न करतात तसे धोरण निर्मिती कार्यक्रम अमलबजावणी व सामाजिक जागृती मध्ये यामध्ये समाजकार्याचे योगदान लक्षणीय आहे आजच्या काळात शासन स्वयंसेवी संस्था व सामाजिक संस्था महिला सक्षमीकरण व सामाजिक समावेषण साठी विविध योजना व कार्यक्रम राबवीत आहे मात्र या योजनाची प्रभावीता पोहोचवा परिणामकारकता यांच्या शास्त्रीय अभ्यास होणे आवश्यक आहे समाजकार्याच्या अभ्यास समाजकार्याच्या अभ्यासाच्या माध्यमातून या प्रक्रिया प्रक्रियाचे विश्लेषण करून अधिक समावेश क व न्याय समाज निर्मितीसाठी दिसानिश्चित करता येऊ शकते सदर अभ्यास महिला सक्षमीकरण व सामाजिक समावेशन या संकल्पनाचा समाजकार्याच्या दृष्टिकोनातून सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न करतो या अभ्यासातून सामाजिक समस्या समाजकार्य हस्तचे व सामाजिक बदल यामधील परस्पर संबंध स्पष्ट होऊन सामाजिक विकासाच्या प्रक्रियेस शास्त्रीय अधिष्ठान मिळवण्याचा मदत होईल.

सामाजिक संशोधनाचे उद्देश्य:-

1.महिला सक्षमीकरणा सक्षमीकरणाच्या संकल्पनेचा समाजकार्याच्या दृष्टिकोनातून अभ्यास करणे.
2.महिलांच्या सामाजिक आर्थिक आर्थिक व शैक्षणिक स्थितीचे विश्लेषण करणे.
3.सामाजिक समावेशनाची प्रक्रिया मातीचे महत्त्व समजून घेणे .
3.वंचित व दुर्बल घटकांच्या सामाजिक समावेशांतील अडथळे ओळखणे.
4.महिला सक्षमीकरण व सामाजिक समावेशनासाठी समाजकार्य हस्तक्षेपाची भूमिका अभ्यासणे
5.शासकीय व शासकीय योजना ची परिणामकारक तपासणे
6.सामाजिक व समाजकार्य शिक्षण व व्यावसायिक मूल्यांचा सामाजिक विकासातील उपयोग समजून घेणे.
7.सामाजिक न्याय समानता व मानव अधिकार प्रस्थापित करण्यासाठी उपाय सुचवणे .
8.महिला व वंचित घटक घटकांना मुख्य प्रवाहात .आणण्यासाठी प्रभावी रणनीतीत विकसित करणे .
9.समाजकार्याच्या अभ्यासातून समावेशक व सक्षम समाज निर्मितीस हातभार लावणे.

सामाजिक संशोधनाचे गृहितके/ उपकल्पना:

1.महिलांचा सामाजिक आर्थिक व शैक्षणिक सक्षमीकरणाची सद्यस्थिती अभ्यासणे
2. महिला महिला सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय व अस्सकीय योजनांची प्रभावी ता अभ्यासणे.
3. महिलांसमोर असलेल्या सामाजिक सांस्कृतिक व आर्थिक अडथळयांचे विश्लेषण करणे.
4. स्वालंबन निर्णय क्षमता व नेतृत्व विकासामधील समाजकार्याची भूमिका अभ्यासणे.
5. महिला सक्षमीकरण प्रक्रियेत समाजकार्य हस्तक्षेपाचे मूल्यांकन करणे.

३. संकल्पना आणि तात्त्विक रूपरेषा :

3.1 महिला सक्षमीकरण

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना निर्णयप्रक्रियेतील भागीदार बनवणे, आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात स्वावलंबी बनवणे होय. हा एक सतत चालणारा सामाजिक प्रक्रिया आहे ज्यामुळे महिलांना स्वत:च्या जीवनावर नियंत्रण मिळते आणि त्यांच्या क्षमतेचा प्रचंड वापर होतो.

3.2 सामाजिक समावेशन

सामाजिक समावेशन म्हणजे कोणत्याही व्यक्ती किंवा गटाला — लिंग, जात, वय, धर्म, वंचितता, आर्थिक स्थिती यांचा भेद न करता — मुख्य प्रवाहात समान संधी व अधिकार प्राप्त करून देणे. हे असे वातावरण निर्माण करते की जिथे सर्व लोकांना जगणे, शिकणे, काम करणे व निर्णय घेणे या सर्व प्रक्रियेत सक्रिय सहभाग मिळतो.

3.3 समाजकार्याची भूमिका

समाजकार्य म्हणजे समाजातील दुर्लक्षित व वंचित घटकांसाठी काम करणारा व्यावसायिक स्तरावरचा प्रयत्न. हे लोकांच्या जीवनात बदल घडवून आणण्याचे, सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचे आणि समुदायबद्ध विकासाची दिशा साकारण्याचे माध्यम आहे.

4. सैद्धांतिक चौकट आणि संशोधन पद्धती

या संशोधनात सामाजिक विकास, स्त्रीवादी सिद्धांत (Feminist Theory), मानवाधिकार दृष्टिकोन आणि सहभाग आधारित विकास मॉडेलचा आधार घेतला आहे. संशोधन पद्धतीमध्ये साहित्य सर्वेक्षण, धोरण विश्लेषण, प्रकल्प मूल्यांकन व समुदाय मुलाखतीचा समावेश केला आहे.

असे ६५ % महिला गावातील विकासाच्या प्रक्रियेत निर्णय स्वतः घेतात बहुतांश महिला सहभागी होतात.

प्रश्न 3. प्रशासकीय कामात तुम्हाला कोणाच्या मदतीची गरज लागते का ?

तक्ता क्र. ३

प्रशासकीय कामात तुम्हाला कोणाच्या मदतीची गरज लागते का हे दर्शविणारा तक्ता

अ.क्र.	विवरण	संख्या	शे.प्रमाण
१	होय	११	५५%
२	नाही	०९	४५%
	एकूण	२०	१००%

प्रशासकीय कामात तुम्हाला कोणाच्या मदतीची गरज लागते का हे दर्शविणारा तक्ता क्र. ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे ५५ % महिला ह्या प्रशासकीयकामात कोणाचीही मदत घेत नाही तर तक्ता क्र3 मध्ये दर्शविल्याप्रमाणे ४५ % महिला ह्या कागदे ,कागदपत्रे गोळा करण्यासाठी समाजातील किवा कुटुंबातीलव्यक्तीची मदत घेतात.

प्रश्न 4 .ग्रामीण भागातील प्रश्नांच्या समस्यांच्या संदर्भात करण्यात आलेल्या उपाययोजना मध्ये तुम्ही सहभागी होता का ?

तक्ता क्र. ४

ग्रामीण भागातील प्रश्नांच्या समस्यांच्या संदर्भात करण्यात आलेल्या आंदोलनात तुम्ही सहभागी होता का हे दर्शविणारा तक्ता

अ.क्र.	विवरण	संख्या	शे.प्रमाण
१	होय	८	४० %
२	नाही	१४	६0 %
	एकूण	२०	१००%

ग्रामीण भागातील प्रश्नांच्या समस्यांच्या संदर्भात करण्यात राजकीय पक्षाद्वारे किंवा राजकीय संघटनाद्वारे आयोजित करण्यात आलेल्या आंदोलनात नागरिकांचा सहभाग महत्वाचा असतो कारण त्या माध्यमातून त्यांच्या प्रश्नाकडे , समस्यांकडे शासनाचे लक्ष आकर्षित केले जाते वरील तक्ता क्र. ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे ४० %
महिला ग्रामीण भागातील प्रश्नांच्या समस्यांच्या संदर्भात करण्यात आलेल्या आंदोलनात सहभागी होतात.व ६0 % महिला सहभागी होत नाही यावरून स्पष्ट होते की, ग्रामीण भागातील प्रश्नांच्या समस्यांच्या संदर्भात करण्यात आलेल्या आंदोलनात बहुतांश महिला सहभागी होत नाहीत

प्रश्न 5. शासकीय अधिकारी तुमच्या सूचनांना गांभीर्याने घेतात का ?(उदा ग्रामसेवक, बीडीओ)

तक्ता क्र. ५

शासकीय अधिकारी तुमच्या सूचनांना गांभीर्याने घेतात का हे दर्शविणारा तक्ता

अ.क्र.	विवरण	संख्या	शे.प्रमाण
१	होय	११	५५%
२	नाही	०९	४५%
	एकूण	२०	१००%

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

वरील तक्ता क्र. ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे ५५% महिला ना असे वाटते कि शासकीय अधिकारी त्यांच्या सूचनांना गांभीर्याने पालन करतात.व ४५ % महिलांना असे वाटते कि शासकीय अधिकारी त्यांच्या सूचनांना गांभीर्याने पालन करत नाही यावरून स्पष्ट होते की, , ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचा महिलांना अजूनही राजकीय प्रक्रियेत अडचणी आणि आव्हाने आहेतच असे माझ्या संशोधनातून निदर्शनास आले आहे.

निष्कर्ष :

स्थानिक स्वराज्य संस्थाना 50% आरक्षण असल्यामुळे स्थानिक राजकारणात महिलांची संख्यात्मक वाढ लक्षणीय रित्या झाली आहे. अनेक ठिकाणी महिलांनी पिण्याचे पाणी , आरोग्य ,शिक्षण यासाररख्या प्रश्नावर उत्कृष्ट रित्या काम केले आहे. परंतु प्रतिनिधित्व मिळवून ही " वास्तविक सत्ता " मिळवण्यासाठी त्यांना आजही संघर्ष करावा लागतो आहे. हे सत्य नाकारता येणार नाही.जोपर्यंत ग्रामीण भागातील " पितृसत्ताक मानसिकता , बदलत नाही तोपर्यंत केवळ आरक्षणाने पूर्ण सक्षमीकरण होणार नाही. महिला लोकप्रतीनिधिनी आपल्या अधिकारांची जाणीव ठेऊन आत्मनिर्भरहोणे हीच खऱ्या अर्थाने लोकशाहीच्या विकेंद्रीकरणाची यशस्वीता ठरू शकेल. नमुना सर्वेक्षणनातून असे दिसून येते की,आजही अनेक ठिकाणी महिला प्रतिनिधीच्या नावाखाली त्यांचे पती किवा घरातील पुरुष सदस्य कारभार पाहतात हे नेतृत्व महिलांच्या वास्तविक सक्षमीकरणातील सर्वात मोठा अडथळा आहे. मात्र ,उच्च शिक्षण घेतलेल्या महिलांमध्ये हा प्रभाव कमी असल्याचे आढळते महिलांच्या सहभागामुळे स्थानिक राजकारणाच्या अजेंडात बदल झाला आहे. पुरुष लोकप्रतिनिधी सहसा रस्ते ,बांधकाम आणि भौतिक पायाभूत सुविधांना प्राधान्य देतात,तर महिला लोकप्रतिनिधी पाणीपुवठा ,स्वच्छता ,अंगणवाडी मुलांचे पोषण या सारख्या सामाजिक प्रश्नावरजास्त लक्ष केंद्रित करताना दिसतात. सुरुवातीला निवडून आलेल्याअनेक महिलांना प्रशासकीय कामाचा अनुभव नसतो.मात्र 2 ते 3 वर्षाच्या कार्यकाळात त्याच्या निर्णयक्षमतेत आणि आत्मविश्वासात मोठी वाढ होताना दिसते. त्या महिला ग्रामसभेत बोलू लागतात आणि अधिकाऱ्यांशी संवाद साधतात. तसेच ग्रामपंचायत आणि जिल्हापरिषद स्थरावरीलकर्मचारीची (ग्रामसेवक ,कनिष्ट अभियंता) मानसिकता अजूनही पूर्णपणे बदललेली नाही अनेकदा महिला प्रतिनिधीना तांत्रिक माहिती कमी असल्याचे गृहीत धरून त्यांना प्रशासकीय कामात डावलले जाते.किवा त्यांच्यापासून माहिती लपवली जाते. आर्थिक आणि सामाजिक अडथळे महिलांना घरगुती जबाबदाऱ्या आणि राजकीय कर्तव्य यांचा समतोल साधताना प्रचंड कसरत करावी लागते.तसेच निवडणुकांमध्येवाढणारा अवाढव्य खर्च आणि पैसा बळाचा वापर यामुळे आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी नसलेल्या महिलांना स्वतंत्रपणेराजकारण करणे कठीण जाते.

संदर्भसूची

१) पंडित ग.श. "पंचायत राज आणि ग्रामीण महिला " सुगावा प्रकाशन ,पुणे ,१९९६
२) Dasarathi Bhuyan : Women in Politics, First Edition, Arora Publication Delhi 2008
३) शेळके शांता,"आजचे बदलते स्त्रीजीवन ", नरेंद्र प्रकाशन ,१९७९
४) बनारसे राजू भागाजी ,"महिलाओ के राजनीतिक सशक्तीकरण में पंचायत राज व्यवस्था की भूमिका " राष्ट्रीय चर्चासत्राचे इतिवृत ,२०१५ ,जय मुद्रण कंपनी अकोला.
५) चौधरी पब्लिकेशन,'महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम -१९५८ ' (२००६) जळगाव
६) जळगाव जिल्हा शासकीय संकेतस्थळ- www.jalgaon.gov.in
७) जैन, प्रकाश (1993), "पंचायतों में महिलाओं का प्रतिनिधित्व" कुरुक्षेत्र नवम्बर, प्रकाशन विभाग, भारत सरकार, नइ दिल्ली।
८) कु. वंदना अरुण सातपुते ,प्रा.डॉ. विजय जालिंदर देठे – यांचा लेख
९) स्त्री मुक्ती आणि कुटुंब संस्था –मृणाल साठे ,अमोल कैरकर

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

महिला सक्षमीकरण : सुवर्णकाळ (१९७५ ते २०२५)

डॉ.सौ.अरुणा रविंद्र वाघोले.
सहयोगी प्राध्यापक, इतिहासविभाग प्रमुख.
मा.बाळासाहेब जाधव क, वा, वि.महाविदयालय
आळे, ता.जुन्नर. जि .पुणे.
aruna.123w@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180249
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 222-227
February 2026
Submitted: 30 Jan. 2026
Revised: 04 Feb. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

प्रस्तुत लेख १९७५ ते २०२५ या ५० वर्षांतील महिला चळवळीचा आणि सक्षमीकरणाचा आढावा घेतो. स्वातंत्र्यपूर्व काळात राजा राममोहन रॉय, महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्री-शिक्षणाची व हक्कांची मुहूर्तमेढ रोवली. १९ व्या आणि २० व्या शतकात सतीबंदी, विधवा पुनर्विवाह आणि शारदा कायद्यासारख्या कायदेशीर सुधारणांमुळे स्त्रीमुक्तीला सुरुवात झाली. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय संविधानाने स्त्रियांना मतदानाचा समान अधिकार दिला. हिंदू कोड बिल आणि त्यानंतर झालेले हुंडाबंदी, समान वेतन व वारसा हक्क यांसारख्या कायद्यांमुळे स्त्रियांच्या सामाजिक आणि कायदेशीर दर्जात सुधारणा झाली. लेखात 'सेवा', 'चिपको आंदोलन', 'शहादा आंदोलन' आणि 'बलात्कारविरोधी चळवळ' यांसारख्या विविध सामाजिक व राजकीय आंदोलनांमधील स्त्रियांच्या सक्रिय सहभागाचे वर्णन केले आहे. ७२ व ७३ व्या घटनादुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आरक्षण देऊन राजकीय सक्षमीकरणाचा पाया रचला. जरी काही आव्हाने अद्याप शिल्लक असली, तरी गेल्या ५० वर्षांत स्त्रियांनी शिक्षण, प्रशासन आणि राजकारण अशा सर्वच क्षेत्रांत आपली मोहोर उमटवली आहे.

कीवर्ड्स: *महिला सक्षमीकरण , स्त्रीवादी चळवळ , सावित्रीबाई फुले , हिंदू कोड बिल , आंतरराष्ट्रीय महिला वर्ष (१९७५) , राजकीय आरक्षण (७३ व ७४ वी घटनादुरुस्ती) , हुंडाबंदी कायदा , चिपको आंदोलन, स्वयंसेवी संस्था*

प्रास्ताविक

यावर्षी २१ व्या शतकातील पहिली २५ वर्षे पूर्ण होत असून याच वर्षी १९७५ ते २०२५ या महिला चळवळीला ५० वर्षे पूर्ण होत असून यात विविध छटांमुळे झालेले इंद्रधनुष्यातील नऊ रंगांची उधळण कार्य, कर्तुत्व, शिक्षण, शिक्षणासाठी वातावरण, पैसा, सजगता, शैक्षणिक गुणवत्ता, पात्रता, विविध क्षेत्रातील भरारी, नेतृत्व सिद्ध केले. स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्री -स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ पुरुषांनी घातली. राजा राममोहन रॉय यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे इ.स. १८२९ मध्ये लॉर्ड विल्यम बेटिंगने सतीबंदीचा कायदा पास केला. तेव्हापासून स्त्रीमुक्तीला सुरुवात झाली. पुढे १८५६ साली विधवा पुनर्विवाह कायदा पास झाला. त्यानंतर स्त्रियांच्या दृष्टीने महत्त्वाच्या संमती वयाचा कायदा उर्फ शारदा कायदा इ.स. १९२९ मध्ये पास झाला. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात स्त्रीमुक्ती चळवळ पूर्ण लोकशाही मार्गाने चालू होती. स्त्रियांना समान दर्जा व अन्याय निवारण ही त्यांच्या चळवळीची दोन प्रमुख उद्दिष्टे होती. ही उद्दिष्टे नुसती डोळ्यासमोर आणली तरी, त्यातून स्त्रीवाद डोकावतांना दिसतो. इ.स. १९२६ पासून राज्यांच्या विधिमंडळाचे सदस्यत्वही त्यांना मिळू लागले. मुथूलक्ष्मी रेड्डी या मद्रास प्रांतात पहिल्या विधिमंडळाच्या उपाध्यक्षपदी निवडून आल्या, तर मुंबई प्रांतात श्रीमती सरोजिनी नायडू निवडून आल्या. १९३० साली भरलेल्या पहिल्या गोलमेज परिषदेकडे देण्यासाठी ऑन इंडिया विमेन्स कॉन्फरन्सने एक निवेदन तयार केले. त्यात

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
डॉ.सौ.अरुणा रविंद्र वाघोले, सहयोगी प्राध्यापक, इतिहासविभाग प्रमुख.मा.बाळासाहेब जाधव क, वा, वि.महाविदयालय आळे, ता.जुन्नर. जि .पुणे.

How to cite this article:
वाघोले., . अरुणा . रविंद्र . *(2026).* महिला सक्षमीकरण : सुवर्णकाळ (१९७५ ते २०२५). *Journal of Research and Development, 18(2(XIV)), 222–227. https://doi.org/10.5281/zenodo.18800316*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18800316
OPEN ACCESS

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

१) सर्व भारतीयांना समान हक्क द्यावेत.

२) धर्म, जात व लिंग अशा कोणत्याही कारणांसाठी भारतीयांमध्ये भेदाभेद केला जाऊ नये.

३) सर्व प्रौढांना विनाअट मतदानाचा हक्क मिळावा.

४) पुरुषांप्रमाणेच सर्वसाधारण मतदारसंघांतून निवडणुका लढविता याव्यात, अशा मागण्या केल्या होत्या.[१]

त्यांच्या या मागण्यांपैकी इ.स. १९३२ मध्ये एकवीस वर्षांवरील सर्व स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला. हा स्त्रीवादाचाच विजय म्हणता येईल. सुचेता कृपलानी व अरुणा असफअली यांसारख्या स्त्रियांनी सन १९४२ च्या चलेजाव चळवळीत भूमिगत राहून भाग घेतला. या वर्षी कमलादेवी चट्टोपाध्याय या अखिल भारतीय महिला परिषदेच्या (AIWC) अध्यक्ष झाल्या. त्यांना यावेळी अटक झाली. इ.स. १९४४ मध्ये त्यांची सुटका झाली. याच वर्षी अखिल भारतीय काँग्रेसची महिला शाखा स्थापन झाली. काव्य फुले १८५४ सावित्री जोतिबा यात एकूण ४१ कविता लिहिलेल्या आहेत.

छत्रपती शिवाजीचे । प्रातः स्मरण करावे
शूद्रादी अतिशुद्रांचा । प्रभू वंदू मनोभावे
नळराजा युधिष्टर । द्रौपदी ही जनार्दन
पुण्यश्लोक पुराणात । इतिहासी शिवानन [२]

या काव्यातून मनोभावे शिवाजी राजांचे सकाळी स्मरण करावे हा बोध केला होता.

१३ राणी छत्रपती ताराबाई (पद्य)
छत्रपती सिंहासनीची एक राणी ताराबाई
कोल्हापूरची जगदंबा महिराष्ट्राची अंबाबाई
शत्रुवर घाली छापा काळ तयाची ती होई
जेरीस शत्रूला करून करी बेफाम चढाई
ताराबाई माझी मर्दिनी
भासे चंद्रिका रणांगणी
रणदेवी ती श्रद्धास्थानी
नमन माझिये तिचिया चरणी[३]

२१ ओळी पद्धतीने ताराबाईंची कार्याचे वर्णन काव्यातून केले आहे.

सावित्रीबाई फुले यांनी आपल्या काव्यफुलातून माझी जन्मभूमी, पिवळा चाफा, जाईचे फुल, गुलाबाचे फुल, मानव व सृष्टी, शूद्रांचे दुखणे, मनू म्हणे, ब्रम्हवंती शेती, श्रेष्ठ धन, बाळास उपदेश, इंग्रजी माऊली, नवस, शूद्र शब्दाचा अर्थ, इंग्रजी शिका, शिकणेसाठी जागे व्हा, शूद्रांचे परावलंबन यावरील विविध कवितातून शिक्षण महत्त्वाचे आहे हा शुभ संदेश सर्वांना दिला आहे.

क्रांतीज्योती सावित्रीबाई यांनी स्त्रीशिक्षणाचा वारसा १८४८ रोजी सुरु केला. त्याचे स्त्रीवादी चळवळीत पुढे रुपांतर झाले. स्त्रीवादी चळवळीची सुरुवात झाली. त्याला आंतरराष्ट्रीय महिला वर्ष सुरू झाले. त्याला यंदा ५० वर्षे पूर्ण झाली आहेत.[४] गेल्या ५० वर्षात प्रत्येक टप्प्यावर ती स्त्री स्वतःला कशी व्यक्त करत गेली हे आपण बघतो, तिने स्वतःकडे वळून कसं पाहिलं ते पाहतो, ती जागी कशी झाली ? स्वतःच्या आणि समाजाने तिला दिलेल्या भूमिकांचा विचार ती कधी करायला लागली ? स्त्रीचे आणि कुटुंबाचे संबंध, स्त्रीचे आणि मुलांचे संबंध, स्त्रीचे आणि समाजाचे संबंध या सगळ्या पलीकडे जात आपण उरतो का? आणि उरत असलो तरी काय म्हणून उरतो? आपली सर्जनशीलता या प्रवासात टिकेल का? यासाठी वेगवेगळ्या लेखिकांनी कथांमधून प्रकट केलेले दिसते.[५] स्वातंत्र्यपूर्व काळातील काशीबाई कानिटकर, कमलाबाई टिळक, विभावरी शिरुरकर, मेघना पेठे, निरजा, मोनिका गजेंद्र गडकर यांच्या आपल्या कसदार लेखनातून कलात्मक जाणिवांचा एक चढता आलेख स्त्री जीवनाचा दृश्यमान केला आहे.[६]

या चळवळीत विद्यार्थिनीसुद्धा सहभागी झाल्या होत्या. शकुंतला शर्मा नावाच्या अलाहाबादच्या विद्यार्थिनीने कलेक्टर कचेरीवर तिरंगा फडकविण्याचे धाडस केले होते. तसेच कॅबिनेट मिशन जेव्हा भारतभेटीवर आले तेव्हा याच स्त्रियांनी प्रचंड संख्येने एकत्र येऊन स्वतःच्या मागण्या बाजूला ठेवून भारताच्या स्वातंत्र्याचीच मागणी केली. स्त्रियांच्या स्वातंत्र्य लढ्यातील सहभागामुळेच घटनासमिती स्थापन झाली. तेव्हा देशभर पसरलेल्या महिला संस्थांच्या प्रतिनिधींना घटना कामात भाग घेण्यासाठी पाचारण करण्यात आले होते. इ.स. १९४६ मध्ये घटना समिती स्थापन झाली. तेव्हा चौदा स्त्रिया तिच्या सभासद होत्या. स्त्रीवादात हीच समता अपेक्षित आहे. घटनेच्या ३२६ व्या कलमानुसार कामे कोणताही भेदभावन करता सर्व भारतीय नागरिकांना मतदानाचा अधिकार मिळाला. लिंगावर आधारित भेदभाव त्यामुळे नाहीसा झाला.

स्वतंत्र भारतातील लोकशाही शासनव्यवस्थेत स्त्रियांच्या सहभागाला योग्य वातावरण असले, तरी निर्णय प्रक्रियेत त्यांचा समावेश फार कमी आहे. स्त्रियांनी राजकारणात मोठ्या प्रमाणावर भाग घेतला, तर राजकारणाचा रंग बदलेल, त्याचे गुन्हेगारीकरण कमी होईल, स्पर्धात्मक राजकारणापेक्षा विधायक कार्यक्रमांवर लक्ष केंद्रित होईल हे सर्वांना मान्य आहे. त्यामुळे त्यांच्या राजकारणातील प्रवेशात येणारे अडथळे शोधून दूर केले पाहिजेत. हळूहळू कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक अडथळे दूर होत आहेत. ग्रामीण भागात तयार

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

झालेले महिला नेतृत्व राष्ट्रीय पातळीवर पोहोचेलच असे नाही. पण ७३ व ७४ व्या घटनेतील कलमानुसार स्त्रियांच्या हाती सत्ता सोपविण्यासाठी पहिले पाऊल उचलले आहे.

स्त्रीवादाची जोपासना करण्यासाठी झालेले कायदे

स्त्रीवादाची योग्य पद्धतीने जोपासना व्हावी या हेतूने स्वतंत्र भारतात वेळोवेळी विविध कायदे पास केले. स्वातंत्र्य लढयात पुढाकार घेऊन पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढणाऱ्या महिलांच्या स्वराज्याकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सन १९५५-५६ मध्ये हिंदू कोड बिल मांडण्यात आले. कारण स्त्रियांवरील अन्याय दूर होऊन समान दर्जा मिळाला पाहिजे याबद्दल लोकमत तयार झालेले दिसते. या कायदयातील द्विभार्या प्रतिबंधक कायदा, वारसा कायदा, घटस्फोटाचा कायदा, मूल दत्तक घेण्याचा व घटस्फोट झाल्यास पतीकडून पोटगी मिळण्याचा हक्क देणारा कायदा, आईला मुलाची नैसर्गिक पालक म्हणून मान्यता देणारा कायदा, वेश्या व्यवसायातील मुलींच्या खरेदी-विक्रीवर बंदी घालणारा कायदा असे अनेक कायदे होते. त्यातील वारसा कायद्याला लोकसभेत डॉ. राजेंद्रप्रसाद व इतर सर्वच सभासदांचा जोरदार विरोध होता, कारण या कायद्यामुळे हिंदू कुटुंबसंस्था मोडून पडेन अशी सर्वांना भीती वाटली, पित्याच्या संपत्तीत मुलाप्रमाणेच मुलीला वारसा हक्काने समान वाटा मिळाला तर कुटुंब व आप्तसंबंध नष्ट होतील असे सर्वांचे म्हणणे होते. हे कलम सोडून बाकीचे बिल पास करण्याची लोकसभेची तयारी होती. पण हे बिल मांडणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर बिलालून हे कलम वगळण्यास तयार नव्हते. शेवटी बिल मागे घेतले गेले. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर राजीनामा देऊन बाहेर पडले. पुढे हे बिल तुकडया- तुकडयांनी पास झाले. वारसा कायद्यात मुलींचा समान वाटा पित्याच्या इच्छेवर सोडण्यात आला. स्त्रीवाद किंवा स्त्रीमुक्तीची गरज का भासली याचे उत्तर वरील विवेचनातुन मिळते.

सुरुवातीस घटस्फोट सोपा नव्हता. त्यात वेळेचा बराच अपव्यय होत असे. इ.स. १९७६ च्या दुरुस्ती कायदयाने सर्व विवाह नोंदणे अनिवार्य ठरले. त्यामुळे परस्पर संमतीने घटस्फोट मिळू लागला. समान वेतन कायदा केल्यामुळे स्वियांच्या सामाजिक दर्जात सुधारणा घडून आली. इ.स. १९६१ मध्ये हुंडाबंदी कायदा पास करण्यात आला. त्यात इ.स. १९८४ मध्ये सुधारणा करण्यात आली. त्यानुसार हुंडयासाठी होणारा स्त्रीचा छळ हा दखलपात्र गुन्हा ठरविण्यात आला. त्यात इ.स. १९८६ मध्ये जी दुसरी दुरुस्ती करण्यात आली त्यानुसार विवाहानंतर सात वर्षांच्या आत स्त्रीने आत्महत्या केली आणि तिचा छळ केला गेला हे सिद्ध झाले तर, नवरा व सासू-सासऱ्यांना शिक्षा होऊ शकते. इ.स. १९७१ मध्ये वैद्यकीय कारणासाठी गर्भपात कायदेशीर ठरला, सरकारी हॉस्पिटलमधून तो मोफत केला जातो. सन १९८० च्या कायद्यानुसार बलात्कारासारख्या केसेसमध्ये स्त्रीला बदनामीपासून वाचविण्यासाठी केस न्यायाधीशांच्या चेंबरमध्ये करण्याची तरतुद केली.

इ.स. १९८६ मध्ये स्त्रियांच्या बाबतीत त्यांचे अश्लील असे चित्रीकरण करण्यावर बंदी घालण्यात आली. इ.स. १९९२ मध्ये ७२ व ७३ व्या घटनादरुस्तीने ३०% जागा निवडणूक होणाऱ्या सर्व संस्थांमध्ये व स्थानिक आस्थापनात राखीव ठेवण्यात आल्या आहेत. आठव्या पंचवार्षिक योजनेत स्त्रियांसाठी रोजगार आणि उत्पन्नाच्या बाबी वाढविण्यासाठी प्रयत्न केला आहे. इ.स. १९९३ मधील महिला समृद्धी योजना तसेच शाळा मध्येच सोडणाऱ्या मुलींसाठी पोषण, आरोग्य व्यक्तिमत्व विकास, व्यवसाय शिक्षण किंवा तंत्रशिक्षण असे अनेक कार्यक्रम सुरू आहेत. स्त्री सबलीकरणासाठी हे प्रयत्न प्रामाणिकपणे राबविण्यासाठी प्रयत्न केल्यास स्त्रीमुक्ती दूर नाही. अर्थात कितीही कायदे केले तरी पुरुषांच्या मानसिकतेत मूलतः बदल होत नाहीत तोपर्यंत स्त्रीवाद व स्त्रीमुक्ती आंदोलने सुरूच राहतील स्त्रीवादी चळवळीचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

स्त्रियांचा विविध आंदोलनात सहभाग

राजकीय क्षेत्रातील महिलांचे देशाच्या स्वातंत्र्यासाठी केलेले कार्य मुंबई येथे भरलेल्या अधिवेशनात चले जाव ठराव मंजूर झाल्यानंतर गांधीजींनी 'करेंगे या मरेंगे' या निर्धाराने सरकारशी संघर्षाला प्रारंभ केला. याला सरकारने दडपशाहीचे धोरण स्वीकारले. ९ ऑगस्ट रोजी महात्मा गांधी, पंडित नेहरू, मौलाना आझाद, सरदार पटेल, राजेंद्र प्रसाद व सरोजिनी नायडू इ. १४८ नेत्यांना तुरुंगात टाकले.७ यात महिला सहभागी झाल्या होत्या. चलेजाव चळवळीचा एक भाग म्हणून भूमिगत चळवळ सुरू केली .या चळवळीचे नेतृत्व डॉ. राम मनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण व श्रीमती अरुणा असफली या नेत्यांनी केले.८ सर सय्यद यांचे अलिगढ चळवळ गुरुदासपूर येथील २७ जानेवारी १८८४ रोजी दिलेल्या भाषणात ते म्हणतात, "हिंदू व मुस्लिमांनी एक होऊन परस्पर सहकार्याने कार्य केले पाहिजे, हिंदू मुस्लिमांत एकी होणे ही काळाची गरज आहे. जर आपण एक झालो नाही तर दोघांचाही नाश झाल्याशिवाय राहणार नाही असे विचार मांडले होते." तसेच ते म्हणतात, "इस्लाम धर्मियांनी पाश्चात्य शिक्षणाचा अवलंब केला पाहिजे, त्यात इस्लामविरोधी असे काही नाही. मुस्लिम तरुणांनी बुद्धीवादी व आधुनिक दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे, व्यापाराकडे लक्ष दिले पाहिजे, स्त्रियांनी पडदा पद्धत झुगारून इंग्रजी शिक्षण घ्यावे, अन्यथा राजकीय, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात आपली अधोगती झाल्याशिवाय राहणार नाही. मुस्लिम समाजात जागृती होण्यासाठी त्यांनी अनेक लेख लिहिले, पत्रके काढली, पुस्तके लिहिली.९ नेताजींचे कार्य महाराणा प्रताप व छत्रपती शिवाजी महाराज हे नेताजींचे आदर्श होते.१० नेताजींच्या आझाद हिंद सरकारमधील सदस्यांत जगन्नाथराव भोसले, शाहनवाझ खान, गुरुबक्षसिंग धिल्ला, प्रेम कुमार सहगल व डॉ. लक्ष्मी स्वामीनाथन यांचा सहभाग होता.११

सन १९७० पासून 'स्त्रीवाद' भारतात प्रस्थापित झाला, पण त्या आधी सन १९६० च्या दशकाच्या शेवटी आणि १९७० च्या सुरुवातीला देशात निर्माण झालेल्या राजकीय प्रक्षोभातून नक्षलवादी चळवळ, जेपींचे (जयप्रकाश नारायण) आंदोलन अशा नव्या राजकीय प्रवाहांना आणि चळवळींना जन्म दिला. सन १९७३ ते १९७५ या काळात महाराष्ट्राच्या शहरी भागातील कम्युनिस्ट आणि समाजवादी स्त्री कार्यकत्यांनी संघटित केलेल्या भाववाढविरोधी आंदोलनाच्या अंतर्गत सार्वजनिक मेळाव्यात हजारो महिलांनी सहभाग

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

घेतला होता. आणि ज्या स्त्रियांना घराबाहेर पडता आले नव्हते त्यांनी लाटणी हातात घेऊन थाळया वाजविल्या, हे आंदोलन गुजरातपर्यंत गेले आणि जयप्रकाश नारायण यांच्या 'संपूर्ण क्रांतीने' प्रभावित केलेल्या नवनिर्माण आंदोलनात सहभागी झाले. या आंदोलनामुळे स्त्रियांच्या प्रश्नांना प्रत्यक्ष चालना मिळाली नसली तरी आंदोलनात फार मोठ्या प्रमाणावर स्त्रिया सहभागी झाल्यामुळे त्यांच्यावरील निर्बंधांतून त्या काही अंशी मुक्त झाल्या. या आंदोलनामधून स्त्रियांवरील जुलूम कमी करता यावा यासाठी आवश्यक तो आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण झाला.

सेवा (सेल्फ एम्प्लॉईड वुमेन्स असोसिएशन)

याच काळात गुजरातमध्ये कापड कामगार संघटना या गांधीवादी संघटनेच्या महिला आघाडीची स्थापना झाली, या संघटनेचे नाव सेवा असे होते. पुढे काळाच्या ओघात ही संघटना कापड कामगार संघटनेपासून स्वतंत्र झाली. ती एक महत्वपूर्ण संस्था होती, कारण या संस्थेने किरकोळ विक्रेत्या व फेरीवाल्या या असंघटित क्षेत्रातील महिलांना संघटीत करून त्यांची एक संघटना निर्माण केली, आणि त्यांना सामूहिक सौदेबाजीबरोबर प्रशिक्षण, पतपैसा आणि तांत्रिक मदत देण्याची व्यवस्था केली. 'सेवा'चा प्रसार नंतर इंदोर, भोपाळ, दिल्ली आणि लखनौमध्ये झाला. आजही इला भट यांच्या नेतृत्वाखाली ही संघटना कार्यरत आहे.

माओवादी स्त्रियांची चळवळ

१९७२ साली महाराष्ट्राच्या नंदुरबार जिल्ह्यातील शहादा या आदिवासी भागात एक वेगळया स्वरूपाचे आंदोलन सुरू करण्यात आले. सुरुवातीस गांधीवादी सर्वोदयी कार्यकत्यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेले आणि नंतर माओवादी चळवळीच्या नेतृत्वाखाली चालविले गेलेले हे आंदोलन दुष्काळात मदत मिळविण्यासाठी सुरू झाले होते आणि त्यात आदिवासी भिल्ल स्त्रियांचा महत्वाचा सहभाग होता. त्याचे पर्यवसान दारूविरुद्धच्या मोहिमेत झाले. दारू हेच बायकोला मारझोड करण्यामागचे प्रमुख कारण असल्यामुळे स्त्रियांनी दारूच्या गुत्त्यांमधील दारूची भांडी फोडली आणि पत्नीला मारझोड करणाऱ्या पुरुषांना सार्वजनिक शिक्षा करण्यासाठी मोर्चे काढले. देशाच्या निरनिराळया भागांत दारूविरोधी आंदोलने अधूनमधून होतच राहिती, त्यांपैकी एक अगदी अलीकडील आंदोलन आंध्रप्रदेशात सन १९९० च्या दशकाच्या मध्यास झाले. तेथे ग्रामीण महिलांनी चालविलेल्या दारूविरोधी चळवळीची अशी एक मोठी लाट आली की, शासनाला प्रथम दारुबंदीचे धोरण जाहीर करावे लागून नंतर दारूच्या विक्रीवर निर्बंध घालावे लागले. स्वातंत्र्य आंदोलन काळात स्त्रियांचे कार्य लक्षात घेऊन महात्मा गांधी यांनी दारूवरील बहिष्कार हा राष्ट्रीय कार्यक्रमाचा अविभाज्य भाग बनवून त्याची अंमलबजावणी स्त्रियांकडे सोपविली होती.

उत्तराखंडातील स्त्रियांचे चिपको आंदोलन

सन १९७४ पासून उत्तराखंडातील स्त्रिया पूर्वीप्रमाणे चिपको आंदोलनात पुन्हा भाग घेऊ लागल्या. इमारती लाकडाच्या ठेकेदारांना झाडे तोडण्यास अटकाव करण्यासाठी झाडांना चिकटून राहण्याच्या स्त्रियांच्या कृतीमुळे 'चिपको' हे नाव या आंदोलनास मिळाले. पर्यावरणाचे रक्षण करणारे पहिले मोठे आंदोलन माणून ते प्रसिद्ध झाले आणि स्त्रियांना निसर्गाच्या रक्षणात एक विशेष भूमिका पार पाडायची आहे हेही या आंदोलनामुळे लक्षात आले. वास्तविक पाहता पर्यावरणाचे प्रश्न हे बऱ्याच वेळा स्त्रियांचेच प्रश्न असतात आणि त्याचा ऱ्हास झाल्यास स्त्रियांच जास्त त्रास सहन करावा लागतो. उदा., जेव्हा वने नाहीशी होतात तेव्हा स्त्रियांनाच सरपण व चारा गोळा करण्यासाठी आणि पाण्यासाठी लांबवर पायी जावे लागते.

छत्तीसगड खाणी-श्रमिक महिला संघ-

मध्य प्रदेशातील छत्तीसगडमध्ये भिलाई पोलाद कारखान्याच्या यांत्रिकीकरणाच्या धोरणाचा निषेध करण्यासाठी लेथील आदिवासी भागात १९७७ साली स्थापन झालेल्या छत्तीसगड श्रमिक महिला संघाच्या महिला कार्यकर्त्या खूपच लढाऊ वृत्तीच्या होत्या. भिलाई पोलाद कारखान्याच्या यांत्रिकीकरणाचे हे धोरण महिलांना मिळणाऱ्या रोजगारांच्या दृष्टीने हानिकारक असल्याने 'महिला मुक्ती मोर्चा' हे एक नवीन व्यासपीठ निर्माण झाले. १९७९ साली जयप्रकाश नारायण यांच्या विचारांनी प्रभावित झालेली 'छात्र-युवा-संघर्ष वाहिनी' ही संघटना बिहारच्या बोधगयेतील मंदिराच्या पुजाऱ्याविरुद्ध संघर्ष करणाऱ्या शेतमजुरांचे नेतृत्व करीत होती. या वाहिनीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या स्त्री-कार्यकर्त्या आणि सर्वसामान्य महिलांनी अशी मागणी केली की, जमिनीची लेखी नोंद स्त्रियांच्याही नावावर झाली पाहिजे.

भोपाळ गॅसपीडित महिला उद्योग संघटना

१९८४ साली भोपाळच्या 'युनियन कार्बाइड' या कारखान्यातील विषारी वायूच्या गळतीचे बळी झालेल्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याच्या कामी भोपाळ गॅसपीडित महिला उद्योग संघटना या संस्थेने महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली, सन १९८० पासून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या शेतकरी संघटनेची महिला आघाडी म्हणून सन १९८० च्या दशकात समग्र महिला आघाडीचा उदय झाला. नोव्हेंबर १९८६ मधील अधिवेशनास एक लाखापेक्षा अधिक संख्येने हजर असलेल्या महिलांनी अन्य विभागांपेक्षा स्त्रियांवर अधिक वाईट परिणाम करणाऱ्या राजकारणाच्या पाशवीकरणाविरुद्ध भूमिका घेतली, तसेच त्यांनी पंचायती आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुकांत केवळ स्त्रियांची पॅनल्स उभी करण्याचा निर्णय घेतला.

आंतरराष्ट्रीय महिला वर्ष (सन १९७५)

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

संयुक्त राष्ट्रसंघटनेने सन १९७५ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून जाहीर केले. पुण्याची पुरोगामी स्त्री-संघटना आणि मुंबईची स्त्रीमुक्ती संघटना यांनी सन १९७५ पर्यंत अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडली होती. सन १९७५ या वर्षी महाराष्ट्रात आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने बरेच कार्यक्रम हाती घेण्यात आले होते. सन १९७५ या वर्षी राजकीय पक्षांवर आधारलेल्या आणि 'स्वायत्ता' संघटनांनी ८ मार्च हा 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' म्हणून प्रथमच साजरा केला. पुण्यात ऑक्टोबर १९७५ मध्ये जी महिला परिषद घेण्यात आली. त्या वेळी राज्यभरातून आलेल्या माओवादी, समाजवादी, रिपब्लिकन पक्ष, मार्क्सवादी आणि लाल निशाण गटाच्या महिलांनी हजेरी लावली होती.

सन १९७७ च्या आणीबाणीनंतर आणखी एका झंझावती कार्यास सुरुवात झाली. दिल्लीतील महिलांच्या एका गटाने स्त्रियांच्या चळवळीत प्रदीर्घ काळ टिकून राहिलेली एक संस्था सुरु केली. 'मानुषी' या नियतकालिकाने महिला चळवळीची लेखी नोंद ठेवून तिचे विश्लेषण केले, तिचा इतिहास कथन केला, स्त्री-लिखित साहित्य प्रसिद्ध केले. मधुकीश्वर या आजही आपल्या कुशल नेतृत्वाखाली महिला चळवळीची धुरा समर्थपणे सांभाळीत आहेत.

समाजवादी स्त्रियांची चळवळ

जनता पक्षातील बहुतांश समाजवादी महिलांनी 'महिला-दक्षता समिती' स्थापन केली. दिल्ली येथील स्त्री-संघर्ष ही संघटना अधिक सक्रिय होती, तिने हुंडाविरोधी मोहिमेस सुरुवात केली, हुंड्यासाठी छळ आणि हुंडाबळीची कारणे सन १९७९ पासून रस्त्यावरील मेळावे, पथनाट्ये, हुंडाबळींच्या घराबाहेर निदर्शने आणि कायदेशीर सुधारणांच्या मागण्या या मार्गांनी मोठ्या प्रमाणावर करण्यात आल्या. मार्क्सवादी पक्षाच्या महिलांची आघाडी असलेली 'जनवादी महिला समिती' आणि १९८१ साली स्थापन झालेली 'आखिल भारतीय लोकशाही संघटना'यांनी या प्रश्नावर दारोदार मोहीम सुरु केली. हुंडा प्रतिबंधक कायद्याला (१९६१) दुरुस्ती करणारे विधेयक संसदेच्या संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात आले. महिला संघटना आणि अन्य कार्यकत्यांनी सन १९८१-८२ या काळात देशभर फिरून पुरावे गोळा केले व ते समितीला सादर केले. हुंड्याशी संबंधित गुन्हे करणाऱ्यांविरुद्ध कायदा बळकट करणाऱ्या दुरुस्त्या १९८४ साली मंजूर करण्यात आल्या. पुढे त्यात आणखी काही दुरुस्त्या करण्यात आल्या, यानंतर हुंडाविरोधी चळवळीस उतरती कळा लागली आणि हुंड्याची प्रथा टिकून राहिल्याने आणि गुन्हेगारांना दोषी ठरविताना येणाऱ्या अडचणींमुळे फारसे काही साध्य झाले नाही.

बलात्कारविरोधी चळवळ

यानंतर स्त्रियांवर होणाऱ्या बलात्काराचा प्रश्न हाती घेण्यात आला. त्यातही पोलिसांनी केलेल्या बलात्काराचा १९७८ मधील हैद्राबादच्या रमीक्षाबीचे प्रकरण, महाराष्ट्रातील मथुरेचे प्रकरण आणि सन १९८० मधील पश्चिम उत्तर प्रदेशातील माया त्यागी प्रकरण अशा अनेक प्रकरणांनी जनतेचे लक्ष वेधून घेतले. महिलांचे गट आणि संघटना व मुख्य प्रवाहातील राजकीय पक्ष या सर्वांनी निदर्शनास आणून दिल्यामुळे बलात्कारविषयीच्या प्रचरिका कायद्यात दुरुस्ती करणारे एक विधेयक १९८० साली लोकसभेत मांडण्यात आले. ते १९८३ साली मंजूर झाले, त्यातील एका मुख्य बदल असा होता की, बलात्काराच्या अन्य प्रकारापेक्षा पोलीस कोठडीतील बलात्कारास अधिक घृणास्पद गुन्हा मानून पुराव्याची जबाबदारी बळी गेलेल्या स्त्रीऐवजी आरोपीवर टाकण्यात आली. त्यामुळे गुन्हेगारावरील आरोप सिद्ध होण्याची शक्यता अधिक वाढली. या मोहिमेतील विचारसरणी आणि ध्येयधोरणांमधील मतभेदांमुळे महिला चळवळीत फूट पडली,

हुंडाविरोधी आणि बलात्कारविरोधी चळवळीमुळे आंदोलनातील जोर काही काळ संपल्यासारखा वाटला, पण १९८५-८६ मध्ये शाहबानो प्रकरणाचा निषेध करण्यात आला. तरी त्यापूर्वीचा उत्साह आणि ऐक्य भावना नव्हती. हा प्रश्न जातीध स्वरूपाचा असल्यामुळे अधिक कठीण झाला होता, त्यात पुन्हा मुस्लीम व्यक्तित्वाचे प्रश्न स्त्रियांच्या अधिकारांशी जोडले गेले आणि मुस्लीम स्त्रियांच्या अधिकारांबद्दल हिंदू जातीयवाद्यांनी प्रमाणापेक्षा अधिक उत्साह दाखविल्यामुळे महिलांच्या अधिकारांसाठी आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्या गोंधळल्या. आणि त्या-त्या प्रश्नाबद्दल काहीही करण्यास असमर्थ ठरल्या.

'स्वायत्त' महिलांच्या धोरणात बदल

सन १९८० च्या दशकात स्वायत्त महिलांच्या गटाच्या धोरणात महत्त्वपूर्ण बदल झाले. मोठया संख्येने महिलांचे मेळावे भरविण्याऐवजी कायदेशीर मदतीसाठी महिलांची केंद्रे उभारणे, सल्ला देणे, माहिती गोळा करून संशोधन आणि प्रकाशन करणे अशा प्रकारचे कार्यक्रम हाती घेण्यात आले. त्याचे एक कारण म्हणजे कायदेशीर सुधारणांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या मोहिमा महिलांचे प्रश्न सोडविण्यात अपयशी ठरल्या होत्या,

सहेली

दिल्लीच्या 'सहेली' सारख्या महिलांच्या अनेक गटांना असे वाटले की, स्त्रियांच्या समस्यांवरच फक्त प्रकाशझोत टाकणे गरजेचे नसून त्यांचे जीवनही आनंदी व उत्साही बनविले पाहिजे. म्हणून त्यांनी स्त्रियांना संगीत, नृत्य उराणि कलेच्या माध्यमातून स्वतःला व्यक्त करण्यास उत्तेजन दिले. अन्य गटांनी मासिके काढली, स्त्रियांची मानहानी करणाऱ्या प्रसारमाध्यमांतील जाहिराती आणि चित्रपटांचे

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

निरीक्षण करण्याचे पहारेकऱ्याचे काम केले, स्त्रियांच्या आरोग्यासंदर्भात लेखन केले. झोपडपट्टीत राहणाऱ्या स्त्रियांच्या घरांसाठी आणि पिण्याच्या पाण्यासाठी योजना तयार केल्या.

अन्वेषा

हैदाबादमध्ये स्त्रियांच्या प्रश्नांच्या सात्विक अभ्यासासाठी एक व्यासपीठ म्हणून अन्वेषाची स्थापना केली. दिल्लीच्या स्त्री-विकास अभ्यासकेंद्राने माहितीचे संकलन आणि संशोधनास उत्तेजन दिले आणि पुढील काळात लैंगिक अभ्यासाशी संबंधित माहितीपुस्तिका नियतकालिक सुरु केले. १९९० च्या दशकात विद्यापीठांच्या माध्यमातून अनेक केंद्रे सुरु झाली. विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात स्त्रीविषयक अभ्यासाचा समावेश करता येईलइतके संशोधन आणि लेखन बऱ्याच मोठया प्रमाणावर करून ठेवले आहे.
स्त्रीवादी चळवळीविषयी काही कार्यकत्यांना वाटते तशी चळवळीची तीव्रता कमी झाली नाही तर सामाजिक व्याप्ती वाढली आहे. व्याप्ती वाढल्यामुळे साहजिकच या चळवळीची धार थोडी बोथट झाली आहे. उद्दिष्टे, रणनीती, कार्यपद्धती यातील ऐक्याचा अभाव तसेच डाव्यांनी दिलेली कंपूशाहीची देणगी आणि कृतीकार्यक्रमावरएकमत मिळविण्याऐवजी तात्कालिक संकटावर प्रतिक्रिया देण्याची वृत्ती यामुळे काही अंशी चळवळीचे नुकसान झाले आहे. परदेशी संस्थांकडून मिळालेल्या पैशाचा प्रभाव काही संघटनांवर पडला आणि त्यांनी भारतातील चळवळीशी संबंध नसलेले पण देणगीदारांच्या दृष्टीने खूप महत्वाचे असलेले प्रश्न बऱ्याच अंशी सोडविले, असाही एक आरोप करण्यात येतो. व तो काही अंशी खरा आहे. शहरातील सुशिक्षित महिलांचे गट आणि ग्रामीण किंवा शहरातील गरीब महिलांचे गात यातील दरी काही बाबतीत कमी झाली आहे पण अजून ती मिटलेली नाही.

निष्कर्ष

याचा अर्थ स्त्रीवादी चळवळीचे सर्व प्रयत्न वाया गेले असे मुळीच नाही. या चळवळीचा शासनाच्या धोरणावर निश्चितच परिणाम झाला होता, स्त्रियांचे आरोग्य, शिक्षण आणि राजकीय सहभागासाठी १९८८ साली एक सविस्तर राष्ट्रीय योजना तयार करण्यात आली. ती १९८९ साली मांडण्यात आली. त्यानुसार थोडया उशिरा का होईना पण १९९३ साली पंचायतराज्य विधेयकाने पंचायतीमध्ये स्त्रियांसाठी एकतृतीयांश जागा राखीव ठेवल्या.तसेच 'महिलाकोष' नावाची आणखी एक अभिनव योजना सुरू करण्यात आली. त्याचा फायदा आजपर्यंत अनेकांनी घेतला. स्थानिक आणि राष्ट्रीय राजकारणातील स्त्रियांचा सहभाग वाढवा म्हणून सातत्याने प्रयत्न चालू आहे. पंचायातीमधील एक तृतीयांश जागा राखीव ठेवल्यात आल्यामुळे पंचायातीच्या स्त्री सभासदांना आणि ग्रामसेवकांना आपल्या नव्या भूमिका पार व्यवस्थित पार पडण्यासाठी विशेष प्रशिक्षण देण्यात आले होते. संसदेत देखील एक तृतीयांश जागा स्त्रियांसाठी राखीव ठेवण्यात याव्यात असा प्रयत्न सुरु आहे. पण आजपर्यंत त्यास प्रत्यक्ष मान्यता मिळालेली नाही. भविष्यकाळात मिळण्याची आशा आहे.

संदर्भग्रंथ व तळटीपा

१) आधुनिक भारत (१८८५ ते १९९२) : ले. डॉ. एस. एन. तांबोळी, निराली प्रकाशन पुणे. प्रथमावृत्ती जून २००९, पृ. ७.२१ जुलै
२) सावित्रीबाई फुले- समग्र वा:डमय : (संपा) डॉ. मा.गो. माळी, प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, द्वितीयावृत्ती मार्च १९९८, कविता क्र. ५
३) सावित्रीबाई फुले- समग्र वा:डमय : कित्ता काव्य फुले कविता १३
४) ग्राहकहित दिवाळी विशेषांक : (संपा) सूर्यकांत पाठक, प्रकाशन ग्राहक पेठ, ग्राहक भवन पुणे- 30. वर्ष ३२ वे ऑक्टोबर 2025. पृ. २७७
५) ग्राहकहित दिवाळी विशेषांक : कित्ता पृ. २७७
६) ग्राहकहित दिवाळी विशेषांक : कित्ता पृ. २७७
७) आधुनिक भारत (१८८५ ते १९९२) : ले. डॉ. एस. एन. तांबोळी, निराली प्रकाशन पुणे. प्रथमावृत्ती जून २००९, पृ. ३.१४
८) आधुनिक भारत (१८८५ ते १९९२) : कित्ता पृ. ३.१५
९) आधुनिक भारत (१८८५ ते १९९२) : कित्ता पृ. ४.६
१०) आधुनिक भारत (१८८५ ते १९९२) : कित्ता पृ. ४.१५
११) आधुनिक भारत (१८८५ ते १९९२) : कित्ता पृ. ४.१७

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

Original Article

दलित आत्मकथनांचा नैतिक मूल्यांचा अभ्यास

रितेश सुकदेव साळुंके [1] डॉ. सचिन अशोक पाटील [2]

[1]संशोधक , कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, धरणगांव जि. जळगांव

[2]मार्गदर्शक , डी.डी.एस.पी., कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, एरंडोल जि. जळगांव-

Manuscript ID:
JRD -2026-180250
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 2 (XIV)
Pp. 228-230
February 2026
Submitted: 30 Jan. 2026
Revised: 04 Feb. 2026
Accepted: 14 Feb. 2026
Published: 28 Feb. 2026

सारांश

प्रस्तुत शोधनिबंधात दलित आत्मकथनांमधील नैतिक मूल्यांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि इतर समाजसुधारकांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन दलित साहित्याने १९६० नंतर मराठी साहित्यात एक क्रांतिकारी बदल घडवून आणला. दलित आत्मकथने ही केवळ वैयक्तिक वेदनांची मांडणी नसून, ती सामाजिक अन्याय, शोषण आणि जातीव्यवस्थेतील विषमतेचे वास्तव चित्रण करतात. या अभ्यासात प्रामुख्याने लक्ष्मण माने यांचे 'उपरा', दया पवार यांचे 'बलुतं' आणि शरणकुमार लिंबाळे यांचे 'अक्करमाशी' या तीन प्रमुख आत्मकथनांचे विश्लेषण केले आहे. 'उपरा' मधून भटक्या विमुक्त समाजाचा संघर्ष, शिक्षणाचे महत्त्व आणि आत्मसन्मानाची जाणीव अधोरेखित होते. 'बलुतं' मध्ये बलुतेदारी पद्धतीतील आर्थिक-सामाजिक शोषण आणि दलित स्त्रियांच्या दुहेरी शोषणाचे चित्रण आढळते. 'अक्करमाशी' मधून सामाजिक गुलामगिरीविरुद्धचा लढा, सत्यनिष्ठा आणि मानवी प्रतिष्ठेचा आग्रह दिसून येतो. एकंदरीत, ही आत्मकथने स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय यांसारखी मानवी मूल्ये रुजवून समाजात परिवर्तनाची प्रेरणा देतात आणि वाचकाला आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडतात.

कीवर्ड्स: *दलित साहित्य , आत्मकथन , नैतिक मूल्ये , सामाजिक न्याय , आत्मसन्मान , जातीव्यवस्था , संघर्ष , शिक्षण , समता व बंधुता , मानवी प्रतिष्ठा सामाजिक परिवर्तन*

प्रस्तावना :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले,, महात्मा बसवेश्वर, राजर्षी शाहू महाराज, संत गाडगे बाबा इ. समाजसुधारकांनी दलित समाजाचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, इ. स्वरूपाचा विकास होण्याच्या दृष्टीने पुढाकार घेतलेला आपणांस दिसून येतो. पुढे या समाजसुधारकांपासून प्रेरणा घेवून भारतातील दलित समाजातील साहित्यिकांनी उदा. बाबुराव बागुल, दया पवार, शरणकुमार लिंबाळे, नामदेव ढसाळ, लक्ष्मण गायकवाड, लक्ष्मण माने, नरेंद्र जाधव, किशोर काळे, शांताबाई कांबळे, बेबी कांबळे, उर्मिला पवार इ. यांनी आपल्या साहित्यातून दलितांसदर्भात आपले विचार स्पष्टपणे समाजासमोर सादर केलेत या विचाराने दलितांवरील अन्याय व शोषण या संदर्भात दलित साहित्यातून वास्तव चित्रण समाजासमोर सादर केले गेलेत. अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्वांचे अनुकरण करून १९६० नंतर दलित साहित्य, ग्रामिण साहित्य, आदिवासी साहित्य आणि स्त्रीवादी साहित्य असे अन्य साहित्य प्रवाह प्राध्यान्याने मराठी साहित्यात आले. त्यातीलच दलित आत्मकथन हा मराठी साहित्यामधील प्रभावी साहित्य प्रकार आहे. दलित आत्मकथनं फक्त वैयक्तिक जीवनाचे चित्रण नसून, ते समाजामधील अन्याय, शोषण आणि जातींमधील विषमता दाखवते.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
रितेश सुकदेव साळुंके, संशोधक , कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, धरणगांव जि. जळगांव

How to cite this article:
साळुंके, . रितेश . सुकदेव ., & पाटील, . सचिन . अशोक . (2026). दलित आत्मकथनांचा नैतिक मूल्यांचा अभ्यास. *Journal of Research and Development,* 18(2(*XIV*)), 228–230. https://doi.org/10.5281/zenodo.18800403

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.18800403

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

दलित लेखकांनी अनुभवलेल्या वेदना, अपमान, संघर्ष इ. सत्य आणि प्रामाणिक वर्णन या आत्मकथनांमध्ये आढळते. या आत्मकथनांमधून विविध नैतिक मूल्ये जाणवतात जसे की, माणुसकीचे भान, आत्मसन्मान, सामाजिक न्याय, संघर्ष समानता या मूल्यांचा कक्षा हया केवळ दलित समाजापुरत्या मर्यादित नसून ते इतर समाजाला दिशा देणारी आणि समाजामध्ये परिवर्तन घडविण्यासाठी प्रेरणा देणारी ठरतात. समता, न्याय दलित आत्मकथांमधून संदेश देणाऱ्या नैतिक मूल्यांचा अभ्यास करतांना, आताचा सामाजिक संरचना, सामाजिक चळवळ, मानसिक जागृती यांचा विसंगती बाबत आपणांस विचार करता येईल. ही आत्मकथनं फक्त ठराविक समाजाची कथा सांगत नाहीत, तर ते नविन समाज आणि नविन मूल्यव्यवस्थेचे निर्माण कसे करावे हे शिकवतात. अशा या दलित आत्मकथनं अभ्यासतांना त्यामधील नैतिक मूल्यांचा शोध घेणे ही आजचा काळाची गरज आहे. त्यामागील कारण म्हणजे हि मूल्यं आज देखील समाजामध्ये न्यायाच्या आणि समानतेच्या उभारणीसाठी आवश्यक आहेत.

उद्दिष्टे :-

१) ग्रामीण, शहरी आणि सीमेपार दलित आत्मकथनांमधील नैतिक मूल्यांचा अभ्यास करणे.
२) दलितांच्या अस्तित्वाची आणि आत्मसन्मानाची जाणीव करून देणे.
३) काल्पनिक कथांपेक्षा वास्तव जीवनांवर आधारित साहित्य निर्माण करणे.
४) दलित आत्मकथनांमधील समाज प्रबोधनपर मूल्यांचा अविष्कार करणे.
५) एकविसाव्या शतकामधील सामाजिक वास्तव मूल्यांवर प्रकाश टाकणे.

दलित आत्मकथनांतील नैतिक मूल्यांचे विषय विवेचन :-

दलित आत्मकथनांमध्ये मराठी साहित्य प्रकारांमधील एक क्रांतिकारी वाटचाल आपणांस जाणवते. दलित समाजाचा संघर्ष, वेदना, स्वाभिमान तसेच सामाजिक वास्तवाचे चित्रण मांडलेले आपल्याला आढळते. या साहित्यप्रकारात अनेक नैतिक मूल्यं आढळुन येतात जसे की, सामाजिक न्याय, बंधुता, समता, स्वाभिमान, शिक्षण, संघर्ष, सामाजिक परिवर्तनाची दिशा इ. दलित आत्मकथनांमधील सर्वात महत्वाचे वैशिष्टये म्हणजे निर्भीड कटू सत्य मांडलेले असते. ही आत्मकथंनं सौदर्यदृष्टिकोन मांडत नसून समाज वास्तव जसे आहे तसे मांडण्याचा प्रयत्न यामध्ये केलेला दिसतो. या आत्मकथांमध्ये अस्पृश्यता, जातीभेद सामाजिक विषमतेचा विरूध्द तीव्र निषेध आपणांस पहावयास मिळतो.

लक्ष्मण माने यांच्या 'उपरा' या आत्मकथनात भटक्या जमातीमधील स्वाभिमान जो अनेक पिढयांपासून नाकारला गेला होता, तो स्वाभिमान या आत्मकथनात जागृत होतांना दिसतो. या आत्मकथनामध्ये माणूस हा केंद्रस्थानी आहे. या आत्मकथनांमध्ये सामाजिक बहिष्कार असून देखील आपल्या स्वतःच्या अस्तित्वाचा स्वाभिमान टिकवण्याचा संघर्ष या आत्मकथनांमध्ये दिसतो. त्याचप्रमाणे हे आत्मकथन निराशावादी न राहता परिवर्तनवादी आहे. या आत्मकथनांमध्ये केंद्रस्थानी असलेले नैतिक मूल्य म्हणजे आत्मसन्मान. यामध्ये लहानपणापासूनच समाजाने भिकारी, चोर, असभ्य असे शब्दप्रयोग केलेले असतानाही स्वतःच्या अस्तित्वावर विश्वास ही नैतिकभूमिका त्याच प्रमाणे जातिव्यवस्थेमुळे निर्माण झालेली विषमता यामध्ये अधोरेखित होते. तसेच सामाजिक न्याय मिळवण्यासाठी संघर्ष करणे. भटक्या समाजातील अमानवी वागणूक वाचकाला अस्वस्थ करणारी आहे. लेखकाच्या संवेदनशील दृष्टीमधून माणसाचे दुःखाचे महत्व यामध्ये प्रकर्षाने जाणवते. मानवी जीवन जगत असतांना शिक्षणासाठी, पोटासाठी आणि अस्तित्वासाठी लेखकाने केलेला संघर्ष हा वाईट परिस्थितीला सामोरे जाणे हे या आत्मकथनांमध्ये अधोरेखित होते. या आत्मकथनांमध्ये शिक्षणांला मुक्तीचे साधन मानले आहे. योग्य शिक्षण घेतल्यानेच सामाजिक व वैचारिक स्वातंत्र मिळते. हे यामध्ये प्रभावीपणे मांडलेले नेतिक मूल्य आहे. उपरामध्ये भटक्या समाजव्यवस्थेमध्ये परस्पर सहाय्य करणे, एखादयाचे दुःखीवेदना सामायीकीकरण करणे, जीवन जगण्याची सामूहिक पध्दती यामधून बंधुतेचे मूल्य लेखक ठळकपणे मांडतात. उपरा या आत्मकथनांचे लेखन हे अतिशय प्रामाणिक आहे. स्वजीवनातील वास्तव निर्भीडपणे मांडणे हे देखिल एक प्रकारचे नैतिक मूल्यंच आहे.

दया पवार यांच्या 'बलुतं' या आत्मकथनांचा मुख्य विषय म्हणजे बलुतदारी पध्दतीमध्ये अन्यायकारक सामाजिक, आर्थिक शोषण करणारी व्यवस्था यामध्ये लेखकाने मांडलेली आहे. यामध्ये माणूस म्हणून नव्हे, तर एका विशिष्ठ जातीचा म्हणून शाळा, विहीर, देवळे, सार्वजनिक ठिकाणे इ. सर्वत्र ठिकाणी दुय्यम स्वरूपाची वागणूक मिळते. यामध्ये अन्न, वस्त्र, निवारा यासाठी सततचा संघर्ष दिसून येतो. त्याचप्रमाणे शिक्षण हे मुक्तीचे साधन आहे अशी जाणीव असून देखील केवळ जातीय भेदभावामुळे शिक्षण घेणे कठीण बनते. शाळेमधील अपमान, उपेक्षा आणि अडथळयांवर मात करून शिक्षण घेण्याचा संघर्ष हा बलुतं मधील एक प्रेरणेचा विषय आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही स्वाभिमानाने जीवन जगणे हे या आत्मकथनांचा केंद्रबिंदू आहे. बलुतं या आत्मकथनांमध्ये आई-वडील, भावंडे यांचे संघर्षपूर्ण वास्तववादी जीवनपट मांडलेला आहे. यामध्ये विशेषतः दलित स्त्रीचे दुहेरी शोषण हे जात आणि त्याकाळात असलेले स्त्रीयांना दुय्यम स्थान या दोन्ही पातळयांवर झाल्याचे स्पष्टपणे दिसते. यामध्ये आईचे कष्ट, सहनशीलता आणि त्याग हा महत्वपूर्ण विषय यामध्ये आहे. तसेच यामध्ये एकीकडे त्याकाळी समाजात रूढ असलेल्या अंधश्रध्दा, भीती आणि परंपरा हे यामध्ये मांडलेल्या आहेत. तर

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-2(XIV)| February- 2026

दुसरीकडे मात्र या रूढींविरोधात उभे राहण्याची भूमिका देखील पाहवयास मिळते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विचारांचा वारसा चालू ठेवून आत्मसन्मान, आपल्या हक्काची जाणीव आणि सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा हे देखील या आत्मकथनाचे नैतिक मूल्यंच आहे.

शरणकुमार लिंबाळे यांचे 'अक्करमाशी' हे मराठी साहित्यामधील प्रखर वास्तव मांडणारे आत्मकथन आहे. या आत्मकथनांत सामाजिकदृष्टया दुय्यम, समाजाने नाकारलेली ओळख, अस्तित्व हे सर्व असून देखील माणूसम्हणून जगण्याचा हक्क हा या आत्मकथनांचा मुळ गाभा आहे. शरणकुमार लिंबाळे यांनी स्वतः विषयी लिहतांना जीवनांतील आलेल्या अनुभवांची कोणत्याही प्रकारे लपवाछपवी न करता या आत्मकथनांमध्ये मांडलेले आहे. या आत्मकथनांमध्ये स्वतःचे दोष, दुर्बलता आणि सामाजिक वास्तव खुलेपणाने मांडण्याचे धैर्य यामध्ये पाहवयास मिळते. यामध्ये दारिद्रय, उपेक्षा आणि अपमानाच्या परिस्थितीतही आपला आत्मसन्मान जपून स्वतःच्या अस्मितेसाठी संघर्षमय जीवन आणि स्वाभिमान हा या आत्मकथनामधील नैतिक मूल्यांचा कणा आहे. हे आत्मकथन जरी तीव्र वास्तव मांडत असले तरी त्यामध्ये मानवी संवेदनशीलता मोठ्या प्रमाणात आढळते. यामध्ये आपल्या परिवारांविषयीची काळजी हे करूणेचे नैतिक मूल्य अधोरेखित करते. अज्ञान, अंधश्रध्दा आणि सामाजिक गुलामगिरीतून मुक्त होण्याचे महत्वाचे साधन म्हणजे शिक्षण आहे. अशी नैतिक शिकवण हे आत्मकथन देते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ही मूल्ये 'अक्करमाशी' च्या नैतिक भूमिकेचा पाया आहेत. हे आत्मकथन सामाजिक परिवर्तनाची नैतिक दिशा दर्शवते. या आत्मथनांत निर्भीड सत्यनिष्ठा हे एक महत्वाचे नैतिक मूल्य आहे.

निश्कर्ष :-

'उपरा' या आत्मकथनामध्ये भटक्या विमुक्त समाजाच्या दारिद्रय, उपेक्षा, असुरक्षितता आणि नेहमीचा स्थलांतराचा संघर्ष त्याचपध्दतीने समाजव्यवस्थेमधील भेदभाव, संशयाची वागणूक, पोलीसांचा छळ, जीवनाचे वास्तववादी दर्शन प्रभावीपणे या आत्मकथनांत मांडले आहे. यामध्ये मानवी अपमान, तिरस्कार अवहेलना इ. सहन करून देखील माणूस म्हणून जगण्याचा मानवी प्रतिष्ठा हा या आत्मकथनांचा केंद्रबिंदू आहे. शिक्षणामुळे आयुष्यात परिवर्तन घडवून आत्मभान, विचारशक्ती, आणि सामाजिक जाण निर्माण झाल्याचे या आत्मकथनांमध्ये दिसते. भटक्या विमुक्त समाजाच्या समस्यांकडे समाज आणि शासन या दोघांनीही गांभीर्यान लक्ष देण्याची गरज असून समाज सुधारनेचे आवाहन देखील यामध्ये दिसते. 'उपरा' हे आत्मकथन मराठी दलित साहित्याला वेगळी दिशा देणारे आत्मकथन ठरते. हे आत्मकथन भटक्या विमुक्त समाजाच्या वेदनां मांडतांना मानवी हक्क, आत्मसन्मान, शिक्षण आणि सामाजिक न्याय यांचा आग्रह धरून समाजाला आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडते.

'बलुत' या आत्मकथनामध्ये समाजव्यवस्थेमधील जातीय शोषण, दारिद्रय, अपमान, शिक्षणासाठी केलेला संघर्ष आणि आत्मसन्मान इ. विषयांचे प्रभावी विवेचन आढळते. या आत्मकथन दलित समाजाच्या वेदनांची मांडणी केलेली दिसते. हे आत्मकथन समाजामधील अन्यायकारक जाती व्यवस्थेवर तीव्र प्रहार करते. या आत्मकथनांमध्येबलुतदारी पध्दत ही केवळ उपजीविकेची व्यवस्था नाही. ती दलित समाजामधील सामाजिक, आर्थिक, मानसिक, शैक्षणिक शोषणाची परंपरा असल्याचा ठाम निष्कर्ष या आत्मकथनामधून समोर येतो. या आत्मकथनामधून दलित स्त्रीवर होणारे जातीय व लैंगिक शोषण यामधून समोर येते. हे आत्मकथन संपूर्ण दलित समाजाच्या वेदनांचे सामाजिक दस्तऐवज बनते. हे आत्मकथन समाजपरिवर्तनाची जाणीव जागवणारे साहित्य सिध्द होते.

'अक्करमाशी' हे आत्मकथन आत्मसन्मान, शिक्षण, सत्यनिष्ठा, शिक्षण आणि सामाजिक न्याय यांचा नैतिक आग्रह धरते. समाजाला आत्मपरीक्षण व परिवर्तनासाठी प्रवृत्त करणारे प्रभावी साहित्य ठरते. हे आत्मकथन वैयक्तिक जीवनकथा न रहाता दलित समाजाचा वेदना, संघर्ष आणि नैतिक मूल्यांचे प्रतिनिधित्व करते. शिक्षणामुळे लेखकाला शिक्षणामुळे विचारशक्ती, सामाजिक जाण आणि स्वतःची ओळख मिळते. लेखकाने स्वतःच्या जीवनातील वेदनादायी, कडू व अस्वस्थ करणारे अनुभव हे निर्भीडपणे मांडलेले दिसून येतात. मानवी प्रतिष्ठा जपणे हे नैतिकदृष्या आवश्यक आहे. असा निष्कर्ष हे आत्मकथन सांगते. समाजाने जातीय * व्यवस्थेनुसार माणसाच्या अस्तित्वावर लादलेले निर्बंध यामध्ये स्पष्ट होतांना आपल्याला दिसते. दलित स्त्रीवर होणारे अन्याय, अत्याचार हे समाजामधील विसंगतीचे गंभीर दर्शन या माध्यमातून पाहण्यास मिळते. त्यामुळे हे आत्मकथन नैतिक मुल्यांची जाणीव जागवणारी साहित्यकृती ठरते.

संदर्भ :-

१. उपरा - लक्ष्मण माने - मेहता प्रकाशन, कोल्हापुर
२. बलुतं - दया पवार - ग्रंथाली प्रकाशन, मुंबई
३. अक्करमाशी - शरणकुमार लिंबाळे - दिलीपराज प्रकाशन, पुणे
४. दलित आत्मकथने चिंतन आणि चर्चा डॉ. रविंद्र केदार आणि डॉ. गोपाल ढोले- अथर्व प्रकाशन, जळगांव
५. दलित साहित्य उगम आणि विकास डॉ. योगेश मेश्राम श्री मंगेश प्रकाशन
६. दलित साहित्याचा इतिहास प्राचार्य डॉ.म.सु.पगारे - प्रशांत प्रकाशन, जळगांव